ग्र. सं. छ.
विषय चरित्र
सं. क्र.


॥ श्री विठ्ठल ॥

# श्रीसंत चोखामेळा महाराज यांचें चरित्र
व
# अभंग गाथा



REFBK-0017373

संपादक श्री. स. भा. कदम

७१५६९ संदर्भ
३१।३।८०। चारित्र

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थूलक्रम
अनुक्रम ७१५६९ वि: चारित्र
क्रमांक १५१५ नोंद दि ३१।३।८०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ७९५६१ वि० चरित्र

॥ श्रीविठ्ठल ॥
क्रमांक ९५९५ नोंद दि० ३१३१५-

# श्रीसंत चोखामेळा महाराज यांचें चरित्र

व

# अभंग गाथा

[ सोयराबाई, कर्ममेळा, बंका व निर्मळा यांच्या अभंगांसह ]

प्रास्ताविक :— गु. शं. वा. तथा सोनोपंत दांडेकर, एम्. ए.

★

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१०३६७

संपादक : श्री. स. भा. कदम

REFBK-0017373

किंमत ६ रुपये

● प्रकाशिका :

**सौ. मंदाकिनी स. कदम**
३५ ए, भिमडीवाला बिल्डिंग,
वरळी नाका, मुंबई १८.

( ह्या आवृत्तीचे सर्व हक्क प्रकाशिकेच्या स्वाधीन राखून ठेविले आहेत )

● पुस्तक मिळण्याचें ठिकाण :

३५ ए, भिमडीवाला बिल्डिंग,
वरळी नाका, मुंबई १८.

मूळकल्पनाकार : **श्री. श्रावणबुवा गंगाधर कांवळे**, आळंदीक्षेत्र
चोखामेळा चित्रकार : **श्री. सखाराम धोंडिबा शिंदे**, शिगवण
छायाचित्रकार : **श्री. तानाजी श्रीपतराव काळे**, बारामती

● मुद्रक :

**चिंतामणि र. देसाई**
न्यू भारत प्रिंटिंग प्रेस,
६, डॉ. भालेराव मार्ग, गिरगांव, मुंबई ४.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ५७५६१ वि: चरित्र
क्रमांक १५१५ नोंद दि २७।३।८६

## : समर्पण :

भागवत धर्माच्या प्रणेत्यांनीं आपलाच म्हणून अंगिकार केलेल्या श्रीसंत चोखोबारायांनीं ज्यांचें अखंड नामचिंतन करून आपली काया ब्रम्हीभूत करून घेतली, इतकेंच नव्हे तर देहपातानंतर सुद्धां त्यांचीं हाडें ज्याच्या नामाचाच जयघोष करीत राहिलीं त्या विठ्ठलाच्या चरणीं हीं अल्प सेवा सादर समर्पण.

**स. भा. कदम**
संपादक

# ~ शुभेच्छा ~

## श्री पांडुरंग प्रसन्न

श्रीसंत चोखामेळा महाराज यांचे अभंग म्हणजे वेदांचा महाराष्ट्रीय अवतार होय. त्यांचें अध्ययन होईल तितके मनुष्याचे हृदयपटावर असणारा अज्ञानपट जाईल व अंतःकरण शुद्ध होऊन मनुष्यजन्माचें साफल्य जी भगवत् प्राप्ती त्या मार्गाकडे वळेल. आपल्या वारकरी संप्रदायांत पुष्कळ संतांचें वाङ्मय प्रसिद्ध असून त्यांचा मानवी जीवांचा उद्धार व्हावा या हेतूनें जे मार्गदर्शन वेदाला धरून योग्य असेंच केलें आहे. पण कांहीं संतांचें वाङ्मय प्रसिद्ध नसल्याकारणानें आपल्याला दृष्टीगोचर होत नाहीं. असेच अभंग श्रीसंत चोखोबारायांचे आहेत. त्या अभंगांचें एकत्रीकरण करून प्रसिद्ध व्हावें या सत् हेतूनें श्री. रा. रा. स. भा. कदम व श्री. श्रावणबुवा वगैरे लोकांनीं दीर्घ प्रयत्नानें लोकांच्या नजरेस ग्रंथरुपानें प्रसिद्ध केले, त्याचा सर्वांनीं अवश्य फायदा घेऊन आपलें पारमार्थिक कल्याण करून घेतील अशी खात्री आहे. कळावें,

**भगवान पंढरीनाथ बडवे**
पंढरपूर २६-१-१९६७

॥ श्री ॥

ह. भ. प. श्री. श्रावणबुवा कांबळे व इतर कांहीं संतप्रेमी मंडळी यांनीं श्रीसंत चोखोबाराय यांच्या अभंगांचा गाथा छापण्याबद्दलचें काढलेलें जाहीर विनंतिपत्रक वाचून समाधान वाटलें. त्याकाळीं वारकरी सांप्रदायांतील संत मंडळींत श्रींचोखोबा-रायांचें स्थान फार मोठें होतें. श्रीपांडुरंगरायालाहि त्यांची हाडें आपल्यासमोर सदां असावीं असें वाटलें म्हणूनच श्रीपांडुरंगरायाच्या मंदिरासमोर श्रीचोखोबांची समाधि आज सातशें वर्षे निरंतर आहे. अशा थोर संताचें अभंग वाङ्मय प्रसिद्ध झालें तर सर्व भाविक जनतेला त्याचा फार मोठा लाभ होईल व श्रीचोखोबांचे भक्त गाथा प्रसिद्ध करणाऱ्या मंडळीचे ऋणी राहातील. तरी श्रीचोखोबांच्या आशिर्वादानें ही गाथा लवकरच प्रसिद्ध होवो व भाविकांचें पारमार्थिक कल्याण होवो हीच पांडुरंगचरणीं नम्र प्रार्थना.

संतचरणरज
**भास्कर सोमा सर्वगोड**
दि. १ नोव्हेंबर १९६६ — श्रीसंत चोखामेळा समाधीचे पुजारी, पंढरपूर

# निवेदन

ज्ञानदेव व नामदेवराय या संत मालिकेतील व त्यांचे समकालीन असलेले श्रीसंत चोखामेळा महाराज यांच्या उपलब्ध असलेल्या समग्र अभंगांची स्वतंत्र गाथा छापून प्रसिद्ध व्हावी हें सुखस्वप्न आळंदीचे ह. भ. प. श्रावणबोवा गंगाधर कांबळे हे कित्येक दिवस आपल्या उराशीं बाळगून होते. श्री. श्रावणबोवा हे महार समाजांतील असून ते आज कित्येक वर्षें वारकरी संप्रदायांत एकनिष्ठेनें वावरत आहेत. ते माधुकरी मागून बहुतेक आळंदी येथेंच असतात. बोवाचें स्वप्न साकार होणें म्हणजे फार कठीण काम होतें. कारण चोखोबांचे उपलब्ध समग्र अभंग मिळविणें व त्यांच्या जीवनाची आतां दुर्मिळ होत चाललेली माहिती गोळा करणें व सध्यांच्या महागाईच्या दिवसांत छापणें या साऱ्या गोष्टी वाटतात तेवढ्या सोप्या नाहींत, हें बहुतेकांना ठाऊक आहेच. शिवाय एखाद्या संत वाङ्मयाच्या अभ्यासकानें असल्या संतवाङ्‌मयाच्या संकलनाचें काम हातीं घ्यावयास पाहिजे. बहुतेक संतवाङ्‌मयाचे व्यासंगी आपापल्या संशोधनांत गर्क असतात; त्यामुळें असल्या कामाकडे लक्ष देण्यास सुद्धां कोणास फुरसत नसते असा अनुभव आहे.

१९६६ च्या ऑक्टोबर महिन्यांत एके दिवशीं श्री. श्रावणबोवा माझ्याकडे आले असतांना त्यांनीं ही गोष्ट माझ्याजवळ काढली. बोवाजवळ ना पैसा ना संतवाङःमय लेखनाचा व्यासंग, मग हें कार्य कसें तडीस जाणार ? बोवांना मी सांगितलें — 'बुवा, ही अवघड गोष्ट आपणास कशी शक्य होणार ? ' बोवा नाराज झाले व म्हणाले— 'आमच्यासारख्या गरिबांचें कोणी ऐकूनसुद्धां घेत नाहीं. चोखोबांच्या कार्याकडे आमच्या वारकरी पंथातले लोक सुद्धां कोणी पहात नाहींत. मी पुष्कळांना विचारून पाहिलें, पण कोणीच या गोष्टींत लक्ष घालीत नाहींत.'

बोवाचे हे खिन्न शब्द ऐकून मला जरा वाईटच वाटलें व त्यांना मी 'प्रयत्न करून पाहूं' म्हणून चटकन् बोलून गेलों. त्यानंतर मला कोणाची कसलीच मदत न मिळाल्यामुळें एकट्याला जेवढें म्हणून शक्य होतें ते सर्व प्रयत्न मी केले. मी कोणी संतवाङ्मयाचा अभ्यासक नाहीं वा साहित्यिक नाहीं. नोकरीच्या वेळेबाहेर वेळ मिळालाच तर फावल्या वेळीं कांहींतरी संतवाङ्मयाचें वाचन या पलीकडे माझा अभ्यास वा ज्ञान नसल्यामुळें या पुस्तकांत बरेच दोष राहाण्याची फार शक्यता आहे. संतांचीं चरित्रे लिहिण्यास अत्यंत पवित्र अंतःकरणाची व जीवंत भक्तीच्या जिव्हाळ्याची आवश्यकता असते. यापैकी कोणतीही गोष्ट मजपाशीं नसल्यामुळें या पुस्तकांत चोखोबांची माहिती मांडतांना सारखी भीति वाटते. माझ्या अज्ञानामुळें चोखोबांच्या पवित्र लेखनांत माझे कडून कांहीं

प्रमाद तर घडत नसावे ना ? तरी चोखोबाराय व वाचक उदार अंतःकरणानें दुर्लक्ष करून मला क्षमा करोत !

वास्तविक पाहातां ही गाथा गेल्या वर्षींच प्रसिद्ध व्हावयास पाहिजे होती. तथापि एवढी मोठी आर्थिक झीज सोसण्याची माझी परिस्थिती खास नाहीं. ह्या ग्रंथाचें हस्तलिखीत तयार होऊन वै. गु. मामासाहेब दांडेकर यांनीं परिक्षण केल्यानंतर कित्येक प्रकाशकांचे उंबरठे मी झिजविले. कित्येकांनीं गोड थापा मारून मला दीर्घकाल झुलत ठेवलें. माझ्या कित्येक स्नेह्यांनीं आश्वासनें देऊनही तीं खुशाल मोडली. संत व त्यांच्या वाङ्मयाशी त्यांनीं केलेली वंचना ही अक्षम्य आहे. तरी परमेश्वर त्यांना सुबुद्धि देऊन त्यांचें कल्याण करो !

शेवटीं बराच काळ व पैसा घालविल्यानंतर ऋणाचें ओझें शिरावर घेऊन स्वतःचे दायित्वावर ही गाथा छापण्याचें मी ठरविलें. ही खुद्द चोखोबांची प्रेरणा आहे असें मी मानतों व तशी माझी श्रद्धा आहे.

परवडत नसली तरी या पुस्तकाची किंमत छपाईच्या खर्चाच्या मानानें फारच कमी ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. माझ्या मराठी जनताजनार्दनाच्य दारांत त्यांच्या सहानुभूतीच्या उष्ट्यासाठीं मी उभा आहे.

माझ्या ह्या कार्यास वै. गु. मामासाहेब दांडेकर यांचे मंगल आशीर्वाद व वेळोवेळीं मार्गदर्शन लाभलें. तथापि आमच्या दुर्दैवानें ते आज आमच्यांत नाहींत. अखिल महाराष्ट्रांतील वारकरी सांप्रदायिकांचा ज्ञानमार्तंड अकस्मात अस्तास गेला. ह्या अंधःकारांत चाचपडतच ह्या श्रध्येय महापुरुषास प्रणाम करतों.

आमच्या वरळीच्या 'श्री संत सेवा मंडळ' या संस्थेचे संस्थापक समान असलेले कै. रंगनाथ राजाराम सांबारे मास्तर, कै. बाबूराव वि. पारकर व कै. डॉ. जयवंतराव मा. पालकर हे आज हयात नाहींत; परंतु त्यांच्या सहवासांत माझा कांहीं काळ गेला असल्यानें संतसेवा व संतवाङ्मय यांची मला थोडीफार गोडी लागली. त्यामुळें थोड्याशा अक्षरवाङ्मयाची पुसट तोंडओळख झाली. एवढ्याच अल्प भांडवलावर ह्या पुस्तकाची इमारत बांधण्याचें धाडस केलें आहे.

या चरित्रांत आलेली सारी माहिती कणाकणांनीं मिळविली आहे व वाचकांपुढें यथाशक्ति मांडण्याचा प्रयत्न केला आहे. हें चरित्र साद्यंत व परिपूर्ण नाहीं. याची मला पूर्ण जाणीव आहे. भविष्यकाळीं कोणीहि सत्पुरुष हें अपुरें असलेलें विठ्ठलभक्ताचें चरित्र विश्वसनीय माहिती गोळा करून व संशोधन करून श्रीचोखोबांच्या जीवनाचें संपूर्ण दर्शन घडवो एवढीच श्रीविठ्ठल चरणीं प्रार्थना करतों.

पूर्वी अगदीं अपरिचित असलेले व आतां सुपरिचित झालेले श्री. तानाजी श्रीपतराव काळे यांनीं या पुस्तकांत घालण्यास लागणाऱ्या सर्व चित्रांचे फोटो घेण्याची जबाबदारी आपल्या स्नेह्यांच्या मदतीनें आपल्या शिरावर घेतली. त्यांचा बारामती येथें फोटो स्टुडियो असून त्यांना संत सेवेची अत्यंत आवड आहे.

हें छोटें संत चरित्राचें पुस्तक प्रसिद्ध व्हावें म्हणून कांहीं व्यक्तींनीं निरनिराळ्या स्वरुपांत मदत केली आहे. कित्येक लेखकांचे त्यांच्या ग्रंथांतील उतारे त्यांचा नामनिर्देश करून या पुस्तकांत घातले आहेत. ते सर्व मला उदार अंतःकरणानें क्षमा करोत! कारण हें कार्य निरपेक्ष बुद्धीनें होत असून केवळ सर्वांच्या सहकार्यानें व मदतीनें होत आहे. सर्वांचे आभार मानून मोकळे न होतां त्यांच्या प्रेमळ ऋणाचें ओझें माथ्यावर सदैव राहावें असेंच वाटतें.

माझे मेहुणे श्री. आनंदराव लक्ष्मणराव बागवे, बी. ए., व न्यू भारत प्रिंटींग प्रेसचे श्री. चिंतामणि देसाई यांचें सहकार्य, औदार्य व सौजन्य ह्या गाथ्याची घडण घडविण्यास कारणीभूत आहेत.

पंढरपूरचे ह. भ. प. श्री. भा. पं. बहिरट, एम्. ए., यांनीं अगदीं आपुल्कीनें माझ्या आग्रहास्तव आपला एक लेख पाठविला आहे. तो स्वतंत्रपणें पुढें दिला आहे. मंगळवेढ्याचे श्री. रा. ग. करंदीकर, वकील यांनींहि एक छोटेंसें चरित्र लिहून पाठविलें आहे. तेंही स्वतंत्रपणें या पुस्तकांत घातलें आहे.

तसेंच किर्तनकार व प्रवचनकार चोखोबांच्या अमृतमय वाणींतून उमटलेल्या वचनांचा आपल्या किर्तन प्रवचनांतून प्रसार करोत एवढीच त्यांना विनंति.

संत वाङ्मयांतील लुटलेल्या आनंदाला मी आतां मुकणार म्हणून नेत्रांत अश्रु जमतात. भारावलेल्या अंतःकरणांत विचार येतो, हें कार्य माझ्याकडे कां यावें? वेडे वांकडें जें सुचलें तें पुढें केलें. तुकोबा म्हणतातच—

**करविली तैसी केली कटकट। वाकडी कीं नीट देव जाणे ॥ १ ॥**
**कोणा कारणें हें जालेंसें निर्माण। देवाचें कारण देव जाणे ॥ २ ॥**
**तुका म्हणे मी या अभिमाना वेगळा। घालुनि गोपाळा भार असे ॥३॥**

जुलै १९६९
३५ ए, भिमडीवाला बिल्डिंग,
वरळी नाका, मुंबई १८.

**स. भा. कदम**
संपादक

# प्रकाशिकेचें हृद्गत

विज्ञानाचें राक्षसी पाऊल चंद्रलोकावर जाऊन आदळलें आहे. जगांतील सुधारलेलीं वा पुढारलेलीं राष्ट्रें आज वैभव शिखरावर आरूढ झालेलीं आहेत. परंतु आमच्या वाट्यास काय आलें ? आम्ही अस्पृश्यतेच्या व वर्णाश्रमाच्या चिखलांत अद्याप लोळत आहोंत. राष्ट्राला खरोखर सुखी व समृद्ध करावयाचें असेल तर विज्ञान व भौतिक प्रगतीच्या पावलाबरोबर धर्मविषयक तत्वज्ञान व साधु-संतांची शिकवणूक यांचेंही पाऊल पडलें पाहिजे. जोपर्यंत आम्हाला हें उमजत नाहीं तोपर्यंत एकट्या विज्ञानानें केवढीही प्रगति केली व अतुल भौतिक सुख मिळविलें तरी तें टिकाऊ नाहीं अशी आमच्या तत्वज्ञानाची शिकवणूक आहे.

स्वामी विवेकानंदजीच्या अमेरिकेतील प्रथम दौऱ्याच्या वेळीं त्यांना आलेले कित्येक अनुभव त्यांच्या चरित्रांत नमूद आहेत. मार्टिन जोन्स ह्या कोट्याधीशाच्या घरीं आदर सत्कारांनीं स्वामीजींचा जीव गुदमरून गेला होता. त्या रात्रीं एका सुंदर सजविलेल्या शयनगृहांत त्यांची झोपण्याची व्यवस्था केली होती. त्या शयन-गृहांतील शोभिवंत पलंगावर ते बसतांक्षणींच त्याच्या शरिरांत हजारो विंचवांनीं एकदम नांग्या माराव्या तशा वेदना उठल्या. ऐश्वर्याच्या शिखरावर पोचलेल्या अमेरिकेंत ते सर्व सुखांत होते. तथापि त्यांच्या डोळ्यांसमोर आपला हिंदुस्थान—आपला स्वदेश उभा होता. तीस कोटी हिंदुसमाज, त्याचें दारिद्य, विस्कळीतपणा, अज्ञान, पारतंत्र्य, दुःख, हालअपेष्टा व दुष्काळ ह्या साऱ्या गोष्टी त्यांना दिसत होत्या. अशा वेळी त्यांना तेथें मिळत असलेले सुख त्यांना काय कामाचें ! आपल्या देशाबद्दल किती निःस्वार्थी प्रेम व केवढी तळमळ—आणि ह्याच त्यांच्या तळमळींतून ते जगदंबेची प्रार्थना करीत होते.

" आई जगदंबे, माझी मातृभूमि जोपर्यंत भीषण दारिद्र्याच्या दुःखांत आहे तोपर्यंत मला लाभणाऱ्या यशाचें व कीर्तीचें काय होय ! मूठभर तांदुळासाठीं माझ्या देशांतील असंख्य लोकांना मरावें लागत आहे. किती दारूण विपरित स्थिती ही ! ही कशी दूर होईल ? माझा देश जागृत कसा होईल ? सुखी व समृद्ध कसा होईल ? आई जगदंबे, कालीमाते ! यांतून तूं मला मार्ग दाखव ! "

चालून आलेल्या सुखाच्या राशीवर लोळण्याचें सोडून हा तरुण संन्यासी काय विपरीत प्रार्थना करीत आहे पहा ! अशा लोकोत्तर विभूति जेव्हां ज्या ज्या देशांत जन्म घेतात तेव्हां त्या त्या देशाचा भाग्योदय होत असतो. आज राष्ट्रास खरोखर कशाची तातडीची गरज असेल तर अशा महात्म्यांची !

भगवान् ज्ञानेश्वरांच्या काळांत एक प्रचंड धर्म जागृति महाराष्ट्रभर झाली होती. त्यावेळीं पददलित अशा महार समाजांत श्रीसंत चोखामेळा या थोर विठ्ठल भक्ताचा जन्म झाला होता. केवळ आपल्याच धर्मबांधवांची अवहेलना व छळ करण्यात मशहूर असलेल्या आमच्या धर्म बांधवांनीं श्रीचोखोबांचा अनन्वित छळ केला. अस्पृश्य समाजावर इतका दीर्घकाल झालेला व अजून होत असलेला छळ जगाच्या इतिहासांत इतरत्र क्वचितच दृष्टीस पडेल. परधर्मीयांपुढें नांगी टाकणारे व स्वतःला हिंदु म्हणवून घेण्यास लाज वाळगणारे आम्ही हिंदु अस्पृश्यतेची मगरमिठी कशी सोडविणार ?

अस्पृश्यतेविरुद्ध सातशें वर्षांपूर्वी दक्षिणेतील काशी समजणाऱ्या पंढरपूर क्षेत्रांतील श्रीविठ्ठल मंदिराच्या महाद्वारांत बसून श्रीचोखोबांनीं आपली विटाळाची गाणी गाईली. सवर्ण हिंदूंच्या उष्ट्यासाठीं ह्या महार विठ्ठल भक्तानें जोहार करीत आपली पाटी महाराष्ट्रभर मराठी जनतेच्या दारोदारीं नेली. गेल्या ७ शें वर्षांचा काळा इतिहास याची साक्ष देईल.

अस्पृश्य समाजाची केलेली अवहेलना, उपेक्षा व छळ यांतून एकच निष्कर्ष निघतो कीं एके काळीं समृद्ध व सुखी असणारा आमचा देश आज मूठभर तांदुळ किंवा गहू यांना वंचित झाला असून परकियांच्या उष्ट्यासाठीं पाटी घेऊन टपून बसला आहे. ही दुरावस्था दूर होण्यासाठी साधूसंतांच्या शिकवणुकीचा प्रसार घरोघरीं होणें आवश्यक आहे. हीच शिकवणूक आम्हांला स्वाभिमानानें जगण्यास मार्गदर्शक होईल.

विठू पाटलाच्या दारांत धरणें धरून चोखया महारानें कष्टी मनानें गाईलेलीं गाणीं कारुण्यानें भरलेली आहेत. आपण तीं सहृदयतेनें वाचलींत तर ती सहृदयता आपले नेत्र ओले करील असें शब्दसामर्थ्य त्या वाणींत आहे. सहृदयतेबरोबर निरहंकार असेल तर वाचकांच्या आंतडीला वाचतां वाचतां पीळ पडेल. प्रत्येकानें हा अनुभव अवश्य घ्यावा.

श्रीचोखोबांची ही अमृतमय अभंगवाणी व त्यांच्या जीवनाची उपलब्ध असलेली माहिती स्वतंत्र ग्रंथरूपानें मराठी जनतेच्या हातीं देण्यांत मला आनंद वाटत आहे. प्रत्येक मराठी माणूस ह्या ग्रंथाचें स्वागत करून आपलें आत्महित साधून घेवो हीच त्या चोखोबारायांच्या विठ्ठल चरणीं शरणागती.

वरळी नाका, मुंबई १८ **सौ. मंदाकिनी स. कदम**
जुलै १९६९

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वक्रमांक
अनुक्रम ...................... दि: ......................
क्रमांक ...................... नों. दि: ......................

# प्रास्ताविक चार शब्द

श्रीचोखोबांच्या विषयींच्या या पुस्तकाचे दोन मुख्य भाग आहेत. एक भाग चरित्र व दुसरा त्यांचे अभंग. श्रीचोखोबांच्या अभंगांची गाथा छापून प्रसिद्ध करावी ही मूळ कल्पना जरी ह. भ. प. श्रावणबोवांची तरी तिला आज जें सर्वांग सुंदर स्वरूप प्राप्त झालें आहे त्यास कारण श्री. स. भा. कदम यांचे परिश्रम होत. या ग्रंथाकरितां त्यांनींच म्हटल्याप्रमाणें अक्षरशः कणकण जमा करून व विशेष म्हणजे आपली नोकरी संभाळून अनेक महिने मेहनत घेतली. या कामाकरतां अक्षरशः आपलें काया वाचा मन व द्रव्य अर्पण करून त्यांनीं हा ग्रंथ तयार केला.

ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास प्रभृति संतांच्या ग्रंथांचें संशोधन होऊन त्यावर अनेक ग्रंथहि निर्माण झाले आहेत. श्रीचोखोबांच्या भक्तीची उंची फार मोठी होती. आम्ही पामर तिचें काय वर्णन करणार? तिची थोडी कल्पना तुकोबांनीं ज्यांना मनांत आणून पुढील अभंग रचला तो देऊन देतां येईल. तुकारामबोवा म्हणतात :—

‘ मांस चर्म हाडें । देवा अवघीच गोडें ॥ १ ॥
जे जे हरिरंगीं रंगले । कांहीं न वचे वाया गेले ॥ २ ॥ ’

ज्यांची हाडें सुद्धां श्रीपांडुरंगाला आपल्या समोर सदा असावींत असें वाटलें त्या चोखोबांचें शब्दानें काय वर्णन करणार?

तात्पर्य, चोखोबांच्या भक्तीची उंची जरी अशी होती तरी त्यांची काव्यसंपदा थोडी होती; व हें अगदीं स्वाभाविक आहे. आपल्या मराठींत अशी म्हण आहे कीं, झाडाखालीं झाड वाढत नाहीं. त्याप्रमाणें चोखोबांचे गुरु नामदेवराय हे शतकोटी अभंग रचण्याची प्रतिज्ञा करणारे. त्यांचे आजेगुरु नऊ हजार ओव्यांची ज्ञानेश्वरी व अभंग रचणारे ज्ञानोबा. अशा स्थितींत चोखोबा स्वतंत्र काव्यनिर्मिती करण्यापेक्षां त्यांच्या ग्रंथांचे वाचनच अधिक करीत असावेत. शिवाय चोखोबांची व नामदेवांची गांठ पडून साधना करण्यांत त्यांचा काळ गेलेला असावा. त्यांच्या समाजाची तत्कालीन स्थिति या सर्व गोष्टी लक्षांत घेतां श्रीचोखोबांची काव्य निर्मिति मोठी नसावी असें वाटतें.

शिवाय नामदेवांच्या शहाण्णव कोटीपैकीं आज जवळ जवळ दोन तीन हजारच अभंग उपलब्ध आहेत. हें लक्षांत घेतां श्री. कदम यांनीं परिश्रम करूनहि त्यांना ३४९ पेक्षां जास्त अभंग मिळाले नाहींत यांत आश्चर्य नाहीं. त्यांनीं इतके परिश्रम घेतले म्हणून इतके तरी गोळा करतां आले. हें सर्व लिहिण्याचा हेतु असा कीं चोखोबांचें वाङ्मय गोळा करण्यांत श्री. कदमांचे प्रयत्न कमी पडले नाहींत. मूळांत चोखोबांच्या अभंगांची संख्याच कमी असावी.

श्री. कदम यांनीं नुसते अभंग गोळा करून त्यांचें संपादन केलें एवढेंच नव्हे तर चोखोबांच्या अभंगांचा अभ्यास करणाऱ्यास लागणारी सर्व तयारी करून दिली आहे. अभंगांचें वर्गीकरण करून ते दिले आहेत. अभंगापूर्वीं चोखोबांचें जीवन चरित्र व अभंग या संबंधीं उत्पन्न होणाऱ्या अनेक प्रश्नांची तेरा प्रकरणांमधून चर्चा केली आहे. तिचा अभ्यासूस चोखोबांच्या अभंगांचा अभ्यास करतांना उपयोग होईल.

ही मदत जणू काय अपुरी आहे असें समजून संतवाङ्मयाचे प्रसिद्ध व्यासंगी ह. भ. प. भा. पं. उर्फ बाबूराव बहिरट, एम्. ए., पंढरपूर यांचा ‘ श्रीचोखोबांचा सनाथत्वाचा संदेश ’ म्हणून चोखोबांचा संदेश देणारा लेख छापला आहे व त्याच्या जोडीस ज्या मंगळवेढ्यांत श्रीचोखोबांनीं आपला देह विसर्जित केला तेथील संतभक्त श्री. रा. ग. करंदीकर, वकील यांचा ‘ श्रीसंत चोखामेळा महाराज यांचें चरित्र ’ हा श्रीचोखोबांची जीवनकथा सांगणारा लेख दिला आहे. चोखोबांच्या जीवनाशीं संबंधित असणारे चार फोटो दिले आहेत. चोखोबांच्या संबंधीं इतर संतांच्या सूचि दिल्या आहेत. तात्पर्य, चोखोबांचें चरित्र व अभंग या संबंधीं देण्यासारखें जेवढें आहे तेवढें दिलें आहे. असें सर्वांगसुंदर पुस्तक प्रसिद्ध केल्याबद्दल संत वाङ्मयप्रेमी व श्रीचोखोबांचे उपासक श्री. कदमांचे ऋणी रहातील.

या सर्व गोष्टी श्री. कदम यांनीं आगाऊच करून ठेवल्यामुळें खरें म्हटलें तर मजसारख्यास लिहिण्याजोगें कांहीं राहिलें आहे असें वाटत नाहीं. पण आपण जर कांहींच लिहिलें नाहीं तर श्रीचोखोबांची सेवा करण्याची चालून आलेली संधि आपण गमावली असें होईल म्हणून पुढील एक दोन गोष्टी लिहीत आहे.

श्रीपांडुरंगांनीं चोखोबांची व त्यांच्या कुटुंबाची अनेक प्रसंगीं सेवा केल्याच्या गोष्टी प्रसिद्ध आहेत. पण मला जें थोडें सांगावयाचें आहे तें वर उल्लेखिलेल्या घटने-संबंधीं. ती घटना प्रसिद्ध आहे. मंगळवेढे येथें कुसाचें काम करतांना चोखोबांनीं वैशाख वद्य ५ स इहलोक सोडला. पंढरपूरांत श्रीपांडुरंगास वाटलें कीं त्यांचीं हाडें आपणासमोर आणून त्यांना समाधि द्यावी म्हणजे चोखोबा निरंतर आपल्यासमोर

राहतील. हीं हाडें आणण्याची कामगिरी देवांनीं नामदेवांना सांगितली. तेव्हां नामदेव म्हणाले, त्या ढिगाऱ्यांत चोखोबांचीच म्हणून हाडें आतां कशी ओळखतां येतील? त्यावर देव म्हणाले, तुला चोखोबांची हाडें ओळखण्याची खूण सांगतों. ‘हाड उचल व कानाला लाव. विठ्ठल असा शब्द ऐकूं आला तर तें चोखोबांचें समज व पदरांत घाल,’ असा संदेश मिळाल्यावर नामदेव मंगळवेढ्यास गेले व कानाला हाड लावून विठ्ठल शब्द ऐकूं आला कीं तें चोखोबांचें असें जाणून त्यांनीं तें पदरांत घेतलें. अशी हाडें गोळा करून पंढरपुरास आणलीं व देवानें स्वहस्तें त्यांना समाधि दिली. ही कथा आजच्या विज्ञानाच्या युगांत कल्पित वाटणें स्वाभाविक आहे व म्हणूनच त्या गोष्टीसंबंधीं आज शास्त्रीय पुरावा पुढें देत आहे.

मानसशास्त्राच्या एका पुस्तकांत चिंतनाचा परिणाम कसा होतो हें सांगतांना एका मानस शास्त्रज्ञानें केलेल्या एका प्रयोगाचा उल्लेख केला आहे. तो प्रयोग असा :—

एका अस्सल चिक्कू गृहस्थास गाढ झोप लागली होती. तो हाक मारून अथवा हालवूनहि जागा होईना. मग त्या प्रयोग करणाऱ्यानें त्याच्या उघड्या अंगास पैशाचें नाणें लावलें. त्या नाण्याचा स्पर्श होताच तो जागा झाला! प्रयोगांतील चिक्कू मनुष्यानें पैशाचें केवढें चिंतन केलें कीं तो जरी झोपेंत तरी त्याच्या स्थूळाच्या ठिकाणीं जी पैशाची जाण येऊन राहिली होती ती काम करत होतीं. पैशाचें चिंतन करणाराचें स्थूळ जर जागें रहातें तर संसारास पाणी देऊन ज्यांनीं हरि मनीं धरला त्यांची हाडें विठ्ठल विठ्ठल कां म्हणणार नाहींत?

अगदीं अर्वाचीन काळांत झालेले स्वामी विवेकानंदाचे गुरू श्रीरामकृष्ण परमहंस यांची अशीच कथा सांगतात. ते समाधींत असतांना त्यांचा एक हात शेगडीजवळ होता पण त्याचें त्यांना भान नव्हतें. इतक्यांत परीक्षेकरतां एका भक्तानें दुसऱ्या हातावर रुपया टाकला. लगेच तो हात वाकडा होऊन रुपया पडला. ज्ञानदेवांनीं एके ठिकाणीं म्हटल्याप्रमाणें ‘साचचि करचरणी होती डोळे’ कर्मेंद्रियें ज्ञानेंद्रियांची कामें करतात. चोखोबांची कडी यावरती आहे. त्यांचा देह गेल्यावरहि त्या देहांतील संस्कारित हाडें विठ्ठल विठ्ठल म्हणाली. केवढा भक्तीचा महिमा!

या घटनेंत दुसरी अशी मौज आहे कीं गुरूला आपल्या उपदेशाचा परिपाक पाहण्याची संधि आली. नामदेवासारखे गुरू व चोखोबासारखे सत्‌शिष्य मग नामाचा परिणाम काय वर्णन करावा? आपल्या शिष्याचीं हाडेंहि विठ्ठल विठ्ठल म्हणतात हें पाहून नामदेवांना केवढा आनंद वाटला असेल तो शब्दानें सांगणें अशक्य आहे.

दुसरी गोष्ट सांगावयाची म्हणजे चोखोबांच्या अभंगासंबंधीं. त्यांच्या अभंगांवर नामदेव ज्ञानदेव यांच्या अभंगांची छाया पडलेली दिसते. तें अगदीं स्वाभाविक आहे. भक्तीचा महिमा असा आहे कीं ती ज्ञानाची जननी होते. भक्ताला पाठशाळेंत जाऊन शिकावें लागत नाहीं. चोखोबांच्या अभंगांत साक्षात्कारी ज्ञान आहे, नामाचें महात्म्य आहे, भक्ताचा धांवा आहे. चोखोबांनीं केलेलें 'डोळयाचा डोळा' वगैरे वर्णन (अभंग २३१–३३) पाहिलें म्हणजे साक्षात्कारी ज्ञान काय मोलाचें असतें याची कल्पना येईल. "चोखा डोंगा परी भाव नोहे डोंगा" (२४०) सारखे आर्तता व स्पष्टभाषा यानें अलंकारलेले त्यांचे उद्गार प्रसिद्ध आहेत. विशेष म्हणजे आपणास समाजाकडून त्रास दिला गेला याबाबत देवाजवळ कळवळयानें नेलेलें गाऱ्हाणें आहे. पण त्यामुळें भक्तीच नको असे कोठें उद्गार नाहींत. त्रास झाला कष्ट भोगावे लागले तरी देवच हवा ही जाज्वल्य एकांतिक निष्ठा त्यांत दिसून येते.

शेवटीं आकारानें लहान पण मोलानें मोठा अशी गाथा श्री. कदम यांनीं वाचकांस उपलब्ध करून दिला याबद्दल वारकऱ्यांतर्फे मी त्यांचे आभार मानतो व ही वाक्पुष्पांजलि श्रीचोखोबांच्या चरणीं अर्पण करतों.

पुणें
वैशाख वद्य ५
शके १८८९

शं. वा. दांडेकर

# श्रीसंत चोखामेळा महाराज चरित्र

## अ नु क्र म णि का


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | विषय प्रवेश ... ... ... | १ |
| २. | भागवतधर्म, पंढरी व विठ्ठल ... ... | ८ |
| ३. | चोखोबांचा जीवन वृत्तांत ... ... | १५ |
| ४. | चोखोबांचे आत्मनिवेदन ... ... | २३ |
| ५. | चोखोबांची गुरुपरंपरा ... ... | ३० |
| ६. | चोखोबांची नामनिष्ठा व एकमेव भाव ... ... | ३६ |
| ७. | चोखोबांचें गृहजीवन ... ... ... | ४५ |
| ८. | चोखोबांच्या वेळचा त्यांचा समाज व त्याची स्थिती ... | ५० |
| ९. | चोखोबांचा विटाळ ... ... | ५५ |
| १०. | चोखोबांचें अभंग वाङ्मय ... ... | ६१ |
| ११. | चोखोबांचें कार्य ... ... ... | ६९ |
| १२. | चोखोबांचा विटाळ घालविण्यासाठीं झालेले प्रयोग ... | ७२ |
| १३. | संत, संतचरित्रें व त्यांचें कार्य ... ... | ७७ |

* * *

| | |
|---|---|
| चोखोबांचें जीवनदर्शन ... ... | ८७ |
| लोककथा व भक्तकथा ... ... | १०४ |
| भरोनी सद्भावाची अंजुळी ... ... | ११३ |
| परिशिष्ट ... ... ... | ११४ |

* * *

| | |
|---|---|
| श्रीचोखोबांचा सनाथत्वाचा संदेश ... ... <br> ले. श्री. **भा. पं. बहिरट**, एम. ए. – पंढरपूर. | ११७ |
| श्रीसंत चोखामेळा महाराज यांचें चरित्र ... <br> ले. श्री. **रा. ग. करंदीकर**, वकील – मंगळवेढे | १२२ |


# चित्रांची सूचि


श्री विठ्ठल

श्रीसंत चोखामेळा महाराज.

श्रीचोखामेळा समाधि, पंढरपूर.

श्रीचोखामेळा समाधि, मंगळवेढे.

श्रीचोखोबांची दीपमाला, पंढरपूर.

वै. गु. सोनोपंत दांडेकर.

# चोखोबांची अभंग गाथा

## विषयानुक्रमणिका


| मंगलाचरण | अभंग | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विठ्ठल | १– ५५ | ... | १३२ |
| २ पंढरी | ५६– ७२ | ... | १४१ |
| ३ आत्मनिवेदन | ७३ | ... | १४३ |
| ४ बालक्रिडा | ७४– ७७ | ... | १४४ |
| ५ परिपूर्णता–समाधान | ७८– ८१ | ... | १४४ |
| ६ करुणा | ८२–१७८ | ... | १४५ |
| ७ नाम | १७९–२१५ | ... | १६२ |
| ८ संत | २१६–२२३ | ... | १६८ |
| ९ उपदेश | २२४–२७५ | .. | १६९ |
| १० भाव | २७६–२७७ | ... | १७७ |
| ११ विटाळ | २७८–२८३ | ... | १७८ |
| १२ भक्तवत्सलता | २८४–२९४ | ... | १७९ |
| १३ महार समाजाच्या स्थितीचें वर्णन | २९५–२९६ | ... | १८१ |
| १४ श्री पाडुरंगरायाचा वियोग | २९७–३०३ | ... | १८२ |
| १५ नामदेव गुरु–स्तुति | ३०४–३३५ | ... | १८३ |
| १६ ज्ञानेश्वर स्तुति | ३३६-३४० | ... | १८८ |
| १७ संकीर्ण | ३४१–३४२ | ... | १८९ |
| १८ जोहार | ३४३–३४५ | ... | १८९ |
| १९ पांडुरंगरायाचा शेवटचा निरोप व मागणें | ३४६–३४८ | ... | १९१ |
| २० प्रसाद | ३४९ | ... | १९२ |
| २१ चोखोबांच्या समाधीचे अभंग | ... | ... | १९२ |
| २२ चोखामेळा चरित्र–नामदेवराय | ... | ... | १९३ |
| २३ चोखामेळा चरित्र–एकनाथ महाराज | ... | ... | १९६ |
| २४ चोखोबांची आरती | ... | ... | १९७ |
| २५ संत सोयराबाईचे अभंग | १– ६२ | ... | १९८ |
| २६ संत बंका महार यांचे अभंग | १– ३९ | ... | २०८ |
| २७ संत कर्ममेळा यांचे अभंग | १– २७ | ... | २१५ |
| २८ संत निर्मळाबाईचे अभंग | १– २४ | ... | २१९ |
| २९ सच्छिष्याला वाहिलेली श्रद्धांजलि | ... | ... | २२४ |
| ३० चोखोबांना वाहिलेली स्तुतिसुमनांजलि | ... | ... | २२४ |
| ३१ संतांच्या संगती | ... | ... | २२६ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम........................ वि: ....................
क्रमांक ........................ नों. दि ..............

|| श्री विठ्ठल ||



ह. भ. प. ना. द. बडवे, चेअरमन,
बडवे कमिटी पंढरपूर यांच्या सौजन्यानें
( फोटो : माणिक स्टुडियो, बारामती. )

श्रीसंत चोखामेळा महाराज



शुद्ध चोखामेळा। करी नामाचा सोहळा॥

( चित्रकार : सखाराम धोंडिबा शिंदे, भिगवण. )

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलमत
अनुक्रम .................... वि ..............
क्रमांक .................... नों. दि ..............
१७३४३

: १ :

# विषय प्रवेश

गेल्या सातशें वर्षांत महाराष्ट्रांत अनेक लहान थोर संत होऊन गेले. ह्या सर्व संतांना ईश्वरी साक्षात्कार झाला होता. त्यांचें जीवन, कार्य व वाङ्मय महाराष्ट्रीय समाजाला स्फूर्तीदायक झालेलें आहे. समाजांतील अशिक्षितापासून सुशिक्षितापर्यंत बऱ्याच लोकांच्या जीभेवर त्यांचें वाङ्मय व वचनें आजही घोळत आहेत. त्याकाळीं छापण्याची कला नव्हती. तरी तें संत वाङ्मय अत्यंत लोकप्रिय झालें. त्या वाङ्मयावर ईश्वरी प्रसाद होता आणि म्हणूनच त्या वाङ्मयाचा प्रसार घरोघरीं झाला. छापण्याची कला भारतांत आल्यावर ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास व निळोबा इत्यादि संतांचें वाङ्मय ग्रंथरूपानें प्रसिद्ध झालें व होत आहे. निरनिराळ्या विद्वानांची मतें, शंका, तर्क व उलट सुलट टीका यांनीं वर्तमानपत्रें व मासिकें भरूं लागलीं. निरनिराळे विद्वान आपापल्या मताप्रमाणें वाद माजवूं लागले. या वादांच्या धबधब्यांत श्रीसंत चोखोबाराय यांचे कार्याबद्दल विशेष अशी माहिती कोठें दिसून येत नाहीं. तसेच त्यांचें वाङ्मय वा चरित्र स्वतंत्र ग्रंथरूपानें कोठें दृष्टीस पडत नाहीं. श्रीसंत चोखामेळा हे अस्पृश्य समाजांत जन्मास आले व त्या काळी त्यांनीं फार मोठी कामगिरी केली आहे. तथापि त्यांचें जीवन व कार्य ह्या विषयाला स्पर्श करणारे कांहींच ग्रंथ उपलब्ध नसावेत ही पण एक प्रकारची अस्पृश्यताच ठरेल, असें कोणाही बुद्धिवंताला वाटल्याशिवाय राहाणार नाहीं. मंगळवेढे येथें किल्ल्याच्या भिंती पडून चोखोबाराय दगडा-मातीच्या ढिगाऱ्यांत दृष्टी आड झाले आणि त्यांच्याबरोबर त्याची विपुल अशी अभंग संपत्तीही त्याच ढिगाऱ्यांत कोठेंतरी अदृश्य झाली. पुढें नामदेवरायांनीं

विठ्ठल नामाच्या घोषावरून त्यांचीं हाडें मंगळवेढ्यावरून पारखून आणली. तथापि त्यांची अभंगवाणी पारखण्यास मागाहून कोणीच नामदेव पुढें आला नाहीं. म्हणून त्या दृष्टीनें कांहीं प्रयत्न झाल्यास महाराष्ट्रांतील भागवत धर्म व त्याचें कार्य ह्यावर बराच प्रकाश पडण्याचा संभव आहे. शिवाय ‘ महाराष्ट्रीय समाज ’ या व्यापक दृष्टीनेंही या प्रश्नाकडे पाहिलें पाहिजे. त्यांचे वाङ्मय व कार्य ही खरोखर समाजाच्या दृष्टीनें एक उपकारक गोष्ट ठरेल यांत कांहीं शंका नाहीं.

अशा प्रकारचा यत्न करणाऱ्याला सर्व दृष्टीनें आज सारी अनुकूल परिस्थिती आहे अशांतला भाग नाहीं. अशाप्रकारचें वाङ्मय आज फारसें उत्साहानें वाचलें जाण्याची शक्यता कमीच दिसते. परंतु लोकांनीं ह्या वाङ्‌:मयाबद्दल उदासीन राहावें अशी त्यांची योग्यता खास कमी नाहीं. सामान्य लोकांना अशा संत वाङ्मयापासून कांहींच मार्गदर्शन होऊं शकणार नाहीं कां ? तसें असतें तर आजही लक्षावधी लोकांच्या कंठामध्यें संत वाङ्मय अमर होऊन कसें राहिलें ? दुर्दैवानें सुशिक्षित म्हणविणारा आजचा फार मोठा वर्ग या प्रश्नाकडे कांहींशा उपेक्षेनें पाहातांना दिसतो. विद्वानांच्या दृष्टीनें संतकार्य व वाङ्‌:मय याबद्दल कांहीं प्रामाणिक शंका तशाच कुशंकाही असण्याची शक्यता असते. संत एकनाथ यांच्यांविषयीं आकाशवाणीवरून बोलतांना प्रा. न. र. फाटक यांनीं केलेली संताची व्याख्या मननीय आहे. ते म्हणतात—

“ संतांनीं आपपर भाव विसरायला शिकवून देशाचा घात केला असें मानणारा व म्हणणारा वर्ग हल्लीच्या साक्षर जनतेमध्यें फार मोठा आहे. जे संतांच्या कार्याची पूर्वग्रह टाळून परीक्षा करतील त्यांना संतांसंबंधांतील यासारखे आरोप सोडून द्यावे लागतील. संत म्हणजे देवाचा भक्त हें समीकरण अर्वाचीन आहे. संत म्हणजे सत्पुरुष. लोकांना आपल्या आचरणानें शुद्ध व्यवहाराचा धडा घालून देणारे जे कोणी ते संत, साधु अशी या शब्दाची प्राचीन व्याख्या आहे. ”

आपले संत ज्या काळांत झाले त्या काळांत—म्हणजे ज्ञानदेवानंतर भारतांत मुसलमानी आक्रमण होऊन त्यांच्या सत्तेची पाळेंमुळें भारतांत

दृढ होत होती. हिंदुजनतेवर अत्याचार होत होते. देवळें नष्ट होत चालली होती. सक्तीनें धर्मांतरें होत होती. स्त्रिया भ्रष्ट केल्या जात होत्या. येथील हिंदु समाजावर जिझिया सारखे कर लादले जात होते. अशा वेळीं परकीय आक्रमकाविरुद्ध चीड व आवेश उत्पन्न होणारें वा करणारें वाङ्मय निर्माण होणें आवश्यक होतें. परंतु संतांनीं टाळकुटेपणाखेरीज समाजाला कांहींच दिलें नाहीं व समाज अगदीं निष्क्रिय केला. स्वातंत्र्याला प्रेरक असें कांहीं तरी संतांनीं करावयास हवें होतें. परंतु संतांनीं तें केलें नाहीं. अशा प्रकारचे आक्षेप नेहमीं घेतले जातात. परंतु आग लागली असतां आगीकडे धांवणारे लोक ज्याप्रमाणें कांहींच करूं शकणार नाहींत, त्यासाठीं ज्या ठिकाणी पाण्याचा साठा आहे तिकडे धांव घेणारे अखेर ती आग विझवू शकतील, हें जसें खरें असू शकतें तसेंच संतांच्या कार्याचें महत्त्व आहे. परंतु राजकीय पारतंत्र्याची जीं कारणें असू शकतील ती सामाजिक विषमता दूर करण्याचें महान् कार्य संतांनीं केलें. त्या काळीं सामाजिक विषमतेमुळें येथील समाजाचे तुकडे तुकडे झाले होते. त्यामुळें येथील समाज परकीय आक्रमणाविरुद्ध एकीनें लढू शकला नाहीं व त्यामुळेंच राजकीय पारतंत्र्य आलें असें म्हणावें लागेल. संतांनीं केलेल्या सामाजिक समतेच्या पुरस्काराचें महत्व फार मोठें आहे. आपलें तत्वज्ञान व धर्मविषयक वाङ्मय संस्कृतमध्यें अडकून पडलें होतें. अध्यात्मविद्या बहुजन समाजासाठीं नव्हती. वर्णाश्रमाचें बुजगांवणे समाजाच्या नरडीस डसलें होतें. तथापि संतांनीं आपल्या प्रभावी व प्रासादिक वाणीनें आपलें तत्वज्ञान व धर्मविषयक माहिती, बहुजन समाजासाठीं प्रथमच आपल्या मायबोलींत उपलब्ध करून दिली. अनेक देवतांचें माहात्म्य कमी करून एका विठ्ठलाचेंच महत्व वाढवून सामाजिक ऐक्याला योग्य परिस्थिती निर्माण केली. यामुळें आपला देश जरी राजकीय दृष्ट्या पारतंत्र्यांत होता तरी सुद्धां आपल्या समाजाचें स्वत्व नष्ट झालें नाहीं. तें झालें असतें तर पुढें झालेलें शिवछत्रपतीच्या स्वराज्य स्थापनेचें कार्य फारच बिकट झालें असतें.

संतांनीं शरीर व उपभोग ह्याविरुद्ध फार लिहिलें आहे. इतकें कीं त्यामुळें संसार जिद्दीनें करण्यास लागणारी रग या समाजांत कमी झाली.

युरोपमध्यें या उलट स्थिती होती. त्यामुळें तिकडे भौतिक प्रगतीची प्रेरणा नष्ट होऊ शकली नाहीं. आणि एका नवीन कालखंडाचा–वैज्ञानिक युगाचा तिकडे उदय होऊं शकला. आपल्याकडे ती औद्योगिक क्रांतीची उषा प्रगट होऊं शकली नाहीं याबद्दल संतांना दूषण देण्यांत येतें. संतांचें कार्य मुख्यतः अध्यात्मविद्येचा प्रसार सामान्य जनतेपर्यंत करावयाचें असतें. स्वस्वरुपाचें ज्ञान होऊन समाजांतील लोकांनीं व्यवहार करावा. निरनिराळ्या संबंधांत स्वतःचें ज्ञान करून घेऊन सामाजिक व्यवहार घडेल तर त्या समाजांत शांतता, ऐक्य, परस्पराबद्दल प्रेम व उच्च नैतिक स्थिती आढळून येईल. त्यामुळें स्वतःला व समाजाला सुख प्राप्ती होऊं शकेल. आजही समाजांतील पुष्कळशा लोकांना स्वस्वरुपाचें ज्ञान होण्याची गरज आहे. निरनिराळ्या संबंधांत स्वतःचें वर्तन कसें असावें हें समजून घेण्याची गरज कोठेंही व कोणत्याहि कालीं कमी लेखता येण्यासारखी नाहीं. संसाराबद्दल किंवा उपभोगाबद्दल जर संतांनीं टीका केलीच असेल तर त्यांचा उद्देश मानवानें स्वतःची ओळख करून घ्यावी. इंद्रिय सुखामागें धावूं नये हा आहे. त्यामुळें भौतिक प्रगतीची प्रेरणा उत्पन्न होऊं शकली नाहीं हें जरी खरें असले तरी भौतिक प्रगती आत्मिक प्रगती-शिवाय लंगडी आहे हें विधान सहजासहजीं खोडतां येण्यासारखें नाहीं.

आज जग भौतिक प्रगतीच्या शिखरावर उभें आहे. आपणाला अनेक उपभोग्य वस्तु विपुल प्रमाणांत निर्माण करण्यांत असाधारण यश येऊं लागलें आहे. इंद्रियांच्या सुखासाठीं अनेक वस्तु निर्माण होत आहेत. त्या इतक्या प्रमाणांत उपलब्ध होऊं शकतील कीं माणसाला आतां चिंता करण्याची वेळ येणार नाहीं असें म्हटलें जातें. अणुयुगाच्या उंबरठ्यावर आपण आज उभे आहोंत. अद्याप मानवी सौख्यासाठीं अणुशक्तीचा वापर व्हायला सुरवात झालेली नाहीं. आज भौतिक प्रगती न केल्यास इतर समाजाच्या मानानें आपलें जीवन कमी प्रतीचें ठरेल. म्हणून भौतिक प्रगतीला प्रेरणा देणारें वाङ्मय आज हवें आहे. खा, प्या व मजा करा हें तत्वज्ञान सांगणारें वाङ्मय आज हवें आहे. प्रचंड राक्षसी शक्ति असलेली यंत्रें सांगत आहेत कीं खा, प्या व मजा करा. तुमच्या सेवेसाठीं आम्ही सज्ज आहोंत. यंत्राचा हा दावा खोटा आहे असें माणसाला आज वाटत नाहीं. औद्योगिक क्रांति हें मानवाच्या

बुद्धीला आलेलें प्रचंड यश आहे. त्यामुळें प्रत्येक गोष्टीचा उलगडा बुद्धिवादानेंच होऊं शकेल अशी त्याची धारणा आहे. संसार व जीवन ह्याविषयीं उदासीनता उत्पन्न करणारें वाङ्मय आज नको आहे. आपलें राष्ट्रच नव्हे तर सर्व मानव समाज ह्या नव्या तत्वज्ञानामागें ओढला गेला आहे. यंत्रांच्या योगें प्रचंड प्रमाणांत सुखसाधनें निर्माण करावीत, उपभोग घ्यावा सुखी व्हावें असें आजचें तत्वज्ञान सांगत आहे. संतांचें तत्वज्ञान त्यांना नको आहे.

स्वामी स्वरुपानंदजी, रत्नागिरी, यांनीं या यंत्र युगाचें वर्णन आपल्या अभंगवाणींत फार उत्कृष्ट रीतीनें केलें आहे. ते म्हणतात—

यंत्र–युगें घोर माजला आकांत । बळावला प्रांत दुर्जनाचा ॥ १ ॥
शास्त्रज्ञांचे शोध योजिती उन्मत्त । साधावया घात दुर्बलांचा ॥ २ ॥
लोभ अहंकार वाढती अपार । नीतिधर्मा थार नुरे कोठें ॥ ३ ॥
पाशवी संस्कार घालिती ते पिंगा । गुप्त झाली गंगा मानव्याची ॥ ४ ॥
स्वामी म्हणे नाहीं स्वरूपाचा शोध । व्यर्थ तो प्रबोध शास्त्रज्ञांचा ॥ ५ ॥

सर्वेच सुखसाधनांची प्राप्ती सर्वांना सारख्या प्रमाणांत होत नाहीं. त्यामुळें भयानक विषमता निर्माण झाली आहे. एकीकडे अतिशय श्रीमंत तर दुसऱ्या बाजूला अतिशय दरिद्री अशी सर्व समाजाची फाळणी झाली आहे. अतिशय श्रीमंतीमुळें श्रीमंताचें जीवन सडत आहे व दारिद्र्यामुळें दरिद्री जनतेचें जीवन जळत आहे.

आज प्रचंड उत्पादनाची गरज आहे. कारण माणसांच्या सुखसाधनांमध्यें खूप वाढ झाली आहे. त्यामुळें त्या वस्तु उत्पन्न करण्यासाठीं त्याला रात्रंदिवस राबावें लागत आहे. स्वतःकडे सुद्धां बघायला त्याला वेळ नाहीं. दिवसेंदिवस स्वतःची ओळख दुरापास्त होत आहे. आजचा माणूस हा प्रचंड यंत्राचा एक भाग बनत चालला आहे. फक्त भाकरी कशी मिळवितां येईल याचकडे त्याची नजर असते. पूज्य विनोबाजी आपल्या गीता प्रवचनांत म्हणतात—

“ आज जडवादाचा सारा डोळ्यावर चढला आहे. ईश्वर आहे तरी कोठें, येथून आज सुरवात आहे. तो कोणाला कोठें प्रतीतच होत नाहीं.

सारें जीवन विकारमय, विषयलोलुप आणि विषमतेनें भरलेलें आहे. हल्लीं उंचातील उंच विचार करणारे जे तत्त्वज्ञानी आहेत त्यांचे सुद्धां विचार सर्वांना भाकर कशी पोटभर मिळेल या पलीकडे जाऊं शकत नाहींत. ह्यांत त्यांचा दोष नाहीं. कारण आज अनेकांना खाण्यासही मिळत नाहीं अशी स्थिति आहे. आजची मोठी समस्या म्हणजे भाकरी. ही समस्या सोडविण्यांत सारी बुद्धि आज गढून गेली आहे. "

इंद्रियांना सुख देणाऱ्या अनेक वस्तु निर्माण झाल्यामुळें त्यांची संवेदनाक्षमता कमी कमी होऊं लागली आहे. मानवी मनही बोथट होत चाललें आहे. त्याला विशेष असें कांहीं तीव्रतेनें जाणवत नाहीं. जाणून घ्यायला वेळ नाहीं. एक प्रकारचें हृदयशून्यतेचें राज्य पसरत आहे. माणसांच्या प्रचंड गर्दीतही त्याचें जीवन एकाकी आहे. त्याच्या आनंदात व दुःखांत सहभागी होणारीं माणसें कमी कमी होत आहेत.

शक्ति व ज्ञान ही जर संयमी ( रामाच्या ) हातांत असतील तरच त्यांतून सुख निर्माण होऊं शकेल. दहाही तोंडांनीं अमर्याद उपभोग घेणाऱ्या माणसाच्या ठिकाणीं संयम कसा येईल ? त्यांतून रावणच निर्माण होऊं शकेल. आज ह्या रावणाच्या हातांत ही शक्ति व सत्ता येत आहे. आजच्या रावणानें गेल्या दोन महायुद्धांत माणसाला घायाळ केलेंच आहे.

वस्तूंशीं व निरनिराळ्या गरजांशीं माणसांचे संबंध दिवसेंदिवस वाढत आहेत. ज्यांच्याशीं ते संबंध येत आहेत तेथें एक प्रकारची गुंतागुंत निर्माण होत आहे. हे संबंध सुखावह होतील अशाच प्रकारे ते आले पाहिजेत. नाहींतर त्यांचे स्वास्थ्य धोक्यांत येईल. ह्या गुंतागुंतीतून सत्तामद, संशयीवृत्ती, विषयान्धता व स्वार्थीपणा सारखे दुर्गुण आपलें जाळें विणीत असतात. स्वामी विवेकानंद यांनीं बोस्टन शहरीं 'माझे सद्गुरु' या विषयावर आपलें ठरलेलें व्याख्यान न करितां श्रोत्यांचें दुर्गुणांनीं धुंद झालेले चेहरे पाहून ते म्हणाले—

" सभ्य स्त्री–पुरुष हो, रामकृष्णांचें चरित्र ऐकण्याची तुमची पात्रता नाहीं. तुम्हीं सत्तावारुणीनें धुंद झालेले आहांत. विहित आणि अविहित कर्म यांचा विचार तुमच्या ठिकाणीं नष्ट झाला आहे. कनक आणि कामिनी यांचा

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम.................. वि: ..................
क्रमांक.................. नों दि..................



अनावर लोभ तुमच्या डोळ्यांतून ओसंडत आहे. अर्थवादानें तुमच्या जीवनांत अनर्थ निर्माण केला आहे. पावित्र्याची कल्पना तुम्हांला स्वप्नांतही करतां येणार नाहीं. जडवादाची आत्यंतिक उत्क्रांति हीच तुमची संस्कृति आहे. परलोकाचा विचारही तुमच्या चित्ताला शिवलेला नाहीं. येथें निग्रोना ठार मारतात, ही तुमची भ्रातृभावना. देह हाच तुमचा आत्मा आहे. इंद्रियांच्या लालसा पूर्ण करणें हीच तुमच्या जीवनाची इतिकर्तव्यता आहे. ''

यंत्र युगानें पुष्कळच समस्या निर्माण केल्या आहेत. लोकांचें जीवन सुखी झाल्याचा जेवढा आभास निर्माण केला जातो तेवढे तें झालेलें नाहीं. कारणही उघड आहे. यांत्रिक वा भौतिक शक्तीचा तोल आत्मिक शक्तीनें साधलेला नाहीं. त्यांचे भौतिक शक्तीचें पाऊल फार पुढें आहे व दुसरें पाऊल फारच मागें आहे.

तेव्हां संतांनीं त्याला उपकारक वाङ्मय निर्माण केलें नाहीं यासाठीं संतांबद्दल उगाच उपेक्षा व राग न धरतां त्यांनीं निर्माण केलेलें वाङ्मय हेंच माणसाचें दुसरें पाऊल पुढें टाकायला मदत करील हें ओळखलें पाहिजे. आजच्या एवढी संत वाङ्मयाची गरज पूर्वीं केव्हांही नव्हती हेंही ध्यानांत आणलें पाहिजे.

संत कालदृष्ट्या फार पूर्वी होऊन गेले. त्यांचें जीवन आजच्या काळालाही उपयोगी ठरेल. कालदृष्ट्या जुनें तें जुनें व नवीन तें नवीन हें विधान तितकेंसें टिकणारें नाहीं. नितितत्वाचें बाबतींत त्याचें नवीनपण सदैव टिकून राहूं शकतें. त्याचें नवीनपण स्थल कालातीत असतें. शिवाजी महाराजांचा शूरपणा त्या काळांत त्या परिस्थितींत ज्याप्रमाणें प्रगट झाला तसाच तो आजही प्रगट झाला असता असें म्हणतां येणार नाहीं. त्यावेळीं त्यांनीं तलवार घेतली म्हणून आजही तलवार घेऊन ते लढतील असें म्हटलें तर त्यांच्यावर अन्याय केल्यासारखें होईल. आजची शस्त्रांची प्रगती शिवाजी महाराजांच्या काळापेक्षां मोठी आहे. म्हणून शिवाजीमहाराजांच्या शूरपणाचें महत्त्व कमी ठरेल कां ? तसेंच आजच्या औद्योगिक व वैज्ञानिक शिखरावर आपण आहोंत म्हणून शांतीचे, मानवतेचे वा उच्च नैतिक मूल्यांचें महत्त्व कमी ठरणारें नाहीं. संतांचे, मानवतेचे, शांततेचे व उच्च

नैतिकतेचें जीवन व तत्वज्ञान आजही उपयोगी पडणारें आहे. महत्त्व आहे त्यांच्या श्रेष्ठ चरित्रांचें व गुणांचें. आजच्या काळांत संत वेगळ्या प्रकारें कालानुरूप वागले असतेच असते.

अशा या संत परंपरेंत श्रीसंत चोखामेळा महाराज यांचें स्थान अनन्य-साधारण आहे. सामाजिक दृष्ट्या अवमानल्या गेलेल्या कुळामध्यें जीवन जगणाऱ्या चोखामेळ्यांनीं आपल्या भक्तिबळावर व आत्मनिष्ठेवर एवढें मोठें स्थान प्राप्त करून घेतलें आहे कीं कालसागरामध्यें सर्व मानव जातीला मार्गदर्शक ठरावें अशा दीपस्तंभाचें महत्त्व त्यांना आलें आहे. परिस्थिती चहुंबाजूंनीं कितीही प्रतिकूल असली तरी तिच्यावर मात करून प्रयत्नांनीं तो परमेश्वरपदही मिळवूं शकतो, हें त्यांनीं स्वतःच्या उदाहरणानें दाखवून दिलें आहे.

: २ :

# भागवत धर्म, पंढरी व विठ्ठल

पंढरपूर क्षेत्रास दक्षिण द्वारका असें समजण्यांत येतें. वारकऱ्यांचें उपास्य दैवत श्रीविठ्ठल हें भगवान् श्रीकृष्णाचे बाळरुप आहे असें समजण्यांत येतें व वारकरी लोकांची तशी श्रद्धा आहे. त्याप्रमाणें भागवत धर्मांतील अर्थात वारकरी पंथांतील उपासक सगुणोपासना, नामस्मरण, हरिकिर्तन, पंढरी व आळंदीच्या वाऱ्या इत्यादि गोष्टींची वारकऱ्यांची अर्थात विठ्ठलभक्तांची साधना बनलेली असते. वारकरी लोक या गोष्टींकडे फार आदरानें पाहातात. ही साधना आज कित्येक शतकें अव्याहतपणें दिवसेंदिवस गंगेच्या प्रवाहाप्रमाणें वाढत्या प्रमाणावर चालू आहे. भागवत धर्माची शिकवणूक समानतेची आहे. देवापुढें कुठल्याही जातीचा मनुष्य येऊन भागवत धर्मांतील साधनांचा अवलंब करून आपली आत्मोन्नति करून घेण्यास मोकळा असतो. देवापुढें उच्चनीच हा भेदभाव नाहीं.

या भागवतधर्माबद्दल ह. भ. प. पांगारकर यांनीं 'ज्ञानेश्वरांची प्रभावळ' या आपल्या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत मांडलेले विचार मननीय आहेत. ते म्हणतात—

"वेदशास्त्र प्रमाण मानणाऱ्या सनातन धर्माचाच भागवतधर्म हा नवा व लोकप्रिय अवतार होय. हा धर्म आचांडाल सर्व जीवांस प्रेमभक्ति भाग्य देणारा आहे. आमच्या आजकालच्या सामाजिक प्रश्नांना व चळवळींनाही या भागवतधर्मानें चोख उत्तर देऊन ठेवलें आहे. यांत गोंधळ नाहीं, वाद नाहीं, मी तूं नाहीं, पक्षभेद नाहीं. निर्मळ मनानें व निरहंकारानें याजकडे पहावें, यांत मिसळावें व मिथ्या भेदभाव विसरून जावें व्यवहारांतले भेदभाव व्यवहारांतच ठेवावेत, परमार्थांत आणूं नयेत."

श्रीचोखोबाराय यांच्या काळीं पंढरपुरांत श्रीनामदेवरायांचें अवतारी कार्य सुरूं झालें होतें. त्यांनीं समताधर्माचा झेंडा पंढरपूर येथें प्रथम फडकावला. महाराष्ट्रांतील जनतेला सामाजिक विषमतेचा असाध्य रोग अगोदरपासूनच जडला होता. कर्मठांच्या वर्णाश्रमाच्या खुनी माऱ्यामुळें हिंदुलोकांमधील ऐक्य व बंधुभाव रसातळास जाण्याच्या मार्गावर होते. प्रत्येक जमात आपल्या-पुरतें पाहात होती. इतर समाजांतील लोकांकडे आपुलकीच्या भावनेनें पाहण्याचा अभाव जागोजाग दिसत होता. मला त्याचें काय, या तुच्छतेनें व बेफिकीर वृत्तीनें दुसऱ्या समाजाकडे–विशेषतः खालच्या थराकडे पहाण्याचा दृष्टीकोन तयार झाला होता. अखिल हिंदुत्वाच्या व्यापक कल्पनेला जवळ-जवळ मूठमातीच मिळाली होती.

प्रा. शं. दा. पेंडसे यांनीं आकाशवाणीवरून 'श्रीज्ञानेश्वराची अमृत-वाणी' या विषयावर बोलतांना त्या काळच्या समाजाचें केलेलें चित्रण चिंतनीय आहे. ते म्हणतात—

"ज्ञानेश्वरांच्या वेळीं महाराष्ट्रांतील वरिष्ठ वर्ग सुखासीनतेमुळें कर्तव्य-च्युत झाले होते. समाजांत धार्मिक, सामाजिक आणि आर्थिक विषमता सर्वत्र दिसत होती. या विषमतेमुळें व जन्मजात श्रेष्ठ–कनिष्ठतेच्या कल्पनांमुळें होणारा सामाजिक छळ आणि अपमान त्यांनीं स्वतःच अनुभवला होता. धर्म व धर्मशास्त्र न जाणतांहि धार्मिकतेचे ढोंग करणाऱ्या ब्राह्मणांनीं,

त्यांच्या माता-पित्यांना देहांत प्रायश्चित्त सांगून घेतलेला बळीहि ते विसरले नव्हते. धर्म, कर्म, भक्ति, यज्ञ, संन्यास इत्यादि सर्व तत्वांचें स्वरूप लोकांनीं विकृत करून टाकलें होतें व बहुजन समाजाला अध्यात्म ज्ञानाचे दरवाजे बंद झाले होते. ”

अशा बिकट विपत्कालीं नामदेवरायांनीं सर्व थरांतील लोकांना एकाच ध्वजाखालीं येण्याची हाक दिली. भागवतधर्म हा सर्व जातींतील लोकांना समानतेनें वागविणारा धर्म आहे अशी ग्वाही दिली. याचवेळीं संस्कृत भाषेच्या रेशमी रुमालांत घट्ट बांधलेला वेदांत ज्ञानदेवांनीं उघडून राजरोसपणें सर्वांस समजणाऱ्या मराठी वा प्राकृत भाषेंत लिहून या झेंड्याच्या जवळ ठेविला होता. गु. शं. वा. दांडेकर यांनीं आपल्या वारकरी पंथाचा इतिहास या पुस्तकांत या बाबतींत यथार्थ वर्णन केलें आहे. ते म्हणतात—

“ वैदिक धर्मांतील सर्व धार्मिक ग्रंथ संस्कृतांत व बहुजनसमाज हा कालौघाबरोबर त्या भाषेस अनोळखी होत चाललेला. अंतःकरणाला जीवनाचा ओलावा देणाऱ्या धर्माचें अज्ञान ज्यावेळेस एखाद्या समाजांत वाढतें त्यावेळेस तो अज्ञ समाज धर्मांतर करण्यास साहजिकच तयार होतो. धर्मांतर करण्यास याचमुळें नेहमीं समाजाचे खालचे थर-कीं जेथपर्यंत शुद्ध धर्मज्ञान पोहोचूं शकत नाहीं तेच तयार होतात. श्रीज्ञानदेवास ही आपत्ति घडधडीत दिसत होती. एवढ्याचकरितां त्यांनीं आपला ग्रंथ मराठींत लिहिला.

तीरें संस्कृताची गहनें। तोडोनि मऱ्हाठिया शब्द सोपानें।
रचिली धर्म निधानें। निवृत्तिदेवें ॥ ज्ञाने. ११-९ ”

तथापि, इतर समाजांतील.... विशेषत; खालच्या समाजांतील लोक या भागवतधर्माच्या ध्वजाखालीं येण्यास प्रथम प्रथम बिचकत. अशावेळीं महार समाजांतील थोर संत—श्रीचोखोबाराय हे या ध्वजाखालीं निर्भयपणें येऊन प्रथम उभे राहिले व इतर समाजांतील लोकांस त्यांनीं पाचारण केलें. खरोखर त्याकाळीं व त्या सामाजिक परिस्थितींत चोखोबांनीं दाखविलेलें मनोधैर्य वाखाणण्यासारखें आहे. त्यांनीं दाखविलेल्या धैर्यामुळें इतर समाजांतील लोकांचें मनोधैर्य कितीतरी पटीनें वाढलें. चोखोबांचीं ही कामगिरी खरोखर अतुलनीय

होती असें कोणीही म्हणेल. 'महार' हा शब्द उच्चारणें सुद्धां अमंगल मानणारी माणसें त्याकाळीं बहुसंख्य होती. परंतु ह्या महार संतानें मराठी जनतेस दाखवून दिलें कीं हा भागवतधर्म सर्वांसाठीं असून एकाचा किंवा कांहीं विशिष्ट जमातीपुरता नाहीं. त्यांच्या या कृत्यामुळें इतर समाजांतील लोकसुद्धां भराभर येऊन भागवतधर्माच्या झेंड्याखालीं समानतेनें वावरूं लागले.

या बाबतींत 'मराठी संतांचे सांस्कृतिक कार्य' ह्या विषयावर मुंबई आकाशवाणीवरून बोलतांना प्रा. गं. वा. सरदार म्हणतात—

"मराठी संतांच्या भक्तिसंप्रदायानें महाराष्ट्रांतील बहुजन समाजाच्या धर्मजीवनाला आध्यात्मिक अधिष्ठान मिळवून दिलें. संकुचित ग्रामजीवनाच्या ठराविक चाकोरींत पिढ्यान् पिढ्या खिचपत पडलेल्या शूद्रातिशूद्रांना त्यांनीं अंतर्मुख बनविलें आणि त्यांच्या अंतःकरणांत आत्मोन्नतीची प्रेरणा निर्माण केली. अठरापगड जातींच्या लोकांसाठीं ज्ञानेश्वर प्रभृति संतांनीं मोक्षसुखाचें अन्नछत्र घातलें. 'सकाळांसी येथें आहे अधिकार'. भागवतधर्माच्या विशाल मंदिरांत हा ब्राह्मण, हा शूद्र, हा अंत्यज असा भक्तिप्रपंच नव्हता. 'नाहीं वर्ण धर्म याती। नाभीं अवघीची सरती ॥' हिंदुधर्माच्या दैनंदिन व्यवहारांत कुळ, जाति आणि वर्ण यांच्या उच्च नीच भावाचे व सोवळ्या ओंवळ्याचें फारच स्तोम माजलें होतें.

घोकाया अक्षर। मज नाहीं अधिकार ॥
सर्व भावें दीन। तुका म्हणे याति हीन ॥
हीन याति माझी देवा। कैसी घडेल तुझी सेवा ॥
मज दूर दूर हो म्हणती। तुज भेटूं कवण्यारीती ॥
आदि अंती अवघा विटाळ संचला। सोवळा तो झाला कोण न कळे ॥

उच्च वर्णीयांची अहंमन्यता आणि तुसडेपणा यामुळें ज्यांची मनें व्यथित झाली होती ते शूद्रातिशूद्र साहजिकच वारकरी पंथाकडेच ओढले गेले. पांडुरंग भावाचा भुकेला आहे. तो जातपात पाहात नाहीं आणि वर्णभेदहि मानीत नाही. ज्ञानेश्वरांपासून चोखामेळ्यापर्यंत सर्व जातीचे भक्त त्याला सारखेच प्रिय आहेत. म्हणून विठ्ठल संप्रदायांत उच्च नीच भावाची उपाधि नाहीं. जन्मसिद्ध विषमतेची बाधा नाहीं."

वर सांगितल्याप्रमाणें प्रत्येक समाज सामाजिक विषमतेमुळें अंध झाला होता. आपसांतील तेढी वाढत होत्या. एकमेकांस कमी अधिक मानण्यांत आपली सारी शक्ति गमावीत होते. आपत्काळीं भगवान्, ज्ञानेश्वर नामदेवराय इत्यादि संतांचे अवतार झाले आणि याचवेळीं इतर बहुतेक सर्व समाजांत संत निर्माण होऊन ज्ञानदेव व नामदेवराय इत्यादि संतांनीं आरंभिलेल्या कार्यास मदत केली. भावी काळांत हिंदुधर्मीयांना खडतर काळांतून जावें लागणार आहे याची जाणीव या संतांना होती. म्हणून भागवत धर्माच्या मंदिराचा जीर्णोद्धार व डागडुजी मजबूत तऱ्हेनें त्यांनीं करण्याचें ठरविलें होतें असें म्हणावें लागतें.

संतांच्या अवताराबाबत लिहितांना गु. दांडेकर आपल्या वारकरी पंथाचा इतिहास या पुस्तकांत म्हणतात—

> " श्रीज्ञानदेव–नामदेव यांचा काल अनेक दृष्टींनीं मोठा अपूर्व होता. विष्णूचा अवतार झाला म्हणजे जसे इतर देवहि त्याचबरोबर अवतार घेतात, चंद्र उदयास आला म्हणजे इतर तारागणहि जसा उदय पावतो अथवा सार्वभौम चक्रवर्ती राजा निघाला म्हणजे आपली मुगुटशिखरें त्याच्या चरणावर नत करणारी नृपतिपंक्ति ज्याप्रमाणें त्याचबरोबर निघते त्याचप्रमाणें श्रीविष्णु अवतार, ज्ञानियांचे राजे ज्ञानदेव हे ज्यावेळीं या आनंदभुवनांत अवतरले त्याकाळीं एकदम अनेक संत निर्माण झाले. त्यावेळेस अशी जात राहिली नाहीं कीं जींत संत निर्माण झाले नाहींत, असें म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाहीं. "

तसेंच न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे यांनी आपल्या मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष ( Rise of the Maratha Power ) या आपल्या इंग्रजी पुस्तकांतील आठव्या प्रकरणांत महाराष्ट्रीय साधुसंताविषयीं मननीय विचार प्रकट केले आहेत—

> " या साधुसंत मेळ्यांत कांहीं स्त्रिया, कांहीं मराठे, कुणबी, शिंपी, माळी, कासार, सोनार, पश्चात्तापानें शुद्ध झालेल्या वेश्या, दासी व अतिशूद्र महार व निम्मेशिम्मे ब्राह्मण अशी मंडळी होती. याबरोबर असें आढळून येईल कीं या आध्यात्मिक उन्नतीचा केवळ परिणाम एकाच जातीवर पडला

नसून लहानापासून थोरापर्यंत सर्व समाज तिनें वेडा करून टाकिला होता. उच्च–नीच, अज्ञ–सुज्ञाण, स्त्री–पुरुष सर्व लोक धर्मानंदांत नाचूं लागले होते. अशा प्रकारची धर्मजागृति इतर देशांच्या इतिहासांत क्वचितच सांपडेल...''

अशा तऱ्हेनें बहुतेक बऱ्याच खालच्या जातींत एक एक तरी संत निर्माण झाला व त्यामुळें ती जात वा समाज अधिक उंचावला.

पंढरपूर क्षेत्रास एवढें महत्त्व प्राप्त करून देण्याचें सर्व श्रेय पुंडलिकाकडे जाते. चंद्रभागेच्या विस्तीर्ण वाळवंटांत मातृपितृभक्त पुंडलिकरायानें आपल्या मातापित्याच्या सेवेची कसोटीच लावली असें म्हणावें लागतें. कारण त्याच्या मातृपितृ भक्तीच्या कसोटीस उतरल्यामुळेंच विठ्ठलाला तेथें येऊन उभें राहावें लागलें आणि त्यांतूनच चंद्रभागेच्या पात्रांत पुंडलिकरायाचें मंदिर आज शतकानुशतकें उभें आहे. पुंडलिकरायाच्या दर्शनाशिवाय विठ्ठल दर्शनाचा लाभ वा वारी सफल होत नाहीं अशी वारकऱ्यांची धारणा वा श्रद्धा असते. विठ्ठलदर्शन घेणाच्या अगोदर चंद्रभागेचें स्नान व पुंडलिकाचें दर्शन घ्यावेंच लागतें. श्रीपुंडलिकरायावर निरनिराळ्या संतांचे कित्येक अभंग आहेत. जनाबाईंचा अभंग तर प्रसिद्धच आहे—

भक्तांमाजी अग्रग्रणीं । पुंडलिक महामुनी ॥ १ ॥
त्याचे प्रसादें तरले । साधु संत उद्धरिले ॥ २ ॥
तोचि प्रसाद आम्हासी । विटेवरी हृषिकेशी ॥ ३ ॥
पुंडलिक बाप माय । दासी जनी वंदी पाय ॥ ४ ॥

अर्थात् पुंडलिकरायांना सर्व संतांनीं धन्यवाद दिले आहेत. पुंडलिकरायांच्या विनंतीमुळें देवाला अजूनपर्यंत विटेवर तिष्ठत उभें राहावें लागलें आहे. म्हणून पंढरपूर, पुंडलिक व विठ्ठल या तिहींचा संयोग येथें आहे. विठ्ठलाच्या उभें राहाण्यानें सर्व संतांना तो सुखाचा आगर आहे व पतित पावन आहे. या विठ्ठलामुळें पंढरपूरास क्षेत्राचें स्वरुप आलें. गेल्या कित्येक शतकांत या क्षेत्रांत साधुसंत, ऋषि, महंत व स्वामी इत्यादिकांनीं येथें येऊन वस्ती केली आहे. त्यामुळें पंढरपूरांत–संतांच्या समताभूमीवर निरनिराळे मठ व धर्मशाळा

यांची गर्दी झालेली दिसते. व्यक्तिवाचक मठ व जातिवाचक धर्मशाळा यांची संख्या आज बरीच वाढली आहे. ही गोष्ट कोणत्याही विचारी माणसाला थोडी तरी खटकल्याशिवाय राहात नाहीं. ह्या सर्व गोष्टी सोडल्या तरी पंढरपुरांत एवढें कशाचें आकर्षण आहे ? आकर्षण आहे तें श्रीपांडुरंगाचें. एकदां का या देवाचें आकर्षण वाढूं लागलें कीं माणसें त्या आकर्षणांत गोविलीं जातात. साधुसंतांनीं तर पंढरपूर आपलें जवळ जवळ निवासस्थानच करून टाकलें आहे. आपल्या 'हरिपाठ विवरण' या पुस्तकांत श्रीसंत धुंडा महाराज यांनीं पंढरपूर क्षेत्राबद्दल केलेलें वर्णन यथोचित असें आहे. ते म्हणतात—

> "प्रचलित काळांत महाराष्ट्रांतील सर्व साधुसंतांनीं सर्व तीर्थक्षेत्रांत श्रेष्ठ तीर्थ पंढरी हें निश्चित केलें आहे. ज्ञानेश्वर महाराज, नामदेवराय, एकनाथ महाराज, तुकाराम महाराज आदिकरून सर्वच संतांची यांत एकवाक्यता आहे. पंढरी महात्म्यावर सर्वच संतांचे शेंकडो अभंग आहेत. सर्व साधुसंतांनीं आपल्या श्रद्धेचें, भावनेचें, प्रेमाचें हेंच एकमेव क्षेत्र केलें आहे. अनेक शतकांपासून मोठे मोठे साधुसंत, पीठस्थ, आचार्य यांनीं येथेंच येऊन नित्यशः वारी करून यथेच्छ प्रेमसुख लुटलें आहे व या मृत्युलोकापुढें वैकुंठ व सत्य-लोकासहि लाजवावयास लाविलें आहे."

यावरून कल्पना येईल कीं पंढरपूर व विठ्ठल यांचे अभेद्य व न तुटणारे असें नातें आहे. या प्रेमनगरांत वारकरी म्हणूनच गेलें पाहिजे व तेथील प्रेमसुख लुटलें पाहिजे. तुकोबाराय म्हणतातच—

होय होय वारकरी । पाहे पाहे रे पंढरी ।।

अशा या विठ्ठलाच्या प्रेमनगरींत चोखोबांनीं प्रेमसुख लुटलें. म्हणूनच ते म्हणतात:—

पंढरीचें सुख नाहीं त्रिभुवनीं । प्रत्यक्ष चक्रपाणी उभा असे ।। १ ।।
त्रिभुवनीं समर्थ ऐसे पैं तीर्थ । दक्षिण मुख वाहात चंद्रभागा ।। २ ।।
सकळ संतांचा मुगुटमणि देखा । पुंडलीक सखा आहे जेथं ।। ३ ।।
चोखा म्हणे तेथं सुखाची मिराशी । भोळ्या भाविकांसी अखंडित ।। ४ ।।

: ३ :

# चोखोबांचा जीवन वृत्तांत

चोखोबांच्या मातापित्याची, त्यांचें जन्मस्थळ व जन्मकाळ यांची फारसी विश्वसनीय अशी कांहीं माहिती उपलब्ध नाहीं. लोककथा बऱ्याच रूढ आहेत. अशाच लोककथेवर वा आख्यायिकांवर आधारलेली माहिती पुढें करावी लागत आहे.

या बाबतींत श्रीतुकाराम चरित्राच्या कालनिर्णय प्रकरणांत 'महात्म्यांच्या चरित्राचें गांभीर्य' विषयावर लिहितांना ह. भ. प. पांगारकर यांनीं प्रकट केलेले विचार फार उद्बोधक आहेत. ते म्हणतात—

"तत्वतः पाहतां महात्म्यांच्या आयुर्दायाचा हिशेब आपण काय लावणार ? मरणाला मारून उरलेले व काळाच्या माथां पाय देऊन जगत्कल्याणार्थ स्वेच्छेनें या भूलोकीं संचरणारे महात्मे त्यांना जन्म कोठचा व मृत्यु कोठचा ? मुक्तकोटींतले महात्मे जगत्कल्याणाची सूक्ष्म विमलवासना चित्तीं ठेवून वेळोवेळीं मृत्युलोकीं अवतरतात व कांहीं सभाग्य जीवांना दुर्लभ संगलाभ देऊन ठायींच्या ठायीं विराम पावतात. त्यांच्यावर आम्ही जन्ममृत्यूचे मिथ्या आरोप करीत असतो ! उदयास्त प्रमाण मानून स्वस्थानीं स्थिर असलेल्या सूर्यावर आम्ही आकाशगमनाचा आरोप करितों आणि त्यांतही आमच्या माजघरांत त्याच्या प्रकाशाचा कवडासा पडला व तो चढत उतरत नाहींसा झाला यावरून दिवसाच्या गतीचें मान मोजीत असतों. त्यांतलाच प्रकार रामकृष्णादि भगवदवतारांच्या व तत्तुल्य विभुतींच्या चरित्रांचा होय ! त्यांचे अजत्वें जन्मणें, अक्रियता कर्म करणें, व न मरतां मरणें हेंच त्यांचें खरें चरित्र होय !"

चोखोबांच्या जीवनाची माहिती लोकांत रूढ आहे ती अशी :—

कोरेगांवांत चोखोबाचे जन्मकाळीं एक पाटील होता. तो फार भाविक असून एकनिष्ठ विठ्ठलभक्त होता. कोणतीही नवीन वस्तु घेतली तर ती पांडुरंगाला दाखविल्याशिवाय वापरत नसे व खाण्याची वस्तु असेल तर खात नसे. असा त्याचा नेम होता.

एक वर्षी आंब्याला अमाप पाड आला होता. पहिल्या फळांच्या ढीगांतून त्यानें सवाशें उत्तम असे आंबे निवडले व ते पांडुरंगरायाला अर्पण करण्याकरितां येसकर महाराबरोबर चिठ्ठी देऊन पंढरपूरी रवाना केले. येसकर महाराचे नांव सुदाम असें असून त्याच्या पत्नीचें नांव सावित्रीबाई असें होतें. हें दांपत्यपण विठ्ठल भक्त असून पंढरपूरच्या वाऱ्या करणें, एकादश्या करणें वगैरे वारकऱ्यानें करावयाच्या साऱ्या गोष्टी ते मोठ्या आस्थेनें करीत. त्यांना कांहीं मूल बाळ नव्हतें. देवावर त्यांची एकनिष्ठ भक्ति होती.

येसकर सुदामानें आपल्याबरोबर आपल्या पत्नीस घेतलें व ते सवाशें आंबे दोघांनीं मिळून पाटींत घातले व बडव्यांना दिलेली चिठी घेऊन तीं पंढरीच्या वाटेस लागलीं. विठ्ठल चिंतनांत पडलेलें त्यांचें प्रत्येक पाऊल त्यांना पंढरपूरानजीक आणीत होतें. त्यांचें मन विठुरायाच्या मंदिराचा कळस पाहाण्यास अगदीं आतुर झालें होतें. महाद्वारांत जाऊन विठ्ठल नामाचा जयघोष केव्हां करूं असें त्यांना झालें होतें.

थंडी, ऊन, थकवा व भूक याची पर्वा न करतां हें जोडपें जवळ जवळ पंढरीपासून दोन कोसांच्या अंतरावर आलें होतें. इतक्यांत पांडुरंगाला काय वाटलें कोण जाणे. त्यानें एका अगदीं वृद्ध ब्राह्मणाचें रूप घेऊन त्यांच्यापुढें उभा राहिला. त्याचें हातपाय लटलटा कापत होते. त्याला अतिशय भूक लागली होती व तो कांहींतरी त्यांच्याजवळ खावयास मागूं लागला. येसकर महार त्याला म्हणाला—“बाबा, माझ्याजवळ आतां तुला देण्यासाठीं कांहींच नाहीं. शिवाय आम्ही महार व आपण ब्राह्मण. माझ्या डोक्यावर आंब्यांचे ओझें आहे. परंतु ते आंबे माझे नसून लोकाचे आहेत.” असें म्हणून तो पुढें चालूं लागला. त्याच्या मागून सावित्रीबाई येत होती. त्या वृद्ध ब्राह्मणाचा तिला कळवळा आला. विचार न करतां एक चांगला आंबा निवडून त्याचे हातावर ठेवला. ब्राह्मण संतुष्ट झाला. त्यानें तो चोखून पाहिला. परंतु लगेच आंबा आंबट आहे म्हणून सावित्रीबाईस परत केला. आंबा आंबट निघाला म्हणून तिला फार वाईट वाटलें. तो उष्टा आंबा पाटींत न ठेवतां तिनें आपले ओटींत ठेवला.

पुढें हें दांपत्य पंढरीस पोहोचल्यावर बडव्याच्याकडे जाऊन त्याच्यापुढें ते आंबे व चिठ्ठी ठेविली. बडव्यानें चिठ्ठी वाचून आंबे मोजून पाहिले तो एक आंबा कमी पडला. लगेच त्यानें त्यांना जाब विचारला. सावित्रीबाईनें सर्व हकिकत त्याला सांगितली व चोखलेला आंबा दाखविण्यासाठीं ती आपल्या ओटींतील फळ काढूं लागली. चमत्कार असा झाला कीं आंब्याच्या ऐवजीं एक सुंदर बालक सर्वांच्या नजरेस पडलें. हा पांडुरंगाचाच खेळ आहे असें सर्वांस वाटलें. देवानें आंबा चोखला व प्रसादाचें मूल झालें असें समजून त्या मुलाचें नांव चोखामेळा असें ठेवण्यांत आलें. आपल्या चरित्र नायकाचा जन्म अशा चमत्कारिकरित्या झालेली लोककथा आहे.

या संबंधित एक लोककवन भाविक लोकांत रूढ आहे. तें वाचकांच्या माहितीसाठीं खालीं देत आहे.

## लोककवन

कोरेगांवी एक पाटील तो भला । निजध्यास त्याला विठोबाचा ॥ १ ॥
देई आधी फळें देवाधिदेवा । मग घाली बरवा आपुले मुखीं ॥ २ ॥
लागली नुतन आंबीयासी फळें । त्यांतूनि निवाडिले गोड गोड ॥ ३ ॥
भरोनी दोन डाला मोजुनी सवाशें । बोलावी येसकरास महारा लागी ॥ ४ ॥
डाला न्यावयासी दुजें नाहीं कोणी । घेतले कांतेसी तेणें आपुल्या ॥ ५ ॥
तयाची ते कांता पतिव्रता सती । वोझें नेई शिरीं पंढरीसी ॥ ६ ॥
पंढरी समीप राहे दोन कोस । तेव्हां पंढरीनिवास काय करी ॥ ७ ॥
झाला वृद्धरूप हाले हानूवटी । टेकीतसे काठी हाळू हाळू ॥ ८ ॥
आळवी महारासी क्षुधावंत फार । देई हातावर फळ एक ॥ ९ ॥
महार म्हणे स्वामी फळें पाटलाची । एका ब्राह्मणाचे नांवें पत्र ॥ १० ॥
महार म्हणे स्वामी खंडोनी निगाणी । फळ देणें करीं नाहीं माझ्या ॥ ११ ॥
इतुकें सांगोनिया पुढें चाल केली । मागोनिया आली कांता त्याची ॥ १२ ॥
आडवी महारिणीसी क्षुधावंत फार । देई हातावर फळ एक ॥ १३ ॥

ऐकोनि वचन तिनें केलासे निर्धार । द्यावें हातावर तोरण एक ॥ १४ ॥
पुढें होणार तें होवो सुखें जाण । भुकेलीया जाण देऊं फळ ॥ १५ ॥
चांगला तो एक निवडोनिया दिला । तयानें घेतला हाता माजी ॥ १६ ॥
लावी मुखी चोखी आंबट तो आहे । परतोनी देत आहे तिचे करीं ॥ १७ ॥
घालीतां तो नये उष्टें पाटी माजी । घेतला ओटी माजी सावित्रीनें ॥ १८ ॥
महार ते महारिण आले पंढरीसी । ज्याचा डाला त्याची पत्र दिलें ॥ १९ ॥
एकशें चोवीस एक काय झाला । तो म्हणे ब्राह्मणाला विश्वासानें ॥ २० ॥
पुसुं तो लागला आपल्या कांतेसी । आंबा सांग वेगेसी काय झाला ॥ २१ ॥
ती म्हणे स्वामी ब्राह्मणासी दिला । तेणेंही चोखीला पुरता नाहीं ॥ २२ ॥
उष्टा तो घालितां नये पाटी माजी । घेतलासे ओटी माजी आहे ॥ २३ ॥
पाहाति पंढरीचे सर्व लोक पाहा । आंबीयाचे बाळ झालें तेव्हां ॥ २४ ॥
देवानें चोखिला काय वर्णू लिला । नांव चोखामेळा ठेवियलें ॥ २५ ॥
नामा म्हणे धन्य अनुपम्य लीला । भक्तांचा कळवळा देव पाळी ॥ २६ ॥

हें कवन नामदेवरायांचे आहे असें शेवटच्या ‘ नामा म्हणे ’ या चरणावरून म्हणावें लागतें. तथापि उपलब्ध असलेले नामदेवरायांचे समग्र अभंग गाथे धुंडाळले. परंतु हा अभंग कोणत्याही गाथ्यांत मिळत नाहीं. बऱ्याच वारकऱ्यांकडे याचे बद्दल माहिती विचारली. परंतु कोणीही विशेष अशी कांहीं माहिती देऊं शकत नाहीं. मात्र कांहीं वारकरी हा अभंग तोंडपाठ म्हणून दाखवितात. हा अभंग क्षेपक असावा म्हणून तो गाथ्यांत मिळत नसावा. पंढरपूर येथील ह. भ. प. नामदास पंढरीनाथ नामदास महाराज यांच्याकडे एका जुन्या वहींत हा अभंग लिहिलेला आढळला. तो लिहून घेतला व वाचकांसाठीं पुढें ठेविला. हेंच कवन अगदीं थोड्या फार फरकानें श्री. किसन फागू बंदसोडे, पाटील, नागपूर यांच्या “ चोखामेळा महाराज चरित्र ” ग्रंथांत ‘ चोखामेळा महाराज यांचा जन्म ’ ह्या प्रकरणांत छापलें आहे.

चोखोबांच्या जन्माबाबत दुसरेंही एक लोकमत प्रचलित आहे. कांहीं लोक म्हणतात विठ्ठल वृद्ध ब्राह्मणाचें रुप घेऊन आल्यावर व दिलेला आंबा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम.......................... वि: ..................
क्रमांक .......................... नों दि ..................



चोखल्यावर तो प्रसाद त्यानें सावित्रीबाईस दिला व त्या प्रसादाच्या योगानें पुढें चोखोबांचा जन्म झाला.

आजच्या विज्ञान युगांत अशा चमत्कारावर विश्वास ठेवणारे लोक अगदीं थोडेच. तथापि विश्वास हा कोठेंतरी ठेवावा लागतोच. कांहीं अलौकिक गोष्टी केव्हां केव्हां होतात. चोखोबारायाचे समकालीन संत गोरोबा काका यांचे तुटलेले हात परत आले व कांहीं वर्षांपूर्वी त्यांचें मेलेलें मूल देवानें आणून दिल्याच्या गोष्टी त्यांच्या चरित्रांत नमूद आहेत. कांहीं असो. ज्याची जशी श्रद्धा असेल त्यानें तसें घ्यावें. चोखोबांच्या जीवनाचा अभ्यासक एकच गोष्ट सांगू शकेल कीं चोखोबांचें सारें जीवन भाव–भक्तीच्या एकाच खांबावर उभें आहे.

जनकराजाला सीतामाई ही भूमातेपासून ईश्वरी देणगी म्हणून लाभली होती असें वर्णन आहे. इ. सनाच्या ७ ते ९ या शतकांत दक्षिण भारतांत सुमारें बारा अलवार संत होऊन गेले. ते सारे श्रीविष्णूचे महान् भक्त होते. ह्या साऱ्या भक्तांत अंदाल ह्या स्त्रीभक्ताचें स्थान फार मोठें आहे. तिचाहि जन्म असाच अलौकिकपणें झाल्याचें नमूद आहे. सातव्या शतकांत मदुराय जिल्ह्यांत राहात असलेल्या पेरियलवर नांवाच्या एका अपत्यहीन विष्णुभक्ताला त्याच्याच घरासमोरील बागेंत तुळसीच्या झाडाखालीं ती अर्भकावस्थेंत सांपडली. त्या देदिप्यमान मुलीचें संगोपन त्यानें आपली स्वतःची मुलगी असें समजून केलें. भूमातेनें हें कन्यारत्न पेरियलवरला बहाल केलें होतें.

भाविक लोकांची फार मोठी श्रद्धा आजही आहे कीं चोखोबांचा जन्म 'अयोनिज' आहे. तसेंच ते 'जयदेवाचा अवतार' आहेत असेंही कांहीं जुन्या लोकांचें म्हणणें आहे. कांहीं असो. परंतु चोखोबांचें चरित्र म्हणजे एखाद्या दीपस्तंभाप्रमाणें साधकांना मार्गदर्शक होणारें आहे यांत शंका नाहीं.

मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात. मोठ्या माणसाचें बाळपण तपासून पाहाण्यांत सुद्धां एक प्रकारचा आनंद असतो. मोठ्या माणसाच्या जीवनाचें रहस्य जाणून घेण्यासाठीं चरित्रकाराला चरित्र नायकाच्या बालपणाची जेवढी जास्त माहिती मिळेल तेवढी थोडीच असते. तथापि चोखोबारायांच्या बाबतींत अशी कांहींच माहिती मिळत नाहीं.

वेद विद्येचा अभ्यास करणें हें चोखोबांना स्वप्नांतही शक्य नव्हतें. फार काय पण ब्रह्मविद्येचें अक्षर घोकण्याचा सुद्धां अधिकार नव्हता. तसेंच लिहिणें वाचण्यासारखें व्यावहारिक शिक्षणही त्यांना जवळ जवळ उपलब्ध नव्हतें. त्यामुळें त्यांना लिहितां वाचतां येणें सुद्धां शक्य नव्हतें असें दिसतें. तथापि पंढरपुरांत बराच काळ लोटला असल्यामुळें संतांचा लांबून कां होईना पण संत संग घडला होता. लांबून कथा किर्तनें ऐकून अक्षर वाङ्मयाच्या श्रवणानें ते बहुश्रुत झाले होते असें म्हणावें लागतें. त्यांची श्रवण भक्ति अलौकिक होती असे त्यांच्या अभंगवाणीवरून दिसतें. बाळपणापासून त्यांच्यावर हरिभक्तीचाच संस्कार झाला होता. त्यांचे आई–वडिल नंतर कायमचेच पंढरपूरी राहावयास आले असेंही म्हटलें जातें. त्यामुळें अनायासें त्यांना श्रवण भक्तीचा लाभ पंढरपुरांत कित्येक वर्षें मिळाला असण्याची शक्यता आहे.

सातशें वर्षांपूर्वी ज्या शापित जमातींत त्यांचा जन्म झाला त्या समाजाची काय दुर्दशा असेल त्याची अटकळ वाचकांनीच करावी. राहावयास धड घर नाहीं किंवा पोटभर खावयास जाडे भरडें सुद्धां अन्न नाहीं. बहुसंख्य माणसांच्या अंगावर अक्षरशः लक्तरें—कदाचित कित्येक दिवस अंगाला पाण्याचा स्पर्श न झालेले—अशा माणसांचा समाज म्हणजे पशुपक्ष्यांचा कळप असेंच म्हणावें लागेल. अशा समाजाच्या नशिबीं दारिद्रय व अवहेलना या शिवाय दुसरें काय येणार ?

चोखोबांच्या वाट्यास श्रीमंती आली नव्हती. जी श्रीमंती आली ती अठराविश्वे दारिद्रय ! ह्या दारिद्रयाचें पांघरून घेऊन हा महात्मा आपल्या जीवनाची वाटचाल करीत होता. वाटचाल साधी व सरळ नव्हती. पदोपदीं अवहेलना आणि हीनत्व. तथापि त्यांचें मन विचलित झालें नाहीं. इंद्रियांना त्यांनीं मोकळें सोडलें नाहीं. विठ्ठलाचे पायीं त्यांनीं आपली सारीं इंद्रियें जखडून ठेविलीं. त्यांचें भाग्य थोर होतें. त्यांना भगवान् ज्ञानेशांची व नामदेवरायासारख्या एकनिष्ठ विठ्ठल भक्तांची सावली मिळाली. हे त्या सावलींत बसले. संत संग झाला. सर्व संतांनीं त्यांच्यावर प्रेमाची अमृतधारा धरली. घरट्यांत पंख न फुटलेलें हें पिल्लूं उडण्यासाठीं धडपडत होतें. शेवटीं

योग्य वेळीं त्यांना पंख फुटले. संतांच्या सावलींत वाढून स्वतःच्या पंखांनीं उडण्याचें सामर्थ्य त्यांच्यांत आलें.

विटाळापायीं त्यांना विठ्ठलाचें दर्शन घेतां येत नव्हतें. कर्मठांनीं देवाधिदेव बाटेल म्हणून त्यांना दहा हात लांब ठेवलें व त्यांचा अनन्वित छळ केला. तथापि पांडुरंगभक्तीच्या वाटेस लागलेला हा महार मागें फिरला नाहीं. एकदां देव बाटविला म्हणून त्यांना पंढरपुरांतून हद्दपार केलें. त्यांना अतिशय वाईट वाटणें सहाजिकच होतें. तो ईश्वरीप्रसाद म्हणून तो त्यांनी शिरोधार्य मानला. चंद्रभागेला सुद्धां आपला विटाळ होऊं नये म्हणून चंद्रभागेच्या पलीकडील काठावर त्यांनीं आपली झोपडी बांधून वसतीस्थान केलें. सोबत त्यांची जन्माची सोबतीण होती. तेथें त्यांनीं दगडाची एक दीपमाला बांधली व विठ्ठलाकडे मुख करून ते तेथेंच भजन करीत. भग्नावस्थेंत आजही ही दीपमाला आपणापुढें चोखोबांच्या निस्सिम भक्तीची ग्वाही देत उभी आहे. प्रत्यक्ष देव तेथें येऊन त्यांचे बरोबर भोजन करीत अशी लोककथा आहे.

एकदां देव बाटविला व देवाचा रत्नहार चोरला म्हणून त्यांच्यावर आरोप सिद्ध होऊन बैलांच्या पायीं बांधून मारण्याची त्यांना कठोर शिक्षा झाली. परंतु विठ्ठलानें त्यांचें रक्षण केलें. एवढेंच नाहीं तर त्या प्रसंगापासून लोकांच्या डोळ्यांत चांगलें झणझणीत अंजन घातलें गेलें. ते विठ्ठलाचे एकनिष्ठ भक्त असून देव त्यांचा सांभाळ करतो असें बहुसंख्य लोकांचें मत झालें त्यावेळेपासून त्यांच्यावरील बरेच निर्बंध सैल करण्यांत आले असें दिसतें.

विठ्ठल प्रसादानें त्यांना मुलगा झाला. त्यांच्या पत्नीचें बाळंतपण देवानें त्यांची बहीण निर्मळा हिच्या रूपानें येऊन केलें व अडचण दूर केली अशा भक्तकथा प्रचलित आहेत. नामदेवरायांच्या अभंगांत बाळंतपणाचा व बैलाच्या पायीं बांधल्याचा असे दोन प्रसंग आहेत.

स्वर्गांतील इंद्राचें अमृत नासलें होतें. ते नारदमुनींच्या सांगण्यावरून पंढरपुरांत आणून चोखोबांच्या व सोयराबाईच्या करांगुलीच्या स्पर्शानें शुद्ध करून घेतलें. यावरून नामनिष्ठाची काय योग्यता असते हें श्रीसंत एकनाथ महाराज यांनीं आपल्या अभंगांत वर्णन केलें आहे. तसेंच चोखोबा अस्पृश्य असूनसुद्धां देव व संतमंडळीनें त्यांच्याकडे भोजन केलें असें वर्णिलें आहे.

संतांच्या दरबारांत चोखोबांचें स्थान अनन्य साधारण होतें. परंतु कर्मठ शेवटपर्यंत कर्मठच राहिले. ज्ञानदेव व इतर संतांच्या संगतींत त्यांनीं प्रेमसुख लुटलें. तसेंच ते ज्ञानदेव, नामदेव यांच्याबरोबर तीर्थयात्रेंत सामील होऊन त्यांच्या संगतींत ते शेवटपर्यंत होते असें विद्वानांचें मत आहे. त्याचप्रमाणें त्यांच्या स्वतःच्या अभंगवाणीवरून त्यांनीं बराच प्रवास केला होता, पुष्कळ तीर्थे व देवस्थानें पाहिलीं होतीं व पुष्कळ ग्रंथ ऐकले होते असें म्हणावें लागतें. ते म्हणतात—

बहुत हिंडलों देशदेशांतर । परी मन नाहीं स्थिर झालें कोठें ॥ १ ॥
बहुत तीर्थे फिरोनिया आलों । मनासवें झालों वेडगळचि ॥ २ ॥
बहुत प्रतिमा ऐकिल्या पाहिल्या । मनाच्या राहिल्या वेरझारा ॥ ३ ॥
चोखा म्हणे पाहतां पंढरी भूवैकुंठ । मनाचे हे कष्ट दूर गेले ॥ ४ ॥

पंढरपूर व मंगळवेढे हीं दोन स्थळें त्यांची कर्मभूमि होती. त्याकाळीं मंगळवेढ्यास एक आगळेंच स्वरूप होतें. त्या शहराला ऐतिहासिक महत्त्व होतें. श्रीचोखोबांचा देहपात इ. स. १३३८ मध्यें झाला. त्यापूर्वीं सुमारें वीस वर्षे मुसलमानी राजवटीचा अंमल महाराष्ट्रांत सुरू झाला होता. देवगिरीच्या जाधवाच्या राज्याचा शेवट इ. स. १३१८ मध्यें झाला व या प्रांतांत यवनी सत्ता सुरू झाली होती. सर्वत्र अंदाधुंदी, जाळपोळ व भ्रष्टाचार चालू होते. अशा विपत्काळी महार समाजाचा कोणी वालीच नव्हता असें दिसतें. अगोदरच तो समाज अज्ञानी, मागासलेला व अस्पृश्य मग त्याचे हाल काय वर्णन करणार? त्याकाळीं जोखमीची व कष्टाची कामें महार लोकांस वेठीस धरून करून घेत.

अशाच एका प्रसंगीं मंगळवेढ्यास गांवकुसुचें फार मोठें काम चालू करावयाचें असल्यामुळें निरनिराळ्या भागांतून शेकडों महार लोकांस वेठीस धरून नेलें होतें. त्यामध्यें आमचे उतार वयाचे चोखोबाराय पण होते. पांडुरंगाचे मनांत त्यांना तिकडे पाठवावयाचेंच होतें म्हणून वयाचा विचार न करतां यवनी अंमलदारानें त्यांनांही निवडलें. शेवटीं पांडुरंगरायाचा शेवटचा हृदयस्पर्शी निरोप घेऊन चोखोबा इतर महार लोकांबरोबर मंगळवेढ्यास गेले.

त्यांना ठाऊक होतें कीं ते परत पंढरपुरास परतणार नव्हते. पुढें एके दिवशीं खणीत असतां किल्ल्याचा तट कोसळून शेकडों महार मजूर त्याखालीं गाडले गेले. त्यांत चोखोबापण होते.

पुढें श्रीपांडुरंगरायाचे सांगण्यावरून नामदेवरायांनीं मंगळवेढे येथें जाऊन ज्या अस्थिमधून विठ्ठलनामाचा गजर येईल ती चोखोबांचीं हाडें असें ओळखून व पारखून त्यांचीं हाडें गोळा केलीं व पंढरीस आणली. नंतर त्या हाडांस देवाच्या आज्ञेनें मोठ्या समारंभानें महाद्वारांत समाधि दिली. त्यावेळीं चोखोबांच्या हाडांतून विठ्ठल नामाचा घोष होत होता असें नामदेवरायांच्या अभंगावरून दिसतें. त्यावेळीं चोखोबांचा छळ करणाऱ्या कर्मठांच्यासुद्धां नेत्रांत अश्रू उभे राहिले असें म्हणतात. त्यांची खरी योग्यता त्यांना त्यावेळीं स्पष्ट कळून आली.

ती ही चोखोबांची समाधि आज पंढरीतील एक श्रद्धास्थान होऊन बसली आहे. आजही एखादा श्रद्धावान् या श्रद्धास्थानाजवळ मोठ्या श्रद्धेनें विसावला तर त्याच्या कानीं भक्ति–परिपूर्णतेच्या शिखरावर बसलेल्या चोखोबांचा नामघोष पडेल—

आम्हां आनंद झाला आम्हां आनंद झाला। देवोचि देखिला देहामाजी॥१॥
देखणें उडालें पाहणें लपालें। देवें नवल केलें देहामाजी॥ २ ॥
मागें पुढें देव रिता ठाव कोठें। हृदयींच भेटे देही (देवो)॥ ३ ॥
चोखा म्हणे देव देखिला पंढरी। उभा भीमातिरीं विटेवरी॥ ४ ॥

: ४ :

## श्री चोखोबांचें आत्मनिवेदन

शुद्ध चोखामेळा। करी नामाचा सोहळा॥ १ ॥
यातीहीन मी महार। पूर्वी निळाचा अवतार॥ २ ॥
कृष्णानिंदा घडली होती। म्हणोनि महार जन्मप्राप्ती॥ ३ ॥
चोखा म्हणे विटाळ। आम्हां पूर्वींचें हें फळ॥ ४ ॥

वरील अभंगांत चोखोबारायांनीं आपलें आत्मनिवेदन केलें आहे. ते म्हणतात ते पूर्वी निळाचा अवतार असून त्यांचे हातून कृष्णानिंदा घडली होती. म्हणून त्यांना महाराचा जन्म प्राप्त झाला. आपल्या मागें जो विटाळ लागला आहे तें पूर्वीचें फळ होय असें त्यांचें म्हणणें आहे.

निसर्गाचे नियम मोडणें म्हणजे त्याच्यापासून होणारे बरे वाईट परिणाम भोगण्यास तयार होणें होय. अग्नीला हात लावला तर भाजणें किंवा हाताला फोड येणें हा निसर्गधर्म आहे. त्याचप्रमाणें आपण जीं बरी वाईट कर्मे आपल्या दैनंदिन जीवनांत करतों त्यांची त्या त्या प्रमाणें बरी वाईट फलप्राप्ति होणें हें याच नियमास धरून असतें. कर्मदेवतेची फळें आपण डोळ्यांनीं प्रत्यक्ष पाहूं शकत नाहीं. पण त्यांचे परिणाम डोळ्यांना दिसूं लागतात. कर्मदेवता व तिचीं फळें हीं सूक्ष्म व अदृश्य असल्यामुळें कांहीं माणसें हें सर्व खोटें आहे असें गृहित धरून चालतात व मनसोक्त वागतात. शेवटीं ते फसतात व मागाहून त्यांना पश्चाताप होतो.

श्रद्धावान माणूस या कर्मदेवतेच्या नियमांवर विश्वास ठेवतो व कर्म-बंधनांतून मुक्त होण्यासाठीं तळमळत असतो. या विश्वाची रचनाच अशी आहे कीं मनुष्य कांहीं कर्म न करतां स्वस्थ बसूंच शकत नाहीं. सर्व जगच कर्माधीन आहे. ज्ञानदेव म्हणतात.

येऱ्हवी जग हें कर्माधीन । ऐसियाची व्याप्ति गहन ।।

ज्ञाने०

मनुष्य देह प्राप्त झाला म्हणजे त्याच्या दैनंदिन कर्माला प्रारंभ झाला असें म्हणावें लागतें. कर्म करतांना खंत करण्याचें कारण नसतें. ज्ञानदेव पुढें म्हणतात—

परिस पां सव्यसाची । मूर्ति लाहोनि देहाची ।
खंती करिती कर्माची । ते गांवढे गा ।।

कर्मबंधनाची श्रृंखला तोडणें व जन्ममृत्यूच्या फेऱ्या चुकविणें म्हणजेच मोक्ष मिळविणें असें म्हणतात. मनुष्याला नरदेह प्राप्त झाला आहे म्हणजे

परमेश्वरानें मुक्त होण्यासाठीं त्याला दिलेली संधि होय. म्हणून प्रत्येक मनुष्यानें ह्या संधीचा फायदा घेऊन आपलें जीवन सफल करावें हें उचित होय. कर्मबंधापासून सन्त महात्मे मुक्त असतात. ज्ञानदेव म्हणतात:—

तो कर्मे करी सकळें । परी कर्मबंधा नाकळे ।
जैसे न सिंपे जळीं जळें । पद्मपत्र ॥

तसेंच तुकाराम महाराज म्हणतात—

मग मी व्यवहारी असेन वर्तत । जेवीं जळाआंत पद्मपत्र ॥

तुकाराम महाराज दुसऱ्या एका अभंगांत मनुष्य देहाचें महत्त्व सांगतात—

इह लोकींचा हा देहे । देव इच्छिताती पाहे ॥ १ ॥
धन्य आम्ही जन्मा आलों । दास विठोबाचे झालों ॥ २ ॥
आयुष्याच्या या साधनें । सच्चिदानंद पदवी घेणें ॥ ३ ॥
तुका म्हणे पावठणी । करूं स्वर्गाची निशानी ॥ ४ ॥

परंतु प्रपंच्याच्या भोवऱ्यांत सांपडलेला माणूस संत संगतीस मुकतो. संतांचे वचनावर विश्वास ठेवीत नाहीं व संसारांत फटके खात असतो. परमेश्वराचें मनोगत न ओळखतां व मानवी शरीर मिळालें असतां त्या सुसंधीचा फायदा न घेतां आपल्या अज्ञानानें कर्मबंधाच्या फेऱ्यांत सांपडतो व त्या जाळ्यांत तो अधिकाधिक गुरफटला जातो. ज्ञानदेव म्हणतात—

तैसें स्वामिचिया मनोभावा । न चुकिजे हेंचि परम सेवा ।
येर तें गा पांडवा । वणीज करणें ॥

परमेश्वराचा हेतु न ओळखून व त्याच्या मनोगताप्रमाणें न चालल्यामुळें माणसें अधोगतीस जातात व जन्म मरणाच्या फेऱ्यांत सांपडतात. म्हणून ज्ञानदेव म्हणतात—

पाहे पा शरीराचिया गांवा । जयालागीं आले पांडवा ।
तो कार्यार्थु आघवा । सांडूनिया ॥

तसेंच—

तैसें औट हातपणें । तें शव होऊनि जिणें ।
उपजो उपजो मरणें । नावा नावा ॥

वरील सर्व विवेचनावरून एकच गोष्ट निश्चित आहे कीं मनुष्य आपल्या स्वतःच्या कृतीनें आपली उन्नति वा अधोगति करून घेऊं शकेल.

चोखोबाराय आपल्या वरील अभंगांत आपणास महार जन्म व विटाळ कां मिळाला तें सांगतात. परंतु केवळ दैवाला बोल न देतां आलेल्या संधीचा उपयोग करून घेऊन ते शेवटीं देवाच्या श्रेष्ठ भक्तांमध्यें जाऊन बसतात ही गोष्ट नाकारून चालणार नाहीं. पूर्व जन्माच्या पापानें जरी मनुष्य दुःख भोगीत असला तरी तो चालू आयुष्यांत सत्कर्में व भक्ति करण्यास मोकळा असतो. ईश्वरभक्तीला लागणें किंवा न लागणें किंवा सत्कर्मे करणें वा न करणें हें ज्याच्या त्याच्या हातांत असतें व प्रारब्धावर नसतें. कर्म करण्यास मनुष्य मोकळा असतो. त्याच्यावर बंधन नाहीं. परंतु बरेच लोक दैवावर बोट ठेवून म्हणतांना दिसतात कीं काय करणार भजन पूजन आमच्या प्रारब्धांतच नाहीं. याबाबतींत गु. दांडेकर यांनीं मांडलेले विचार फारच उद्बोधक आहेत—

"लोक समजतात त्या अर्थानें तुकाराम महाराजादि संत व शास्त्रें प्रारब्धवाद शिकवूं लागले तर त्यांना उलट विचारतील, 'बोवा, तुम्ही आम्हाला भजन करायला सांगतां? अहो, ते आमच्या प्रारब्धांतच नाहीं. तुम्ही सांगून काय उपयोग? तुमच्या प्रारब्धांत आहे, म्हणूनच तुमच्या हातून तें होतें.' हे साधु आपल्याच हातानें आपल्या पायावर धोंडा पाडून घेणारे नव्हते. प्रारब्धाची सबब सांगणारे लोक किती धूर्त आहेत तें त्यांना माहीत होतें. जे त्यांना नको असेल तेव्हां प्रारब्धाचें बुजगावणें पुढें करावयाचें, आणि जें मनास येईल तें करतांना मात्र प्रारब्ध खुशाल गुंडाळून ठेवायचे; तेथें प्रारब्धाची चिंता करावयाची नाहीं, असा यांचा शिरस्ता असतो. तुकाराम महाराज म्हणतात—

'भजन घाली भोगावरी । अकर्तव्य मनीं धरी ॥'

स्वातंत्र्य व पारतंत्र्य यांची संगति तुकाराम महाराजांनीं एका कडव्यांत स्पष्ट करून सांगितलेली आहे.

'भविष्य न सुटे भोगिल्यावांचूनि । संचित जाणोनि शुद्ध करा ॥'

आपण पूर्वी कर्म करून संचित तयार केलें, तेंच आतां भोगावें लागतें; तसेंच आज जें करूं तें पुढें भोगावें लागणार; एवढ्याकरितां पुढची तयारी म्हणून चांगलें कर्म करा. या विचारपरंपरेला इंग्रजीत Self Determinism अशी संज्ञा आहे. मनुष्य कर्मानें बांधला जातो व कर्मानेंच मुक्त होतो. तात्पर्य, तुकाराम महाराजांच्या मतें जीव सुखदुःखाला बांधलेला आहे व कर्म करण्याला स्वतंत्र आहे.

गीतासुद्धां याच अर्थानें सांगते—

'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ॥
सुख दुःखे समे कृत्वा लाभा लाभौ जयाजयौ ।
ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापमवाप्स्यसि ॥'

(अ. २–३८)

भोग हा बनून गेलेला आहे, हें न कळल्यामुळें काळजी वाहिली तरी भोग बदलत नाहीं, दुःख मात्र पदरांत पडतें. चिता माणसाला एकदांच व मेल्यावर जाळते, चिंता जितेपणीं रोज सारखी जाळीत असते.

—अभंग—संकीर्तन

प्रसाद, ऑगष्ट १९५१"

वरील विवेचनावरून दिसून येतें कीं जीव सुखदुःखाला बांधलेला आहे; परंतु कर्म करण्यास स्वतंत्र आहे. जीव सुखदुःखाला बांधलेला आहे याचें वर्म एवढेंच कीं आपण जीं कांहीं बरी वाईट कर्मे केलीं आहेत व करीत आहोंत त्यांची त्या त्या प्रमाणें मिळणारीं फळें भोगणें हें होय. आपणास बरेच लोक आढळून येतील कीं कर्मभोग किंवा प्रारब्धभोग असें म्हणून न करावयाच्या, त्याज्य व निषिद्ध गोष्टी ते केवळ प्रारब्धभोग म्हणून करतात. अशा लोकांसाठीं तुकाराम महाराज ताकीदवजा सांगतात—

कर्मफळ म्हणूनि इच्छूं नये काम । तुका म्हणे वर्म दावूं लोकां ॥

ऋण, वैर व हत्त्या जन्मोजन्मीं चुकत नाहीं असें म्हणतात. तसेंच केलेल्या कोणत्याहि कर्माचें फळ भोगलेंच पाहिजे. समर्थ रामदास स्वामी म्हणतात :—

मना त्यांचि रे पूर्व संचित केलें । तया सारिखें भोगणें प्राप्त झालें ।।

ह. भ. प. श्री. रा. कृ. कामत यांनीं आपल्या 'नामचिंतामणि' या पुस्तकांत याबाबतींत उत्कृष्ट विचार मांडले आहेत. ते म्हणतात—

"श्रीकृष्णानें आपल्या गुरुचा पुत्र, ज्यास मरून १२ वर्षें झालीं होतीं, तो आणून दिला, कालिया सर्पाच्या विषानें मरून पडलेले गोप व गाई ज्यानें नुसत्या कृपादृष्टीनेंच उठविल्या, त्याच प्रभूनें देवकीमातेचे कंसानें मारलेले सहा पुत्र आणून दिले नाहींत; तसेंच सुभद्रासुत अभिमन्यूला त्यानें उठविलें नाहीं; महाभयंकर अशा ब्रह्मास्त्रापासून परिक्षितीचें ज्यानें गर्भांत रक्षण केलें, त्याला क्षुद्र सर्पदंशापासून त्याच परिक्षितीचें रक्षण करतां आलें नसतें काय ? पण केलें नाहीं. इंद्राच्या कोपापासून गायी गोपाळांचें रक्षण करण्याकरितां ज्यानें ७ दिवस गोवर्धन पर्वत उचलून धरला, त्याला निजभक्त चोखामेळा ज्या किल्ल्याच्या भिंती ढासळून मेला व ज्याची हाडें आणून आपल्या महाद्वारांत पुरा म्हणून सांगून आपलें भक्तप्रेम दाखविलें, त्याचें रक्षण करण्याकरितां त्या भिंती सावरून धरतां आल्या नसत्या काय ? अथवा उद्यां तो किल्ला ढासळणार आहे, करितां तूं तेथें जाऊं नकोस असें त्यास आज सांगतां आलें नसतें काय ? पण तसें केलें नाहीं. देव किंवा साधु बहुधा मरण चुकवीत नाहींत, मरणाची भीति चुकवितात, आणि ह्यांतच जीवाचें खरें कल्याण असतें. तात्पर्य, कर्माचे कायदे ज्यानें केले, तोच त्या कायद्यांचें उल्लंघन कसें करूं शकेल ? राजानेंच कायदे पाळले नाहींत, तर प्रजा कशी पाळील ? कर्माचें कायदे म्हणजे निसर्गाचे नियम. आणि हे ईश्वरकृत असल्यामुळें अनुल्लंघनीय होत."

सारांश, कर्माचें फळ हें ज्याला त्याला त्याच्या मागील कर्माप्रमाणें भोगावें लागतें. म्हणूनच चोखोबांनीं आपली सारी व्यथा निमूटपणें सहन केली. फक्त त्यांनीं आपली कैफियत आपल्या अभंगांतून देवापुढें मांडली. त्यांनीं आपल्या संचितासच दोष दिला आहे—

आमुचें संचित भोग क्रियमान । तुमचें कारण तुम्ही जाणा ।।
होणार तें होय न होणार तें न होय । सुख दुःख पाहे कर्माधिन ।।
आमुचें संचित जैसे जैसे आहे । तेथे तो उपाय न चले कांहीं ।।
कर्माचें संचित प्रारब्धाचा भोग । न सुटे भागा भाग निढळीचा ।।

पौराणिक काळापासून पाहिलें तरी देव, राजे, सम्राट, ऋषि व साधुसंत हे कोणीहि कर्मभोगांतून सुटलेले नाहींत. दशरथ राजाचा पुत्रवियोग व स्वतःचा मृत्यु, देवकीच्या सहा पुत्रांची हत्या, वशिष्ठांच्या शंभर पुत्रांची हत्या, भगवान् श्रीकृष्णाला व्याधाच्या हातून बाण लागून त्यांचें निर्वाण, महात्मा भीष्माचार्यांना शरपंजरी देह दंडयातना, सुदाम्याचें दारिद्र्य वगैरे गोष्टी आपण वाचतों.

व्यक्तिशः केलेलीं पापकर्मे व सामुदायिकरित्या केलेलीं पापकर्मे असे पापाचे दोन प्रकार होऊं शकतात. व्यक्तिशः केलेलीं पापकर्मे त्या त्या व्यक्तींना भोगावी लागतीलच; परंतु त्याचा समाजावरहि थोडाफार परिणाम झाल्याशिवाय राहाणार नाहीं. कारण अनेक व्यक्तींच्या समुदायास समाज म्हणतात. सामुदायिकरित्या केलेल्या पापकर्मांचीं फळें बहुधा सामुदायिकरित्याच भोगावी लागतात. दुष्काळ, रोगांच्या साथी, अवर्षण इत्यादि सारख्या आपत्तींना सामुदायिकरित्याच तोंड द्यावें लागतें. स्पृश्य हिंदूनीं अस्पृश्य हिंदूंचा केलेला छळ, भारताच्या फाळणीनंतर झालेले जाळपोळ, हत्याकांड वगैरे साऱ्या गोष्टी आज आपल्या नजरेसमोर ताज्या आहेत.

असो. परंतु ज्यांनीं आपलें सर्वस्व देवाला समर्पण केलें आहे व जे देवाशिवाय आपण आपल्यापणानें शिल्लकच उरले नाहींत त्यांना कर्मबंध प्रारब्ध, क्रियमाण, संचित किंवा दुसरें कांहींच उरत नाहीं.

तुकोबा म्हणतात—

प्रारब्ध क्रियमाण । भक्ता संचित नाहीं जाण ॥
अवघा देवचि झाला पाही । भरोनिया अंतर्बाही ॥

तरी सुद्धां जडजीवांच्या कल्याणासाठीं चोखोबाराय म्हणतात—

नको मज मान अथवा अपमान । दोहींचें कारण मज नाहीं ॥१॥
सुख अथवा दुःख संचिताचा ठेवा । संकल्पाचा ठेवा जैसा तैसा ॥२॥
जन्म मरण हें तो बांधिलें पदरीं । वांया हाव भरी येणें संगे ॥३॥
चोखा म्हणे ऐसा नेमियेला नेम । तेंचि हें वर्म भोगूं आतां ॥ ४ ॥

हें गातांना हा भक्तराज पूर्वकर्मानुसार मिळालेल्या आपल्या मानापमानाचें व अवहेलनेचें गांठोडें विठ्ठल चरणीं अर्पून मोकळा झाला. नेमियेला नेम भोगण्यास तो पाणीरूप होऊन विश्वाच्या माळ्यानें जिकडे नेलें तिकडे तो निवांतचि गेला.

माळिये जेउतें नेलें । तेउतें निवांतचि गेलें ।
तथा पाणिया ऐसें केलें । होआवें गा ॥

—ज्ञाने०

: ५ :

# श्री चोखोबांची गुरुपरंपरा

श्री चोखोबाराय हे महार समाजांतील होते. श्री नामदेवरायांच्या हाकेला ओ देऊन ते भागवतधर्माच्या ध्वजाखालीं निर्भयपणें उभे होते. वारकरी संप्रदायाच्या संकेतानुसार त्यांना सद्गुरुंना शरण जाणें आवश्यक होतें. ते शूद्र होते. ते अस्पृश्य होते. तथापि नामदेवरायांनीं त्यांना मंत्रोपदेश देऊन कृतार्थ केलें होतें.

भारतांत गुरुपरंपरेला अतिशय महत्व आहे. आपल्या निरनिराळ्या धर्मग्रंथांत त्याची माहिती मिळते. उदाहरणार्थ—( १ ) मुण्डकोपनिषद् ( २ ) भगवद्गीता ( ३ ) महर्षि पतंजलीचें योगदर्शन ( ४ ) श्रीमद्भागवत ( ५ ) गुरुगीता ( ६ ) मनुसंहिता ( ७ ) याज्ञवल्कसंहिता ( ८ ) महाभारत ( ९ ) रुद्रयामल ( १० ) तंत्रशास्त्र व ( ११ ) दैवीमीमांसा दर्शन इत्यादि ग्रंथांत गुरुचें महत्व व गुरुशिष्याचे संबंध यांची माहिती मिळते. जगांत जितके म्हणून धर्मसंप्रदाय आहेत, त्या सर्वांत गुरुदीक्षेची रीत थोड्या फार प्रमाणांत दिसून येते. गुरुवाचून ब्रह्मप्राप्ति कधींही प्राप्त व्हावयाची नाहीं असा सिद्धांत आहे.

आपल्या सर्व अवतारी पुरुषांनीं सुद्धां गुरु केल्याचा उल्लेख सांपडतो. मत्स्यावतारी मांधाता, कच्छावतारी सहजानंद, वराहावतारी कंकऋषि, नर-

सिंहावतारी दुर्वास, वामनावतारी ब्रह्मदेव, परशुरामावतारी शंकर, रामावतारी वसिष्ठ आणि कृष्णावतारी संदीपनी याप्रमाणें गुरु केले होते.

ज्याप्रमाणें अवतारी पुरुषांना गुरु करावे लागले तसेंच भक्त, ऋषि साधुसंत व महात्मे या सर्वांना गुरू करावेच लागले वा त्यांना लाभले व त्यांना गुरुचाच उपदेश तारक झाला. वाल्या कोळ्यासारख्या निंद्य पुरुषास देवर्षि नारदांचा सत्संग घडला व क्षणांत त्याचा कायापालट होऊन पुढें ते विश्ववंद्य वाल्मिकी झाले. ध्रुव व प्रल्हाद या दोन्ही बालभक्तांस नारदमहामुनिच गुरूठायी होते. व्यास, पराशर सारख्या ऋषिमुनींना सद्गुरूंचा लाभ झाला होता असा इतिहास आहे. आंधळ्या धृतराष्ट्रास कुरुक्षेत्रावरील मात कथन करणारा संजय हा व्यासाचा शिष्यच होता. त्याला दिव्य चक्षूंचा लाभ होऊन तो कुरुक्षेत्रावरील वृत्तांत सांगण्यास समर्थ झाला.

माऊली म्हणतेच—

व्यास शिष्य संजयाचा । पूर्णोद्धारू जो ॥

आपण गेल्या ७ शें वर्षांत होऊन गेलेल्या महाराष्ट्रीय संत मालिकेकडे पाहिल्यास हेंच आढळून येईल कीं ब्रह्मप्राप्तिसाठीं सर्वांना गुरु करावेच लागले व तो तसा जवळ जवळ संप्रदायच ठरला आहे. तुकाराम महाराजांना कोणी लौकिक गुरु मिळाला नाहीं. परंतु आपलें नांव बाबाजी असें सांगून त्यांना 'रामकृष्णहरि'चा गुरुमंत्र याच बाबाजीकडून स्वप्नांत मिळाला होता. रानांतून जात असतां विक्राळ व्याघ्राला भिवून पळत असतांना आपल्या मातापित्यापासून दूर झालेल्या बाल निवृत्तिनाथांना गैनीनाथांनीं अंजनी पर्वताच्या गुहेंत दर्शन देऊन व अधिकार संपन्न शिष्य आहे हें जाणून ब्रह्मबोध केला व त्यांना कृतार्थ केलें. पुढें निवृत्तिनाथांनीं तोच बोध आपल्या भावंडाना देऊन कृतार्थ केलें. नामदेवराय हे देवाचे अतिशय लाडके भक्त असून त्यांना देवाचा सहवास अहोरात्र होता. परंतु संतशिरोमणी व वैराग्य मुकुटमणी गोरोबा यांचें थापटणें खाल्यावर ते ब्रह्मप्राप्तीस कच्चें भांडें ठरले. म्हणून नंतर देवाचे सांगण्यावरून त्याना विसोबा खेचराचें शिष्यत्व पत्करावें

लागलें हें प्रसिद्धच आहे. जनार्दन स्वामींनी श्री एकनाथांना दीक्षा देऊन महाराष्ट्राला त्याच्या पडत्या काळांत एक मोठा संत पुरुष दिला. पुढें एकनाथांनीं आपल्या सर्व वाङ्मयामध्यें एकाजनार्दनीं हा शब्द लावून गुरुशिष्याचें नातें अजरामर करून ठेविलें आहे.

कित्येक शतकांपूर्वीं झालेली मत्स्येंद्रनाथ व गोरक्षनाथ या गुरुशिष्याची जोडी अखिल भारतांत सुपरिचित आहे. मागील थोड्या काळापूर्वी बांदे, सावंतवाडी, येथे गैनीनाथांनीं संत सोहिरोबांना दर्शन देऊन ब्रह्मबोध केला. अगदीं अलीकडे झालेली गुरुशिष्याची जोडी म्हणजे रामकृष्ण परमहंस व स्वामी विवेकानंद. हे दोघेही सत्पुरुष सर्वांस ठाऊकच आहेत.

भगवान् श्रीकृष्णानें आपण स्वतः गाय बनून अर्जुनाला वत्स केलें व गीतेचें दुभतें जगाला पुरेल एवढें दिलें. त्या वत्सरूपी अर्जुनाचे मुखांतूनच आपण गुरुकृपेची महति माऊलीच्या शब्दांत पाहूं. श्रीकृष्ण व अर्जुन हे दोघेजण अगोदर पासूनच मित्र होते. पण पुढें श्रीकृष्ण व अर्जुन यांच्यामध्यें गुरुशिष्याचें नातें जोडलें गेलें.

माऊली म्हणते—

जो प्रल्हादाचिया बोला । विषाही सकट आपणचि जाहला ।
तो सद्गुरू असे जोडला । किरीटीसी ॥

अर्जुन स्वतः आपल्या मुखानें भगवान् श्रीकृष्ण आपला सद्गुरु असल्याचें सांगतो.

प्रभु आथवेनि येणें जन्मे । जिये पुण्यें केलीं मियां उत्तमें ।
तयांचि न ठकतीचि अंगीं कामें । सद्गुरु तुवां ॥

आपण सद्गुरुच्या कृपेस पात्र होण्याच्या पूर्वीं कसे होतों त्याचा कबुली-जबाब अर्जुन देतो—

तैसी व्यासादिकांची बोलणी । तिया मजपाशीं चिद्रत्नाचिया खाणी ।
परि उपेक्षिल्या जात होतिया तरणी । तुजविण कृष्णा ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........................ वि: ....................
क्रमांक ........................ नों. दि. ....२२....



एऱ्हवी वडिल वडिलांचेनि मुखें । मी सदां तूतें कानीं आइकें ।
परि कृपा न किजेचि तुवां एके । तंव नेणवेचि कांहीं ॥

परंतु गुरुकृपा झाल्यावर काय फरक होतो तेंहि अर्जुन सांगत आहे—

जी ज्ञानाचे बीज तयाचे बोल । माजि हृदयभूमिके पडिले सखोल ।
वरि इयें कृपेची जाहाली वोल । म्हणोनि संवाद फळेशी उठले ॥
म्हणोनि भाग्य जैं सानुकूल । जालिया केले उद्यम सदां सफळ ।
तैसे श्रुताधीत सकळ । गुरूकृपा साच ॥ —ज्ञाने०

सारांश, गुरुकृपेची महति फार मोठी असून सद्गुरुकृपेशिवाय भाव-भक्तीचा अनुभव येणार नाहीं. याबाबतींत आपल्या सर्व महाराष्ट्रीय संतांची एकवाक्यता आहे. गुरुकृपेची महति आपण त्यांच्या संगतींतच पाहूं—

ज्ञानदेव म्हणतात—

सद्गुरूवांचुनी संसारी तारक । नसेचि निष्टंक आन कोणी ॥
सद्गुरू सारिखा सोयरा सज्जन । दाविले निधान वैकुंठीचे ॥
सद्गुरू माझा जीवींचा जिवलग । फेडियेला पांग प्रपंचाचा ॥
भावेंविण देव न कळे निःसदेह । गुरूवीण अनुभव कैसा कळे ॥
कां येऊनि फळाचा घड । पारूषवी केळीची वाढ ।
श्रीगुरू भेटोनि करी पाड । बुभुत्सु तैसा ॥
तरी गुरू दाविलिया वाटा । येऊन विवेक तीर्थ तटा ।
धुऊनिया मळकटा बुद्धिचा तेणें ॥

नामदेवराय म्हणतात—

जंव सद्गुरू नाहीं केला भ्रतार । साधन विचार व्यर्थ गेला ॥
सद्गुरू सारिखा सोइरा जीवलग । तोडिला उद्वेग संसाराचा ॥
माया देऊनियां ब्रह्म घ्यावें हातीं । ऐशा गुरूप्रती कां भजाना ॥
नामा म्हणे गुरूपायीं लाभ आहे । मोक्ष तेही पाहे दास होती

एकनाथ महाराज म्हणतात—

धन्य गुरू कृपा जाहली । अहंता ममता दूर गेली ॥
घालूनि अंजन डोळां । दाविला स्वयंप्रकाश गोळा ॥
सद्गुरूसी शरण जाय । त्यासी ब्रह्मप्राप्ति होय ॥
नलगे आणिक उपाय । धरी सद्गुरूचे पाय ॥

तुकाराम महाराज म्हणतात—

सद्गुरू वांचोनि प्रेतरूप वाणी । बोलती पुराणीं व्यास ऋषी ॥
म्हणोनि तयाचें पाहूं नये तोंड । निगुरा अखंड सुतकळा ॥
सद्गुरू वांचोनि सांपडेना सोय । धरावे ते पाय आधी आधी ॥

निळोबाराय म्हणतात—

बरवें झालें बरवे झालें । आत्माराम हृदयीं आले ॥
सद्गुरूनी कृपा केली । वस्तु डोळां पैं दाविली ॥

श्रीचोखोबाराय यांना गुरुकृपेसाठीं कोठें फिरावें लागलें नाहीं. त्यांचें भाग्य फार मोठें होतें म्हणून त्यांना नामदेवरायांचा सहवास व गुरुकृपा लाभली. त्यांनीं आपल्या कांहीं अभंगांतून आपल्या गुरुबद्दल वसत असलेला उच्च प्रकारचा आदरभाव व्यक्त केला आहे. विसोबा खेचर हे ज्ञानेश्वरांचे शिष्य व त्यांचे शिष्य नामदेवराय. अर्थात् ज्ञानेश्वर हे नामदेवांचे परमगुरु म्हणजे आजेगुरु होत. बंका महार हे चोखोबाराय यांचे शिष्य. बंका महार यांनीं आपल्या गुरुबद्दल आपल्या अभंगांत आदरांजलि वाहिली आहे.

ते म्हणतात—

सुखाचा सागर चोखा हा निर्धार । काय मी पामर गुण वानूं ॥ १ ॥
धन्य प्रेमपान्हा पाजुनियां मातें । केलें असे सरतें आपणामाजी ॥ २ ॥
आनंदी आनंद दाविलासे डोळां । दिली जीवनकळा माझी मज ॥ ३ ॥
बंका म्हणे माझी प्रेमाची माउली । कृपेची साउली केली मज ॥ ४ ॥

आपल्या दुसऱ्या एका अभंगात बंका महार आपल्या गुरुची गुरु-परंपरा सांगतात—

ज्ञानियाचा राजा ज्ञानेश्वर माउली । खेचरा वोळली कृपासिंधु ॥ १ ॥
ज्ञानदेवा चरणीं खेचर शरण । नामदेवा पूर्ण कृपा केली ॥ २ ॥
नामदेवें हात चोखियाचे शिरीं । विठ्ठल तीं अक्षरीं उपदेशिलें ॥ ३ ॥
बंका म्हणे माझा चोखा गुरू माउली । तयाचे पाउलीं लोटांगण ॥४॥

अशा तऱ्हेनें नामदेवरायांनीं चोखोबारायांच्या मस्तकावर हात ठेऊन विठ्ठल या त्रिअक्षरी मंत्राचा उपदेश दिला व कृतार्थ केलें.

चोखोबाराय हे स्वतः आपल्या अभंगवाणींत आपली गुरुपरंपरा सांगतात व आपल्या सद्गुरुबद्दल आदर व्यक्त करतात—

भक्ति भाव मज तुम्ही दाखविला । आनंद सोहळा सुखाचाचि ॥ १ ॥
तें प्रेम मज न ये सांगता । कोंदाटलों चित्ता सुखानंदे ॥ २ ॥
रूप दृष्टी धाय पाहाता न समाये । बोलतांचि नये काय करूं ॥ ३ ॥
चोखा म्हणे धन्य नामया तूं गुरू । फेडिलां आधारू जिवित्वाचा ॥४॥

* * *

धन्य धन्य नामदेवा । केला उपकार जीवा ॥ १ ॥
माझा निरसिला भेवो । दाखविला पंढरिरावो ॥ २ ॥
मंत्र सांगितला सोपा । निवारिलें भवतापा ॥ ३ ॥
माझी कृपेची माऊली । चोखा म्हणे पान्हा घाली ॥ ४ ॥

* * *

धन्य धन्य नामदेव । माझा निरसला भेव ॥ १ ॥
विठ्ठल मंत्र त्रिअक्षरी । खूण सांगितली निर्धारी ॥ २ ॥
ठेवोनी माथा हात । दिलें माझें मज हित ॥ ३ ॥
दावियलें तारू । चोखा म्हणे माझा गुरू ॥ ४ ॥

असो, चोखोबारायांना अखंड संतसंग होता. पंढरपूरांतील वास्तव्य व नित्य चंद्रभागेचें स्नान त्यांना घडंत होतें. महाद्वारांत उभें राहून नामचिंतन व नामावर त्यांची अढळ श्रद्धा. वैराग्य व समाधान हीं त्यांचीं भूषणें होतीं. तसेंच सद्‌गुरुच्या ठिकाणीं त्यांची निस्सीम भक्ति व दृढ भाव होता. शुद्ध आचरण हें त्यांच्या जीवनाचें सूत्र होतें. या सर्व साधनांनिशीं त्यांनीं गुरुचरणांची उपासना केली व कृतार्थ झाले.

परी संतांसवें वसतां । योग ज्ञानीं पैसतां ।
गुरूचरण उपासितां । वैराग्येसी ॥
म्हणोनि जाणतेनें गुरू भजिजे । तेणें कृत कार्य होइजे ।
जैसें मूळ सिंचनें सहजें । शाखापल्लव संतोषती ॥

—ज्ञाने०

: ६ :

## चोखोबांची नामनिष्ठा व एकमेव भाव

चोखोबांना श्रीनामदेवरायांनीं अनुग्रह देतांना ‘ विठ्ठल ’ या त्रिअक्षरी मंत्राचा उपदेश दिला होता. आपल्या सद्‌गुरुवर भरवंसा ठेऊन आपली साधना त्यांनीं अखंड चालू ठेवली व मोठ्या निष्ठेनें आपले ध्येय गांठीपर्यंत त्यांनीं नामाला सोडलें नाहीं. किंबहुना आमरण त्यांनीं नामरूपी साधनाला दूर केलें नाहीं. ज्ञानदेवांनीं म्हटलें आहेच—

“ पारियाचा रवा घेतां भूमीवरी । यत्न परोपरी साधन तैसें ॥ ”

आपल्या साधुसंतानीं ‘ भावपर ’ शेंकडों अभंग साधकासाठीं निर्माण करून ठेविले आहेत. त्याप्रत्येक अभंगांत त्या त्या संताचा आत्मानुभव ओतलेला असतो. सामान्य माणसें बहिर्मुख असल्यामुळें आत्मनिष्ठा व नामनिष्ठा यांच्या सुखाला आंचवत असतात. संत आम्हास जागे करून कल्याणाचा व आत्मोद्धाराचा उपदेश करीत असतात.

चोखोबा आपला भाव लोकांपुढें प्रकट करतात—

आमुचा आम्ही केला भावबळी । भावें वनमाळी आकळीला ॥ १ ॥
भावची कारण भावची कारण । भावें देव शरण भाविकासी ॥ २ ॥
निजभाव बळें घातिलासे वेढा । देव चहूंकडा कोंडियेला ॥ ३ ॥
चोखा म्हणे देव भावाचा बांधला । भक्तांचा अंकिला म्हणुनी झाला ॥४॥

ते स्वच्छ सांगत आहेत कीं माझ्या भाव भक्तीच्या योगानें वनमाळीला आपलेसें करून घेतलें वा प्राप्त करून घेतलें. हा त्यांचा आत्मानुभवच नाहीं काय ? तसेंच इतर साधनांच्या खटपटींत न पडतां तूं नामाचाच आश्रय धर असें ते सांगतात. पुढें ते म्हणतात—

नामाचें चिंतन माझें हेंचि अनुष्ठान । यापरतें साधन न कळे कांहीं ॥१॥
नामचि सार नामाचि सार । उतरेल भवपार पैलतीर ॥ २ ॥
आणिक सायास नको काया क्लेश । नामाविण सोस करूं नको ॥ ३ ॥
चोखा म्हणे मज भरंवसा नामाचा । जेथें कळिकाळाचा रीघ नाहीं ॥४॥

भाव भक्तीचें सार नामाशिवाय दुसरें कांहीं नसून नाम हें एकमेव साधन आहे असें ते आर्जवून सांगत आहेत. दुसरे कांहीं कायाक्लेश वा अनुष्ठान करूं नकोस. श्रद्धेनें घेतलेलें नामच तुला भवसागराच्या पैलतीरावर पोचवील. ज्ञानदेव म्हणतात—

भावेंवीण भक्ति भक्तीविण मुक्ति । बळेंवीण शक्ति बोलूं नये ॥

* * *

भावबळें आकळे येऱ्हवी नाकळे । करतळी आवळे तैसा हरी ॥

नामाचें महत्व चोखोबांनीं जागोजागीं आपल्या अभंगांत गाईलें आहे. त्यांत त्यांचा आत्मानुभव प्रतिबिंबितींत झालेला दिसतो.

नामा परता मंत्र नाहीं त्रिभुवनीं । पाप ताप नयनीं न पडेचि ॥

* * *

वेदाचा अनुभव शास्त्रांचा अनुवाद । नामचि गोविंद एक पुरे ॥

* * *

त्रैलोक्य वैभव ओवाळोनी सांडावें । नामसुखें घ्यावें विठोबाचें ।।
आणिक साधनें आहेत बहुतांपरी । नामाची ती सरी न पवती ।।
चोखा म्हणे माझा अनुभव उघडा । भव भय पीडा येणें वारे ।।

* * *

हातीच्या कांकणा कासया आरसा । धरावा भरंवसा विठ्ठल नामीं ।।
नलगे साचार याग यज्ञ विचार । जप निरंतर विठ्ठल नामीं ।।

* * *

नाशिवंतासाठीं करितोसी आटी । दृढ धरा कंठी एक नाम ।।
भवासी तारक विठ्ठलची एक । नाहीं आणिक सुख येतां जातां ।।

* * *

चोखा म्हणे माझा भोळा भाव देवा । गाईन केशवा नाम तुझें ।।

* * *

सुलभ सोपारें विठोबाचें नाम । आणिक नाहीं वर्म दुजें कांहीं ।।

* * *

नामाचें सामर्थ्य विष तें अमृत । ऐसी हे प्रचीत आहे जीवा ।।

* * *

चोखा म्हणे मज भरंवसा नामाचा । येणें कळीकाळाचा भेव नाहीं ।।

* * *

अखंड नामाचें चिंतन सर्वकाळ । तेणें सफळ संसार होय जनां ।।

* * *

अवघ्या साधनांचें सार । रामकृष्ण हा उच्चार ।।

* * *

नामामृत पाठ घेई कां घुटिका । होईल सुटिका संसाराची ।।

* * *

नलगे अधिकार वर्णावर्ण धर्म । नाम परब्रह्म येचि अर्थी ।।

* * *

एकनाथ महाराज तर भावालाच देव म्हणतात—

भाव तोचि देव भाव तोचि देव । ये अर्थीं संदेह धरूं नका ॥ १ ॥
भाव भक्ति फळे भावें देव मिळे । निजभावें सोहळे स्वानंदाचे ॥ ध्रु०॥
भावचि कारण भावचि कारण । या परतें साधन नाहीं नाहीं ॥ २ ॥
एका जनार्दनी भावाच्या आवडी । मनोरथ कोडी पुरती तेणें ॥ ३ ॥

तुकोबांचे भावावर किती तरी अभंग आहेत—

भावें गावें गीत । शुद्ध करोनिया चित्त ॥

* * *

दिला जीव भाव । तेव्हां सांडिला म्यां ठाव ॥
आतां वर्ते तुझी सत्ता । येथें सकळ अनंता ॥

* * *

देवापाशीं मागें आवडीची भक्ति । विश्वासेंशी प्रीतिभाव बळे ॥

* * *

भावा एका साठीं । खांदा वाहे आपुल्या ॥

* * *

भाव धरी तया तारील पाषाण ॥

* * *

भावापुढें बळ । नाहीं कोणाचें सबळ ॥

* * *

धन्य भाव शीळ । ज्याचें हृदय निर्मळ ॥
पूजी प्रतिमेचे देव । संत म्हणती तेथें देव ॥
भाव ज्याचे गांठी । त्यासी लाभ उठा उठी ॥

* * *

कासया पाषाण पूजिसी पितळ । अष्ट धातू खळ भावें वीण ॥
भावचि कारण भावचि कारण । मोक्षाचे साधन बोलियेलें ॥
तुका म्हणे भाव नाहीं, करी सेवा । तेणें काय देवा योग्य होसी ॥

तसेंच संत बहिणाबाई भावाविषयीं म्हणतात—

बहिणी म्हणे भाव तोचि आम्हां देव । नाहीं या संदेह अणुमात्र ॥१॥
भाव तेथें भक्ति, भक्ति तेथें ज्ञान । ज्ञानें समाधान होय चित्ता ॥ २ ॥
अशुद्ध तो भाव करी घात सर्व । अंगीं वसे गर्व तयाचिया ॥ ३ ॥
बहिणी म्हणे भाव इच्छा फळ दानी । पाववी निर्वाणी मोक्षपदा ॥ ४ ॥

विस्तार भयास्तव जास्त प्रमाणें देतां येत नाहींत.

किरात म्हणून धनुर्विद्या शिकविण्यास नकार दिल्यामुळें दुःखी झालेला एकलव्य, द्रोणगुरूंचा मातीचा पुतळा करून व तो पुतळा प्रत्यक्ष आपले गुरुदेव आहेत असें मानून मोठ्या निष्ठेनें आपल्या धनुर्विद्येचे पाठ स्वतः शिकून त्या विद्येंत प्रत्यक्ष पार्थापेक्षांहि पारंगत झाला. हें केवळ एकनिष्ट भावाचेंच फळ नाहीं काय ? ज्ञानदेव म्हणातात—

श्रीगुरूचेनि नांवें माती । डोंगरी जयापासीं होती ।
तेणें कोळिये त्रिजगतीं । येकवद केली ॥

सारांश, साधकानें आपल्या सद्गुरुवर व साधनावर विश्वास ठेवून प्रामाणिकपणें प्रयत्न करावयास हवे. आपणास अनुभव येत नाहीं असें फोलकट बोलणें व्यर्थ आहे असा संतांचा साधकांना इषारा आहे.

गुरु नानकाच्या चरित्रांत एक गोष्ट आहे. गुरुनानक व मर्दाना नांवाचा त्यांचा एक शिष्य मिळून प्रवास करीत होते. वाटेंत एक नदी लागली. तिला पूर आला होता. 'अलख निरंजन' म्हणून गुरुनानक पाण्यावरून चालूं लागले. पाण्यांत उतरण्यास शिष्यास भीति वाटूं लागली म्हणून गुरूस तरणोपाय विचारला. गुरूनें सांगितलें कीं सद्गुरूचें स्मरण करून चाल. त्याप्रमाणें शिष्यानें केलें. तुडुंब नदी भरली असतांना सुद्धां त्याला कंबरेएवढेंच पाणी झालें. नदीच्या मध्यभागीं गेल्यावर नानकांनीं 'अलख निरंजन' म्हणतांच गुडघ्याएवढें पाणी झालें. शिष्य मनांत म्हणतो

गुरुजीला गुढघ्याएवढें पाणी व मला कंबरेएवढें पाणी. माझ्या गुरुनें मला साधारण मंत्र दिला व आपण चांगला मंत्र जपत आहेत म्हणून त्यांना गुढघ्याएवढें पाणी झालें. ही शंका मनांत येतांच त्यानें गुरुप्रमाणें 'अलख निरंजन' म्हणतांच पाणी त्याचे कंठापर्यंत चढलें. लगेच त्यानें गुरूला बुडालों, बुडालों म्हणून हांक मारिली. गुरु नानकांनीं मागें वळून पाहिलें. ते म्हणाले सद्गुरूचें स्मरण कर. त्यानें मोठ्या श्रद्धेनें सद्गुरू स्मरण केलें व सुखरूपपणें पैलातीरावर गेला.

सारांश एवढाच कीं संतांचे वचनावर विश्वास पाहिजे.

नामधारी आपल्या नामरूपी साधनाला व उपास्य देवतेला एकनिष्ठ व भावनिष्ठ असतो. कसाहि प्रसंग आला तरी तो आपल्या निष्ठेपासून ढळत नाहीं. परमेश्वरावर त्याची अढळ श्रद्धा असते व त्याचा एकविध भाव देवाच्या पायीं दृढ असतो. भानुदास महाराज ह्या दृढ भावाबद्दल म्हणतात—

जरि हें आकाश वर पडो पाहे । ब्रह्मगोळ भंगा जाये ॥
वडवानळ त्रिभुवन खाये । तरी तुझीच वाट पाहे गा विठोबा ॥ १ ॥
न करी आणिकांचा पांगिला । नामधारक तुझाची अंकिला ॥ २ ॥

तसेंच तुकोबा म्हणतात—

पतिव्रते जैसा भ्रतार प्रमाण । आम्हा नारायण तैशापरी ॥

* * *

आम्हा विष्णुदासा एकविध भाव । न म्हणे या देव आणिकांसी ॥
शतखंड माझी होईल रसना । जरी या वचना पालटेन ॥

* * *

अशा नामनिष्ठाची योग्यता फार मोठी असते. एकनाथ महाराजांनीं आपल्या एका अभंगांत त्याचें वर्णन केलेलें आहे. त्याचा सरळ अर्थ खालीलप्रमाणें आहे—

१००० गांवढे ब्राह्मण = १ क्षेत्रस्थ ब्राह्मण
१००० क्षेत्रस्थ ,, = १ वेदपाठक ,,
१००० वेदपाठक ,, = १ पंडित ,,
१००० पंडित = १ संन्यासी
१००० संन्यासी = १ परमहंस
१००० परमहंस = १ ब्रह्मवेत्ता
असंख्य ब्रह्मवेत्ते = १ नामधारक

**टीप**—जिज्ञासूनीं ' गांवढे सहस्त्र ब्राह्मण । तृप्त केलिया भोजन । ' हा श्रीएकनाथ महाराजांचा अभंग पहावा.

यावरून नामधारकाची योग्यता काय आहे याची कल्पना येते. नामनिष्ठेमुळें चोंखोबांनीं स्वर्गांतील नासलेलें अमृत आपली नुसती करांगुली लावून शुद्ध केल्याचें सांगतात. सारांश, नामामृतापुढें स्वर्गांतील अमृत सुद्धां फिकें पडतें. ज्ञानदेव म्हणतात—

नामामृत गोडी वैष्णवा लाधली । योगिया साधली जीवन कळा ॥

सध्या या कलीयुगांत नामसाधनेशिवाय दुसरें अन्य साधन नाहीं हें संतांनीं ओळखून सामान्य जनाला नाममार्गाकडे लाविलें आहे. नामसाधनेचें महत्व प्रा. के. वी. बेलसरे यांनीं आपल्या ' नामसाधना ' या छोट्या पुस्तिकेंत फार मार्मिकपणें प्रतिपादिलें आहे. ते म्हणतात—

" आनंद प्राप्तीसाठीं नामरुपी आनंदसाधनच सर्वोत्तम साधन आहे. साधनाचा आरंभ नामांत तसा त्याचा अंत देखील नामांतच होतो. मन नामाला चिकटलें तर भगवंताला तेथें प्रकट झाल्याशिवाय गत्यंतर उरत नाहीं. जो नियम भगवंताला तोच नियम सद्‌गुरुंना लागू पडतो. म्हणून ज्याला समाधान हवें त्यानें सर्व शंका सोडून नामसाधना करावी. "

नामाचें महत्त्व वामन पंडितांनीं सुद्धां आपल्या ' नामसुधा ' काव्यांत फार बहारीनें वर्णन केलें आहे.

हरि–पण हरि–नामें धातुमुर्तीसि आलें ।
हरि–मय हरि–नामें विश्व संतांसि जालें ॥
भव–भय हरि–नामें साधकांचें पळालें ।
वद् वद् वद् जिव्हे राम नामे रसाळे ॥

हरि नामानें जर धातूच्या मूर्तीस हरिपण येतें तर हाडामांसाच्या माणसानें एकनिष्ठपणानें हरिनामाला वाहून घेतलें तर त्याचा देहसुद्धां हरिनामानें भरून जाऊन हरिमय कां होणार नाहीं? अगदीं याच सिद्धांतावर चोखोबांचीं हाडें देहपातानंतर सुद्धां विठ्ठल नामाचा गजर करीत होतीं. ह. भ. प. पांगारकर यांनीं आपल्या नारदभक्तिसूत्रांतील भक्त गौरव प्रकरणांत स्पष्टीकरण करतांना अतिशय उत्कृष्ट विचार मांडलेले आहेतः—

"भक्तांच्या ठिकाणी जात, विद्या, कुल, धन, इत्यादिकांचा भेद नसतो. भक्ताची जात कोणतीही असो, तो कितीही अविद्वान किंवा विद्वान असो, तो श्रीमंत असो वा दरिद्री असो, त्याच्या हृदयांत जर श्रीहरि भरला आहे तर तो विश्ववंद्यच आहे. 'उंच नीच कांहीं नेणें भगवंत ।' चोखा डोंगा होता, पण त्याचा भाव डोंगा नव्हता, म्हणूनच तो मान्य झाला आहे. दुराचारी पाखांडी ब्राह्मणाहून सदाचारी भगवद्भक्त महार कोट पटीनें श्रेष्ठ आहे. जनाबाईच्या गोवऱ्या व चोखामेळाची हाडें 'विठ्ठल' 'विठ्ठल' बोललीं; ह्यावरून त्यांचे देह विठ्ठलानें कसे भरले होते हें दिसतें. चोखामेळा, सजन कसाई यांची जात कोण पाहतो? ध्रुव व उपमन्यु यांच्याशीं विद्या कोणती होती? सुदामदेवापाशीं द्रव्य किती होतें? कुब्जादासीचें रुप कसें होतें? तात्पर्य, मुख्य हरिप्रेम ज्याच्या रोमा रोमांत भिनून गेलें आहे, ते ह्या सर्व भेदांतून पार गेले आहेत. ते विश्ववंद्य झाले आहेत. ब्राह्मणपणा हा अभिमान नको व महारपणा ही लाज नको. राम-कृष्ण-हरीच्या भजनानें भक्ताच्या कुळांतले होऊन जावें हेंच मनुष्याचें मुख्य कर्तव्य आहे. जो अभेद भजनानें एकमय हरीच्या स्वरुपांत रंगून गेला तो भेदमय मायेच्या पैलपार गेला."

चिंतन व शुद्ध भाव यांच्या जोरावर मनुष्य आपलें इष्ट साध्य करून घेऊं शकतो हें आपण पाहिलें. प्रभु रामचंद्र, भगवान् गोपाळकृष्ण सारख्या

अवतारी पुरुषांच्या चरित्रांचा आपण विचार केला तर त्यांही चरित्रांत निष्ठा, भाव व चिंतन यांना फार मोठें स्थान आहे. भगवान् कृष्णाची प्राप्ति व्हावी ह्या गोष्टीचें चिंतन व ध्यास प्रत्यक्ष लक्ष्मीचा अवतार असलेल्या रुक्मिणी-देवीला लागला. तिनें भगवान् कृष्णाला पाठविलेली पत्रिका सर्वांना सुपरिचित आहे. श्रीएकनाथ महाराजांनीं आपल्या 'रुक्मिणी–स्वयंवर' ग्रंथांत फारच उत्कृष्ट रितीनें ही पत्रिका वाचक व श्रोत्यांपुढें ठेविली आहे:—

कृपा न करवेल येथें । तरी मारुनी जाये आपुले नि हातें ।
मग परलोकीं तरी तूतें । सावकाश भोगीन ।। ६० ।।

ऐसें घडतां जरी न घडे । तरी देह करीन मी कोरडे ।
व्रते तपें जे अवघडे तुज उद्देशें करीनं ।। ६१ ।।

प्राण सांडीन सर्वथा । तरी म्हणसी काय येईल हाता ।
एक दों पांचां सातां । जन्मशतां वरीन ।। ६२ ।।

तसेंच वामन पंडितांनीं आपल्या लेखणींतून हा प्रसंग वाचकापुढें कसा उभा केला आहे तो पहा—

शर्वादि सर्व तुझि इच्छिति पायधूळीं ।
तुझा प्रसाद नव्हता मज याच काळीं ।।
जन्मा शतांत मरणें स्मरणें मुकुंदा ।
अंतीं तुझ्याच वरणें चरणार विंदा ।।

वाचतां वाचतां ह्या ओळी कोणत्याही सहृदय मनुष्याच्या मनास सहज चटका लावून जातील अशा आहेत. आपल्या शुद्ध भावानें ही तिनें गुंफिलेली पत्रिका नव्हे. भगवान् कृष्णाला वाहिलेली भावभक्तीनें बहरलेली सुमनें, भगवान् गोपाळकृष्णाचें हृदय हेलावण्यास योग्य ठरली आणि म्हणूनच त्यांनीं लगेंच द्वारकेहून धांव घेतली.

एकनाथ महाराज पुढें म्हणतात—

ज्यासी जैसा भावो । तयासी तैसाची देवो ।
भीमकी कृष्णमय पहावो । कृष्ण देवो तन्मय ।। ६८ ।।
हृदयीं नाहीं सत्य भावो । तंव कैसेनि पावे देवो ।
भीमकी भाग्याची पाहावो । उठिला देवो सत्वर ।। ६९ ।।

म्हणून चोखोबा निक्षून सांगतात—

आमुचा आम्ही केला भावबळी । भावें वनमाळी आकळीला ।।

आणि याच भावबळाच्या जोरावर त्यांनीं चंद्रभागेच्या वाळवंटावर भावभक्तीचीं फुलें फुलविली कीं ज्याचा सुगंध आज सातशें वर्षें महाराष्ट्रभर अव्याहतपणें दरवळत आहे.

: ७ :

# चोखोबांचें गृहजीवन

चोखोबांचें गृहजीवन कसें होतें व ते काय करीत होते याचा खरा तपशील मिळत नाहीं. तथापि चोखोबा त्या काळांतील रूढीप्रमाणें जीं कामें त्यांना करावी लागत तीं सर्व कामें ते करीत असत असें दिसतें. केवळ आठही प्रहर ते महाद्वारांत बसून भजन करीत असा उल्लेख कोठें सांपडत नाहीं. संसारांत लागणारें द्रव्य व इतर गोष्टी ते सामान्य माणसाप्रमाणेंच करीत असत वा मिळवीत असत याबद्दल शंका नाहीं. तथापि ते संसारांतील गोष्टींत रममाण होऊन त्यावर आसक्त होऊन राहिले होते असें दिसत नाहीं. आसक्तीच्या जाळ्यांत ते सांपडले असते तर श्रीपांडुरंगरायाला स्वतःच्या जाळ्यांत अडकवूं शकले नसते हें तितकेंच खरें आहे. मेलेलीं ढोरें ओढतांना देव त्यांना सहाय्य करीत असे असें बहुतेक सर्व संतांच्या अभंगांत वर्णन आहे. शेती वाडी करणें, ढोरें ओढणें, घाण काढून साफसफाई करणें हीं

त्यावेळचीं त्यांची कामें ते मन लावून करीत. परंतु ते निष्काम कर्मयोगी व नामनिष्ठ असल्यामुळें प्रत्येक केलें जाणारें काम हें पांडुरंगाचेंच आहे असें समजून ते करीत असत असें म्हणावें लागतें. संसारांतील विषयसुखाकडे विन्मुख झालेला हा संत संसाराकडे कसा पहात होता तें त्यांच्याच अभंगांत पाहूं—

वाढलें शरीर काळाचें हें खाजें । काय माझें तुझें म्हणतोसी ।।

*  *  *

असोनि नसणें संसाराचे ठाई । हाची बोध पाही मना घ्यावा ।।

*  *  *

जन्मला देह पोशिला सुखाचा । काय भरंवसा याचा आहे ।।

*  *  *

दुःखरूप देह दुःखाचा संसार । सुखाचा विचार नाहीं कोठें ।।

*  *  *

घरदार वोखटें अवघें फलकटें । दुःखाचें गोमटें सकळही ।।
नाशिवंतासाठीं रडती गंडा पोरें । काय त्यांचें खेरे स्त्री पुत्र ।।

*  *  *

सुदैवानें त्यांना जी पत्नि लाभली होती ती पण सुस्वभावी, पतिव्रता व हरिभक्तीची आवड असणारी अशीच होती. ती आपल्या पतीच्या भक्तिमय जीवनांत एकरूप झाली होती. चोखोबांच्या संगतीचा व सहवासाचा तिला लाभ झाल्याबरोबर तिच्यांत उपजतच असलेल्या हरिभक्तीला बहर आला व तिच्या मुखांतूनही अभंगवाणी स्रवूं लागली. सोयराबाईचे अभंग वाचतांना तिच्या सरळ, पापभिरू व निष्कपट अंतःकरणाचें प्रतिबिंब तिच्या काव्यांत आपण पाहूं शकतो. सोयराबाईचा भाऊ बंका महार. चोखोबांची बहिण निर्मळा ही बंका महार यांना दिली होती. बंका महार हे चोखोबाचे शिष्य पण होते. संतांच्या सभेंत बंका महार यांना मानाचें स्थान होतें. त्यांच्या अंतःकरणांत असलेल्या भक्तिभावाला चोखोबांनीं प्रेरणा देऊन त्यांच्याही

मुखांतून अभंगवाणी प्रकटविली. निर्मलाबाई ही आपल्या बंधूप्रमाणें भक्ति-भावाची उपजत देणगी घेऊन आली होती. तीचे अभंगही प्रसिद्ध आहेत.

चोखोबाना दीर्घकालपर्यंत मूलबाळ नव्हतें. सोयराबाई स्त्रीस्वभाव सुलभ संचित असे. देवाला हें ठाऊक होतें. परंतु पुढें देवाच्या आशिर्वादानें तिला मुलगा झाला. त्याचें नांव कर्ममेळा. घरांत दुसरें कोणी नव्हतें व सोयराबाई एकट्याच असून प्रसूतीचा वेळ अगदीं समीप आला होता. चोखोबाराय आपल्या बहिणीस आणण्यासाठीं तिच्या गांवीं गेले होते. अशा अडचणीच्या वेळीं श्रीपांडुरंगरायानें निर्मळेच्या रुपानें त्यांच्या घरीं येऊन सोयराबाईची अडचण दूर केली. मुलाचें बारसें केलें व कोडकौतुक केलें. या प्रसंगाचें वर्णन नामदेवरायांनीं आपल्या अभंगांत केलें आहे.

पुढें कर्ममेळासुद्धां आपल्या वडिलाप्रमाणें विठ्ठलभक्त निघाला. तोही अभंग करूं लागला. कर्ममेळ्याचे अभंग म्हणजे देवापुढें मांडलेल्या कैफियतीच होय. त्याचे अभंग थोडेफार बंडखोर वृत्तीचे असून देवाला अधुनमधून कैचींत धरल्याप्रमाणें केलें आहे. विटाळाबद्दल केलेल्या व देवापुढें मांडलेल्या त्याच्या तक्रारी म्हणजे त्यावेळच्या कर्मठपणावर केलेले प्रहारच होत.

आमुची केली हीन याती । तुज कां न कळे श्रीपती ॥
जन्म गेला उष्टें खातां । लाज न ये तुमचे चित्ता ॥

* * *

तुमच्या संगतीचें काय सुख आम्हां । तुम्हां मेघःश्यामा न कळे कांहीं ॥
हीनत्व आम्हासी हीनत्व आम्हासी । हीनत्व आम्हासी देवराया ॥
घड गोड कधीं न मिळेचि अन्न । सदां लाजीरवाणें जगांमध्यें ॥

एकदरींत ही पांचही संत मंडळी एकाच कुटुंबांतील असून या पांचांनीहि अभंग रचना केली आहे हें विशेष होय. असे योगायोग एकाच कुटुंबांत क्वचितच येत असतात. ज्ञानेश्वरांच्या शिकवणूकीचा व वाङ्मयाचा या कुटुंबियांवर विलक्षण प्रभाव पडला होता असें दिसतें.

'मराठी संत कवयित्री' या विषयावर आकाशवाणीवरून बोलतांना डॉ. कमलाबाई देशपांडे यांनी या कुटुंबियांबद्दल दिलेली माहिती उद्‌बोधक आहे. त्या म्हणतात—

"कान्होपात्रेच्या खालोखाल प्रसिद्धि मिळालेल्या पण कालदृष्टया कान्होपात्रेच्या मागचे शतकांत म्हणजे नामदेव आदि संत मंडळीचे समकालीन होऊन गेलेल्या दोन नणंदा–भावजया कवयित्री सोयराबाई व निर्मला. सुप्रसिद्ध संत चोखामेळा याची सोयराबाई ही बायको व निर्मळा ही बहीण. तो काळच असा दिसतो कीं ज्ञानदेव–नामदेवाच्या प्रेरणेनें आधींच चालू असलेल्या विठ्ठलभक्तीला बहर यावा. जेथें जेथें सहृदयता असे तेथें तेथें ही प्रेरणा पोचे व त्या व्यक्तींतील भक्तिभाव जागृत होऊन काव्याचें स्वरुप घेई. ज्ञानदेव व नामदेव हे स्वतंत्र स्फुरण होऊन कवि झाले. पण ज्ञानेश्वर कुटुंबीय सोपानमुक्ताई आदि मंडळी, नामदेव कुटुंबीय बायको, बहीण, मुलगे, सुना. इत्यादि सर्व तशीच दासी जनी, यांना त्याच्या स्फुरणाचें वारें लागलें. तसेंच वारें जातिनिरपेक्षपणें इतर सर्वांपर्यंत पोचलें. तसेंच चोख्या महारापर्यंतहि गेलें. त्याच्या भगवद्‌भक्तीचा परिणाम पुन्हां त्याची बायको, मुलगा व बहिण यावर झाला. नीच जातींत जन्म असून सदाचरणी व वृत्तीनें भक्तिमार्गी; विठ्ठलाचे चिंतनांत, भजनांत गुंगून सर्व संतांचे पद्धतीप्रमाणें संसार विसरे. त्यास मूलबाळ नव्हतें त्यामुळें त्याची बायको सोयराबाई दुःखी असे. पांडुरंगानें ब्राह्मणाचे स्वरुपानें येऊन अन्न मागितलें. आपण हीनजाति; ब्राह्मणास अन्न कसें द्यावें हा सोयराबाईस प्रश्न पडला. पण त्या ब्राह्मणानें आग्रहानें मागितल्यामुळें तिनें दहीभात दिला. ब्राह्मणानें दहीभात खाऊन तुला पुत्र होईल असा आशिर्वाद दिला. आशिर्वाद फलद्रूप झाला. बाळंतपणासाठीं मदत करण्यासाठीं चोखा बहिणीस बोलावण्यास गेला, पण तेथेंच राहिला. इकडे देवानें बहिणीचें रुप घेऊन सोयराबाईची अडचण वारली अशी ही भक्तकथा आहे.

सोयराबाई देवाचें रूप व त्याचे ध्यानांत तल्लीन होते. ती म्हणते —

अवघा रंग एक झाला – रंगी रंगला श्रीरंग ॥
मी–तूं पण गेलें वाया – पहातां पंढरीच्या राया ॥
नाहीं भेदाचें तें काम – पळोनि गेले क्रोध–काम ॥
देहीं असूनी तूं विदेही – सदां समाधिस्थ पाही ॥
पाहते पहाणें गेलें दुरी – म्हणे चोख्याची महारी ॥

या अभंगावरून अद्वैत तत्वज्ञानाची तिला चांगलीच समज झालेली दिसते. एरवी

देही असूनी तूं विदेही – सदा समाधिस्थ पाही ॥
पाहते पाहणें गेलें दुरी – म्हणे चोख्याची महारी ॥

अशी स्पष्टीकरणें इतक्या सुलभपणें येणें कठीण. जातीची महार, त्यामुळें लोकांना आपला विटाळ होतो. हें तर तिला माहीत होतेंच. पण हा सोवळें-ओंवळेपणा देव व भक्त यांच्या मीलनांत आड येणार नाहीं, ही भागवतधर्माची शिकवण तिला कळली होती. या जगांत भेद आहे, पण या जगापलीकडे जीव व शिव यांत हा स्पर्शास्पर्श नाहीं हीं तिची श्रद्धा व म्हणून ती म्हणते—

देहासी विटाळ म्हणती सकळ – आत्मा तो शुद्ध बुद्ध ॥
देहींचा विटाळ देहींच जन्मला – सोवळा तो झाला कवण धर्म ? ॥
विटाळावाचोनि उत्पत्तिचें स्थान – कोणी देह निर्माण नाहीं जगीं ॥
म्हणूनि पांडुरंगा – वानितसे थोरी – विटाळ देहांतरी वसतसे ॥
देहींचा विटाळ देहींच निर्धारी – म्हणत महारी चोखीयाची ॥

निर्मला ही चोख्याची बहीण. तीहि याच भक्तिभावानें भारावलेली आहे. नामाचा जप तारक होतो तें ती सांगते—

मज नामाची आवडी । संसार केला देशधडी ॥ १ ॥
सांपडलें वर्म सोपें । विठ्ठलनाम मंत्र जपे ॥ २ ॥
नाहीं आणीक साधन । सदा गाई नारायण ॥ ३ ॥
निर्मला म्हणे देवा । छंद एवढा पुरवावा ॥ ४ ॥ ”

सारांश, संसारांत राहून हरिप्राप्तीचा लाभ करून घेणें हें साधारण काम नाहीं. परंतु चोखोबांनीं तें करून दाखविलें. त्यांनीं श्रीपांडुरंगाला साक्षी ठेऊन आपल्या हृदयांगणांत भक्तीचें रोपटें लावलें. त्या रोपट्याला त्यांनीं कर्मठांकडून मिळत असलेल्या अवहेलना व छळ यांचे खतपाणी घातलें. त्यांच्या कुटुंबियांनीं या भक्तिरूपी रोपट्याची जोपासना केली. शेवटीं ह्या

रोपट्याचें रूपांतर एका प्रचंड भक्तिवृक्षांत झालें व त्याच्या विस्तीर्ण छायेंत बसून चोखोबा गात होते—

कर्मातें वाळिलें धर्मातें वाळिलें । सर्व हारपलें जेथिचें तेथें ॥ १ ॥
विधीतें वाळिलें निषेधा गिळिलें । सर्व हारपलें जेथिचें तेथें ॥ २ ॥
वेदातें वाळीलें शास्त्रातें वाळीलें । सर्व हारपलें जेथिचें तेथें ॥ ३ ॥
चोखा म्हणे माझा संदेह फिटला । देहींच भेटला देव आम्हां ॥ ४ ॥

: ८ :

# चोखोबांच्या वेळचा त्यांचा समाज व त्याची परिस्थिती

चोखोबांच्या वेळीं महार समाजास शूद्र किंवा अतिशूद्र म्हणून ओळखीत. संतांच्या मेळाव्यांत चोखामेळा जातीनें हीन होते. परंतु श्रेष्ठ भक्त होते. मांगेंत कधीं कधीं तुळस उगवते. त्याप्रमाणें या हीनदीन व पददलीत समाजांत ते जन्मास आले. खरोखर त्यांचें जीवन तुळसीसारखें स्वच्छ होतें. त्याकाळीं त्या समाजास विद्या म्हणजे काय हें ठाऊक नव्हतें. ब्राह्मण समाजाशिवाय इतर दुसऱ्या सवर्ण हिंदूंवर सुद्धां हीच आपत्ति होती. त्या काळीं आजच्यासारख्या शाळा किंवा कॉलेजें नव्हतीं. कांहीं खाजगी पाठशाळा असत. बरेच विद्यार्थी—बहुधा ब्राह्मण विद्यार्थी वेद, उपनिषदें, शास्त्रें व इतर कलांचे ग्रंथ कंठस्थ करीत असें दिसतें. जर बहुजन समाजाची विद्येच्या बाबतींत अशी परिस्थिति होती तर महार समाजाची काय असेल त्याची कल्पना वाचकांनीं करावी. अस्पृश्य समाज तर सवर्ण हिंदूंपासून दहा पावलें दूरच असायचा. त्याची सावली पडणें सुद्धां निषिद्ध व गुन्हा समजत. त्यामुळें त्यांच्या कानांवर चांगले सुसंस्कृत शब्द पडणें सुद्धां कठिण तेथें विद्यार्जनाचा प्रश्न दूरच होता. विद्या नसल्यामुळें तो समाज बहुतेक रानटी लोकांप्रमाणें हलकीं व नीच कामें करून आपला उदरनिर्वाह करीत असे. त्यांच्या घरांत

कधीं गोडधोड करण्याची मनाई होती. शिळ्यापाक्या उष्ट्यावर तो समाज अल्पसंतुष्ट होता असें दिसतें. विद्या व सुसंस्कार यांचा अभाव व घरांत अठराविश्वें दारिद्रय यामुळें तो समाज अगदीं गांजलेला होता. हलकीं कामें व वरच्या समाजाकडून हेटाळणी यांच्याशिवाय त्यांच्या वाट्यास कांहींच आलें नव्हतें असें दिसतें. अशा परिस्थितींत त्या समाजांतील कांहीं माणसें चोऱ्या, मद्यपान व इतर व्यसनें सारख्या दुर्गुणांच्या जाळ्यांत अडकलेलीं होतीं. खुद्द चोखोबांचे अभंग त्या समाजाच्या ह्या बाजूवर चांगला प्रकाश टाकतात. 'गांव तेथें महारवाडा' ही एक म्हण मराठी भाषेंत अजून रूढ आहे.

तथापि, प्रत्येक गांवच्या दैनंदिन व्यवहारांत महाराला एक विशिष्ट असें स्थान होतें. गांवांतील घाण काढून स्वच्छता ठेवणें, शेताला बांध घालणें, लाकडें फोडणें, मेलेलीं गुरें गांवाबाहेर ओढून नेणें व त्यांची विल्हेवाट लावणें, शेताच्या सीमा ध्यानांत ठेवणें व गांवाचें पहारा करून रक्षण करणें या सारख्या सामाजिक बाबी त्या समाजाकडे असत. शिवाय राजकीय क्षेत्रांत-सुद्धां त्या समाजांतील लोकांना स्थान होतें. सरकारचें टपाल पोचविणें व सरकारी खजिन्याची नेआण करणें सारखीं जबाबदारीचीं कामें महारांच्या शिरावर होतीं. तसेंच बहुतेक सर्व गांवांतील पाटील वा ग्रामप्रमुखाच्या हाताखालीं शिपाई वा जासूद म्हणून महाराचीच निवड केली जात असे. महार हे शरीरानें सुदृढ व ताकदवान असत. महत्वाची व ताकदीची कामें करण्यांत ते तरबेज असत. मंगळवेढ्याचे सुप्रसिद्ध संत भक्त दामाजी यांच्यावर आलेलें सांकडें पंढरीरायानें विठू महाराचे रूपानें दूर केलें तें सर्वांस ठाऊक आहेच. महार हे महत्वाकांक्षी असत. परंतु त्यांच्या माथीं असलेल्या अस्पृश्यतेच्या शापामुळें त्यांच्या धाडसाचें व पराक्रमाचें त्याकाळीं व्हावें तसें चीज झालें नाहीं.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळांत या महार लोकांकडे त्यांचें लक्ष गेलेलें दिसतें. त्यांनीं ह्या उपेक्षित व हीनदीन लोकांची योग्यता पाहून किल्ल्याच्या सभोवतालच्या प्रदेशाच्या संरक्षणाचें काम त्यांच्यावर सोंपविल्याचें दिसतें व त्यामुळें राजकीय क्षेत्रांत मावळे, हेटकरी, आग्री, कोळी व

दा. क.

भंडारी वगैरे समाजाबरोबर आपोआप महार समाजाचीही उंची थोडीफार वाढण्यास मदत झाली असें म्हणावें लागेल. तसेंच त्यांच्या अंगीं असलेले गुण प्रकट करण्यास त्यांना संधि मिळाली.

महाराष्ट्रांतील कांहीं भागांत महाराला भूमिपुत्र म्हणून ओळखत व कांहीं भागांत भूमीचा कोंब म्हणून संबोधण्यांत येत असे. कदाचित फार पूर्वीं जमिनींचे खरे मालक ते होते असतील व आर्य लोक दक्षिणेंत आल्यावर या मुळच्या महारांवर विजय मिळवून त्यांच्या भूमि बळकावल्या असतील व त्यांना हिंदुधर्मांत क्षूद्राचें स्थान देऊन सामावून घेतलें असेल किंवा जमिनी व जमिनींत येणारीं पिकें व मशागत इत्यादि गोष्टींत ते कदाचित तरबेज असावेत म्हणूनही त्यांना हीं नावें प्राप्त झालेलीं असावीत. तो प्रश्न इतिहास संशोधकाचा असल्यामुळें त्या बाबतींत जास्त चर्चा न करणें उचित. कालांतरानें इंग्रज लोकांचें राज्य हिंदुस्थानांत झाल्यावर धूर्त इंग्रज लोकांनीं महार लोकांच्या अंगचे गुण पाहिले व त्यांना सैन्यांत नोकऱ्या दिल्या. इंग्रजी राज्यांत महारांच्या स्वतंत्र पलटणी होत्या हें सर्वांस ठाऊक आहे.

त्या काळीं महार समाजांत गुरांची वैद्यकी, जमिनीची लागवड, पिकांची पेरणी, आड व विहिरी बांधण्यासाठीं जमिनींत असलेल्या पाण्याच्या झऱ्याचा तलास लावणें सारख्या गोष्टींत बरेच महार तरबेज होते असें ऐकिवांत आहे. ताशे, ढोल व सनईसारखीं वाद्यें वाजविण्यांत कांहीं महार तरबेज असत. त्यांच्याकडे अशा वाद्यांचा संच असे. गांवांतील यात्रेच्या वेळीं ते वाद्यें वाजवीत. तसेंच लग्न कार्याचे वेळीं ही मंडळी इतर हिंदूंच्या घरीं येऊन वाद्यें वाजवीत व बिदागी मिळवीत. शिवाय ओल्या बांबूंच्या काठीपासून ते सुपें, टोपल्या, चटया, रोवळ्या सारखीं आयुधें वा वस्तु बनवून विकीत.

अशा तऱ्हेनें लहान सहान उद्योग करून जेमतेम ते आपली भाकरी मिळवीत. तथापि, तो असंतुष्ट समाज सुखी नव्हता हें खास. हिंदूंच्या सनातन कर्मठांनीं समाजरचनेंत त्या समाजाची फारच हेळसांड व उपेक्षा केली व अवहेलना वाढविली. तथापि मराठी संतांनीं हें न्यून बरोबर ओळखिलें व अल्पा कां होईना पण या समाजाची उंची वाढविण्याचे आटोकाट प्रयत्न केले. हा

अल्पसंतुष्ट समाज उच्चवर्णीय हिंदूंच्या छळांतून व अवहेलनेंतून मुक्त होण्यासाठीं धडपडत होता असें दिसतें.

त्यांच्या मानसिक दुःखाचें विश्लेषण श्री. म. माटे यांनीं आपल्या 'संत, पंत आणि तंत' या पुस्तकांतील महार संतांच्या मनाचें सामाजिक दुखणें या प्रकरणांत फार उत्कृष्ट रितीनें वर्णन केलेलें आहे. वाचकासाठीं त्यांतील एकच उतारा येथें देतों.

"आपल्याला लोक अस्पृश्य समजतात, आपल्याला कोणी जवळ करीत नाहींत. आपल्या अंगाला जर यांचें बोट लागलें तर हे सचैल स्नान करतात. अशा प्रकारच्या हीन जातीतच आपण जन्माला आलों ही विविध प्रकारची दुःख देणारी जाणीव सात शतकांच्या पूर्वींच्या महार पुढाऱ्यांना होतीच होती आणि ती त्यांनीं व्यक्तहि केलेली होती. गांवगाड्यांत महार समाजाचा प्रवेश झालेला होता आणि गांवकीच्या राज्यांत अगदीं शेवटच्या प्रकारची कां होईना कांहीं जबाबदारीची कामें त्यांच्याकडेच आल्यानें त्या समाजांतील जे कोणी लोक हीं कामें करीत त्यांना 'राजपुरुष' हें नांव मिळणें स्वाभाविकच होतें. सरकारचें टपाल पोहचविणें, खजिन्याची नेआण करणें आणि गांवच्या शिवारांतील शेताच्या सरहद्दी ध्यानांत ठेवणें ही राजकीय आणि सामाजिक महत्वाचीं कामें महारच करत असत. या कामावर त्याचें पोट कसें बसे चालत असे. ठिकठिकाणच्या डोंगरी किल्ल्याची मेटी राखावयास महाराच्याच नेमणुका झालेल्या असत. परंतु हें सारें खरें असलें तरी या समाजाच्या माथीं अस्पृश्यतेचा शाप बसलेला होताच. कांहीं थोडी सामाजिक किंवा राजकीय हालचाल करतां आली, आणि पोटाला थोडा चंदीचारा मिळवितां आला म्हणजे माणसाचें भागतें असें नाहीं; त्याला थोडी सामाजिक म्हणजे लौकिक प्रतिष्ठाहि हवी असते. पण ही प्रतिष्ठा जर यत्किंचित्हि नसली तर त्याला जीवितांत विशेष कांहीं राम वाटत नाहीं असें वाटतें. महार समाजाची हीच मनस्थिती होती. आपले हें मानसिक अस्वास्थ राजकीय किंवा सामाजिक दृष्टया बोलून दाखविण्याचा काळ तेव्हां आलेला नव्हता. परंतु महाराष्ट्रांतील संत मंडळानें परमार्थ विचारांत एक प्रचंड क्रांति करून टाकलेली होती आणि या क्रांतीमुळें परमार्थाच्या चावडीवर तरी आपल्या मनाचें दुःख बोलून दाखविण्याचा अधिकार या समाजाला खासच प्राप्त झालेला आहे.

चोखोबा महार अशा या मानकरी वर्गातील एक संत बनला होता आणि आपल्या पारमार्थिक अधिकाराच्या बळावर त्यानें संत मंडळांत मोठी मान्यता प्राप्त करून घेतली होती. मनांत आलेले सर्व विचार तो अभंगरूपानें व्यक्त करीत असे आणि हे त्यांचे अभंग उतरवून घेण्याचे काम 'अभ्यंग अनंत भट्ट' करीत असे, असें तेव्हांची स्त्री जातींतील समकालीन संत जनाबाई हिनें लिहून ठेवलें आहे. या अभंगांत केवळ पारमार्थविषयक आणि भक्तिविषयक अभंगच जास्त आहेत हे खरें. परंतु चोखोबांच्या मनाचें सामाजिक दुःख व्यक्त करणारे बरेंचसे अभंग आहेत. हे अभंग चोखोबानें अतिशय तळमळीनें आणि कष्टी मनानें गाइलेले आहेत. "

त्याकाळीं वर्णाश्रम धर्मांतील कर्मठांनीं महारास जरी दूर लोटलें तरी संतांनीं त्याला जवळ केलें. त्या जातीची उंची वाढविण्यासाठीं त्यांनीं आटोकाट प्रयत्न केले व आपल्या वाङ्मयामध्यें त्या जातीला गौरवाचें स्थान दिलें. गांवच्या राखणगिरीची जबाबदारी फार सावधगिरीनें पार पाडणारा व लोकांना जागरूक ठेवणारा हा संतांचा विश्वासू महार – येसकर – आपल्या दीनतेनें, लीनतेनें व नम्रतेनें जोहार करीत उभा आहे. त्याची कारभारीण – महारीण – आपल्या कारभाऱ्याबरोबर उभी आहेच. नम्रता व कारूणिक वृत्तिरूपी रसांनीं भरलेला कलश आमच्या भक्तिभावास उपयोगी पडण्यासाठीं तीं आम्हास प्रदान करीत आहेत. न फिटणारें हें त्यांचें ऋण आमच्या माथ्यावर सदैव राहील.

**'अभिमान न संडी स्वजातीचा ॥'** ह्या ज्ञानेशांच्या संदेशाची पताका हातीं घेऊन हा महार खऱ्या माणुसकीला आवाहन करीत व करूणाजनक गायन करीत उभा होता—

अधिकार माझा निवेदन पाई । तुम्ही तो गोसावी जाणतसां ॥ १ ॥
अवघ्या वर्णांमाजी हीन केली जाती । विटाळ विटाळ म्हणती क्षणोक्षणीं ॥२॥
कोणीही अंगिकार न करिती माझा । दूर हो जा अवघे म्हणती ॥ ३ ॥
चोखा म्हणे तुम्ही घ्याल पदरीं । तरीच मज हरी सुख होय ॥ ४ ॥

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ........................ वि: ..................
........................ नों दि ..............

: ९ :

# चोखोबांचा विटाळ

महाराष्ट्राच्या संतपरंपरेंत चोखामेळा महाराज यांचें स्थान अनन्य साधारण आहे. सामाजिकदृष्ट्या अवमानल्या गेलेल्या समाजांत जीवन जगणाऱ्या चोखामेळ्यांनीं आपल्या स्वतःच्या निष्ठापूर्वक भक्तीनें भक्तमंडळींत फार मोठें स्थान प्राप्त करून घेतलें याबद्दल शंका नाहीं. एका बाजूस भागवत धर्मानें त्यांना पोटाशीं धरलें होतें, तर दुसऱ्या बाजूस हिंदु समाज त्यांना 'दूर हो, दूर हो' 'विटाळ, विटाळ' म्हणून नेडसावीत होता. अशा कैचींत सांपडलेल्या ह्या महात्म्यानें सर्व अवहेलना सोसून श्री विठ्ठलाच्या चरणीं आपल्या जीवन सर्वस्वाचें तुळसीपत्र ठेविलें आणि याच विठ्ठल भक्तीच्या जोरावर वा पारमार्थिक अधिकाराच्या बळावर संत मंडळींत त्यांनीं मानाचें स्थान प्राप्त करून घेतलें. परंतु त्यांच्या मनांत सामाजिक दुःखाची रुख रुख कायम होती असें म्हणावें लागतें. अधून मधून ते आपलें सामाजिक दुःख अभंगद्वारें प्रगट करीत. हे अभंग अतिशय तळमळीचे असून कारुण्यानें भरलेले आहेत. ते सहृदयतेनें वाचीत असतां आतड्यांना पीळ पडतो. त्यांनीं आपली ही मानसिक व्यथा विश्वाच्या चावडीवर बसलेल्या पाटलापुढें त्याचा एकनिष्ठ महार म्हणून गाइली—

हीन याती माझी देवा । कैसी घडे तुझी सेवा ।।
मज दूर दूर हो म्हणती । तुज भेटूं कवण्यारीती ।।

* * *

याती हीन मज म्हणती देवा । न कळे करूं तुमची सेवा ।।
आम्हां नीचाचें तें काम । वाचे गावें सदां नाम ।।

त्यावेळीं समाज रूढीनें अंध झाला होता. समाजाला झालेला हा रोग त्वरित बरा होणारा नव्हता. ह्या रूढी समाजांत केव्हांपासून आल्या त्याचा पत्ता लागत नाहीं. याबाबतींत श्रीमत् स्वामी सत्यदेवानंद सरस्वती, आळंदी, यांनीं मांडलेले विचार उद्बोधक आहेत—

" वर्णाश्रम व्यवस्था हें भारतीयांचें एक मोठेंच वैशिष्ट्य आहे. परंतु कालाच्या ओघांत जातीविचार हा गीतावचनाप्रमाणें ' गुणकर्म विभागशः 'न होतां जन्मानुसार होऊं लागला व याचा गैरफायदा घेऊन पुरोहित वर्गानें ( ब्राह्मणांनीं ) आपल्या जवळचें ज्ञान शूद्रापर्यंत न पोचवितां उलट स्वतःसाठीं कांहीं खास अधिकार राहण्याच्या ईर्ष्येनें बुद्धिपूर्वक या लोकांना पुरोहितांनीं ज्ञान लाभापासून वंचित केलें. समाजांत दिसत असलेला परस्पर द्वेष, शूद्र हा चार वर्णांपैकीं एक वेदमान्य वर्ण असूनही त्याची सर्व सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक बाबतींत उपेक्षा आणि गळचेपी या सर्वांमुळें वैदिक हिंदुधर्माचा जुनाट वटवृक्ष झपाट्यानें पोखरत चालला आहे व या वृक्षाला पुनः चैतन्य प्राप्त होऊन जर या वृक्षाचा अधिक विस्तार व्हावा असें वाटत असेल तर स्त्री शूद्रांना वेदांतील उदात्त व व्यापक तत्वें समजूं शकतील असें शिक्षण देण्यास सुरवात झाली पाहिजे. "

**श्री स्वामीविवेकानंद**

प्रसाद, दीपावली अंक १९६४

त्याचप्रमाणें क्रांतिवीर सावरकर यांनीं या बाबतींत प्रकट केलेले विचार फार मौलिक आहेत. ते म्हणतात—

" जें हिंदुराष्ट्राचें स्वातंत्र्य आपणास मिळवायचें आहे तें जाति भेदानें जर्जर झालेल्या या आपल्या राष्ट्रपुरुषास जरी अनेकवेळां मिळवितां आलें तरी या रोगाचें जोंवर निर्मूलन झालें नाहीं तोंवर एका बाजूस तें मिळविणें शतपट दुर्धर होणारें असून दुसऱ्या बाजूनें तें मिळवितांच पुन्हां गमावण्याचाही पाया भरत जाणार आहे. "

जात्युच्छेदक निबंध ( पृ. १० )

वर्णसंकराचा विचार करतांना ते प्रतिपादन करतात—

" आजचें भारताचे सर्व वर्णांचे व सर्व जातींचे नागरिक एक रक्ताचे आहेत. ( या बाबतींत त्यांचे हिंदुत्व व मनुस्मृतींतील महिला हे प्रबंध पहा ) जें जातीभेदाचें तेंच अस्पृश्यतेचें. पूर्वीच्या काळीं जन्मजात अस्पृश्यता नव्हतीच. मनूनें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे चारच वर्ण सांगितले आणि पांचवा वर्ण नाहीं असाही खुलासा केला. पण विटाळवेड्या हिंदुसमाजानें ही अस्पृश्यता निर्माण करून समाजाचें एक अंग कापून टाकलें. "

चोखोबांच्या काळीं व्यवहारांत क्षूद्रांची स्थिति जरीं केविलवाणी झाली होती तरी महाराष्ट्रीय साधुसंतांनीं त्यांना दूर न ढकलतां आपल्यांतच सामावून घेतलें होतें व आपल्या वाङ्मयांत त्यांचा पुरस्कार करून प्रत्यक्ष कृतीनें विटाळ दूर करण्याचे सारे प्रयत्न केले. ज्ञानदेवांनीं आपल्या ज्ञानेश्वरींत चार वर्ण, त्यांची कर्मे व त्यांचे अभंगत्व टिकविण्यासाठीं बऱ्याच ओंव्या खर्चीं घातल्या आहेत. तसेंच इतर महाराष्ट्रीय सत्पुरुष व भागवत धर्मीय संत यांनीं आपापल्या वाङ्मयांत शूद्रांना सनदा बहाल केल्या आहेत.

ज्ञानदेव म्हणतात—

आतां याचि परी जाण । चाऱ्ही हे वर्ण । सृजिलें म्यां गुण । कर्म विभागें ॥ जे प्रकृतीचेनि आधारें । गुणाचेनि व्यभिचारें । कर्मे तदनुसारें । विरंचिलीं ॥ आणि वैश्य क्षत्रिय ब्राह्मण । हे द्विजन्में तिन्ही वर्ण । ययांचे जे शुश्रूषण । तें शूद्रकर्म ॥ पैं द्विज सेवे परौतें । धांवणें नाहीं शूद्रातें । एवं चतुर्वर्णोचितें । दाविलीं कर्में ॥ चौथा शूद्र जो धनंजया । वेदीं लागु कीर नाहीं तया । तऱ्ही वृत्ति वर्णत्रया । अधीन तयाची ॥ जैसा फुलाचेनि सांगातें । तांतु तुरंबिजे श्रीमंतें । तैसें द्विजसंगें शूद्रातें । स्वीकारी श्रुति ॥ ते पापयोनि मूढ । मूर्ख जैसे कां दगड । परि माझ्या ठायीं दृढ । सर्व भावें ॥ ते पापयोनीही होतु कां । ते श्रुताधीतही न होतु कां । परि मजसी तुकितां तुका । तुटी नाहीं ॥ येऱ्हवी दैत्यकुळ साचोकारे । परि इंद्रही सरी न लाहे उपरे । म्हणोनि भक्ति गा एथ सरे । जाति अप्रमाण ॥ म्हणोनि कुळ जाति वर्ण । हे आघवेंचि गा अकारण । एथ अर्जुना माझेपण । सार्थक एक ॥ तैसे क्षत्रिय वैश्य स्त्रिया । कां शूद्र अंत्यजादि इया । जाती तंवचि वेगळालिया । जंव न पवती मातें ॥ मग जाति व्यक्तिपडे बिंदुले । जेव्हां भावें होती मज मीनले । जैसें लवण कण घातले । सागरामाजीं ॥ या लागी पापयोनिही अर्जुना । कां वैश्य शूद्र अंगना । मातें भजतां सदना । माझिया येती ॥

श्रीएकनाथ महाराजांनीं तर लोकजागृतीसाठीं आपल्या वाङ्‌मयांत या विषयास निरनिराळ्या अंगांनीं प्रसिद्धि दिली आहे. तसेंच त्यांनीं आपल्या आचरणानें व प्रत्यक्ष कृतीनें समाजाचा दृष्टीकोन सुधारण्यासाठीं व्यक्तिशः फार मोठा प्रयत्न त्या काळांत केला. त्यांची समाजसेवकाची भूमिका सर्वांना सुपरिचित आहे.

तुकाराम महाराज आपल्या अभंगवाणींत म्हणतात—

ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्र । चांडाळा आहे अधिकार ॥
बालें नारी नर । आदि करोनि वेश्याहि ।
तुका म्हणे अनुभवें । आम्ही पाडियेलें ठावें ।
आणिकही दैवें । सुख घेती भाविकें ॥

यातीनें अत्यंज असला पण तो नामनिष्ठ असल्यास त्यास ब्राह्मणच मानला पाहिजे असें ते म्हणतात—

ब्राह्मण तो याति अंत्यज असतां । मानावा तत्वतां निश्चयेंसी ॥१॥
रामकृष्ण नामें उच्चारी सरळें । आठवी सांवळें रूप मनीं ॥ २ ॥
शांति क्षमा दया अलंकार अंगीं । अभंग प्रसंगी धैर्यवंत ॥ ३ ॥
तुका म्हणे गेल्या षडउर्मी अंगें । सांडुनिया मग ब्रह्मचि तो ॥४॥

वामन पंडित आपल्या यथार्थ दीपिकेंत स्पष्टिकरण करतांना म्हणतात—

"शूद्र केवळ तमोगुणी । वेद न पडे ज्यांच्या श्रवणीं । तेही मज अनन्यभावें जे क्षणीं । भजती, पावेलच म्हणावें परम गतीतें ॥१७८०॥
स्त्रिया, शूद्र आणि इतर अधम जाती । माझ्या भजनें मुक्ति पावती । ब्राह्मणही नरकास जाती । मज न भजता वेदशास्त्र संपन्नही, हा भाव ॥ १७८१ ॥"

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........ वि. ........
............ नों. दि. ........



लोकमान्य टिळक आपल्या गीता रहस्यांत ह्या विषयाचें स्पष्टीकरण करतांना लिहितात—

" ज्याची बुद्धि सम झाली आहे तो श्रेष्ठ, मग धंद्यानें तो सुतार असो, वाणी असो वा खाटिक असो. कोणत्याहि मनुष्याची योग्यता धंद्यावर किंवा जातीवर अवलंबून नसतां सर्वस्वी त्याच्या अंतःकरणाच्या शुद्धीवर अवलंबून असते असें भगवंताचें सांगणें आहे हें उघड होतें. समाजांतील सर्व लोकांना याप्रमाणें मोक्षाचें द्वार खुलें झाल्यानें समाजांत जी एक प्रकारची विलक्षण जागृति उत्पन्न होते तिचें स्वरूप महाराष्ट्रांतील भागवत धर्माच्या इतिहासावरून सहज कळून येण्यासारखें आहे. परमेश्वरास स्त्री काय, चांडाळ काय आणि ब्राह्मण काय सारखेंच. देव भावाचा भुकेला, प्रतीकाचा नाहीं, काळ्या गोऱ्या वर्णाचा नाहीं आणि स्त्री-पुरुषादि किंवा ब्राह्मण चांडाळादि भेदाचाहि नाहीं."

लोकमान्य टिळक पापयोनीची व्याख्या करतांना गुन्हेगार लोकांना म्हणजे राजदरबारांत गुन्हेगार ओळखिले जाणाऱ्या लोकांना पापयोनींत ढकलतात. यावरून लोकमान्यांच्या मतें शूद्र हा पापयोनींत येत नाहीं असें दिसतें.

आचार्य विनोबा भावे आपल्या गीताईंत गातात—

धरूनि आसरा माझा भोळे स्त्री वैश्य शूद्र हि
कीं पाप-योनि जे जीव तेहि मोक्षास पावती ॥

अशा तऱ्हेनें कितीतरी संतांनीं व सत्पुरुषांनीं आपापल्या परीनें गेलीं ७ शें वर्षे विटाळ धुवून काढण्याचे प्रयत्न केले व देवाच्या दारांतील उच्चनीचतेचा खड्डा भरून काढण्यास मदत केली. श्रीपांडुरंगराय त्याच विटेवर व त्याच ठिकाणीं उभे आहेत. विठू पाटलाच्या ह्या महारानें आपल्या आर्त स्वरांत महाद्वारांत बसून आपलें विटाळाचें गाणें गाइलें—

काळाचा विटाळ जीवशिवा अंगीं । बांधलासे जगीं दृढ गांठी ॥ १ ॥
विटाळी विटाळ चवदाही भुवनीं । स्थावर जंगम व्यापुनी विटाळची ॥२॥
सुखासी विटाळ दुःखासी विटाळ । विटाळीं विटाळ वाढलासे ॥ ३ ॥
विटाळाचे अंगीं विटाळाचें फळ । चोखा तो निर्मळ नाम गाय ॥ ४ ॥

अस्पृश्य समाजाचे निश्वास त्यांच्या गाण्यांत मिसळले होते. श्रीपांडुरंगरायाला गलबलून आलें. निर्मळ चोखा निर्मल नाम महाद्वारांत बसून अजून गातच आहे.

चोखोबा आजही सांगत आहेत कीं समाजानें विश्वांत चाललेल्या घडामोडीकडे नजर टाकून आपल्यांतले दोष काढून टाकण्याचे प्रामाणिक प्रयत्न केले पाहिजेत व बदलत्या कालानुसार हिंदुसमाज निकोप व सर्वांग सुंदर कसा करतां येईल याकडे विचारवंतांनीं लक्ष दिलेंच पाहिजे. समाजाची व्याख्या करतांना व समाजांतील रूढी वारंवार कां बदलाव्या लागतात याचें विश्लेषण करतांना संत साने गुरुजी आपल्या 'प्रयोग करणारे ऋषी' या प्रबंधांत म्हणतात—

"उदार विचारावर भारतीय संस्कृती आधारलेली असल्यामुळें तिच्यांत शेंकडों फेरबदल झालेले आहेत. धर्मांत दोन भाग असतात. एक शाश्वत तत्वांचा भाग व एक अशाश्वत तत्वांचा भाग. जगांत सर्वत्र या दोन गोष्टी आपणास दिसून येतील. आपलें शरीर बदलत असतें, परंतु आंतील आत्मा तोच असतो. समाजांतील व्यक्ति जन्मतात–मरतात, परंतु समाज चिरंतन आहे. नदीच्या प्रवाहांतील जलबिंदु सारखे बदलत असतात, परंतु प्रवाह कायम असतो...ह्या चाली रीती सर्व बदलत असतात याचा एवढाच अर्थ. परंतु आपला समाज जेव्हां बदल करीत नाहीं तेव्हां तो फार मोठी चूक करीत असतो, हें त्याच्या लक्षांत येत नाहीं. जुन्या जीर्ण शीर्ण रूढी आज कशा चालतील? लहानपणाचा अंगरखा मोठेपणी मुलाला कसा येईल? अंगरखा तरी मोठा करा नाहींतर मला तरी सदैव लहान ठेवा, असें त्या मुलाला म्हणावें लागेल. रूढीचे कपडे हे सदैव बदलत असावेत. उन्हाळ्यांतील कपडे थंडींत चालणार नाहींत हा नियम आहे. असा बदल न कराल तर थंडींत गारठून मराल व उन्हाळ्यांत उकडून मराल."

पूज्य साने गुरुजींचें म्हणणें किती सार्थ आहे याची मनोमन खात्री विचारवंतांना झाल्याशिवाय राहाणार नाहीं. देहांत ज्याप्रमाणें निरंतर आत्मा वसत असतो त्याप्रमाणें जगाच्या व्यवहारावरपण दैवी शक्तीची निरंतर अधिसत्ता असते आणि हीच सत्ता कुकर्म व सत्कर्म यांना त्या त्या प्रमाणें

फळ देत राहते. पुणें येथें महाभारत ह्या ग्रंथाचें प्रकाशन उद्घाटन् समयीं दि. २२ सप्टेंबर १९६६ रोजीं डॉ. राधाकृष्णन् यांनीं काढलेले उद्गार खरोखर कितीतरी चिंतनीय आहेत—

> "जगाच्या व्यवहारावर दैवी शक्तीची अधिसत्ता आहे. जगाचें नियमन व नियंत्रण करणारा दैवी न्याय सर्व घटनांच्या मुळाशीं असतो आणि कुकर्माला त्याचें प्रायश्चित जसें मिळतें, तसेंच सत्कर्मालाही त्याचें पारितोषिक मिळतें."

: १० :

# चोखोबांचें अभंग वाङ्मय

चोखोबांनीं पुष्कळ अभंग लिहिले असें म्हणण्याऐवजीं पुष्कळ अभंग त्यांच्या मुखगंगेतून स्रवले असेंच म्हणावें लागतें. साधुसंत आपलें वाङ्मय लिहिण्यासाठीं आजच्या आधुनिक कवि वा लेखकांसारखे बसत नसत. सहजगत्या त्यांच्या मुखगंगेतून अभंग किंवा ओव्यांसारख्या रूपानें वाङ्मयगंगा लोककल्याणासाठीं वाहात असे. 'सहज बोलणें हित उपदेश' असें महात्म्याचें वागणें असतें. महात्मे आपली कीर्ती व्हावी व लोकप्रतिष्ठा वाढावी म्हणून ते कांहीं ग्रंथ लिहीत नाहींत किंवा त्यांना आपल्या वाङ्मयाच्या प्रसारासाठीं कोणाच्या प्रस्तावनेची वा पुरस्काराची गरज नसते. साधु हे कारुण्यानें भरलेले असतात. जड जीवांचा उद्धार व्हावा यासाठीं त्यांची तळमळ असतें आणि अशाच तळमळींतून त्यांचें वाङ्मय सहजगत्या बाहेर पडत असतें. संत वाङ्मयावर प्रसाद असतो, कारण त्यांच्या आत्मनिष्ठेचा भाव व अनुभव त्या वाङ्मयांत प्रतिबिंबित झालेले असतात आणि म्हणूनच त्याचें वाङ्मय चिरंतर होत असतें. बातमी वाचली कीं वर्तमानपत्र संध्याकाळीं रद्दीस जातें. हल्लींच्या काळांतील ग्रंथ वाचला कीं तो परत वाचणें होत नाहीं असा बहुतेकांचा अनुभव आहे. तथापि संत वाङ्मय व धार्मिक ग्रंथ अमर होत असतात ते त्यांच्यांत असलेल्या गुणांमुळेंच. रामायण, महाभारतासारख्या ग्रंथांचें आज हजारों वर्षें लोक आवडीनें परत परत पठण करीत आहेत; तथापि त्यांची गोडी आजहि अवीट अशी आहे. आपल्या महाराष्ट्रीय

संतांच्या वाङ्मयाचा आज गेल्या ७ शें वर्षांपासून लोक अभ्यास करीतच आहेत व पुढें भविष्यकाळीं मराठी भाषा असेपर्यंत भाविक व संतप्रेमी लोक तें वाङ्मय वाचीत राहातीलच यांत शंका नाहीं.

चोखोबांचें पुष्कळ अभंग आहेत असा लोकांचा समज आहे. परंतु पुष्कळ खटपट व खटाटोप करून सुद्धां आहेत त्यापेक्षां जास्त अभंग हातीं लागत नाहींत. आज त्यांचे सुमारें ३५० अभंग निरनिराळया संत गाथ्यांत विखुरलेले आहेत व त्यांच्या कुटुंबियांच्या सुमारें १५० अभंगांवर हात ठेवितां येतो. शिवाय चोखोबांनीं 'विवेकदीप' नांवाचा एक ग्रंथहि लिहिला होता असें म्हणतात. या विवेकदीपासाठीं आम्ही आमच्या प्रयत्नांचा दीप महाराष्ट्रभर नेला; परंतु आमच्या छोट्या दीपाच्या प्रकाशांत हा कालसागरांत हरवलेला 'विवेक दीप' कोठेंच दृष्टीगोचर झाला नाहीं. तसेंच कोणी विद्वानानें वा जाणत्यानें या लुप्त झालेल्या विवेकदीपाचा पत्ता सांगितला नाहीं किंवा शोधण्याचा खराखुरा रस्ता दाखविला नाहीं. भाग्यवशात् हा ग्रंथ उपलब्ध झाला तर चोखोबांच्या जीवनावर आणखी प्रकाश पडण्याचा संभव आहे. त्यांची जी अभंग संपत्ति सांपडते ती सुद्धां फारच अपुरी अशी वाटते. संशोधकानें एकाग्र चित्तानें जर चोखोबांच्या अभंगांचा अभ्यास व चिंतन केलें तर त्याला असें आढळून येईल कीं चोखोबांचें हें सर्व प्रचलित अभंग वाङ्मय खंडित झालेलें आहे. समग्र अभंग वाचतांना अपुरेपणाची खळगी भासते व मनांत हुरहूर उत्पन्न होऊन चुकल्या चुकल्या सारखें वाटतें. मधूनच विचार येतो कीं, या थोर विठ्ठल भक्तानें एवढीच अभंग संपत्ति आमच्यासाठीं ठेवली असेल कां? त्यांच्या दीर्घायुष्यांत हजारों अभंग त्यांच्या मुखांतून निघाले असतील. उपलब्ध असलेल्या अभंगांतील कांहीं विषय पण अपुरे वाटतात. त्यांचें समग्र वाङ्‌मय आज आपणापुढें नाहीं याची रुखरुख वाटते. विद्वान् व संशोधक मंडळीनें या प्रश्नाकडे जिव्हाळ्यानें पाहिल्याशिवाय नजरेआड झालेल्या त्यांच्या पुष्कळ अभंग संपत्तीचा पत्ता लागणार नाहीं. तूर्त आपणास आहे त्याच वाङ्‌मयावर आपली तहान भागवून घ्यावयाची आहे. त्यांचे बरेच अभंग अद्याप उजेडांत यावयाचे आहेत असें वाटतें.

चोखोबांच्या अभंग वाङ्:मयाचे साधारणपणें फक्त दोनच गट पडतात. पहिल्या गटांत साचे अभंग येतात व दुसऱ्या गटांत जोहार येतात.

चोखोबाराय आपले अभंग स्वतः लिहून ठेवीत किंवा त्यांना लिहितां वाचतां येत होतें याचा कांहीं पुरावा नाहीं. परंतु त्यांच्या अभंगांचें लिखाण त्या काळचा एक विद्वान् करीत असल्याचा पुरावा आहे. त्याचें नांव अनंत भट ब्राह्मण. या अनंत भटाचें अक्षर दिसावयास मोत्यांच्या दाण्यासारखें अतिशय सुंदर होतें असें म्हणतात. कोणाचें कवित्व कोणी लिहावें याविषयीं श्रीविठ्ठल, ज्ञानदेव व नामदेवराय तसेंच त्या काळची इतर संत मंडळी यामध्यें कांहीं नियम ठरविले गेले होते असें सांगतात. त्याविषयीं खालीं दिलेल्या ओव्या वारकरी लोकांत रूढ आहेत.

— ओव्या —

ज्ञानेश्वरांची शब्दरत्नें । हें सच्चिदानंद लिहील ब्राह्मण ।
निवृत्तीचा लेखक सोपान । जो अवतार पूर्ण विधीचा ॥ १ ॥
आणीक मुक्ताबाईचे अभंग । ज्ञानदेव लिहितील निजांगें ।
जोगा परमानंद अंतरंग । त्याचे विसोबा खेचर लिहितसे ॥ २ ॥
सांवता माळी भक्त वैष्णव । त्याचा लेखक काशिबा गुरव ।
कूर्मदेवाचा काइत सुदेव । देवाधिदेवें नेम केला ॥ ३ ॥
अनंत भट ब्राह्मण । तो चोखामेळ्याचें करील लेखन ।
आणि नामया–जनीचें बोलणें । रुक्मिणीरमण लिहितसे ॥४॥
ऐसी करून दिधली वांटणी । मग ज्ञानदेवासी म्हणे चक्रपाणी ।
आतां जनीचे अभंग ऐकतां कानीं । संकोच मनीं न धरावा ॥५॥

यावरून दिसतें कीं चोखोबारायांचे अभंग लेखन अनंत भट ब्राह्मण हे करीत असत. ते स्वतः जातीनें ब्राह्मण होते. अर्थात् ते चोखोबांच्या बरोबर महारवाड्यांत राहात होते असें म्हणणें संयुक्तिक होणार नाहीं; परंतु चोखोबांच्या अभंग वाङ्मयानें त्यांच्या मनाची पकड घेतल्यामुळें चोखोबारायांकडे ज्यावेळीं ते जेथें असतील तेथें ते धांव घेत असें म्हणावें

लागतें. चोखोबांनीं आपल्या अंतापर्यंत अभंग रचना केली आहे असें त्यांच्या अभंगावरून वाटतें. परंतु साधारणपणें त्यांनीं अभंग रचनेस केव्हां सुरवात केली व त्यांच्या अभंग रचनेच्या काळाची कालमर्यादा कळण्यास कांहींच साधन नाहीं. परंतु बरीच वर्षें त्यांची अभंगरचना चालू होती हें निश्चित असें म्हणावेसें वाटतें; आणि म्हणूनच त्यांच्या अभंगांची संख्या आज उपलब्ध आहे त्यापेक्षां खातरीनें मोठी असावयास पाहिजे.

चोखोबा आपल्या अभंगांत विठ्ठलाची व्याप्ति सांगतांना म्हणतात—

श्रवणाचें श्रवण घ्राणाचें जें घ्राण । रसने गोडपण विठ्ठल माझा ॥
वाचा जेणें उठी डोळा जेणें भेटी । इंद्रियांची राहाटी विठ्ठल माझा ॥

* * *

देंही देखिली पंढरी । आत्मा अविनाश विटेवरी ॥
तो हा पांडुरंग जाणा । शांति रुक्मिणी निजांगना ॥

देवाची व्याप्ति इतक्या सुलभपणें सांगितलेली इतरत्र क्वचितच मिळेल. श्रीमत् शंकराचार्य आपल्या हस्तामलक स्तोत्र, श्लोक ७ मध्यें जवळ जवळ हेंच सांगतात—

मनश्चक्षुरादेर्वियुक्तः स्वयंयो
मनश्चक्षुरादेर्मन चक्षुरादिः ॥
मनश्चक्षुरादेरगम्य स्वरूपः
स नित्योपलब्धिस्वरूपोऽहमात्मा ॥

"जो मन, बुद्धि इत्यादि ज्ञानेंद्रियें तसेंच डोळे, कान इत्यादि कर्मेंद्रियें यांच्यापासून अगदीं वेगळा आहे, मनाला मनन करण्याचें सामर्थ्य, व नेत्रांना पाहण्याची शक्ति ज्याच्यामुळें येते म्हणजेच जो मनाचें मन आणि डोळ्याचा डोळा आहे, असें असूनही मन व डोळे ही कोणीही ज्याचें स्वरूप जाणूं शकत नाहींत तो सर्वव्यापी, सर्वसाक्षी नित्यज्ञानस्वरूप असा आत्मा मी आहे."

ज्ञानदेव व नामदेवराय यांच्या वेळेपासून पंढरीला एक निराळेंच महत्त्व प्राप्त झालें. त्यावेळच्या सर्व संतांनीं पंढरीच्या सोहळयाचें वर्णन आपापल्या

अभंगांतून केलेलें आहे. पंढरीचें स्थान महात्म्य वाढविण्यास चोखोबांनीं निःसंशयपणें हातभार लावला आहे असें त्यांचे पंढरीवरील अभंग पाहून कोणीही म्हणूं शकेल.

टाळी वाजवावी गुढी उभारावी । वाट हे चालावी पंढरीची ॥
खट नट यावें शुद्ध होऊनि जावें । दवंडी पिटी भावें चोखामेळा ॥
सुखाची सुखराशि पंढरीसी आहे । जावोनिया पाहे अरे जना ॥
अवघाचि लाभ होईल तेथीचा । न बोलवे वाचा मौनावली ॥
जाय पंढरीसी जाय पंढरीसी । पाहे विठोबासी डोळे भरी ॥
चोखा म्हणे ऐसा लाभ बांधा गांठी । जावोनियां मिठी पायीं घाला ॥
चोखा म्हणे पहातां पंढरी भूवैकुंठ । मनाचे हे कष्ट दूर गेले ॥
पंढरी पंढरी वाचे जो उच्चारी । तोचि संसारी तरे जाणा ॥

श्रीविठ्ठल भाविकांची हात उभारोनि वाट पहात उभा आहे असें ते निक्षून सांगत आहेत—

भविकाकारणें उभारोनि हात । वाट जो पहात अनुदिनी ॥

चोखोबांचे करूणापर अभंग वाचीत असतां त्यांनीं देवाविषयीं व्यक्त केलेला कळवळा पाहून अंतःकरण गहिंवरून येतें—

जनक तूं माझा जननी जगाची । करूणा आमुची कां हो नये ॥
गहिंवरूनी चोखा उभा महाद्वारीं । विनवी जोडूनी करीं विठोबासी ॥
कवणाची आस पाहू कोणीकडे । जीविचें सांकडें वारी देवा ॥
नेत्रीं अश्रुधारा उभा भीमातीरीं । लक्ष चरणावरी ठेवोनिया ॥
चोखा म्हणे माझा जीविचा विसांवा । पुकारितो धांवा म्हणोनिया ॥
मज दूर दूर हो म्हणती । तुज भेटूं कवण्यारीती ॥
तैसा मी पामर यातिहीन देवा । माझा तो कुढावा करा तुम्ही ॥

करोनिया दया । सांभाळा जी देवराया ॥
मी तो पतीत पतीत । तुमचाचि शरणांगत ॥
धरोनी विश्वास राहिलोंसे द्वारीं । नाम श्रीहरि आठवीत ॥
उच्छिष्टाची आशा भुंकतसे श्वान । तैसा दीन आहे तुमचा ॥

चोखोबांच्या भक्तिशास्त्रांतील खरें हत्याररूपी साधन म्हणजे नाम. नामाच्याच साधनानें त्यांच्या भक्तीला परिपूर्णता आली होती—

आणिक साधनें आहेत बहुतापरी । नामाची ती सरी न पवती ॥
चोखा म्हणे माझा अनुभव उघडा । भवमय पीडा येणें वारे ॥
सुलभ सोपारें विठोबाचें नाम । सकळ साधनाचें मूळ बीज ॥
नामाचें सामर्थ्य विष तें अमृत । ऐसी ही प्रचीत आहे जीवा ॥
अवघ्या साधनांचें सार । रामकृष्ण हा उच्चार ॥
सुखा कारणें करी तळमळ । जपे सर्वकाळ विठ्ठल वाचे ॥
नाम हेंचि सार नाम हेंचि सार । भवसिंधु उतार दो अक्षरी ॥
भय नाहीं चिंता कोणता प्रकार । झालोंसे निर्भय नामबळें ॥
नामाचें सामर्थ्य न कळे ब्रह्मादिकां । वेडावली देखा वेदशास्त्रें ॥
योग याग जप तप अनुष्टान । नामापुढें शीण अवघा देखे ॥
अवघा परिहार होईल दुःखाचा । छंद या नामाचा लागलिया ॥
असारा साराचे नका पडूं भरी । सार तेंचि धरी हरिनाम ॥

चोखोबारायांना संतांबद्दल अतिशय आदर असून त्यांनीं तो जागोजागीं आपल्या अभंगांतून व्यक्त केला आहे. एवढेंच नाहीं तर ते संतांना सखेसोयरे म्हणतात—

ते माझे सोयरे सज्जन सांगाती । जे आठविती विठोबासी ।
तयांचे संगतीं बहु लाभ झाला । ठेवा तो जाहला पांडुरंग ॥

प्रपंचांत अडकलेल्या व विषयांत रंगलेल्या जीवांना ते अतिशय मोलाचा उपदेश करीत आहेत—

वाढलें शरीर काळाचें हें खाजें । काय माझें तुझें म्हणतोसी ॥
असोनि नसणें संसाराचे ठाई । हाची बोध पाहीं मना घ्यावा ॥
स्वार्थ परमार्थ आपुलेचि देहीं । अनुभवोनी पाही तुझा तूंचि ॥
चालतां बोलतां न मोडे समाधि । तुटली उपाधी लिगाडाची ॥
ऊंस डोंगा परी रस नव्हे डोंगा । काय भुललासी वरलीया रंगा ॥
साधन तें एक जगासी प्रमाण । परदारा परधन वमन जैसें ॥

आपल्या सद्‌गुरुबद्दल त्यांच्या हृदयांत वसत असलेला आदर चोखोबांनीं आपल्या कांहीं अभंगांतून प्रकट केला आहे—

चोखा म्हणे तुम्ही माय हो माउली । कृपेची साउली नामदेवा ॥
माझें सुख मज दाखविलें । पावन केलें तिहीं लोकीं ॥
आजि सोनियाचा दिवस धन्य झाला । प्रत्यक्ष भेटला नामदेव ॥
चोखा म्हणे माझा धन्य गुरूराव । दाखविला देव हृदयीं माझ्या ॥
अवघे या नामयाते अवघे रंगले । अवघे चोखियानें भरोनि उरलें ॥

तसेंच चोखोबांनीं ज्ञानदेवाबद्दल काढलेले धन्योद्‌गार त्यांच्या अभंगांचे उत्कृष्ट दर्शन घडवितात. ज्ञानेश्वरांच्या ठिकाणीं त्यांची असलेली गाढ भक्ति त्यांच्या ज्ञानदेवांवरील अभंगांतील प्रत्येक शब्दांत प्रतित होते. संत, प्राणसखा, महाराज व अवतारी ज्ञानेश्वर असें संबोधून हा जातीहीन चोखा दोन्ही हात जोडून ज्ञानदेवांची प्रार्थना करतो—

निवृत्ति ज्ञानदेव सोपान भले । निर्गुण सगुण त्याही गिळियेलें ॥
सुख अनुपम संतांचे चरणीं । प्रत्यक्ष अलंका भुवनीं नांदतसे ॥
तो हा महाराज ज्ञानेश्वर माउली । जेणें निगमवल्ली प्रगट केली ॥

उघडोनी वेदार्थाचा ठेवा । केला तरणोपाय जीवा ॥
ऐसा समर्थ ज्ञानदेव । तया चरणीं ठेवा भाव ॥
कर जोडोनिया दोन्ही । चोखा जातो लोटांगणी ॥
महाविष्णुचा अवतार । प्राणसखा ज्ञानेश्वर ॥

भावभक्तीच्या परिपूर्णतेची सीमा गांठणारा हा भक्त आनंदानें बेहोष होऊन गातो—

देवा नाहीं रूप देवा नाहीं नाम । देव हा निष्काम सर्वां ठाई ॥
डोळियाचा डोळा दृष्टीच भासला । देव प्रकाशला आदि अंती ॥
आम्हां आनंद झाला आम्हां आनंद झाला । देवोचि देखिला देहामाजीं ॥
कर्मातें वाळिलें धर्मातें वाळिलें । सर्व हारपलें जेथिचें तेथें ॥

चोखोबांच्या जोहार वाङ्मयांत त्यांचे फक्त चारच जोहार उपलब्ध आहेत. जोहार हा त्या काळीं महार आदिकरून खालच्या लोकांच्या तोंडून आपल्या वरिष्ठ लोकांना करावयाचा नमस्कार, वंदन किंवा रामरामासारखा शब्द होय. त्यांत उपदेश करण्याचीहि भूमिका घेतलेली असते. साधारणपणें जोहार हे ज्ञानदेव व चोखोबाराय यांचें वेळेपासून सुरू झाले असेंच म्हणावें लागेल. चोखोबांचा 'जोहार मायबाप जोहार । तुमच्या महाराचा मी महार ॥' हा जोहार आजच्या घटकेपर्यंत महाराष्ट्रांत लोकप्रिय आहे.

जोहाराची भाषा लीनतेची असते. भक्तिमार्गाची वाटचाल करणारा मनुष्य देवावरच सर्व सोपवितो व आपण देवाचा दीनदास होऊन राहतो. तो आपल्या बुद्धीची फुशारकी मारीत नाहीं. देव सर्व कांहीं करण्यास समर्थ आहे अशी त्याची भावना असते. देवाला अहंकार आवडत नाहीं. देवापुढें जातांना दैन्यच पाहिजे. तुकोबा जागोजागीं म्हणतात–'देव सोयरा दीनाचा,' 'नीचपण बरवें देवा,' 'लहानपण देगा देवा,' 'नम्र झाला भूता' इत्यादि.

चोखोबांच्या नंतर झालेल्या महाराष्ट्रीय संतांनीं सुद्धां जोहार लिहिले. चोखोबारायाबद्दल त्यांना अत्यंत आदर होता. चोखोबा जातीनें जरी महार

होते तरी भक्तिमध्यें ते वरचढ होते. त्यांच्या जातीची उंची वाढविण्यासाठींच लीनतेची भूमिका घेऊन इतर संतांनीं चोखोबांच्या कार्यास हातभार लावला आहे असें दिसतें.

आतां चोखोबांच्या शब्दांतच पांडुरंगाजवळ प्रसाद मागण्याशिवाय कांहीं उरलेलें नाहीं—

" चोखा महार जोहार करितसे । प्रसाद देई म्हणोनी ॥ "

: ११ :

## चोखोबांचें कार्य

चोखोबांनीं भागवत धर्माच्या झेंड्याखालीं प्रथम येण्याचें फार मोठें मनोधैर्य त्या काळीं दाखविलें. भागवत धर्मांत जातपात उंच नीच असे भेदभाव नाहींत, असें तोंडानें न बोलतां त्याकाळच्या भागवत धर्माचे श्रेष्ठतर असलेले नामदेवराय, ज्ञानदेव आदि संतांनीं त्यांना जवळ करून प्रत्यक्ष कृति करून दाखविली व खालच्या थरांतील लोकांचा विश्वास त्यांनीं संपादन केला. त्या लोकांची धर्मावर निष्ठा राहाण्यासाठीं त्यांनीं आटोकाट प्रयत्न केले. तथापि कर्मठ लोक मात्र आपल्या वर्णव्यवस्थेच्या जाळ्यांत गुरफटून घेत होते व हिंदुधर्माच्या गळ्यास आंतून नख लावीत होते. तसेंच दक्षिणेंत नुकताच प्रवेश करीत असलेला यवनी अंमल बाहेरून पोखरून टाकीत होता. चोखोबांच्या एकनिष्ठतेमुळें इतर समाजांतील लोकांचा आत्मविश्वास वाढला. लोक भराभर भागवत धर्माच्या झेंड्याखालीं गोळा झाले. नामचिंतनावर सर्व संतांनीं जोर दिल्यामुळें अगदीं सुलभ अशा नामसाधनेच्या घोषानें महाराष्ट्र दुमदुमून गेला. सर्व जातींतील संतांच्या नामस्मरणाचा गडगडाट एवढा मोठा झाला कीं अखिल महाराष्ट्रांत भक्तीच्या पर्जन्याची वृष्टि झाली व त्यामुळें मुळचा सोज्वळ पण कर्मठांनीं कर्मठ केलेला वर्णाश्रमधर्म कांहीं काळ निचेष्टित होऊन पडला. चोखोबांनीं देव बाटविला असें म्हणण्यापेक्षां कर्मठांनींच आपल्या कृतीनें मुळचा शुध्द वर्णाश्रमधर्म बाटविला होता असें म्हणणेंच अधिक संयुक्तिक होय.

चोखोबांच्यामुळें इतर जातीतील संत भराभर पुढें आले. नामदेवराय व चोखोबाराय हे खांद्याला खांदा लावून प्राणपणानें लढले व कर्मठांनीं विकृत केलेल्या वर्णाश्रमाला त्यांनीं चोप्रून काढलें असें म्हणावें लागतें. नामदेवराय, ज्ञानदेव, गोरोबा, सेना महाराज, नरहरी सोनार व सांवतामाळी इत्यादि साऱ्या संतांनी उच्चवर्ण व मध्यमवर्ग आवरून धरला तर चोखोबांनीं खालचा थर अतिशय मजबूत केला. त्या सर्वांना ठाऊक होते कीं धर्मांतर होऊन परधर्मांत केल्यावर सर्वांना समानतेची वागणूक मिळते. त्यामुळें विशेषत: खालच्या थरांतील लोक कर्मठांच्या वर्णाश्रमाचें जूं जुगारून देऊन भराभर धर्मांतर करून मुसलमान होत होते. यवनीं राजसत्ता त्यांच्या पाठीशी असे. हें सर्व चोखोबांना पाहावत नव्हतें म्हणून त्यांनीं आपली सर्व शक्ति हें धर्मांतर रोखण्यांत खर्च केली. ही गोष्ट विसरून चालणार नाहीं.

सुदैवानें त्यांना नामदेवांसारखें दीर्घायुष्य लाभलें होतें. त्यामुळें श्रीपांडुरंगाचा व संतांचा सहवास त्यांना कित्येक वर्षें लाभला. भागवत धर्माचा पाया जो खालचा वर्ग तो स्थिर करण्यासाठीं त्यांनीं आपलें सबंध आयुष्य खर्ची घातलें. त्यांची भक्ति अगदी निर्मळ होती. परमेश्वर भक्तीची तीव्र तळमळ त्यांच्या अभंगवाणींत जागोजाग दिसून येते. त्यांच्या भावभक्तीचा परिणाम जसा अन्य समाजावर झाला तसा त्यांच्या सर्व कुटुंबियावर पण झाला होता. त्यांना बहुजन समाजाबद्दल अत्यंत जिव्हाळा होता. आपण ज्या वर्णांत व आश्रमांत आहोंत त्या वर्णाश्रमाला उचित अशीं सर्व कामें प्रत्येकानें करावीं असें त्यांचे सांगणें दिसतें. परंतु अंधरूढीमुळें समाजांत हिंदू धर्माचे घटक असूनहीं खालच्या लोकांवर होत असलेला अन्याय त्यांना पाहावत नव्हता. तथापि शांत चित्तानें व परमेश्वर भक्तीच्या बळावर बहुजन समाजाला जेवढें मार्गदर्शन करतां येण्यासारखें होतें तें त्यांनीं मोठ्या धैर्यानें केलें. यांतच त्यांची थोरवी सांठविलेली आहे.

त्यावेळीं पंढरपूर येथें कृष्णा महार व भीमा नांवाची त्याची बायको अशी दोघें राहात होतीं. ही दोघें निस्सिम विठ्ठलभक्त होतीं. पुढें ईश्वरी प्रसादानें त्यांना दोन मुलें झालीं. मुलाचें नांव बंका व मुलीचें नांव सोयरा. योग्य वेळीं नामदेवरायांनीं विठ्ठलाचे सांगणेवरून चोखोबाचें लग्न सोयराबाई

बरोबर व बंकाचें लग्न चोखोबांची बहीण निर्मळा हिचे बरोबर लावून दिलें. हीं चौघेजणें विठ्ठलभक्त असल्यामुळें त्यांचें सख्य वाढतच गेलें. ह्या चौघांनींही अभंग रचना केली असून त्यांनीं खालच्या थरांतील लोकांना चाऱ्हीं बाजूंनीं धर्मांतरापासून रोखून धरलें. त्या काळीं ह्या चौघांचेही खालच्या लोकांवर वजन होतें असें दिसतें. चोखोबारायांवर आलेलीं अनेक संकटें देवानें वारलीं होती, प्रत्यक्ष देव त्यांना त्यांच्या कामांत मदत करीत असे हें त्यांना ठाउक असल्यामुळें चोखोबांच्या शब्दाला त्या समाजांत अतिशय आदर असे.

हिंदूधर्म व हिंदुसमाज यांच्या नाशाचे परधर्मियांकडून आजपर्यंत जेवढे प्रयत्न झाले नसतील त्यापेक्षां कितीतरी पटीनें जास्त असे आमच्याच धर्मबांधवांकडून झालेले आहेत व होत आहेत हें विसरून जाण्यासारखें नाहीं. जगाच्या पाठीवर कुठल्याही धर्मातील लोक आमच्या धर्मबांधवांसारखे आपल्या पवित्र मानलेल्या धर्मग्रंथांवर व विभूतींवर टीका किंवा त्यांचा अनादर करतांना आढळणार नाहींत. शिवाय त्या त्या धर्मांच्या पाठीशी राजसत्ता सतत उभी असते.

आज माणसें सत्ता व पैसा यांच्या मोहांत सांपडून अंध झालेलीं आहेत. त्यांना धर्माच्या वा संतांच्या शिकवणुकीची आज गरज नाहीं. परंतु शेवटीं धर्म व संत महात्मे हेच माणसांना माणुसकीचे खरे धडे देत असतात यांत शंका नाहीं. हें सारें खरें असलें तरी हिंदुधर्माची उभारणी ज्या संस्कृतीच्या भक्कम पायावर झालेली आहे आणि जोपर्यंत त्या संस्कृतीची जोपासना चालू आहे तोपर्यंत हिंदुधर्माचा विनाश होणार नाहीं; परंतु तो नित्य गंगेच्या प्रवाहाप्रमाणें अखंड चालू राहीलच.

संताचें कार्य व त्यांचीं चरित्रें योग्यरितीनें पाहावयाची असल्यास अतिशय शुध्द अंतःकरणाची जरूरी असते. तेथें विद्वत्तेची घमेंड किंवा कर्मठपणाचा वृथा अभिमान व्यर्थ होय.

तात्पर्यार्थानें म्हणावें लागतें कीं चोखोबांचें कार्य हें अतिशय अलौकिक असेंच होतें व ईश्वरी प्रेरणेनेंच चोखोबा अवतीर्ण झाले व संत संगतींत आपलें कार्य करून ठायींच्या ठायीं ते विराम पावले.

"मोक्षरेखें आला भाग्यें विनटला । साधूंचा अंकिला हरिभक्त ॥"

: १२ :

# चोखोबांचा विटाळ घालविण्यासाठीं झालेले प्रयोग

संत नामदेवरायानंतर प्रामुख्यानें नांव घेण्यासारखे कोणी संत महाराष्ट्रांत सुमारें दोनशें वर्षांत झाले नाहींत. कर्मठपणाचा पडलेला मुडदा परत उठून बसत होता व आपलें कर्मठपणाचें जुनें व कडवे कार्य पूर्ववत चालू करण्याच्या खटपटींत होता. परंतु भागवत धर्माच्या पुण्याईनें शके १४५० मध्यें संत एकनाथ महाराज यांचा जन्म पैठणांत झाला. त्याकाळीं पैठण ही नगरी दक्षिणेकडील काशी समजत व तो कर्मठांचा बालेकिल्ला होता. त्यावेळीं मुसलमानी सत्ता जोरांत होती आणि या राक्षसी सत्तेला आमचे कर्मठ आंतून भरपूर सहाय्य करीत होते. व्यक्तिशः फायद्यासाठीं यवनांची थुंकी झेलण्यास वरचा वर्ग मग्न झाला होता. थेट ब्राह्मणाच्या देवघरापर्यन्त पीरानें व दावल-मलकानें प्रवेश करून घेतला होता. स्वतः नाथ महाराज म्हणतात :—

थोर या युगाचे आश्चर्य । ब्रह्मकर्म उत्तम सार ॥
सांडूनिया द्वीजवर । दावल पीर स्मरताती ॥
दावल मलीकाची पूजिती गदा । वर्षांतून फकीर होती एकदां ॥
मग डोला होता थंडा । खाती मलीदा हिंदु तुर्कांचे की मायबाप ॥

नाथरायांनीं हें सर्व ओळखिलें. त्या प्रसंगाला अनुसरून त्यांनीं आपली अभंगवाणी व इतर वाङ्मय निर्माण केलें. कर्मठांचा छळ सोसून सुद्धां त्यांनीं भागवत ग्रंथ प्राकृत भाषेंत आणला. कर्मठपणा मोडण्यासाठीं त्यांनीं भगिरथ प्रयत्न केले. पैठणमध्यें त्याकाळीं अस्पृश्यांची सावलीसुद्धां कर्मठांना असह्य होती; परंतु त्यांनीं आपल्या वाणीनें व कृतीनें मोठ्या धैर्यानें कर्मठपणा मोडून काढण्याचा फार मोठा प्रयोग केला. अखिल हिंदूंची एक प्रबळ संघटना असावी व उच्च नीच भेद टाकावे अशी त्यांची शिकवणूक होती. परंतु कर्मठाना तें आवडलें नाहीं व ते नाथांना शेवटपर्यंत विरोधच करीत

राहिले. तथापि नाथांनीं आपले प्रयत्न न सोडतां ते अधिक जोरानें सुरू केले. आपसांतील तेढी, उंचनीच असा भेदभाव व अस्पृश्यता हिंदूंचा नाश करील हें ते ओळखून होते. भूतमात्राच्या ठिकाणीं ईश्वराचें अस्तित्व पाहणें ही गोष्ट त्यांनीं आपल्या अंतापर्यंत केली.

याच शिकवणुकीनें कडक उन्हांत व तप्त वाळवंटांत असहायपणें रडत असलेलें महारांचें मूल महारवाड्यांत नेऊन पोचविणें, पाण्यासाठीं तडफडणाऱ्या गाढवाच्या तोंडांत गंगाजळ घालणें, राणू महाराकडे जाऊन त्याच्या घरीं जेवणें, श्राध्दाच्या दिवशीं आलेल्या महारांना ब्राह्मणांच्या अगोदर जेवूं घालणें अशा सारखीं कृत्यें त्यांनीं मोठ्या धैर्यानें कडव्या कर्मठपणाच्या प्रतिकाराला न जुमानतां केली. चोखोबारायांचे अभंगरूपी हृद्गत व इतर अस्पृश्य समाजाचें मूक रूदन त्यांच्या नजरेसमोर होतें असें म्हणावयास प्रत्ययवाय नाहीं.

श्री. माधव गडकरी यांनीं अगदीं मोजक्या शब्दांत नाथांचें दर्शन व कार्य याचें वर्णन केलें आहे. ते म्हणतात—

> “ इंद्रायणी व गोदावरी महाराष्ट्राच्या पावित्र्याच्या या दोन वहात्या गाथा. त्यांची ओजस्विता घेऊन एकनाथाचा भागवत व तुकारामाची गाथा जन्माला आली. अगदीं विपत्कालीं एकानें भागवत धर्माची पताका समतेचा मंत्र जपून फडकवीत ठेवली तर दुसऱ्यानें असा भक्तीचा मळा फुलविला कीं त्यामुळें त्या दोन्ही नदींच्या तीरावर उज्वल संस्कृतीची एक परंपरा निर्माण झाली. ‘ ज्ञानदेवें रचिला पाया ’ हें खरें. परंतु धर्मच्छलाच्या चिखलांतून ती शोधून काढून त्यावर पहिली वीट लावली ती एकनाथांनीं. ज्ञानेश्वरीचे संशोधक व भाष्यकार म्हणून त्यांचें ऋण सर्वांत मोठें. नेटक्या संसारांत भक्ति आणि तत्वज्ञान यांचा सुंदर संगम साधला तो एकनाथांनीं........ परंतु या सर्वांपेक्षांहि मोलाचा वाटतो तो समोरचा रांजण. एक साधा हौद. परंतु नाथांच्या जीवनाचें प्रतीक बनून तो तेथें राहिला. गाढवाला गंगाजळ पाजण्याची प्रेरणा नाथांना दिली ती या रांजणानें. महाराच्या पोराला त्या काळांत कडेवर घेण्याचा जिव्हाळा दिला तो या पाणपोईनें. समतेचा दिवा स्वकृतीनें प्रज्वलीत करणारा हा संत. पिंगळेच्या माडीवर जाऊन तिच्या शुद्ध भक्तीचा स्वीकार करणारा हा धैर्यशील. महारांच्या पंगतीला जाऊन बसणारा

व बहुजन समाजासाठीं त्यांच्याच रांगड्या रोखठोक भाषेंत लिहिणारा पहिला लोकवाङ्मयकार......"

तसेंच प्रा. न. र. फाटक यांनीं आकाशवाणीवरून केलेल्या भाषणांत नाथांचें एका वाक्यांत उभें केलेलें चित्र पहा. ते म्हणतात—

"म्हणूनच तात्पर्यार्थानें असें पटणारें आहे कीं, ज्याच्या व्यवहारांत हिंदुसमाजांतील अंत्यज म्हणजे महार आणि जनावरांतील अंत्यज म्हणजे गाढव यांच्या विषयीं समानदृष्टि आढळते, असा एकच संत आपल्या देशांत होऊन गेला. तो म्हणजे एकनाथ."

नाथ महाराजांच्या प्रयाणानंतर चोखोबांच्या या विटाळावर एवढ्या मोठ्या प्रमाणांत दुसरा मोठा प्रयोग कित्येक वर्षें झाला नाहीं. १९ व्या शतकाच्या मध्यंतरी महात्मा ज्योतीबा फुले या समाज सुधारकानें अस्पृश्यता निवारण करण्यासाठीं आपल्यापरी पुष्कळ चळवळ केली ती बहुश्रुत आहेच. तसेंच महात्मा गांधीनीं या कार्यास देशव्यापी स्वरूप देऊन दलितांचीं दुःखें हलकीं करण्यासाठीं आटोकाट प्रयत्न केले हें सर्वांस ठाऊकच आहे.

विसाव्या शतकाच्या सुरवातीस संत गाडगे महाराजांच्या कार्यास सुरवात झाली. ते परीट समाजांतील असून दुसऱ्याचे मलीन कपडे स्वच्छ करून देण्याच्या कार्याबरोबर आपलीं मलीन झालेली मनें साफ व स्वच्छ करून ईश्वर भक्तीकडे कशी वळवावी याची थोर शिकवणूक या संतानें महाराष्ट्रास दिली. स्वतः संन्यासी वृत्तीनें राहून लाखो रुपये जमविले व परोपकारार्थ खर्च केले. अस्पृश्यतेचा प्रश्न त्यांनीं जिव्हाळ्यानें हाताळला. श्री चोखोबारायांबद्दल त्यांना अत्यंत आदर होता. चोखोबांच्या भक्तिभावाबद्दल ते किर्तनांतून नेहमीं सांगत. त्यांनीं पंढरपूर येथें इ. स. १९१७ मध्यें श्री संत चोखोबारायांच्या स्मरणार्थ अस्पृश्यांसाठीं एक धर्मशाळा बांधली. तिला सुमारें एक लाखावर खर्च केला असें म्हणतात.

गेल्या शंभर दिडशें वर्षांत राजकीय पुढारी, आगरकरांसारखे समाजसेवक व इतर यांनीं आपापल्यापरी विटाळ दूर करण्यासाठीं प्रयत्न केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महार समाजांतच जन्मास आले. त्यांनीं आपल्या समाजाच्या

उद्धारासाठीं अहोरात्र कष्ट केले. परंतु चोखोबांचा विटाळ दूर झाला नव्हता. श्री पांडुरंगरायाची द्वारें अस्पृश्यांसाठीं अद्याप बंद होतीं. नाथाचें कार्य अपूर्ण राहिलें होतें. त्यांना महाराष्ट्रांत परत जन्म घ्यावा लागला.

एके दिवशीं श्याम आणि त्याचा धाकटा भाऊ अंगणांत खेळत होते. इतक्यांत उंचचउंच बेहेड्याच्या झाडावरून पाखराचें एक लहानसें पिलूं खालीं पडलें. त्याला अजून नीट पंख फुटले नव्हते. उंचावरून खालीं पडण्यानें त्याची दुर्दशा झाली होती. ‘ दुखवे आणिकांच्या दुःखें ’ अशा छोट्या श्यामला अतिशय वाईट वाटलें. त्यानें बालबुद्धीनुसार त्या पिल्लाला अपार प्रेम दिलें. परंतु ते पिलूं शेवटीं मेलें. त्यानें आपल्या आईच्या फाटक्या जरीच्या चोळीच्या तुकड्यांत त्या पाखराच्या पिल्लाचा मृत देह गुंडाळून खळगींत फुलांच्या शेजेवर झोपविला. परंतु खळगीवर डोळे मिटून माती ओढणारा श्याम त्या मृत पिलासाठीं अजूनही रडत होता.

“ तुम्ही त्याला प्रेम दिलेत, चांगलें केलेत; देवही तुमच्यावर प्रेम करील. श्याम, तुम्ही या पांखरावर प्रेम केलेत तसेंच पुढें एकमेकांवर करा. ” आपल्या आईचे गहिंवरून आलेले बोल श्याम हृदयांत सांठवीत होता.

तो सोज्वळ व पापभिरू श्याम आतां मोठा झाला होता. लोक त्यांना आतां साने गुरुजी म्हणून ओळखत होते. जगांतील स्वार्थी व दांभिक लोक पाहून त्यांच्या नेत्रांत अश्रु जमत. जेथें जावें तेथें हेंच त्यांना आढळे. हें जग पुण्यमय व मंगल कसें होईल याची विवंचना त्यांना त्रास देत होती. बंधुभावानें लोक कसे वागतील या विचारांत ते नेहमीं गढून जात. मी एकटा....अगदीं एकटा....काय करूं शकेन ? तुडुंब भरलेल्या विस्तीर्ण तलावाच्या बांधाला पडलेलीं अनेक छिद्रें ते पाहात होते. पाणी भराभर झिरपून जातांना ते पाहात होते. कोणती छिद्रें अगोदर बंद करावीं अशी रात्रंदिवस त्यांना काळजी वाटत होती. महाराष्ट्रभर ते फिरले; परंतु त्यांना कोठेंच मनःस्वास्थ्य मिळालें नाहीं. अस्पृश्यतेचा कलंक त्यांना दिसत होता. पंढरपुरांत येणारे व मंदिराच्या कळसाचें दुरून दर्शन घेऊन आपली धार्मिक तहान भागविणारे असंख्य अस्पृश्य त्यांच्या नजरेसमोर होते.

उच्चवर्णीय हिंदूंनीं त्यांची अवहेलना करूनही ते मोठ्या भक्तिभावानें दरवर्षी पंढरपुरच्या समताभूमीवर....संतांच्या पावन भूमीवर....येऊन गडबडा लोळून आपला भक्तिभाव व्यक्त करीत होते. परंतु त्यांना श्री पांडुरंगरायांचें द्वार अद्याप उघडें झालें नव्हतें व पुढें केव्हांतरी होईल याची खात्री नव्हती. विठ्ठल मंदिराची द्वारें या लोकांना कायमचीच बंद झाली होती. अस्पृश्य लोकांच्या प्रवेश बंदीची कठीण परंपरा मोडण्याची हिंमत वा धाडस आतांपर्यंत कोणींच केलें नव्हतें. हें सारें साने गुरुजींच्या डोळ्यांसमोर होतें.

अशा परिस्थितींत इ. स. १९४७ चें साल उजाडलें. एप्रिल व मे हे महिने फार गरमीचे असतात. संत साने गुरुजी एप्रिल अखेर पंढरपूरच्या मार्गाला लागले. दि. १ मे १९४७ रोजीं चंद्रभागेंत स्नान करून पंढरीनाथाला मोठ्या भक्तिभावानें हात जोडले व सर्व अस्पृश्य समाजास श्री पांडुरंगाची द्वारें मोकळी व्हावींत म्हणून या थोर महात्म्यानें आमरण उपवास सुरू केला. हा उपवास पंढरपुरांतील संत तनपुरे महाराजाच्या मठांत सुरू झाला. त्यांना या निश्चयापासून मागें फिरविण्यासाठीं थोरामोठ्यांकडून आटोकाट प्रयत्न झाले. तथापि ते आपल्या निश्चयापासून जरासुद्धां ढळले नाहींत. अस्पृश्यांचें धार्मिक दुःख त्यांच्या नजरेसमोर होतें. सातशें वर्षांपुर्वी चोखोबांनीं देवापूढें मांडलेलें गाऱ्हाणें ते नजरेआड करूं शकत नव्हते. साऱ्या अस्पृश्यांची दुःखें गोमातेच्या रुपानें त्यांच्या पुढें येऊन आपली करुण कहाणी सांगत होतीं. त्यांना ते डावलूं शकत नव्हते. आपल्या हृदयस्थ पांडुरंगाला साक्षी ठेवून ते पंढरींतील विटेवरील पांडुरंगास जागे करूं लागले. तो पांडुरंग अस्पृश्यांसाठीं झोपला होता. त्याला जागे करणें कठीण होतें. परंतु महाराष्ट्रांतील जनता-जनार्दनरुपी पांडुरंगानें साने गुरुजींच्या आवाजास साथ दिली. पांडुरंगरायाला आस्ते आस्ते जाग येऊं लागली व कुलुपांतील विठ्ठल अस्पृश्यासाठीं मोकळा झाला. पूज्य साने गुरुजींच्या या थोर कामगिरीमुळें चोखोबांनीं आरंभिलेल्या कार्याची परिपूर्णता झाली.

या स्वार्थी जगांत आपलें आतां कांहींच कार्य बाकी उरलें नाहीं, म्हणून या आधुनिक थोर संतानें दि. ११ जून १९५० रोजी आत्मार्पण केलें.

मनांत गलबलून येतें व भारावलेल्या अंतःकरणांत विचार डोकावतो —“ गुरुजी, आपण परत केव्हां हो येणार ? ”

पुढें भारत सरकारनें अस्पृश्यतेविरूध्द इ. स. १९५५ मध्यें कायदा करून अखिल भारतांतील अस्पृश्यतेचें उच्चाटण केलें. अशा तऱ्हेनें हिंदूंच्या ह्या अस्पृश्यतेच्या कलंकावर कायमचें शिक्कामोर्तब केलें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम .................... वि: ....................
.................... नों० दि० ....................

## : १३ :

# संत, संतचरित्रें व त्यांचें कार्य

संत चरित्रें म्हणजे संतांचा जीवन वृत्तान्त. संतांची चरित्रें आपणास मार्गदर्शक होतात. वाट चुकलेल्या लोकांस ते योग्य वाटेवर आणून सोडतात. दुष्टांचा दुष्टपणा घालवून त्याला सन्मार्गाला लावतात. आजकाल संत कोणास म्हणावें हा प्रश्न मोठा विचार करण्यासारखा झाला आहे. साधु, संत, महात्मा, सत्पुरुष व ज्ञानी इत्यादि शब्द मराठी भाषेंत रूढ आहेत. सन्मार्गी माणसास साधारणपणें संत, ज्ञानी किंवा सत्पुरुष असें म्हणतात. संतांबद्दलच्या सामान्य माणसांच्या कल्पना फार विपरीत असतात. त्यांना वाटतें संत किंवा ज्ञानी माणसें म्हणजे कांहींतरी निराळी जात असते. संत दिसावयास सुद्धां सामान्य माणसासारखे नसावे. त्यांनीं रोगी माणसांचे रोग नष्ट करावे, संतती संपत्ति द्यावी. अशा तऱ्हेच्या भावनेनें किंवा इच्छेनें ते त्यांच्याकडे हेलपाटे घालतात. आपलें इष्ट साध्य झालें नाहीं की संतांना दोष देतात. आपण असले प्रकार पदोपदीं पाहात असतोंच.

याबाबतींत ह. भ. प. रा. कृ. कामत यांनीं आपल्या ‘ नामचिंतामणी ’ या ग्रंथांत संतांविषयीचीं सामान्य लोकांचीं मतें फार मार्मिकपणें मांडली जाहेत. ते म्हणतात :—

“सर्वसाधारण लोकांच्या मतें—ज्ञानी म्हटला म्हणजे त्याला सर्व कांहीं सारखें दिसलें पाहिजे, त्याला आपपर भाव नसावा. त्याला काम क्रोध असूं नयेत,

त्याला आंबट तिखट समजतां नये, कोणी दगड मारले तरी मारून घ्यावे, खायला गवत घातलें तर खाऊन सोडावें, तसेंच त्यानें लोकांचे रोग बरे करावे, मेलेली प्रेतें उठवावी, इत्यादि.

पाण्यामध्यें मासा झोप घेतो कैसा ।
जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे ॥

या वचनाप्रमाणें ज्ञान्याचीं स्थिति अथवा ज्ञान्याची लक्षणें ज्ञान्यासच ठाऊक असतात. 'अंतर्निष्ठाच्या खुणा, अंतर्निष्ठ जाणती' असे समर्थ म्हणतात. अज्ञान्यानें ज्ञान्याच्या ज्ञानाची किंवा योग्यतेची परीक्षा करणें अथवा त्याविषयीं आपलें मत बोलून दाखविणें म्हणजे विनयत्तेतील मुलानें बी. ए. मास्तरच्या विद्वतेची परीक्षा करणें, किंवा त्यांच्याविषयीं आपलें मत बोलून दाखविणें होय. अथवा या बद्दल ग्राम्य दृष्टांत द्यावयाचा झाल्यास असें म्हणतां येईल कीं, एखाद्या तृतीय प्रकृति मनुष्यानें एखाद्या पद्मिनी स्त्रीची परीक्षा करणें होय.

ज्ञानी अथवा मुक्त बाहेरच्या लक्षणांनीं जाणतां येत नाहीं. तसें करूं गेल्यास, अमुक्ताला मुक्त व मुक्ताला अमुक्त म्हणणेचा प्रमाद घडणेचा संभव असतो. एखादें-दुसरें लक्षण अवचित दिसून आलें तर तेवढ्यावरून त्यास मुक्त कोण म्हणणार ? प्रत्यक्ष श्रीकृष्णासारखा पूर्णावतारी पुरुष, कीं ज्यानें लहानपणींच पूतनावध, गोवर्धनोद्धार, दावाग्निप्राशन, कालियामर्दन इत्यादि अचाट कृत्यें केली, त्याचें देखील मुक्तपण मानायला जग कबूल नाहीं. तेथें इतर गरीब साधूंची काय कथा ? लोकांचे विकल्प मोठे गहन असतात. भगवान् उद्धवास मुक्तांची लक्षणें सांगतांना म्हणतात —

म्यां सांगितली जीं जीं लक्षणें । तीं तीं मुक्ताचीं मुक्तच जाणे ।
आणिकासी व्युत्पत्तिपणें । मुक्त जाणणें हें न घडे ॥........
प्रारब्ध वशास्तव जाण । एखादें अवचटें दिसे चिन्ह ।
इतुक्यासाठीं मुक्तपण । मानी कोण जगामाजी ॥
शुक-वामदेव मुक्त म्हणतां । सर्वांसी न म्हणवे सर्वथा ।
मा इतरांची काय कथा । माझीहि मुक्तता न मानिती ॥
म्यां गोवर्धनु उचलिला । दावाग्नि प्राशिला ।
अघ बघ विदारिला । प्रत्यक्ष नाशिला काळिया ॥

जों जों ह्या देहाडा। तों तों नीच नवा पवाडा।
निजसुखाचा उघडा। केला रोकडा सुकाळ ॥
त्या माझें मुक्तपण। न मानिती याज्ञिक ब्राह्मण।
इतरांची कथा कोण। विकल्प दारुण लौकिकी ॥

—एकनाथी भागवत अ० ११"

खरें पाहूं गेलें असतां प्रपंची माणसें प्रपंचांतील आपत्तीला अगदीं वैतागून गेलेलीं असतात. तुकोबा त्यांची परिस्थिती वर्णन करतात –

'संसार तापें तापलों मी देवा। करितां या सेवा कुटुंबाची ॥"

मनुष्य संसारांत तप्त झाला कीं तो कोठें तरी विश्रांतीसाठीं आसरा शोधीत असतो. खोट्या आशेनें तो दारोदार फिरतो.जाऊं नये त्याच्या दारावरपण तो खेटें घालतो. त्याचें मन संसारांतील विषय प्राप्तीसाठीं सारखें तळमळत असतें. त्याच्या आशा आकांक्षा नेहमींच पूर्ण होतात असें नाहीं. सर्वांच्याच त्यांच्या मनासारख्या गोष्टी त्यांच्या जीवनांत होतील असें नाहीं. असलीं माणसें साधु संतांची परिक्षा घेण्यास जातात. कधीं कधीं लफंग्या साधूंच्या जाळ्यांतही अडकतात. खऱ्या संतांची भेट होणें हें ज्याच्या त्याच्या प्रारब्धावर अवलंबून असतें.

साधारणपणें समाजांतील सुशिक्षित वर्ग व ज्याला संसारांत दुःखाचे फारसे चटके बसलेले नाहींत अशाचा एक वर्ग असतो. त्यांचा साधुसंतांकडे पाहाण्याचा दृष्टीकोन अगदीं वेगळाच असतो. ते नेहमीं संतांना दोष देतील. त्यांचें म्हणणें असें कीं संतांनीं लोकांना भजन मार्गास लावून निरूद्योगी व आळशी केलें व त्यामुळें देशाचें वाटोळें झालें.

सारांश लोकाचे विकल्प फार गहन असतात.

आपणास त्या विकल्पासी वाद घालण्याचें कारण नाहीं. आपणास सन्मार्गास लावणाऱ्या संतांच्या चरित्रांचा व शिकवणुकीचा अभ्यास करणें असल्यामुळें इतर वादांत शिरण्याचें प्रयोजन नाहीं.

आपले धर्मग्रंथ नेहमीं सांगतात कीं जेव्हां जेव्हां जगांत अनीति माजते, दुष्ट लोक शिरजोर होतात व सज्जनांचा छळ होतो त्यावेळीं देव अवतार घेतो किंवा संतरूपानें प्रकट होतो. जेव्हां संत येतात व समाजांत वावरूं लागतात तेव्हां अनितीचा मळ ते धुवून काढण्याचा प्रयत्न करतात. प्राणीमात्रास सुख व आनंद कसा प्राप्त करून घेतां येईल तो मार्ग ते सांगतात. फार काय पण ते स्वतःच्या आचरणानें समाजाला नीतिमत्तेचे धडे घालून देतात. संत बोलतात तसेच वागतात. म्हणून त्यांचें आचरण सर्वांना मार्गदर्शक ठरतें. ज्ञानदेव म्हणतात—

एथ वडिल जें जें करिती । तया नांव धर्मु ठेविती ।
येर तेंचि अनुष्टिती । सामान्य सकळ ॥

या वचनाप्रमाणें संत जें जें कांहीं करतात ते धर्माला अनुसरूनच करतात आणि त्यांच्या त्या आचरणालाच लोक धर्म म्हणून मानतात. साधारणपणें संत आपणास काय देतात असा सामान्य मनुष्याचा साहाजिकच प्रश्न असतो. त्याचें उत्तर एकच कीं संत आपणास काय देत नाहीत ? ते सर्व कांहीं देतात. जनावरासारख्या वागणाऱ्या माणसास ते खऱ्या माणसांत आणून सोडतात. ह. भ. प. पांगारकर यांनीं आपल्या नारदभक्तिसूत्रांत भक्तीची साधनें या प्रकरणांत संत आपणास काय देतात त्याचें मार्मिक विवेचन केलें आहे. ते म्हणतात—

"संत बुद्धीचे डोळे उघडतात, आपलें नीजरूप पाहण्यास शिकवितात, त्यांच्या संगतींत विषय वासना मावळतात, हरिप्रेमानें ते अंतर्बाह्य रंगलेले असल्यामुळें त्यांच्या संगतींत प्रेमसुख भोगण्याची पात्रता न बोलतांही ते भाविकांच्या अंगीं आणतात व पात्रता सिद्ध झाली कीं पूर्ण कृपा करतात. सत्संग, संतसेवा, व संतकृपा हे श्रीहरि मंदिरांत शिरण्याचे तीन चौक आहेत व ह्या अनुक्रमानें गेल्यानें श्रीहरीची जोड होते. संत हे परलोकीचे सखे आहेत. हे मोठे उदार आहेत. हे बळेंच नामामृत पाजतात. नाथरायांनीं म्हटल्याप्रमाणें "पूर्वपुण्य असतां गांठीं । संतभेटी तै होय ॥" आणि संतांची भेट झाल्यावर "संत भेटीचा आनंदु । सुखसागर परमानंदु ॥" प्राप्त होतो. विषयांच्या महानिद्रेंतून संत जीवांना जागवितात. "काय संतांचे मानूं

उपकार। मज निरंतर जागविती ॥" असा सत्संगानें कृतार्थ झालेल्या तुकोबांनीं प्रेमोद्गार काढला आहे. संतसंगाची सफलता म्हणजेच सद्गुरूकृपा. आरंभी संतसंग व शेवटीं गुरुकृपा. संत, सद्गुरु व देव हे वस्तुतः अभिन्न आहेत."

भक्तिमार्गांत देह हें पहिलें महत्त्वाचें साधन आहे. परंतु माणूस ह्या देहाचा भक्तिमार्गांत साधन म्हणून कितपत उपयोग करून घेत असतो हा खरोखर विचार करण्यासारखा प्रश्न आहे. देहाचा नटवेपणा करण्यांतच माणसाचें आयुष्य संपून जातें. आचार्य विनोबाजी आपल्या गीता प्रवचनांत हीच गोष्ट मोठ्या निकरानें सांगतात—

"पण देहाला साधन म्हणून न वापरतां आम्ही त्या देहांत बुडून आत्म-संकोच करून घेतों. त्यामुळें मूळचा क्षुद्र असलेला देह अधिकच क्षुद्र बनतो. म्हणून संत निकरानें सांगतात. 'देह आणि देहसंबंधें निंदावी। इतरें वंदावी श्वान सूकरें ॥' अरे, देहाची आणि देहाशीं ज्यांचा संबंध आला त्याचीच नको तिन्ही त्रिकाळ पूजा करूं. इतरांना ओळखायला शीक. संत आम्हाला अशा रीतीनें व्यापक व्हावयास सांगत आहेत."

इतकें असून सुद्धां सामान्य माणसें देहविषयक सुख मिळविण्यासाठीं अहोरात्र तळमळत असतात. तुलसीदास महाराज यांनीं आपल्या रामचरित-मानसमध्यें मानवी शरिराची योग्यता वर्णन केली आहे. आपल्या मानवी शरिराचा योग्य उपयोग करून न घेणाऱ्या लोकांना ते दूषण देतात. ते म्हणतात—

नर तन सम नहिं कवनिउ देही। जीव चराचर जाचत तेही ॥
नरक स्वर्ग अपबर्ग निसेंनी। ग्यान बिराग भगति सुभ देनी ॥

अर्थ :—मानवी शरिरासारखें दुसरें कोणतेंही शरीर नाहीं. चर अचर सारे जीव मानवी शरीर प्राप्त व्हावें म्हणून खटाटोप करतात. हें मानवी शरीर स्वर्ग, नरक व मोक्ष यांच्याकडे जाणारी शिढी आहे; त्याचप्रमाणें कल्याणप्रद ज्ञान, वैराग्य व भक्ति ह्याहि गोष्टीं देणारें आहे.

सो तनु धरि हरि भजहिं न जे नर। होहिं विषय रत मंद मंद तर ॥
काँच किरिच बदलें ते लेहीं। कर ते डारि परस मनि देही ॥

अर्थ :—अशा तऱ्हेचा मानवी देह प्राप्त होऊन सुद्धां जे लोक श्रीहरीचें भजन करीत नाहींत आणि अगदीं क्षुल्लक विषयांत गुंग होतात ते हातांतील परिस फेकून देऊन त्याच्या बदली ते कांचेचे तुकडे घेत असतात.

—उत्तरकांड.

आज ना उद्यां हा मानवी देह पडणार हें मनुष्यांना ठाऊक असून सुद्धां मृत्यूचा विसर पाडून घेण्याचा प्रयत्न करीत असतात. आपला देह जीर्ण होऊं नये म्हणून शक्य आहेत त्या सर्व गोष्टी ते करीत असतात. तथापि निसर्गाच्या नियमापुढें त्यांना आपली मान वाकवावी लागते व केवळ नाइलाज म्हणून देह सोडून जातात. मरण चुकविण्यासाठीं ते आटोकाट प्रयत्न करतात; पण मृत्यू अटळ असल्यामुळें तो चुकत नाहीं. फक्त आज किंवा उद्यां एवढाच फरक. देहपातानंतर आयुष्यभर ज्याचें चिंतन केलें ते विषय व त्या विषयवासना, वासना देहानें त्यांचा पिच्छा जन्मोजन्मीं करीत असतात. तसेंच देह म्हणजे मी अशी भ्रामक कल्पना माणसें करून घेत असल्यामुळें शरिराच्या व मनाच्या सुखदुःखानें ती सुखदुःख मानून घेतात व मी म्हणजे देह नाहीं ह्या आत्मभावास ते मुकतात. परंतु संत महात्मे व त्यांची चरित्रें हा हरवलेला आत्मभाव त्यांना मिळवून देतात. या बाबतींत सुबोध ज्ञानेश्वरींत मांडलेले विचार उद्बोधक आहेत—

> " त्याप्रमाणें आपला हरवलेला आत्मभाव आपल्याला प्राप्त व्हावा, दिसूं लागावा अशी ज्यांची इच्छा असेल त्यांनीं अशा मुक्त पुरुषांच्या–संताच्या–चरित्ररुपी आरशांत आपलें प्रतिबिंब पाहावें म्हणजे देह म्हणजेच मी आहे असें आपल्याला खोटें दिसणारें प्रतिबिंब पाण्यांत विरघळणाऱ्या मिठाप्रमाणें संतचरित्ररुपी क्षीरसागरांत नाहीसें होतें आणि आपला आत्मभाव आपल्याला शोधीत येतो. "

' प्रसाद,' दिवाळी अंक १९६३
सुबोध ज्ञानेश्वरी–य. गो. जोशी.

आपला हरवलेला आत्मभाव आपणास शोधित कसा येतो हें आपण पाहिलें. तसेंच प्रा. के. वी. बेलसरे यांनीं भावार्थ–भागवत ( भाग २ )

मध्यें ‘संतांना वंदन’ प्रकरणांच्या गोषवाऱ्यांत संत, देव, देह व श्रद्धा यांचा केलेला मधुर संगम अतिशय मार्मिक आहे. ते लिहितात.

“संत म्हणजे या पृथ्वीवरील चालता बोलता देव. मानवी देहांत राहून अनुभवाची सीमा गांठणारी व्यक्ति म्हणजे संत होय. संतापाशीं देवपण आणि माणूसपण या दोहोंचा मोठा मनोहर संगम सांपडतो. ईश्वराचें प्रीतिपात्र असलेला संत दयेनें भरलेला असल्यानें सामान्य माणसांना जवळ करतो व त्यांना अनुभवाच्या उच्च पातळीवर नेतो. त्यासाठीं त्यांच्यांवर शुद्ध व स्थिर विश्वास ठेवणें एवढीच अट आहे. वास्तविक प्रत्येक माणूस कोठें ना कोठें तरी श्रद्धा ठेवतोच. पण ती संतांच्या ठिकाणीं बसणें कठीण जाते. एखाद्याच्या भाग्यानें अशी श्रद्धा संतचरणीं बसली कीं त्यांचें काम झालें म्हणून समजावें. संताचें बाह्यांग साध्या माणसासारखेंच असल्यानें त्याला ओळखणें कठीण जातें. पण निरपेक्षपणें त्याचा सहवास केला तर त्याचें अंतरंग आपोआप आकलन होतें आणि मग त्याच्यावर प्रेम जडून आपल्या अंगीं देखील शारदा प्रगट होते. संत आणि सद्‌गुरु एकच समजावे.”

—‘प्रसाद,’ दिवाळी अंक १९६५

तसेंच श्रीमद्‌भागवतांत संतांचें आणि जेथें जेथें संत वास करीत असतात अशा स्थळांचें महात्म्य वर्णन केलें आहे.

सतो दिशंति चक्षूंषि बहिरर्कः समुत्थितः ।
देवता बांधवा संतः संत आत्माऽहमेव च ॥ ११-२६-३४

संत डोळे देतात. अंतर्बाह्य प्रकाश पाडणारे हेच होत. संतचदेव, संत बांधव, संतच आत्मा; किंबहुना संतच परमेश्वर होत.

देशान्पुण्यानाश्रयेत मद्‌भक्तैः साधुभिः श्रितान्‌ ।
देवासुर मनुष्येषुमद्‌भक्ता चरितानि च ॥ ११-२९-१०

माझे साधुशील भक्त जेथें वास करितात अशा पवित्र देशाचा म्ह. क्षेत्र तीर्थादिकांचा आश्रय करावा. देव, दानव व मानव यांच्यांत जे माझे भक्त झाले असतील किंवा विद्यमान असतील त्यांच्या चरित्रक्रमाचा आश्रय करावा म्हणजे त्यांचीं चरित्रें वर्णावीत किंवा त्यांच्या कित्त्याप्रमाणें वागावें.

गोकुळ, अयोध्या, मथुरा, वृंदावन, काशी, रामेश्वर, द्वारका, जगन्नाथ, पंढरपूर, पंचवटी, बदरिकाश्रम, हरिद्वार, प्रयाग, गंगागोदाभीमा इ. पवित्र नद्यांचे तीर, आळंदी, पैठण, देहू इ. संत क्षेत्रें हे सर्व देश पावन होत.

—भक्तिमणिमालावरून.

तसेंच संतवचनें व संतसंगती यांची थोरवी सांगतांना ह. भ. प. भा. पं. बहिरट यांनीं 'अवतारांचा कळस' ह्या आपल्या प्रबंधांत मांडलेले विचार उद्‌बोधक आहेत. ते म्हणतात—

"संत वचनांची श्रीमंती मात्र साऱ्यांना सुलभ आहे. त्या संपत्तीच्या ऐटीमध्यें जीवनाचे श्वास वहावेत. त्या धनाच्या उन्मादांत पावलें पडावींत. अन्य कशाचा अभिमान वा थोरवी व्यर्थ आहे. ती केव्हां तरी खालीवर होईलच. सत्संगतीची थोरवी सदां वर मान करुनच ठेवील. सत्संगती कशी मिळेल, संत कुठें शोधावेत या करितां कोणी वणवण फिरावयास नको. संतवचनें गातांना तीं ज्यांची वचनें आहेत ते सदैव पाठीशीं व सन्मुख उभे आहेत. ते आपणास आपल्यासारखें करून घेतील असा विश्वास बाळगावा. आपल्या बाळाचें आरोग्य कसें वाढेल, त्यास कोणतीही उणीव कशी न वाटेल याची सर्व काळजी पिता करतो. बाळानें केवळ त्याच्या अंगाखांद्यावर खेळावयाचें एवढेंच."

आजच्याही काळांत राज्यकर्त्यांनासुद्धां समाजाचें खरेंखुरें कल्याण साधावयाचें असल्यास संतांच्या विचारसरणीला महत्त्व आहे हें विशद करतांना आकाशवाणीवरून केलेल्या आपल्या अध्यक्षीय भाषणांत रे. एम्. ओ. मॅस्करेन्हॅस म्हणतात –

"अर्थशास्त्रांचा सांगोपांग अभ्यास करतांना कै. लाड यांना असें आढळून आलें कीं व्यक्तीच्या स्वार्थ परायणतेमुळें केवळ अर्थशास्त्र समाजाचें खरेंखुरें कल्याण साधूं शकणार नाहीं. समाजाचें खरें खरें हित साधावयाचें असेल तर निष्कामी, निःस्वार्थी कर्मयोगी संतांच्या विचारसरणीची समाजाला पूर्ण ओळख करून दिली पाहिजे. व्यक्ति ही बहुतांशी स्वार्थी असते तर समाज बहुतांशी परमार्थी असतो. म्हणून समाजाचें खरें कल्याण करण्याकरितां संत मंडळीचें सहाय्य घ्यावें लागेल असें वाटून त्यांनीं अलीकडे भारतांतील प्राचीन बुद्धाचा निष्काम कर्मयोग, मध्ययुगीन तुकारामांची निःस्वार्थी समाजसेवा

आणि अर्वाचीन महात्मा गांधींची सत्यनिष्ठा या त्रयींचा मार्मिक अभ्यास सुरू केला. ”

सारांश, संत चरित्रें म्हणजे संत महात्मे स्वतः निर्मळ व धर्मशील असें आचरण करून सामान्य लोकांना ते आदर्शभूत होतात. संतांच्या प्रत्येक शब्दांत स्पंदन असतें व त्यांचा प्रत्येक शब्द अज्ञानी माणसांचें अज्ञान घालविण्यास समर्थ असतो. भारतांत फार पुरातन काळापासून ईश्वराचें प्रत्यक्ष दर्शन घेऊन पावन झालेले असंख्य साधुसंत व महात्मे होऊन गेले आहेत. भगवंतप्राप्तीसाठीं व परोपकारासाठीं ही सारी मंडळी आपल्या देहाला तृणवत् मानीत होती. त्यांच्या पावन सुगंधाचा वास भारतांत आजही दरवळत आहे. मृत्यूपुढें दंड ठोकून आमचे हे सारे संत महात्मे रांगेंत उभे आहेत. त्यांनीं घालून दिलेल्या आचरणाप्रमाणें मानवजातीचें प्रिय करण्यास आम्ही तत्पर राहिलें पाहिजे. भेदाभेद, द्वेष, मत्सर इत्यादि दुर्गुणांचा नायनाट करून दया, सहिष्णुता, परोपकार, मानवता इत्यादि सद्गुणांची कांस धरण्यास ते आम्हास शिकवीत आहेत.

अशाच शिकवणुकीच्या संस्कृतीचीं आतां जीर्ण होत चाललेलीं पानें उघडतां उघडतां गतकालांतील किती तरी आदर्श चित्रें आमच्या मनःचक्षूपुढून निघून जातात –

वत्रासूरापासून मानवजातीचें रक्षण करण्यासाठीं इंद्राला आपलीं स्वतःची हाडें देण्यासाठीं आपलें आत्मबलीदान करणारा महात्मा दधिच ऋषि आपणापुढें उभा राहतो –

आणि तो – आपले शंभर पुत्र मारले आहेत – आपला नाश करण्यासाठीं मोठा दगड घेऊन आपल्याच आश्रमांत दबा धरून बसलेल्या विश्वामित्राच्या तपाची पौर्णिमेच्या चांदण्याशीं बरोबरी व प्रशंसा आपल्या पत्नीसी करीत असलेला – तो असुयारहित व अजातशत्रु वसिष्ठ आजही सप्तर्षिंच्या समुहांतून आमच्याकडे पाहात आहे –

आणि बाणानें घायाळ झालेल्या हंसाच्या जखमेंतून तीर काढून व जखम बांधून त्या मुक्या प्राण्यावर प्रीतीची पाखर घालणारा – भक्षक होण्यापेक्षां रक्षक होण्याचा महामंत्र देणारा – तो भगवान् गौतम बुद्ध –

ससाण्यापासून प्राण वांचवण्यासाठीं आश्रयास आलेल्या कपोतास अभय देऊन त्याच्याबद्दल आपल्या स्वतःच्या शरिराचें मांस त्या ससाण्यास देऊन आपली उदारता दाखविणारा तो शिबीराजा आजही आम्हास आदर्श आहे –

आणि सर्व भूतमात्रांच्या ठिकाणीं ईश्वर पाहाणारा – फार काय, पण प्रत्यक्ष वाघ आपणापुढें उभा असतांनासुद्धां व्याघ्राला न भीतां व्याघ्राची व्याख्या आपल्या शिष्यांस समजावून देणारा व प्रत्यक्ष वाघाचा घांस झालेला–भगवान् पाणिणि आपणापुढें उभा आहे –

संस्कृतीची ही जीर्ण पानें उघडीत उघडीत चालू शतकाच्या आरंभी येऊन ठेपल्यावर स्वामी रामतीर्थांचें नांव असलेलें एक पान चटकन् आपणासमोर उघडलें जातें.

स्वामी विवेकानंदाचे समकालीन स्वामी रामतीर्थ यांनीं या शतकाच्या आरंभी आपली जीवन यात्रा संपविली. आपल्या मृत्यूच्या अगदीं थोडा वेळ अगोदर 'मृत्यूला आव्हान' हीं कविता त्यांनीं लिहून ठेवली होती. मृत्यूची भीति न बाळगतां आपलें शरीर तृणवत् मानणाऱ्या महात्म्याचे मृत्युबद्दल विचार पहा –

"हे मृत्यो ! ये. हें शरीर मी तुझ्या आतां स्वाधीन करतों. पण मी तर अनंत शरिरांनीं या विश्वांत राहणारच्च आहे. लक्ष्मीचा मी पुत्र. मी दरिद्री नाहीं. अनंत वसनें मला आहेत. चंद्राच्या रुपेरी किरणांची वस्त्रें मी लेईन किंवा सूर्याची सोनेरी किरणें नेशीन. मी पर्वतराजींतून खळखळणाऱ्या झऱ्याच्या रुपानें नाद ब्रह्मांत लीन होऊन संचाराला निघेन. सागराच्या लहरींतून मी अनंत नर्तन करीन. सर्वांना सुखावणारा मलय समीर तो मीच्च. माझींच ही अनंतरुपें आहेत. मृत्यो, मी अमरच्च आहे."

आणि अशाच तऱ्हेच्या उद्बोधनांत श्रीचोखोबांनीं मृत्यूला हाक मारून आपला देह त्याच्या स्वाधीन केला.

केधवां सुटेन ऐसें जालें जीवा । गोवियेलं देवा कांहीं येथें ॥
चोखा म्हणे वाया चालिलासे वेळ । आला असे काळ निकट दिसे ॥

# चोखोबांचें जीवन दर्शन

मुक्त कर !

नरेन्द्रा, मलाच भिवविणाऱ्या माझ्या भीषण छायेंतून, भग्न आशांनीं वेष्टिलेल्या धुक्यांतून उद्यांचा विचार करणाऱ्या भवितव्याच्या भासांतून मला मुक्त कर !

कारण रात्र काळोखी आहे आणि तुझा हा यात्रेकरू अंध आहे !

माझा हात घट्ट धर !

निराशेच्या अंधकारांतून माझी मुक्तता कर !

माझ्या दुःखाश्रूंनीं मालविला गेलेला हा दीप तुझ्या ज्वालेच्या स्पर्शांनीं प्रज्वलीत कर !

सुस्ती आलेल्या माझ्या थकलेल्या गात्रांत चैतन्य ओत !

गत आयुष्याच्या अंकगणितांतील वजाबाकींत डोकें खुपसून बसण्याची मला दुर्बुद्धि देऊं नकोस !

हा रस्ता पदोपदीं जें मला गांठावयाचें आहे, त्याचें यशोगान गाऊं दे !

माझा हात सोडूं नकोस !

— गुरुदेव टागोर

" अनंताच्या आराधनेंत आणि यज्ञ मधून. "

गुरुदेव टागोरांची ही भावलहरी मी गुणगुणत होतों. नेत्रांत पाणी तरळत होतें. चटकन एक विचार सहज येऊन गेला. चोखोबाराय देवासमोर असेच उभे राहिले असतील कां ? देवाचा शेवटचा निरोप घेतांना त्यांच्या मानसिक स्थितीचें चित्र स्पष्टपणें वरील भावलहरींत प्रतित झालेलें मला दिसत होतें. वाचकहो, ही भावलहरी सहृदयतेनें पुनः पुनः वाचा. तुमच्या हृदयांत कोठेंतरी खोलवर वसत असलेली आदराची जागा या भावगंगेंत दिसेल.

नाहीं नाहीं, चोखोबांचें संपूर्ण जीवन दर्शन या भावदर्शी गीतांत आढळून येईल. तुमच्या प्रेमाश्रूंचे दोन तरी ठिपके तुमच्या नेत्रांतून ठिपकूं द्या. तुमच्या अंत:करणांत कुठें तरी त्यांच्याबद्दल वसत असलेल्या आदरपूर्ण हरहरीची संवेदना झाल्याशिवाय राहाणार नाहीं. विठ्ठलाचे लाडके भक्त असून व आपल्या समाजांतील लोकांच्या वर्तणुकीचा त्यांना उबग आलेला असून सुद्धां आपल्याच लोकांबरोबर त्यांनीं आपली आत्माहुति दिली....नाहीं....मृत्यूला त्यांनीं आनंदानें व खखुषीनें आलिंगिलें–आणि यांतच त्यांचा मोठेपणा सांठविलेला आहे. रूढीच्या काळोखांत अंध झालेल्या समाजांत राहून सुद्धां गत आयुष्याच्या अंकगणितांतील वजाबाकींत डोकें खुपसून बसण्याची दुर्बुद्धि न मागतां भग्न आशांनीं वेष्टिलेल्या धुक्यांतून आणि उद्यांचा विचार करणाऱ्या भवितव्याच्या भासांतून मुक्त होण्यासाठीं हा महान् महार भक्त श्रीपांडुरंगरायाच्या महाद्वारावर उभा राहून पुकार करीत आहे. सर्व तऱ्हेचा छळ व अवहेलना सहन करून सुद्धां मी माझ्या धर्मासी जागलों व एकनिष्ठ राहिलों. सुस्ती आलेल्या समाजांत नव चैतन्य ओतून जनता जनार्दनरुपी पांडुरंगानें आपला हात सोडूं नये एवढीच त्यांची शेवटची, अगदीं शेवटची मनिषा !

• • •

## – दर्शन १ लें –

तृणें मृगाला, सलिलें झषाला । संतोष हे वृत्ति महाजनाला ।
तयासि निष्कारण तीन वैरी । किरात कैवर्तक दुष्ट भारी ॥

—वामन पंडित

सज्जन माणसांना दुष्ट लोक नेहमींच विनाकारण त्रास देतात. कोणत्याही काळीं व कोणत्याही ठिकाणीं हीच परिस्थिती असते. निरूद्योगी गांव कुटाळ नेहमींच फुकटच्या कुटाळ्या करीत असतात. श्री चोखोबांच्या वेळीं अशा लोकांचा अभाव होता असें म्हणतां येत नाहीं. कारण चोखोबांना सुद्धां दुष्टांच्या कुटाळक्याच्या दिव्यांतून जावें लागलें आहे. त्याचें वर्णन इतर संत वाङ्मयावरून दिसून येतें.

अशीच एक संध्याकाळची वेळ होती. चोखोबा हद्दपारीनंतर विठ्ठलाच्या ओढीनें आपल्या पूर्वीच्या जागेवर येऊन बसले होते व नामचिंतनांत गढून गेले होते. इतक्यांत त्यांच्या कानीं त्यांना उद्देशून उच्चारलेले कांहीं बिभत्स शब्द आले. त्यांनीं त्या बाजूस पाहिलें. रिकामटेकडे कांहीं गांव कुटाळ सभोंवार गोळा झाले होते. त्या पैकीं एक जण म्हणाला, 'हा महारडा हद्दपार करून सुद्धां परत महाद्वारांत आला. चला, चला त्याला चांगलें छेडूं.'

कुटाळ : काय चोखोबा महाराज ! आपणास देव भेटला कां ?

चोखा : महाराज, देव कां भेटणार नाहीं ? आपली तेवढी निष्ठा पाहिजे.

कुटाळ : मग तुला देवानें दर्शन दिलें असेलच !

चोखा : महाराज, देव सर्वव्यापी आहे. तो सर्वत्र आहे.

कुटाळ : अरे महारड्या, तूं नीचांतला नीच. तुझी हीन याती आणि उपदेश करण्याचा मोठा आव आणतोस. जणुंकाय तुला देवानें दर्शन दिलें !

चोखा : महाराज, रागावूं नका. आपण आमचे मायबाप आहांत. तुमच्या उष्ट्यावर आम्ही जगतों. मी यातिहीन महार. परंतु शपथेवर सांगतों कीं तो प्रभू सर्वांना सारखाच कृपाळू आहे.

कुटाळ : अरे नीच माणसा, इतका तुझा देव असेल तर तुला तो देवळांत कां नेत नाहीं ? तुला अद्याप पांडुरंगाचें नुसतें दर्शन सुद्धां झालेलें नाहीं आणि तूं आम्हांस ब्रह्मज्ञान सांगतोस. अरे महारड्या, येवढी तुझी योग्यता आहे कां रे ?

चोखा : मजसारख्या हिन दीनावर दया करा. परमेश्वरानें प्रत्यक्ष मला भेट द्यावी एवढें भूषण मला गरिबाला—हिनदीन महारास कशासाठीं पाहिजे. लक्षावधि कोसांच्या अंतरावर राहून सुद्धां सूर्यनारायण कमलिनीचें व चंद्र चकोराचें रक्षण नाहीं कां करीत ? कासवी आपल्या पिलांवर लांबूनच नजर ठेवते ना ? तेवढ्यांतच मी संतुष्ट आहे महाराज. मी यातिहीन महार. परंतु देव माझें दुरूनच रक्षण करील एवढी माझी देवावर श्रद्धा आहे. देवाच्या ठिकाणीं भाव नसेल तर देवाच्या सान्निध्यांत राहून तरी फळ मिळेल कां ?

सर्व कुटाळ : अरे नीचा, तूं आम्हांला ज्ञान सांगतोस ? तुझें पांडित्य दाखवितोस काय ? आम्हाला हिणवितोस काय ? अरे, पाहतां काय, ठोका याला. शिवाय हद्दपारीचा हुकूम मोडून हा इकडे महाद्वाराजवळ आज आला आहे.

सर्वांचा सर्रास मार खाऊन चोखोबांच्या शरिराला वेदना होत होत्या. असह्य झालेल्या वेदना सहन करीत कसे तरी ते घरीं आले. त्यांच्या पत्नीनें त्यांचें अंग रगडून त्यांना ऊन पाण्याची आंघोळ घातली. चोखोबा तशाही स्थितींत नामस्मरणांत गुंगून गेले होते. त्या कुटाळांचे शब्द त्यांच्या कानीं सारखे घुमत होते. आपल्या सारख्या हीन दीन व यातिहीन महारास श्रीपांडुरंगरायास डोळे भरून पहाण्याची संधि कसली येते याची त्यांना खंत लागली होती. आपल्या समाजाला चिकटविलेला विटाळ पदोपदीं आपल्या मार्गांत येत असतो—असे सारखे विचार त्यांच्या डोक्यांत घोळत होते. ते आपल्याशींच म्हणत होते....

हीन याती माझी देवा । कैसी घडे तुझी सेवा ॥ १ ॥
मज दूर दूर हो म्हणती । तुज भेटूं कवण्या रीतीं ॥ २ ॥
माझा लागतांची कर । सिंतोडा घेताती करार ॥ ३ ॥
माझ्या गोविंदा गोपाळा । करुणा भाकी चोखामेळा ॥ ४ ॥

रात्रीची कृष्णछाया आसमंतांत पडली होती. चोखोबा या कुशीवरून त्या कुशीवर विव्हळत पडले होते. आपल्या शारिरिक वेदना ते विसरून गेले होते. देवाचें दर्शन व सेवा आपल्याकडून कशी होईल याचा विचार त्यांच्या मनांत चालूच होता. जवळ जवळ मध्यरात्र झाली होती. ते आपल्या घराच्या बाहेरच्या पडवींत पडले होते. इतक्यांत त्यांना पावलांचा आवाज ऐकूं येऊं लागला. ते त्या दिशेनें काळोखांतून पाहूं लागले. खांद्यावर कांबळें टाकलेली, पंचा नेसलेली व हातांत काठी असलेली एक व्यक्ति त्यांच्या शेजारी येऊन बसली व अगदीं मृदु आवाजांत म्हणाली....

व्यक्ति : दादा, तुला बरें नाहीं कां वाटत ?

चोखा : होय बाबा, माझें सारें अंग ठणकत आहे रे. आपण अशा अपरात्रीं कोठून आलांत ?

व्यक्ति : मी लांबून आलों आहे. मला विठ्ठलाचें दर्शन घ्यावयाचें होतें.

चोखा : आपण जातीनें कोण ?

व्यक्ति : मी महार आहे दादा.

चोखा : मग तुला कसलें दर्शन होणार ?

व्यक्ति : दादा, मी तर दर्शन घेऊन आलों. द्वार मोकळेंच आहे. नंतर मी अंधारांत वाट चुकलों व येथें आलों.

चोखा : तूं भाग्यवान् आहेस. तुला कोणी मारलें नाहीं ना ?

व्यक्ती : छे. मला कोणी पाहिलें सुद्धां नाहीं. सर्वजण झोपले आहेत व द्वारें उघडीं आहेत. पण दादा, तुमचें अंग दुखत आहे. मी जरा तुमचें अंग चिरडूं कां ?

चोखोबानें त्या व्यक्तीला नकार दिला. परंतु ती व्यक्ति बळेंच त्यांच्या जवळ बसून चोखोबांच्या अंगावरून हात फिरवूं लागली. चोखोबांच्या सर्व वेदना त्या स्पर्शानें नाहींशा झाल्या. ते उठून बसले. लगेंच ती व्यक्ती म्हणते....

व्यक्ती : दादा, आपणास देवाच्या मंदिरांत जावयाचें आहे काय ? देवाचें दर्शन घेणार कां ?

चोखा : जावें आणि देवाला एकदां तरी कडकडून आलिंगन द्यावें असें वाटतें. परंतु ते कसलें शक्य आहे ? मी यातिहीन महार.

व्यक्ती : दादा, चिंता करूं नका, मी तुम्हाला अगदीं जवळच्या रस्त्यानें नेतों. चला लवकर.

देवाला भेटण्याची उत्सुकता व तळमळ पण ब्राह्मणांची भीति या संमिश्र मनस्थितींत ते आपलें कांबळें घेऊन त्या व्यक्तीबरोबर चालूं लागले. त्या व्यक्तीनें त्यांचा हात धरला होता. रात्र अंधारी होती. मार्ग दिसत नव्हता. काय होतंय व काय चाललंय यांची जाणीव चोखोबांना नव्हती. आपण स्वप्नांत आहोंत कीं जागे आहोंत हेंच त्यांना कळत नव्हतें. परंतु एवढें लांब अंतर असून सुद्धां अगदीं थोड्या वेळांत व द्वारें बंद असूनही ते देवाच्या

समोर गाभाऱ्यांत उभे होते. त्यांच्या बरोबरची व्यक्ती मात्र कोठेंच दिसत नव्हती. क्षणार्धांत देवाच्या मुखाकडे पाहून त्यांनीं देवाच्या चरणावर डोकें ठेविलें. देवानें त्यांना उचलून पोटाशीं धरलें. चोखोबांच्या नेत्रांतून प्रेमाश्रू ओसंडत होते. कांहीं काळ ते तशाच स्थितींत होते. शेवटीं देवानेंच त्यांना आपल्या आलिंगनांतून मोकळें केलें. देव मृदु स्वरांत म्हणाले,

देव : चोखोबा, तुझी इच्छा पूर्ण झाली ना ? तुला प्रत्यक्ष देवाचें दर्शन झालें ना ?

चोखा : होय देवा. मी आज धन्य झालों.

यापेक्षां त्यांच्या तोंडांतून शब्द निघत नव्हते. ते आनंदानें बेहोश झाले होते. अशा प्रकारचा आनंद त्यांना पूर्वी कधींच आला नव्हता. ते तशा उन्मनावस्थेंत असतांनाच देव म्हणाले –

" चोखोबा, आतां घाई करा. मध्यरात्र उलटून गेली आहे. आपण आतां बाहेर पडण्याची घाई करा. पुजारी आतां जागे होतील. हा घ्या माझ्या गळ्यांतील तुळसीहार ! "

देवानें आपल्या गळ्यांतील तुळसीहार चोखोबांच्या गळयांत घातला व तातडीनें त्यांना बाहेर घालविलें. चोखोबा त्या आनंदाच्या उर्मींत देहभान विसरले होते. पाय नेतील तिकडे ते चालूं लागले. पहाट होत आली होती. कोंबडे ओरडत होते. त्यांनीं चंद्रभागेच्या कांठावर बैठक मारली व ते चिंतनांत निमग्न झाले.

* * *

# दर्शन २ रें

विश्व रागें झालें वन्हीं । संतीं सुखें व्हावें पाणी ॥
शब्द शस्त्रें झालें क्लेश । संतीं मानावा उपदेश ॥

—मुक्ताबाई

निर्वाणी गोविंद असे मागें पुढें । कांहींच सांकडें पडों नेदी ॥

—तुकाराम महाराज

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम........................ वि: ........९३.......
अनुक्रम ............................ वर्ग विभाग ...........



पंढरीतील विठ्ठलाचे भक्त आतां झोपेंतून उठूं लागले होते. मंदिरांत नगारा झडूं लागला. बडवे, ब्राह्मण, पुजारी व इतर भक्त देवाच्या मंदिरांत गोळा होऊं लागले होते. थोड्याच वेळांत काकड आरती सुरू होणार होती. बडव्यांच्या डोळ्यांवर विश्वास बसेना. ते विठ्ठलमूर्तीकडे निरखून पाहूं लागले. ते सर्व भयाकुल झालेले दिसले. आजूबाजूस ते पाहूं लागले. त्यांची खात्री झाली. देवाचा रत्नहार चोरीस गेला. रात्रौ द्वार बंद करतांना देवाच्या गळ्यांत हार निश्चित होता. कोण चोरील बरे ! आंत कोणाचा बरें प्रवेश होईल ? विचार चालेना. शेवटीं एका बडव्याच्या डोक्यांत कल्पना आली. ती त्यानें त्यांच्या समोर मांडली. तो म्हणाला, बहुतेक हा देवाचा हार चोरीस जाण्यांत चोख्याचा हात असावा. कालच संध्याकाळीं त्याला लोकांनीं बडविलें होतें. हद्दपार झाला असूनसुद्धां तो काल इकडे आला होता. लगेंच इतर लोकांनीं त्याला साथ दिली. चोखोबांवर आलेला वहिम अधिक दृढ झाला. बडवे व इतर लोक चोखोबांचा तपास करण्यास चारी बाजूंना रवाना झाले. सबंध पंढरीभर लोक भराभर निघून गेले व आपापल्या परीनें चोखोबांचा तलास करूं लागले.

इकडे चोखोबाराय हे बहुतेक उन्मनावस्थेंतच चंद्रभागेच्या काठीं झाडाखालीं पडले होते. त्यांना झालेली विठ्ठल भेट ही अपूर्व अशीच होती. ते आपणास धन्य मानीत होते. त्यांचें विचार चक्र चालूच होतें. भूतलावरील ईश्वरी अवतार संत ज्ञानदेव यांनीं मला उराउरी भेट दिली आहे – त्यांनीं मला आपला असें मानून पोटाशीं धरलें आहे – त्यांनीं मला पुढें चालण्याचा मार्ग आखून व स्वच्छ करून दिला आहे. नामदेवासारख्या समर्थ संतानें आपणाला विठ्ठल हा त्रिअक्षरी व अमृतमय असा मंत्र दिला आहे व आपला शिष्य म्हणून स्वीकार केला आहे. या सर्वांवर मात म्हणजे प्रत्यक्ष श्रीपांडुरंगानें आपणास दृढ आलिंगन देऊन कृतार्थ केलें आहे. आतां एवढे लाभ मिळाल्यावर जीवनांत यापेक्षां दुसऱ्या लाभाची किंमत काय उरली आहे – लोकांनीं केलेला अपमान व अवहेलना यांना कोण विचारतो ? अशा गोड आनंदांत ते बेहोष होऊन सुखाच्या राशीवर लोळत होते. इतक्यांत कांहीं लोक तेथें धांवतच येऊन त्यांनीं त्यांची सुखसमाधी मोडली.

एका माणसानें तर हातांत असलेली काठी चोखोबांच्या अंगावर जोरानें मारली व म्हणाला —

" अरे चोरा ! देवाचा रत्नहार चोरून येथें लपून बसलास काय ? "

चोखोबा दिङ्मूढ झाले — ते भानावर आले. पाहातात तो खरेंच त्यांच्या गळ्यांत तुळशीहाराबरोबर देवाचा रत्नहार पण होता. त्यांना आश्चर्य तर वाटलेच, परंतु विनाकारण चोरीचा आळ आला हें पाहून भीति पण वाटली. ते काकुळतीच्या स्वरांत म्हणाले—

"महाराज, शपथेवर खरें सांगतो, मी देवाचा हार चोरला नाहीं."

लोक : मग हा देवाचा रत्नहार तुझ्या गळ्यांत कसा आला ? चोरट्या, देवाचा तूं एवढा मोठा भक्त म्हणून कां देवानें प्रकट होऊन तुला बक्षिस दिला ? सांग, खरें सांग, हार चोरलास ना ?

चोख : मी अगदी खरें सांगतों. मी हार चोरला नाहीं.

लोक : अरे, तुम्ही महार लोक चोर डाकू आहांत हे आम्हांस ठाऊक आहे. देवळांत शिरून देवाच्या दर्शनाच्या निमित्तानें चोऱ्या करण्याचा तुमचा उद्योगच असतो. चला रे, याचा न्याय आपल्या पंचांपुढें झालाच पाहिजे. पंचांपुढें याला उभें करूं.

लोकांनीं चोखोबांना बडवीतच कोतवालीमध्यें नेऊन पंचांसमोर मुद्देमाला-सह उभें केलें. पंचांची बैठक होऊन चोखोबांवर चोरीचा आरोप शाबीत झाला; देवाचा हार चोरणें व चोरी करतांना देवाला विटाळून बाटविणें हा भयंकर गुन्हा ठरवून त्यांना बैलांच्या पायीं जुंपण्याची अतिशय कठोर व निर्दय शिक्षा फर्मावण्यांत आली. ती लगेच अंमलांत आणण्याचा हुकूम झाला. ताबडतोब सारी चक्रें फिरूं लागलीं. ही बातमी हां हां म्हणतां पंढरपूरभर वाऱ्यासारखी फैलावली. ही अघोर शिक्षा अंमलांत कशी येते तें पाहाण्यासाठीं लोकांचे थवेच्या थवे वाळवंटावर जमूं लागले. ज्या वाळवंटावर चोखोबा विठ्ठल प्रेमानें बेहोश होऊन नाचत होते त्याच वाळवंटावर त्यांना झालेली शिक्षा अंमलांत येणार होती. वाळवंट जन समुदायानें गच्च भरून गेलें होतें.

इतक्यांत बैल आणले गेले. बैलांच्या पायांच्या मागें फळी अडकवून त्याच्या मागें या निरपराध भक्तराजास बांधण्यासाठीं नेऊं लागले. श्री चोखोबाराय अगदी शांत होते. ते धीमेपणानें पाऊलें टाकीत टाकीत त्या मस्त बैलांपर्यंत पोचले. श्रीपांडुरंगरायाला हात जोडले. जमलेल्या लोकांकडे पाहून त्यांना वंदन करून हात जोडले. त्या मस्त बैलांच्या अंगास कुरवाळिलें व लगेच फळीला बांधण्यासाठीं खालीं निर्भयपणें झोपले.

जनसमुदायांत एकच हलकल्लोळ कांहीं क्षण झाला. सज्जनांच्या नेत्रांत अश्रू जमा झाले. दुष्टांना राक्षसी आनंद झाला. चोखोबांची पत्नि तेथें येऊन हंबरडा फोडीत होती. लगेंच चोखोबांचे हात बळकट अशा दोरीस अडकविले गेले. लोकांची उत्सुकता शिगेस पोचली होती. इतक्यांत ते निर्दय ब्राह्मण आसुडांचे फटके त्या मस्त बैलांच्या पाठीवर हाणूं लागले. सपासप सपासप असा आवाज कानीं पडत होता. कोलाहल अगदी शांत झाला होता. टांचणी पडली तरी ऐकूं येईल इतकी शांतता पसरली होती. फक्त माणसांच्या श्वासोच्छ्वासा-शिवाय कांहीं ऐकूं येत नव्हतें. बैलांच्या पाठीवर एका मागून एक असे आसुडाचे फटके उडत होते. विश्वांतील सारी क्रूरता वातावरणांत भरून हवा कूंद झाली होती. झाडें स्थितप्रज्ञाप्रमाणें निश्चल उभीं होतीं. पक्षी झाडांवर निश्चळ बसून मानवांचे क्रौर्य निरखीत होते. दिशा ओस वाटत होत्या. चंद्रभागा दुःखानें कीं काय कोण जाणे तिची वहाण्याची गती मंद झाल्याचें भासत होतें. सोयराबाईचें किंकाळणें कानीं पडत होतें. ती देवाला ओरडून सांगत होती —

" अरे विठ्या, माझ्या धन्याचें खाल्लास जेवलास आणि त्या उप-काराची परतफेड अशीच करतोस काय? अन्नाची क्रिया तूं ठेवली नाहींस रे! अरे चोख्याच्या बायकोस तूं रंडकी करतोस कां?"

आसुडांचा भयंकर मार खाऊन सुद्धां बैल निश्चळ उभे होते. जणुं काय ते पाषाणाचेच बनविले होते कीं काय कोण जाणे! ब्राह्मणाचे हात आसूड मारून मारून दुखूं लागले. बैलांच्या समोर नीळप्रभा फाकून एक तेजोवलय निर्माण झालें होतें. अनंत ब्रह्मांडें उदरांत बाळगिणारा विश्वाचा धनी चहूं कडून बैलांची शिवळ धरून उभा होता. लोकांना चमत्कार वाटूं लागला.

पुजाऱ्यांच्या अंतःकरणांत भीतीचा गोळा उभा राहिला. इतक्यांत चोखोबांचा उंच पहाडी आवाज लोकांच्या कानीं गेला —

" चोखा म्हणे रांडे विश्वाचा पोसणा । संतांचा देखणा विठो माझा ॥ "

काय होतेय हें कोणालाच कळेना. नीलप्रभा आस्ते आस्ते विरळ होऊं लागली. श्यामवर्ण पितांबर नेसलेला चक्रधारी विठ्ठल आपल्या भक्ताचें सांकडें फेडण्यासाठीं बैलांच्या समोर उभा असलेला कांहीं क्षण लोकांना दिसला.

लांब कोठून तरी मोठ्या आवाजांत अभंग म्हटलेला ऐकूं येत होता —

चोखामेळा संत भला । तेणें देव भुलविला ॥ १ ॥
भक्ति आहे ज्याची मोठी । त्याला पावतो संकटीं ॥ २ ॥
चोखामेळ्याची करणी । तेणें देव केला ऋणी ॥ ३ ॥
लागा विठ्ठल चरणीं । म्हणे नामयाची जनी ॥ ४ ॥

लोक त्या दिशेनें पाहूं लागले. जनाबाई मोठ्या प्रेमानें आपला अभंग गात होती.

ब्राह्मणांस पश्चात्ताप झाला. तावडतोब चोखोबांची मुक्तता करण्यांत आली. त्यांना मोठ्या सन्मानानें मंदिरांत आणण्यांत आलें. चोखोबांच्या जयजयकारानें वाळवंट निनादून गेलें होतें. देवाच्या दर्शनानें सर्व लोकांचें समाधान झालें होतें.

शुद्ध सोनें ज्याप्रमाणें मुशींतून तापून सलाखून निघतें त्याप्रमाणें चोखोबाराय या प्रसंगांतून निघाले होते.

—o—

## – दर्शन ३ रें –

कां वृक्षाची साउली । वाटे जातां मीनली । घरावरी तेतुली । आस्था नाहीं ॥
पुत्र वित्त कलत्र । हे जालियाही स्वतंत्र । माझें न म्हणे पात्र । त्रिपाचें जैसें ॥
—ज्ञानेश्वरी

पौर्णिमेचें दुधासारखें चांदणें पडलें होतें. चोखोबाराय आपल्या ओटीवर पडले होते. माणसांची त्यांच्याकडे आतां वर्दळ कमी झाली होती. ते चिंतनांत निमग्न झाले होते. इतक्यांत घरांतलें काम आवरून सोयराबाई चोखोबारायांचें शेजारी येऊन बसली. कर्ममेळा अद्याप घरीं परतला नव्हता. सोयराबाई आपल्याशींच गुणगुणत होती—

नाहीं उरली वासना । तुम्हां नारायणा पाहतां ॥
उरला नाहीं भेदा भेद । झालें शुद्ध अंतर ॥

चोखोबांनीं प्रेमळपणानें आपल्या पत्नीकडे पाहीलें. तिच्या चेहऱ्यावर आनंदाच्या उर्मी ओसंडून जात होत्या. चोखोबाराय म्हणाले—

चोखा : सोयरा, तुझा अभंग किती गोड आहे. नारायणाला पाहतां पाहतां वासना उरत नाहीं हें खरें आहे. तसेंच भेदाभेद कोठें पळतो त्याचा पत्ताच नाहीं. परंतु हें सर्व अंतर शुद्धीवर आहे.

सोय० : कसला वेडीचा गोड अभंग—हा आपलाच प्रसाद. आपलें प्रोत्साहन नसतें तर माझ्याकडून काय झालें असतें ?

चोखा : सोयरा, खरेंच सांगतों. फार गोड अभंग आहे. तुझे दुसरे बरेच अभंग चटका लावून गेल्या शिवाय राहात नाहींत. खरोखर पांडुरंग तुझ्याकडून गोड गोड अभंग वदवून घेतो हें खरें.

सो० : आपले अभंग गोड नाहींत कां ? मग अनंत भट्ट महारवाड्यांत धांवून कां येतात ? एवढा मोठा पंडित ब्राह्मण. पण तो नाहीं कां आपल्या अभंगांनीं वेडा झाला. मोत्यासारख्या अक्षरांत आपले अभंग लिहून घेतो असें लोक म्हणतात ना ? मला वेडीला काय समजतें ? माझ्यानें कांहीं व्हावी तशी पांडुरंगाची सेवा झाली नाहीं. थोडें फार करतें ती आपलीच सेवा. ज्ञानोबांनीं नाहीं कां सांगितलें आहे कीं पतिसेवा स्त्रियांना तरून जाण्यास पुरेशी आहे. ज्ञानेश्वरींत त्यांनीं कुठें तरी एक ओवी घातली आहे. मला बरोबर आठवत नाहीं. आपण एकदां मला म्हणून दाखवा पाहूं.

चोखा : सोयरा, तुझें म्हणणें बरोबर आहे. साध्वी स्त्रीला पतिसेवे-पलीकडे दुसरें तप नाहीं. त्यांतच तिची मुक्ति आणि सर्व कांहीं आहे. ज्ञानदेव म्हणतात.—

"पतीचिया मता। अनुसरोनी पतिव्रता। अनायासें आत्महिता। भेटेचि ते॥"

सो० : होय. किती गोड ओवी आहे ही. खरोखर ज्ञानदेवांची रोज किती तरी वेळां आठवण येते. त्यांची मूर्ति डोळ्यासमोरून हालतच नाहीं. आपल्या डोळ्यांत पाणी आलें वाटतें.

चोखा : होय सोयरा, आपण किती तरी भाग्यवान्. या माउलीनें आम्हांला पोटाशीं धरलें. लोकांनीं दूरदूर लोटलें. परंतु माझ्या माउलीनें आम्हांस जवळ केलें. माउलीला जाऊन बराच काळ लोटला सोयरा. आतां मलाही वाटूं लागतें कीं माउलीला भेटण्यास लवकर जावें हेंच बरें.

सो० : आपणाला सर्व कांहीं कळतें. पांडुरंगासी रात्रंदिवस हितगुज करीत बसतां. मी वेडी व अज्ञानी आहे.

इतक्यांत कर्ममेळा घराच्या अंगणांत येऊन उभा राहतो. सोयराबाई बसल्या बसल्याच म्हणते—

बाळ, किती उशीर झाला आज तुला.

कर्म. : आई, थोडा वेळ झाला तरी क्षमा कर. वाटेंत कांहीं मंडळी भेटली. खरोखर मला आतां या विटाळाचा उबग आला आहे.

चोखा : बाळ, काय झालें ? कां रागावतोस ?

कर्म : बाबा, आम्ही महाराच्या जन्मास आलों तें केवढें आमचें पाप ! रस्त्यानें चालणें सुद्धां मुष्किल ! काय आमची ही हीन दीन स्थिती !

चोखा : बाळ, आमच्या पूर्वकर्माचें हें फळ आहे. त्यांत राग येण्यासारखें कांहीं नाहीं.

कर्म : बाबा, जेव्हां तेव्हां तुमचें म्हणणें म्हणजे पूर्वकर्म. केव्हां संपणार तें पांडुरंगच जाणें. पण आमची कुचंबणा कांहीं थांबत नाहीं. आपण तर नेहमीं आपणाला हीनदीन म्हणतां व म्हणवून घेतां. उष्टें तर आमच्या पांचवीला पूजलें आहे. गोडधोड तर जन्मांतच कधीं मिळालें नाहीं. बाबा,

काय हा अन्याय ! कोठला हा न्याय ! माझें डोकें तर भणाणून गेलें आहे. खरोखर स्पृश्य समाजाशीं दोन हात केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. विटाळ, विटाळ, विटाळ --सर्वच विटाळ. काय आमची ही अवहेलना ! बाबा, खरोखर सांगतों, आतां बंड उभारल्याशिवाय तरणोपाय नाहीं. या लोकांची सर्व हलकीं कामें आम्ही करावी—अवहेलनाहि आम्ही करून घ्यावी. खरोखर यांचा आम्हांस काय उपयोग आहे तें तुम्हीच सांगा. विठ्ठल सेवेचें कां हें फळ?

चोखा : बाळ, शांत हो. ही रूढी कितीतरी दिवसांपासून चालत आली आहे. ती एकदम नष्ट कशी होईल? आस्ते आस्ते हा विटाळ जाईल बाळ. आणखी कांहीं पिढ्यांना हें दुःख भोगावें लागेल. पण इलाज नाहीं. लोकरूढी विलक्षण असतात. एकाएकी तुटत नाहींत त्या. लसणाचा किंवा हिंगाचा वास एकदम एकाएकी जातो कां? तसेंच आहे हें. रागावूं नकोस बाळ. मी आतां म्हातारा झालों आहे. माझ्यानें आतां हें पाहावत नाहीं रे !

कर्म : बाबा, मला क्षमा करा. मी आपला उपमर्द करण्यासाठीं बोललों नाहीं. एकदम भडभडून आलें. खरेंच सांगतों—आपल्या ज्ञानदेवांची शपथ घेऊन सांगतों. आपला अपमान होईल अशी कल्पना पण माझ्या मनांत शिवली नव्हती बाबा. आपली मानसिक व्यथा मी ओळखतों. भावनेच्या आहारीं जाऊन मी बोललों. क्षमा करा. ज्ञानदेवांचे बोल माझ्या दृष्टीसमोर आहेत बाबाः—

> “ सकल तीर्थांचिये धुरे । जियें कां माता पितरें ।
> तया सेवेसि कीर शरीरें । लोण कीजे ॥ ”

चोखा : बाळ, तूं आज्ञाधारक आहेस रे ! भावनावश होऊं नकोस. ह्या गोष्टी कांहीं एकाच दिवसांत होत नाहींत. त्याला कालावधि लागतो. आमच्या समाजाची एकंदर स्थिती तूं पाहातोस. अठरा विश्वें दारिद्र्य व दुर्गुणांचें घर. आपला उद्धार आपणच करून घेतला पाहिजे. त्यांनीं ओंगळपणा सोडला पाहिजे. इतर समाजाचें अनुकरण करून दिवसें दिवस आपली प्रगति करून घेतली पाहिजे. बंडखोर वृत्तीनें समाजाचा घात होतो. प्रेमानें दुसऱ्यांचीं मनें जिंकून आपला कार्यभाग नेहमीं करून घ्यावयाचा

असतो बाळ. तूं आज म्हणत आहेस कीं यांचा आम्हांला काय उपयोग आहे. पण तेच लोक तुम्हाला उद्यां उभें राहाण्याला व चालण्याला मदत करणार आहेत हें लक्षांत ठेव. तूं भावनेच्या भरांत बोललास हें मी जाणतों. तुम्ही तरूण पिढींतले आहांत. मी आतां म्हातारा झालों. पान पिकलें कीं गळून पडतें— नवे नवे अंकुर फुटतात व कालांतरानें तेंही पिकून गळून पडतात. सृष्टीचा हा क्रम आहे. आज आम्ही पदतलीं आहोंत, पण तेच आम्ही उद्यां दुसऱ्यांना पदतलीं घेणार आहोंत. प्रत्यक्ष ज्ञानदेवांची काय थोडी अवहेलना व छळ झाला ?

कर्म : बाबा, मला क्षमा करा.

चोखा : नाहीं रे, क्षमेचा प्रश्नच येत नाहीं. तूं कांहीं उद्वेग करून घेऊं नकोस. कार्याला लागा. आपली सोडवणूक आपणच करून घ्या. एवढेंच सांगतों.

इतक्यांत कांहीं मंडळी टाळ मृदंग घेऊन चोखोबांच्या अंगणांत आली. मोठ्या अदबीनें व आदरानें त्यांनीं हाका मारल्या.

‘ चोखोबाराय, भजनास बसायचें ना ?’

होय ना बसूं या. आपलें रोजचें भजन चालू ठेवलेंच पाहिजे. चोखोबा उठले. भजनास लगेंच सुरवात झाली.

विठ्ठलऽऽविठ्ठलऽऽऽविठ्ठल !!!

## –दर्शन ४ थें–

मनें वाचा करणी । जयांची भजनें देवांचिया वाहणी ।
ते शरीर जातियेक्षणीं । देवचि जाले ॥
सांडुनि आंगीची खोळी । सर्प रिगालिया पाताळीं ।
ते त्वचा कोण सांभाळी । तैसें जालें ॥

—ज्ञानेश्वरी

चोखोबांची जड पावलें महाद्वाराच्या दिशेनें वळत होती. चेहऱ्यावर विषण्णतेची छाया पसरली होती. विचारांचें काहूर त्यांच्या डोक्यांत माजलें

होतें. महाद्वारांत येऊन आपल्या रोजच्या जागेवर ते उभे राहिले. आजूबाजूस त्यांनीं आपल्या कांपऱ्या आवाजांत देवाला हांक मारिली. देवाकडे ते निरखून पाहात होते. देव त्यांना नजरेला नजर देण्यास चुकवीत होते. ते आपल्या कंपीत व क्षीण आवाजांत देवाला भाकीत होते. रोजचा गोडवा आज त्यांच्या आवाजांत नव्हता.

"माझी तूं माउली माझी तूं माउली । माझी तूं माउली विठ्ठला तूं ॥ १ ॥
मज कां मोकलिलें वेगळें कां केलें । कां बा धाडियेलें मंगळवेढ्या ॥ २ ॥
काय माझा भार झालासे जोजार । म्हणोनि केलें दूर पायां परतें ॥ ३ ॥
चोखा म्हणे मज द्रव्याची नाहीं चाड । तुझें नाम गोड मुखीं गातां ॥४॥"

त्यांनीं शेवटीं देवाला विचारलेंच--

चोखा : देवा, मला आतां निरोप द्या. मी आपणास एवढा कां जड झालों ?

दा. क्र. ९७.३७३

देव : कोण, चोखोबा, काय म्हणतोस ?

चोखा : देवा, माझा एवढा वीट कां आला ? मला आपल्या पायापासून दूर कां मोकलितां ? मी मंगळवेढ्यास जाऊंच ना ?

देव : चोखोबा ! मला कांहींच सुचत नाहीं रे.

चोखा : देवा, आपण मला पाळीलें पोशिलें. तुमच्या उष्ट्यावर व कृपेवर मी वाढलों व जगलों. परंतु आतांच कां एवढा जड झालों ?

देव : चोखोबा, तुझ्या सारखा अनन्यभक्त मला भेटणार नाहीं रे. माझें अंतःकरण कसें विदीर्ण होत आहे तें तुला कसें सांगूं ?

चोखा : देवा !

देव : चोखोबा, माझ्यानें अधिक बोलवत नाही रे.

चोखा : देवा, शेवटी तुझें श्रीमुख, ती चंद्रभागा व ही पंढरी मला कायमची अंतरणार ना ?

देव : चोख्या, तू माझ्या प्राणाचा प्राण आहेस. तूं सर्व जाणतोस.

चोखा : होय देवा. मला भोगलेंच पाहिजे.

देव : चोख्या, ज्ञानदेवांची अक्षरें विसरलास काय ?

चोखा : नाहीं, देवा मी ज्ञानदेवांना कसा विसरू ? माझ्या ज्ञानदेवांचीं सर्व अक्षरें मी माझ्या हृदयांत कोरून ठेविलीं आहेत:—

" जगाची शुभा शुभें लिहिती । प्राणियांच्या मानसांचा झाडा घेती ।
मग केलियानुरुप होती । भोग नियम जे ॥ "

देव : तुला आतां त्याप्रमाणें तयारीस लागलें पाहिजे.

चोखा : होय देवा, मी जातों आतां. ही माझी शेवटची भेट तुझ्या महाद्वारावर. देवा जातों मी. तुझ्या ह्या दीन भक्तावर कृपा ठेव. तुझ्या कृपेसाठीं मी अनंत क्लेश भोगले.

देव : चोख्या, माझें अंतःकरण कसें भरून आलें आहे. माझ्यानें बोलवत नाहीं रे. तूं कांहीं तरी माग रे चोख्या.

चोखा : तुझ्याकडे काय मागुं देवा ? कांहीं नको. तुझ्या कृपेचा हात माझ्यावर सदैव ठेव. देवा, प्रसन्न झालास तर एवढेंच दे—जन्मोजन्मीं पंढरीचा वास, चंद्रभागेचें स्नान, नामदेवासारख्या सद्गुरुचा अनुग्रह, ज्ञानदेवासारख्या संतांची संगती व तुझें दर्शन. याशिवाय मला कांहीं नको.

देव : तथास्तु !

चोखोबानें देवाच्या मुखकमलावर खिळलेली आपली नजर काढली. ते एखाद्या बाहुलीप्रमाणें जड अंतःकरणानें महाद्वारांतून जात होते. ' तूं माझी माउली तूं माझी माउली ' म्हणून मारलेली चोखोबांची आर्त हांक वातावरणांत अद्याप उमटत होती. देवाची नजर खालीं वळली होती. नेत्रांच्या कोपऱ्यांत अश्रूंनीं गर्दी केली होती. ते टपटप पडत होते व शांततेचा भंग करीत होते. चैतन्याला स्वस्थ बसवेना व रुक्मिणी देवीला राहावेना. ती हळूच पुटपुटली.

रु. : देवा, तुमचे म्लान मुख माझ्यानें पाहावत नाहीं.

देव : देवी, मी काय करूं ? मी माझ्या भक्तांसाठीं अव्यक्तांतून व्यक्तांत येतों. माझा हा अनन्य व लाडका भक्त कायमचा निरोप घेऊन गेला तें तूं पाहिलेंस. माझ्या नामाचा घोष महाद्वारांत आतां कोण करणार ?

रु. : देवा, ती पहा चोखोबांची जड पावलें महाद्वारापासून दूर दूर

जात आहेत. तो पहा मागें मागें वळून पहात आहे. विश्वाची सारी खिन्नता त्याच्या चेहऱ्यावर दिसत आहे.

देव : सहाजिकच आहे. त्याची व माझी या त्याच्या जन्मांत तरी कायमची ताटातूट होत आहे.

रु. : कांही झालें तरी त्याला बोलावून घ्या. त्याला नका पाठवूं मंगळवेढ्यास. तुम्हाला अशक्य असें कांहीं आहे कां ?

देव : देवी, असें कसें होईल. कर्म देवतेचे नियम मला मोडतां कसे येतील ? त्याला त्याच्या कर्मभोगांतून गेलेंच पाहिजे.

रु. : देवा, मग या आपल्या अनन्य व एकनिष्ठ भक्तासाठीं कांहींच करूं शकत नाहीं कां ?

देव : नाहीं. मला त्याला आतां वाचवितां येत नाहीं. परंतु त्याची कीर्ति अजरामर होईल. त्याची समाधि माझ्या महाद्वारापाशीं होईल आणि ती समाधि माझ्या पंढरींतील एक श्रद्धास्थान होईल. माझ्या चोख्यासाठीं पाषाणहृदयीं माणसें सुद्धां हुंदके देतील व सारें पंढरपूर चोख्यासाठीं धाय मोकलून रडेल.

रु. : देवा, त्यानें आपल्यासमोर प्रकट केलेले विटाळविषयक विचार विसरलांत वाटतें. या विटाळापायीं त्यानें व त्या समाजानें काय यातना व क्लेश भोगले आहेत त्याची जाणीव आपणास आहे ना ? त्याच्या देहाच्या अंताबरोबर त्याच्या समाजाचा विटाळ जावा असें कोणीही म्हणेल.

देव : तूं म्हणतेस तें सर्व बरोबर आहे. परंतु माणसा माणसांनीं पाडलेल्या रूढीच्या दरडी एकदम बुजत नसतात. त्याला थोडा विलंब लागतो. भविष्य काळांत एक क्षण येईल आणि या पददलित समाजांना आपलें द्वार मोकळें होईल याची खात्री ठेव.

गाभाऱ्यांत निश्चळ शांतता नांदत होती. "तूं माझी माउली" चे आर्त पडसाद वातावरणांत अद्याप घुमत होते. महाद्वारांतील चोखोबांची जाग आतां कायमची मोकळी पडली होती. आतां चोखोबा परत पंढरपुरांत येणार नव्हते. ते चंद्रभागेंत उतरणार नव्हते किंवा महाद्वारांत विठ्ठल प्रेमानें वेडे होऊन नाचणारही नव्हते !

* * *

# चोखोबांच्या जीवनांतील कांहीं लोककथा व भक्तकथा.

— १ —

पुष्कळ महार लोक कामास लागले होते. बरेच दिवस कामें चालू असल्यामुळें निवाऱ्यासाठीं आसमंतांत झोपड्या तयार झाल्या होत्या. चोखोबा-रायांच्या देखरेखीखालीं काम चालू होतें. चोखोबा हे संत असल्याची ख्याति पसरली असल्यामुळें सात्विक वृत्तीचे पुष्कळ लोक त्यांना मान देत. हाता-खालीं काम करणारे महार मजूर त्यांना लवून वागत. द्वादशीचा दिवस होता. पारणें सोडून झालें होतें. अर्ध्या दिवसाची सुटी पडली होती. चोखोबा आपल्या नित्याच्या जागेवर बसले होते. बरेच महार मजूर त्यांच्या जवळ गोळा झाले व मोठ्या अदबीनें त्यांच्या सभोंवार जागा मिळेल तेथें बसले होते. इतक्यांत चोखोबांनीं विठ्ठल नामाचा गजर केला. थोडा वेळ गजर झाल्यावर त्यांनीं आपल्या लोकांस अर्धा दिवस सुटी असल्यामुळें आपली वस्ती सोडून गावांत फिरण्यास मोकळीक दिली. भराभर सर्व महार मजूर गावांत फेरफटका करण्यास निघून गेले. फक्त एकटे चोखोबाराय आपल्या जागेवर होते. ते विठ्ठल चिंतनांत गढून गेले.

इतक्यांत त्यांच्या मुख्य अंमलदाराचा एक जासूद धांवत त्यांच्यापाशीं आला. जासूदानें चोखोबांना हाक मारली व म्हटलें —

आज आपले सर्व लोक कोठें गेले आहेत ? एक माणूससुद्धां दिसत नाहीं.

चो. : होय. खरें आहे. सुट्टी असल्यामुळें मी त्यांना बाहेर फिरण्यास आज परवानगी दिली आहे.

जा. : चोखोबा हें सर्व खरें आहे.परंतु आमच्या अंमलदारास घोड्याचा खरारा करण्यास एक मनुष्य आतां ताबडतोब पाहिजे. त्यांना तातडीनें बाहेर जावयाचें आहे.

चो. : मग काय करणार ? थोड्याच वेळांत कोणीतरी येईल म्हणजे मी त्याला ताबडतोब पाठवून देतों.

जासूद आपल्या अंमलदाराकडे गेला व कोणी महार तावडतोब मिळत नसल्याबद्दलचा चोखोबांचा निरोप सांगितला. अंमलदार अतिशय चिडला. त्यानें सांगितलें, कोणी महार नसल्यास त्यांचा मुख्य कोण असेल त्याला बोलावून आणून तावडतोब घोड्यास खरारा करण्यास सांग. जासूद परत जवळ जवळ धांवतच चोखोबांच्या जवळ येऊन ओरडला —

चोखोबा : कोणी दुसरा माणूस नसेल तर तुम्ही चला व घोड्यास खरारा करा. मला तसा हुकूम झाला आहे. तरी लवकर चला व घोड्यास खरारा करा. अंमलदार फार चिडले आहेत.

चो. : अरे बाबा, घोडा कोठें बांधला आहे ?

जा. : तो अंमलदाराच्या घराबाहेरच बांधला आहे.

चो. : ठीक. मग तूं जा. घोड्याला तावडतोब खरारा होईल.

जा. : चोखोबा, तुम्ही असें कसें म्हणतां ? आपण प्रत्यक्ष चला व घोड्यास खरारा करा. अंमलदार फार रागावले आहेत. नाहींपेक्षां आपली धडगत बरी दिसत नाहीं. त्वरा करा.

चो. : बाबा, मी तुला सांगतों ना ? तूं जा. घोड्यास खरारा केला जाईल.

चोखोबा आपल्या जागेवरून उठले नाहींत. जासूद पळतच मागें गेला. त्याला पण चोखोबांचा राग आला होता. आपण न उठतां खरारा होईल असें हा माणूस म्हणतो. जागचा उठत पण नाहीं. तेव्हां याचें बरें दिसत नाहीं. जासूदानें अंमलदाराचे घरीं जाऊन त्यास सर्व हकिगत सांगितली. अंमलदारास अतिशय चीड आली व तो शिव्या देतच रागानें बाहेर आला. चोखोबाला काय शिक्षा द्यावी ह्या विचारांत तो होता. इतक्यांत सहज त्याची नजर बाहेर बांधलेल्या घोड्याकडे गेली. त्याला आश्चर्य वाटलें. त्याचा डोळ्यांवर विश्वास बसेना. त्यानें त्या जासूदाकडे पाहून परत विचारलें,

अंम. : अरे, तो चोख्या काय म्हणाला तुला ?

जा. : तूं जा. घोड्यास खरारा होईल.

आ वासून तो अंमलदार त्या घोड्याकडे पाहात होता. घोड्याला खरारा केला जात होता. परंतु ज्या हातानें तो खरारा होत होता तो हात त्याला

प्रत्यक्ष दिसत नव्हता किंवा कोणी माणूस दिसत नव्हता. त्याला चोखोबावर रागावल्याबद्दल व अपशब्द वापरल्याबद्दल खेद झाला. तो तावडतोब त्या जासूदाबरोबर चोखोबाकडे जाऊन त्यांच्या पाया पडला व त्यानें क्षमायाचना केली. चोखोबांची योग्यता त्याला कळून चुकली होती.

**टीप :** ही लोककथा पंढरपुरांतील ह. भ. प. श्री. शंकरबुवा नामदेव शेट्ये यांनीं दिली. हे सेनामहाराजांच्या समाजांतील असून जुन्या पिढींतील एक किर्तनकार म्हणून ओळखले जातात. त्यांचीं कीर्तनें नेहमीं भाविक व रसाळ असतात.

— २ —

चोखोबानें चोरून देवळांत शिरून देवाचें दर्शन घेतलें व देव बाटविला; त्यामुळें पंढरपुरांत सर्वत्र चर्चा चालू होती. जो तो चोख्याला दोष देऊं लागला. देवाची पूजाअर्चा बंद पडली. भक्तांची रीघ थांबली. पुढें काय करावें याची चर्चा ब्राह्मण वर्गांत चालू होती. कर्मठ, देव बाटला म्हणून हाकाटी करीत होते. अशावेळीं मद्रासकडील एक धनाढ्य व्यापारी विठ्ठल दर्शनासाठीं पंढरपुरास आला. त्याच्या बरोबर बरीच माणसें व लवाजमा होता. सुमारें १०० बैलगाड्यांत सामान सुमान व पूजासाहित्य भरलें होतें. त्या व्यापाऱ्यानें देवाची महापूजा करण्याचा आपला मानस पुजाऱ्याकडे व्यक्त केला. तथापि पूजारी म्हणाले देव बाटला आतां कसली पूजा नि कसली अर्चा. व्यापाऱ्यानें गळ घातली व सांगितलें कीं देव बाटला असला तरी आपण मोठी समराधणा घालून देवाचें शुद्धिकरण करूं. वाटेल तेवढे पंडित व शास्त्री बोलवा. मी सर्व खर्च करण्यास तयार आहे. सात दिवस अहोरात्र मंत्रघोष करून व ब्राह्मणभोजन घालून देवाचें शुद्धिकरण करावें. तसेंच वाटेल तेवढ्या ब्राह्मणाचा भोजन खर्च करण्यास तो तयार झाला. शेवटीं सर्व शास्त्री व पंडित यांनीं एकमतानें देवाचें शुद्धिकरण करण्याचें ठरविलें व तो दिवस नक्की केला.

नीचाचे संगती देवो विटाळला । पाणियें प्रक्षाळोनि सोंवळा केला ॥१॥
मुळिंच सोंवळा कोठें तो गोंवळा । पाहतां पाहाणें डोळा जयापरी ॥२॥
सोंवळ्याचे ठाई सोंवळा आहे । वोंवळ्या ठाईं वोंवळा कां न राहे ॥३॥
चोखा म्हणे देव दोहींच्या वेगळा । तोचि म्यां देखिला दृष्टीभरी ॥४॥

अशा तऱ्हेनें सात दिवस समरधणा चालू होती. शेवटच्या दिवशीं असंख्य ब्राह्मणांच्या पंक्ति भोजनास बसल्या होत्या. मद्रासचा व्यापारी सारा खर्च व साहित्य पुरवीत होता. जेवणाच्या पंक्ति चालू असतांना तो व्यापारी पंक्तिमधून जाऊन भरपूर खा म्हणून सर्वांना आग्रह करीत होता. त्या दिवशीं त्यानें आपले अंगावरील नेसत्या वस्त्राशिवाय सारे कपडे उतरून ठेविले होते. लोक त्याच्याकडे टकमक पाहात होते. आधींच काळा दिसणारा तो व्यापारी आज अधिक काळा दिसत होता. महार लोक घालीत तसली झुलपी त्याच्या कानांत होती व गळ्यांत काळा दोरा होता. जानवें कुठेंच दिसत नव्हतें. लोक आपसांत कुजबुजूं लागले. आस्ते आस्ते गोंगाट सुरू झाला. त्यांची खात्री झाली कीं तो व्यापारी खरोखर महार असावा. शेवटीं ब्राह्मणांच्या मुख्यानें त्या व्यापाऱ्याकडे रोखून पहात रागानेंच विचारले—

मुख्य. : अरे, तूं जातीनें कोण आहेत ? ब्राह्मण कीं महार ?

व्या. : महाराज, आपण कोण आहांत ? ब्राह्मण कीं महार ? आपलीं जानवीं कुठें आहेत ?

सर्व ब्राह्मण आपापल्या यज्ञोपवितांकडे पाहूं लागले. त्यांना आश्चर्य वाटलें. कोणाच्याच गळ्यांत यज्ञोपवित नव्हतें. ते सारे कावरे बावरे झाले. शेवटीं एक वृद्ध ब्राह्मण त्यांना म्हणाला—अरे तो कोणी तरी महापुरुष असला पाहिजे. तरी त्यालाच शरण जाणें हें योग्य.

नंतर त्या सर्वांनीं त्या व्यापाऱ्याची क्षमा मागितली व आपल्या जानव्यांची मागणी केली. तो व्यापारी हंसत हंसत म्हणाला, तुमची सारी जानवीं चोखोबांच्या घरीं आहेत. तीं घेऊन या. सर्व ब्राह्मण चोखोबांच्या झोपडीजवळ धांवतच गेले. कितीतरी जान्हवी चोखोबांच्या तुळसी वृंदावनावर पडलीं होतीं. लगेच उचलून त्या सर्वांनीं एक एक आपल्या गळ्यांत घातलें व परत देवळांत परतले. परत येऊन पहातात तो तेथें तो व्यापारी नव्हता किंवा त्याचा लवाजमा पण नव्हता. त्या सर्वांना ईश्वराच्या लीलेचें आश्चर्य वाटलें.

चोखोबाबद्दल लोकांचा आदर वाढला.

— ३ —

चोखोबांना हद्दपार केल्यावर त्यांनीं चंद्रभागेच्या पलीकडील काठावर दीपमाळा बांधली व त्याच्यावर बसून ते विठ्ठलाचें भजन करीत. लिंबाचें झाड तेथें जवळच होतें. लहानशी झोपडी बांधून ते व त्यांची पत्नि सोयराबाई अशी दोघेंजण राहात. एके दिवशीं ते लिंबाच्या झाडाखालीं बसून आपलें जेवण घेत होते. प्रत्यक्ष विठ्ठल त्यांचेकडे आले होते. देवपण त्यांच्याबरोबर भोजन करीत होते. इतक्यांत दहीं संपलें म्हणून चोखोबांनीं सोयराबाईस दहीं वाढण्यास सांगितलें. सोयराबाई दहीं घेऊन आली. परंतु धक्का लागल्यामुळें थोडें दहीं खालीं पडलें. देव तेथें बसले होते तें सोयराबाईस दिसत नव्हतें. चोखोबा सोयराबाईवर ओरडले—“ अग, देव जेवीत असलेले तुला दिसत नाहीं कां ? पहा, देवाच्या पीतांबरावर दहीं पडलें व पीतांबर खराब झाला. ”

मोठ्यानें ओरडलेले शब्द एका पुजाऱ्याच्या कानावर पडले. तो पुजारी त्या बाजूस कांहीं कामानिमित्त गेला होता. तो सहज तेथें उभा होता. मोठ्यानें बोललेले शब्द त्याच्या कानीं गेले. त्याला देव दिसत नव्हता. त्याला वाटलें चोखोबा, देव आपल्याकडे जेवतो हें मुद्दाम दाखवावयाचें आहे म्हणून मोठ्यानें बोलत आहे. त्या पुजाऱ्यास राग आला. तो धांवतच चोखोबांच्या जवळ गेला व त्यानें चोखोबांच्या गालावर एक चपराक मारली व म्हणाला— ‘ काय रे, देव तुझ्याकडे जेवावयास येतो काय ? त्याला कोठें जेवण मिळत नाहीं वाटतें ? ” असें म्हणून त्या ब्राह्मण पुजाऱ्यानें चंद्रभागेंत उडी मारून स्नान केलें व नंतर देवळांत गेला. देवाकडे पाहतो तो देवाचा गाल फार सुजलेला होता. पीतांबरावर दह्याचे डाग पडले होते. त्याला पश्चात्ताप झाला. तो धांवत चोखोबाकडे गेला व त्यांची क्षमा मागितली. परत तो देवळांत आला. देवाच्या गालाची सूज आतां साफ बरी झाली होती.

— ४ —

इंद्रलोकांत अमृत पुष्कळ दिवस राहिल्यानें त्याची गोडी नष्ट होत चालली होती. इंद्राला मोठी काळजी वाटूं लागली म्हणून त्यानें एके दिवशीं नारदास प्रश्न केला व विचारलें कीं अमृताची गोडी कमी होत चालली आहे तरी काय उपाय करावा ?

नारद म्हणाले कीं हे इंद्रा, तुझ्या स्वर्गांत आतां अमृताची गोडी वाढणार नाहीं, करिता भूतलावर पंढरपूर म्हणून एक अतिपवित्र असें तीर्थक्षेत्र आहे. तेथें नेऊन तें शुद्ध करून घ्यावें लागेल. तें कधीं न्यावयाचें तें मी तुला सांगेन. इंद्र या गोष्टीस तयार झाला. सोमवार एकादशीस पंढरपुरास नारदानें इंद्राला व इतर देवांना नेलें. त्यावेळीं तेथें कीर्तन सोहळा चालू होता. नामदेव कीर्तन करीत होते. ज्ञानदेव, जनाबाई, नारद व इतर भक्तमंडळीही आनंदानें नाचत होती. इंद्र व इतर देव यांनीं पण या सोहळ्यांत भाग घेतला होता. हा सोहळा चंद्रभागेच्या कांठावर चालू असतां चोखामेळा आपल्या घरीं होते. त्यांच्यावर बंदी असल्यामुळें ते या सोहळ्यांत नव्हते. त्यांचा व त्यांच्या पत्नीचा एकादशीचा उपवास होता. तिसऱ्या प्रहरी देव त्यांच्या घरीं आले व म्हणाले कीं—"आम्ही सारेजण तुमच्याकडे आज पारणें सोडण्यासाठीं येणार आहोंत." लगेंच ही बातमी चोखोबांनीं आपल्या पत्नीस सांगितली व भोजनाची तयारी करण्यास सांगितलें. थोड्या वेळानें ज्ञानेश्वर, नामदेव आदिकरून सारे संत, विठ्ठल, इंद्र व इतर देव मिळून चोखोबांचे घरीं आलें. देवानें ऋद्धिसिद्धिंना पाठवून सर्व भोजनाची व्यवस्था करून ठेविली होती.

**विठोबा पाहुणा आला आमुचे घरा । निंबलोण करा जीवेंभावें ॥ १ ॥**
**पंचप्राण ज्योती ओंवाळुनी आरती । ओवाळीला पती रखुमाईचा ॥ २ ॥**
**षड्रस पक्वानें विस्तारिलें ताट । जेवूं एकवट चोखा म्हणे ॥ ३ ॥**

त्यानंतर सर्व मंडळीं भोजनास बसली. त्यावेळीं देवेन्द्रानें आपल्या अमृताचा कलश पुढें केला व देवाला तें शुद्ध करण्याची विनंति केली. देवानें चोखोबाकडे पाहिलें व त्यांना तें शुद्ध करण्यास सांगितलें. त्यावरून चोखोबा व त्यांची पत्नी सोयराबाई यांनीं आपली करांगुली लावून अमरनाथांचें अमृत शुद्ध करून दिलें.

नंतर भोजनें उरकल्यावर तांबूल देण्यांत आले. सर्वजण आपापल्या स्थानीं गेले.

— ५ —

चोखोबांना दीर्घकालपर्यंत मूलबाळ नव्हतें. सोयराबाई खिन्न व उदास होती. देवानें हें जाणून एक दिवस एका वृद्ध ब्राह्मणाचें रूप धरून त्यांच्या घरीं गेला. आपणास भूक फार लागली आहे असें सांगून कांहीं तरी खावयास तो वृद्ध ब्राह्मण मागूं लागला. तिनें परोपरीनें त्याला सांगितलें कीं ती महार असल्यामुळें ब्राह्मणास खाऊं देणें योग्य नव्हतें. परंतु तो ब्राह्मण तिचें ऐकेना. तो फार व्याकुळ झाला होता. शेवटीं सोयराबाईनें नाईलाजानें त्याला वाटींतून दहींभात दिला. तो त्यानें खाल्ला व तृप्त झाला. जातांना त्यानें थोडें अन्न वाटींत ठेविलें व तिला सांगितलें कीं तूं हें उरलेलें अन्न खा. तुला पुत्रलाभ होईल. तिनें तो प्रसाद म्हणून मोठ्या श्रद्धेनें खाल्ला. नंतर थोड्याच दिवसांत ती गर्भवती झाली. घरांत दुसरें कोणी मनुष्य नव्हतें व बाळंतीणीला लागणारी सामुग्रीपण घरांत नव्हती. तिनें आपली अडचण चोखोबांना सांगितली. चोखोबा आपल्या बहिणीच्या गांवीं तिला आणण्यासाठीं गेले. परंतु अगदीं थोड्याच दिवसांत तिला प्रसूति–वेदना होऊं लागल्या. तिनें देवाचा धांवा सुरू केला. देवाला संकट पडलें. देव निर्मळेचें रूप घेऊन तिच्या मदतीस धांवला. चोखोबांच्या पत्नीचें बाळंतपण देवानें केलें. मुलाचें बारसें केलें. सुमारें एक महिना देव तिच्या घरीं राहिला. नंतर देव निघून गेला.

— ६ —

एके दिवशीं तात्या कुळकर्ण्याचें घोडें मेलें होतें. ओढून नेण्यासाठीं त्यानें चोखोबास बोलावलें. चोखोबा तेथें येऊन तें मेलेलें घोडें ओढूं लागले; परंतु तें मेलेलें घोडें कांहीं केल्या ओढलें जाईना. तो कुळकर्णी चोखोबाला शिव्या देऊं लागला व जोड्यानें मारूं लागला. चोखोबा अतिशय दीन झाले. त्यांनीं देवाची करुणा भाकली. देवाला त्यांची दया येऊन ते तेथें आले व आपल्या पितांबराचे सोगे खोचून तें मेलेलें घोडें ओढण्यास चोखोबास मदत करूं लागले. शेवटीं तें घोडें दोघांनीं मिळून ओढून गांवाबाहेर नेऊन टाकलें. अर्थात् देव इतरांना दिसत नव्हता. त्या वेळच्या रिवाजाला अनुसरून कुळकर्ण्यानें दोन पायल्या दाणे घातले. किड्यांनीं

खाऊन फोलकट झालेले ते दाणे घेऊन चोखोबांनीं घरीं आणून आपल्या बायकोच्या पुढें ठेविले. त्यांची बायको म्हणाली, "बरें झालें, तात्या कुळकर्ण्याचें कोट कल्याण असो! आतां मी त्याच्या लाह्या भाजून ठेवीन. म्हणजे तुम्हाला वेठी-बिगारीला जातांना घोटभर पाणी प्यावयास उपयोगी पडतील."

त्यावर चोखोबा म्हणाले, 'अगे, हे सगळे दाणे आपले नाहींत. पायलीभर देवाचे आहेत. ते त्याला पंढरींत जाऊन नेऊन दिले पाहिजेत.' त्यांच्या सांगण्याप्रमाणें बायकोनें पायलीभर दाण्याचें गांठोडें बांधून एकीकडे ठेवून दिलें. चोखोबा तें गांठोडें घेऊन भल्या पहाटेसच उठून पंढरीला निघाले आणि देवाच्या महाद्वारांत जाऊन जेथें हल्लीं त्यांची समाधी आहे, त्या ठिकाणीं बसून दर्शनाला जाणाऱ्यां लोकांना विनंति करूं लागले. "श्री पांडुरंगाला मी आल्याची वर्दी द्या." पण त्यांच्या बोलण्याकडे कोणीही लक्ष दिलें नाहीं.

संध्याकाळ होऊन गेली. देवाची शेजारती पण झाली. तरी चोखोबा तेथेंच बसले आहेत असें पाहून पांडुरंगराय धांवत आले व चोखोबाच्या गळ्याला मिठी मारली. देवाच्या डोळ्यांतून प्रेमाश्रु वाहत होते. श्रीपांडुरंगानें विचारलें "चोखोबा! तुम्हीं आज कशा करतां पंढरपुरास आलां?" तें ऐकून चोखोबा म्हणाले, "पांडुरंगा, तूं हे आपल्या वाटयाचे दाणे घे." असें म्हणून ते दाणे त्यांनीं देवाच्या पदरांत घातले. देवानें ते बांधून ठेवले. चोखोबा मंदिरांत आल्याची साक्ष लोकांना पटावी म्हणून एका मेलेल्या म्हशीचा फरा (हाड) त्या गांठोड्यांत बांधला. हा फरा बांधण्याची गोष्ट देवानें मंगळवेढ्यांतच केली होती. चोखोबा पहाटेच्या रात्रीं तें गांठोडें घेऊन पंढरपुरास आले होते. त्यांना जेव्हां देवानें रात्रीं गाभाऱ्यांत नेलें तेव्हां देव भक्ताच्या आनंदात ती रात्र निघून गेली.

सकाळीं काकडा पाहण्याकरितां पुष्कळ लोक जमले होते. देवाची कुलुपें काढून पाहातात तो चोखा महार एका बाजूला देवाच्या पायाजवळ बसला आहे. हा प्रकार पाहून सर्व बडवे संतापले. आणि चोख्यास जोरानें ओढून म्हणाले, "तूं कोण आहेस?" चोखोबा म्हणाले, "मी मंगळवेढ्याचा

राहणारा असून महार आहे." ब्राह्मण संतापले आहेत हें पाहून चोखोबा म्हणाले, "महाराज देवानेंच मला इकडे आणलें. हा देव मला आमच्या भक्तिमळ्यांत सांपडला. हा विठू मोठा जबर असून याला पुंडलिकानें धरला आहे. त्याच्या ठिकाणीं भेदाभेद नाहीं."

बडवे रागानें म्हणाले, "अरे मुर्खा, दगडाचा देव तुला इकडे कसा आणील.? आम्ही त्याला नित्य स्नान घालतों व पुष्पहार घालतों, परंतु आमच्याशीं तो एक शब्द सुद्धां बोलत नाहीं." बडव्यांचे शब्द ऐकून चोखोबांस हसूं आलें. ते त्यांना म्हणाले, "महाराज, आपण श्रेष्ठ ब्राह्मण असून आपणास हा मोह कसा पडला? प्रत्यक्ष देवाला दगडाचा कां मानतां? नामदेवाच्या जनीबरोबर दळतो तो का दगडाचा देव?"

बडवे चिडले व म्हणाले. "मुर्खा, तूं आम्हास ज्ञान सांगूं नकोस." असें म्हणून चोखोबांना लाथा बुक्क्यांनीं मारून बाहेर घालविलें. नंतर ते देवास अभिषेक करूं लागले. इतक्यांत देवाच्या हातांत त्यांना गांठोडें दिसलें. पाहातात तो त्यांत तो फरा देवानें कमरेवरच्या हातांत इतका घट्ट धरला होता कीं कांहीं केल्या निघेना. करवत आणून कापण्याचें ठरलें, पण करवतीनें तो कापला जाईना, वाकसानेहि तुटेना आणि हाड मोठें असल्यामुळें तें काढून टाकल्याशिवाय देवाची पूजा करतां येईना. बडव्यांची पंचाईत झाली. देवाच्या हातांत तें हाड आहे हें लोकांना कळलें तर ते दर्शनास येणार नाहींत. हें हाड म्हणजे आपल्या उत्पन्नावर कुऱ्हाड आहे असें बडव्यांना वाटूं लागलें. त्यांनीं देवळाला कुलुप लावून नाना प्रकारचीं अनुष्ठानें आरंभिली. सरते शेवटीं असा विचार ठरला कीं ही मूर्ति काढून त्या ऐवजीं अशीच हुबेहूब दुसरी मूर्ति आणवून बसवावीं, परंतु ही गोष्ट आपल्या मंडळी शिवाय इतरांना समजतां कामा नये. असा विचारविनिमय झाल्यावर देवानें बडव्यांना दृष्टांत दिला.

"ज्याला तुम्ही लाथाबुक्क्या मारल्या, त्यालाच शरण गेल्याशिवाय हें हाड सुटणार नाहीं. हाडाप्रमाणें मूर्तिही काढतां येणार नाहीं. याचा विचार करा आणि मग काय करावयाचें तें करावें." अखेर दुसरे दिवशीं मंडळींत विचारविनिमय होऊन चोखोबांना मंगळवेढ्याहून आणण्याचें ठरलें.

चोखोबांना बडव्यांनीं विनंति करतांच ते त्यांचे बरोबर श्रीक्षेत्र पंढरीस येण्यास आतुरतेनें निघाले.

आणि देवाच्या मुखाकडे पाहून हाडाला हात लावतांच हाड खालीं पडलें.

— दासगणु महाराजांचें समग्र वाङ्मयमधून ही भक्तकथा घेतली आहे.

# भरोनि सद्भावाची अंजुळी

पाखांडाचें दरकुटे । मोडी वाग्वाद अव्हांटे । कुतर्कीचीं दुष्टें । सावजे फेडी ॥ जेथ चहूंकडे जळत वणवा । तेथूनि न निगिजे केविं पांडवा । तेविं लोका येऊनियां सोपद्रवां । केविं न भजिजे मातें ॥ एऱ्हवी तरी पाहीं । जे जैसे माझ्या ठायीं । भजती तया मी ही । तैसाचि भजे ॥ तैसा समस्तां या भजना । मी साक्षीभुतु पैं अर्जुना । एथ प्रतिफळे भावना आपुलाली ॥ मोराआंगीं अशेषें । पिसें असती डोळसें । परि एकली दृष्टी नसे । तैसें तैं गा ॥ म्हणोनि सानें थोर न म्हणावें । उंच नीच भाव सांडावे । एक मीचि ऐसें मानावें । वस्तुजातातें ॥ आतां हृदय हें आपुलें । चौफळूनियां भलें । वरी बैसऊं पाउलें । श्रीगुरूची ॥ म्हणोनि साधकां तूं माउली । पिकें सारस्वत तुझां पाउलीं । या कारणें मी साउली । न संडीं तुझी ॥

——ज्ञानेश्वरी

उदंड शाहाणे होवोत तार्किक । परी न कळे अलौकिक महिमा कांहीं ॥१॥
उदंड वाचन जरी झालें साचें । परी महिमान ययाचे न कळे कांहीं ॥२॥
उदंड ब्रह्मज्ञान सांगताती गोष्टी । परी अनुभव कसवटी एका नाहीं ॥३॥
संताचे उदंड घेताती सोंग । कामनेचा त्याग करितां न ये ॥४॥
उदंड वैराग्य दाखविती जन । परी वासना भोग त्याग त्यागितां न ये ॥५॥



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम.................... वि ..................
क्रमांक .................... नोंद दि ..................

कीर्तनी सांगती अनुभव गोष्टी । परी धन कांता दृष्टी त्याग नव्हे ॥६॥
चोखा म्हणे हे तो पोटाचे बांधले । म्हणोनि पांगिले घरोघरीं ॥७॥

—चोखोबाराय

धन्य नरदेहाची प्राप्ती । धन्य साधूची संगती ॥
धन्य धन्य ते भावार्थी । जे भगवद्भक्तीं रंगले ॥

—श्री एकनाथ महाराज

भाविक विश्वासी । पार उतरिलें त्यासी । तुका म्हणे नासी ।
कुतर्क्याचे कपाळीं ॥

भेदाभेद मतें भ्रमाचे संवाद । आम्हां नको वाद त्यांसीं देऊं ।
तुका म्हणे अणुं तुजविण नाहीं । नभाहुनी पाही वाड आहे ॥
मोलें घातलें रडाया । नाहीं असूं आणि माया ।
तैसा भक्तिवाद काय । रंग बेगडीचा न्याय ॥
अर्थे लोपलीं पुराणें । नाश केला शब्दज्ञानें ।
विषय लोभीं मनें । साधनें बुडविलीं ॥
सोन्याचे पर्वत करवती पाषाण । अवघे रानोरान कल्पतरू ।
परि या दुर्लभ विठोबाचे पाय । तेथें हे उपाय न सरती ॥

—तुकाराम महाराज

# परिशिष्ट

## चोखोबांचा समाधिकाळ

शके १२६० वैशाख कृष्ण ५ रोजीं मंगळवेढे येथें गांवकुसा खालीं समाधि.
शके १२६० वैशाख कृष्ण १३ रोजीं पंढरपूर येथें महाद्वारांत समाधि.

त्यांची पुण्यतिथी वैशाख वद्य पंचमीस मंगळवेढे येथें व वैशाख वद्य त्रयोदशीस पंढरपूर येथें साजरी करण्यांत येते.

## चोखोबांची पालखी

संत चोखामेळा महाराज यांची पालखी त्यांचे मेहुणे श्रीसंत बंका महार यांचें गांव मेहुणपूर येथून निघते व आळंदी येथें येते. नंतर पालखींच्या मेळाव्यांतून पंढरपूर येथें संत पेठेंत चोखामेळा मठांत उतरते.

## चोखोबांच्या समकालीन संतांचे समाधिशक व समाधिस्थानें.

| | | |
|---|---|---|
| श्रीज्ञानदेव | शक १२१८ | आळंदी |
| सोपानकाका | ,, १२१८ | सासवड |
| चांगदेव | ,, १२१८ | पुणतांबे |
| सांवता माळी | ,, १२१७ | अरणभेंडी |
| मुक्ताबाई | ,, १२१९ | मेहूण |
| निवृत्तिनाथ | ,, १२१९ | त्र्यंबकेश्वर |
| विसोबा खेचर | ,, १२३१ | औंढनागनाथ |
| नरहरि सोनार | ,, १२३५ | पंढरपूर |
| गोराकुंभार | ,, १२३९ | तेर |
| बंका महार | ,, १२४० | मेहुणपुरा |
| जगमित्र नागा | ,, १२५२ | परळी वैजनाथ |
| नामदेवराय | ,, १२७२ | पंढरपूर |
| जनाबाई | ,, १२७२ | पंढरपूर |

सेना न्हावी यांचा जन्म शक किंवा समाधिशक उपलब्ध नाहीं; परंतु यांची पुण्यतिथी श्रावण वद्य १२ ला साजरी केली जाते.


## भारत सरकारनें अस्पृश्यतेविरुद्ध केलेला कायदा

भारत सरकारनें अस्पृश्यतेचे उच्चाटण करण्याकरितां दि. ८ मे १९५५ रोजी कायदा पास केला. त्याचे नांव " धी अनूटचॅबिलीटी (ऑफेन्सेस्) ॲक्ट २२ इ. स. १९५५ चा" असें आहे. The Untouchability (offences) Act XXII of 1955 ह्या कायद्यांत अस्पृश्यतेविरुद्ध कायद्याची तरतूद केलेली असून त्याची अखिल भारतांत एकसूत्रपणा आणण्यासाठीं हा कायदा

लागू करण्यांत आला आहे. कांहीं राज्यांत अस्पृश्यतेविरुद्ध कायदे अगोदर पासूनच राज्य सरकारांनीं केले होते व त्यांचा अंमल त्या त्या राज्यांत जारी होता. तथापि भारत सरकारनें हा कायदा करून सबंध भारतास एकच कायदा लागू केला. ह्या कायद्याच्या १७ कलमान्वयें राज्य सरकारचे पूर्वींचे कायदे रद्द होऊन त्यांच्या बदली हा नविन कायदा सुरू झाला. आपल्या मुंबई प्रांतांत (हल्लीं महाराष्ट्र राज्य) इ. स. १९४७ पासून The Bombay Harijan Temple Act, 1947 [Bombay Act XXXV of 1947] हा कायदा जारी होता.

* * *

श्री चोखामेळा समाधि, पंढरपूर




पंढरीतील एक श्रद्धास्थान

व्यवस्थापक, श्रीसंत चोखामेळा मंडळ,

पंढरपूर, यांच्या सौजन्यानें.

श्री चोखामेळा समाधि, मंगळवेढे




श्री. रा. ग. करंदीकर, वकील,

मंगळवेढे, यांच्या सौजन्यानें

( फोटो : माणिक स्टुडियो, बारामती )

## श्री चोखोबांची दीपमाला, पंढरपूर



चोखोबांच्या शुद्ध भक्तिभावाची अमर कहाणी सांगत—आतां भग्नावस्थेंत कां होईना पण आज उभी असलेली त्यांची दीपमाला.

व्यवस्थापक, श्रीसंत चोखामेळा मंडळ, पंढरपूर यांच्या सौजन्यानें

( फोटो : माणिक स्टुडियो, बारामती. )

## वै. गु. शं. वा. तथा सोनोपंत दांडेकर



ह्या श्रद्धेय महापुरुषास प्रणाम !

# श्री चोखोबांचा सनाथत्वाचा संदेश

ले. श्री. भा. पं. बहिरट,
एम. ए.

इसवी सनाचें तेरावें शतक म्हणजे महाराष्ट्राच्या धार्मिक इतिहासाचें सुवर्ण युगच होय. या शतकांत श्रीज्ञानेश्वर महाराजांसारखी महान् व अद्वितीय विभूति जन्मास आली. त्यांनीं भागवत धर्माचें उज्वल स्वरूप जनतेच्या समोर तिच्याच बोलभाषेंत मांडलें. वैदिक अगर हिंदु धर्माच्या विकासाचें परिपक्व फल म्हणजे भागवत धर्म होय. पारमार्थिक ध्येय व साधना या बाबतींत महान् क्रांतीच घडली. पूर्वसूरीनी प्रतिपादल्या प्रमाणें जीवनाचें ध्येय मोक्ष नसून प्रेमभक्ती आहे, इतर सर्व साधनाहून भक्ति-साधना श्रेष्ठ असून तिचा अधिकार सर्व मनुष्य मात्रांना आहे या तत्वाचा उद्घोष श्रीज्ञानदेवांनीं हिरीरीनें केला. याच कालांत सर्व जमातीमध्यें महान् संत निर्माण झाले. श्रीज्ञानदेव स. १२७५ त जन्मले. नामदेव महाराज त्या अगोदर स. १२७० त जन्मले. गोरोबा कुंभार यांना काका म्हणत कारण ते समकालीन संतांत वडील होते. त्यांचा जन्म १२६७ सालीं झाला. विसोबा खेचर (समाधि १३०९), सांवता माळी (स. १२९५) नरहरी सोनार (स. १३१३) हे थोर संत याच कालांत उदयास आले. चोखोबा महाराज (समाधि १३३८) यांचा कालही हाच होय. त्यांना भगवद्भक्तीचा प्रसाद श्री नामदेव महाराजांचेकडून मिळाला असें बंकांनीं म्हटलें आहे.

**नामदेवें हात चोखयाचे शिरी। विठ्ठल ती अक्षरी उपदेशिले ॥**
**बंका म्हणे माझी चोखा गुरु माउली। तियेचे पाउली लोटांगण ॥**

खुद्द चोखोबांनीं श्री नामदेव-भेटीचें वर्णन केलें आहेच.

**आजि सोनियाचा दिवस धन्य झाला। प्रत्यक्ष भेटला नाम देव ॥**
**माझें मज दिलें माझें मज दिलें। माझें मज दिलें प्रेमसुख ॥**

**धन्य धन्य नामदेवा। केला उपकार जीवा ॥**
**माझा निरसिला भेवो। दाखविला पंढरिरावो ॥**
**माझी कृपेची माउली। चोखा म्हणे पान्हा घाली ॥**

याप्रमाणें नामदेवांचा प्रसाद चोखोबांना मिळाला. या कालांतील साधू-संतांना चोखोबांनीं अत्यादरें नमन केलें आहे.

**सप्रेम निवृत्ति आणि ज्ञानदेव । मुक्ताईचा भाव विठ्ठल चरणीं ॥**
**सोपान सांवता गोरा कुंभार । नरहरी सोनार प्रेमभरित ॥**
**कबीर कमाल रोहिदास चांभार । आणि अपार वैष्णव जन ॥**
**चोखा तया पायीं घाली लोटांगण । वंदितो चरण प्रेमभावें ॥**

ही सर्व संत मंडळी चोखोबांच्या समकालीन होत. चोखोबांनीं कबीराचा उल्लेख केला आहे तो ध्यानांत ठेवण्याजोगा आहे. कबीरांचा काल निर्यण उत्तरेकडील डॉ. क्षितिमोहन सेन, डॉ. हजारीप्रसाद सारखे लेखकांनीं करण्याचा प्रयत्न केला आहे. ते कबीरांचा काल नामदेवानंतर बऱ्याच वर्षांनीं मानतात. पण मराठी संतांच्या उद्गारांवरून पहातां कबीर हे ज्ञानदेव, नामदेव व चोखोबा यांचे समकालीन ठरतात. चोखोबांनी जसा वर उल्लेख केला आहे तसा जनाबाईनीही केला आहे. नामदेवांनीं चरित्रांतील प्रसंग वर्णिला आहे. कबीर हे दक्षिणेंत येऊन जनाबाईना भेटल्याची लोक कथाही प्रचलित आहे. या सर्व गोष्टी लक्षांत घेऊनच कबीरांचा काल निर्णय संशोधिला पाहिजे.

चोखोबांची गुरुपरंपरा–ज्ञानदेव–विसोबा–नामदेव–व चोखोबा अशी आहे. चोखोबा हे भागवत धर्माची चालती बोलती मूर्तीच होते. त्यांच्या रोमरोमांत प्रेमभक्ति संपूर्ण भरलेली होती. त्यांच्या हाडामासांत सुद्धां विठ्ठल प्रीतीचा झंकार निनादत होता. त्यामुळें मंगळवेढ्याच्या अपघातांत देह पडल्यावर सुद्धां त्यांच्या अस्थींतून नामध्वनी उमटत होता व त्या खुणेनें नामदेवांनीं त्यांच्या अस्थि धुंडून पंढरीस आणल्या व पांडुरंगाचे देवालयासमोर त्यावर समाधि उभारल्याची कथा आहे.

महाराष्ट्रांतील भागवत धर्माचा आद्यग्रंथ ज्ञानेश्वरी.

चोखोबांनी या अमृतमधुर ग्रंथाचें अखंड पान केलें. ज्ञानेश्वर माऊलींच्या या अमृतवाणीचें त्यांनीं वर्णन केलें.

**सुख अनुपम संतांचे चरणी । प्रत्यक्ष अलंका भुवनी नांदतसे ॥**
**तो हा महाराजा ज्ञानेश्वर माउली । जेणें निगमवल्ली प्रगट केली ॥**
**संसारी आसक्त माया मोहें रत । ऐसे जे पतित तारावया ॥**
**चोखा म्हणे श्रेष्ठ ज्ञानदेवी ग्रंथ । वाचिता सनाथ जीव होती ॥**

ज्ञानेश्वरीरुपी निगमवल्लीचें सार चोखोबांनीं मोजक्या पण सुंदर शब्दांत सांगितलें आहे. 'वाचिता सनाथ जीव होती' जीवाचे अनाथत्व नाहीसें होऊन

सनाथत्व निर्माण होणें यांत जीवनाची सफलता आहे हा ज्ञानेश्वरीचा संदेश आहे. तो चोखोबांनीं मार्मिकपणें विशद केला आहे. हा संदेश हेंच चोखोबांचें जीवन सूत्र होते व समाजांतील प्रत्येक व्यक्तीनें या जीवनसूत्रानुसार आपल्या आयुष्याची आखणी केली पाहिजे असें त्यांनीं अट्टाहासानें प्रतिपादन केलें. अशी आखणी केली नाहीं तर मोलाचा नरदेह माती मोल होतो. मनुष्यांत व पशूंत अंतर रहात नाहीं. ' आला नरदेही पाही । शुद्धी नेणे ठाइचे ठाई । ' ' आपुला विचार न कळे जयासी । ते या संसारासी पशू आले ।। '

जीवाचें सनाथत्व अनुभविणें हा परम पुरुषार्थ होय. सामान्य मनुष्याचें सर्व आयुष्य अनाथत्वाच्या मार्गानें जात असते. जीवनाचें खरें स्वरुप व त्याची शाश्वत-आधारभूमी यांची त्यास ओळख नसते. कोणत्या तरी आधारानें, आश्रयानें तो जगत असतो. सुखदुःखाच्या लाटांवर हेलकावे खात असतो. मानवी जीवनाची त्यास सामग्र्यानें जाणीव नसते. देह, इंद्रियें, प्राण, मन, बुद्धी, अहं एवढ्या पुरतीच त्याची दृष्टी मर्यादित असते. यापैकींचा एकादा आधार धरून तो जगत असतो. कोणी शरीर सुखांतच रमतो. कोणी मनाचा छंद व आवडींतच रमतो. कोणी बौद्धिक तर्कवादांतच रमतो. ही सर्व जीवनाचीं अंगें आहेत व त्यांचें योग्य पोषण होणें आवश्यक असतें. पण त्यांत तरतमभाव पहाणें मूल अंगाच्या पोषणास ही सर्व साधनीभूत करणें अत्यावश्यक असतें. या सर्वांचें मूल्य हें साधन-मूल्य असतें. साध्य मूल्यावर दृष्टि रोखूनच साधन-मूल्यें विकसित करावीं लागतात.

देह,. इंद्रियें, मनबुद्ध्यादिक हे स्वतंत्र नसून त्यांना चालविणारी परमात्म शक्ति आहे. तिची जाणीव सतत असणें आवश्यक असतें. या सत्तेसच संतांनीं विठ्ठल म्हटलें आहे.

**श्रवणाचें श्रवण घ्राणाचें जें घ्राण । रसने गोडपण विठ्ठल माझा ।।**
**वाचा जेणें उठी डोळा जेणें भेटी । इंद्रियांची रहाटी विठ्ठल माझा ।।**
**प्राण जेणें चळे मन जेणें बोले । शून्यातें वेगळें विठ्ठल माझा ।।**
**आनंदी आनंद बोधा जेणें बोध । सकळां आत्मा शुद्ध विठ्ठल माझा ।।**
**मुळाचें निजमूळ अकुळाचें कुळ । चोखा म्हणे निजफळ विठ्ठल माझा ।।**

परमात्म सत्तेचा व मानवी जीवनाचा संबंध अत्यंत निकटचा व जिव्हाळ्याचा आहे. हा संबंध डावलून सामान्य जीव जीवनाचीं अंगें पुष्ट करण्याचा प्रयत्न करतो. पण शेवटीं त्याच्या वाट्यास वैफल्यच येतें. विज्ञानाचे अनेक आश्चर्यकारक शोध लागले, अनेक सामाजिक वा आर्थिक सुधारणा झाल्या. तरी मानवी स्वभाव बदलला

नाहीं तर समाज वरचेवर अधोगतीस जाऊं लागतो. विज्ञान हें विज्ञानाचा सदुपयोग कसा करावा हें सांगू शकत नाहीं. तें सांगण्याचें काम नितिशास्त्राचें असतें. नीति शास्त्राचा अढळपाया धर्म हा होय. धर्म म्हणजे आचार कांड, व्रतवैकल्यें व अगर कांहीं भोळसट समजुतींचा संच नसून जीव परमात्म्याच्या जिव्हाळ्याच्या अभेद्य प्रेमतंतूवर दृढ व डोळस श्रद्धा होय. या श्रद्धेनें जगणें म्हणजे सनाथत्वानें जगणें होय.

सनाथत्वानें जगण्याच्या आड मनुष्य स्वभावांतील कांहीं गोष्टीच येतात. विपरीत वासना आडकाठी करतात. त्या दूर सारून पुढें पाऊल टाकावें लागतें. मन सुव्यवस्थित असेल तर जीवन सुव्यवस्थित. तेंच विपरीत वासनांनीं भरलें असेल तर जीविताची धूळधाण होते. अशा मनास वाटेल तें वागण्यानें परमार्थ दुरावतो. अशा मनाची संगत म्हणजे कुसंगतच होय.

**याचिया छंदा जे लागले प्राणी। त्याची धुळधाणी केली येणें ॥**
**याचा संग पुरे याचा संग पुरे। अंतरी ते उरे हांव हांव ॥**
**स्वार्थ परमार्थी घातिलासे चिरा। किती फजितखोरा बुझवावें ॥**

परमार्थ साधण्यास–सनाथत्वाचें जीवन संपादण्यास प्रथम चित्तशुद्धि अथवा मनःसंयमाची आवश्यकता आहे. परमात्म्याच्या चिंतनानें चित्त शुद्ध होतें.

**वाया हाव भरी नका घालूं मन। चिंतावे चरण विठोबाचे ॥**
**काम क्रोधाचे न पडती आघात। वाचे गाता गीत राम नाम ॥**

नामस्मरण व चिंतनानें चित्तशुद्धी होते म्हणजे मनावर कामक्रोधाचे आघात होत नाहींत. रजोगुण व तमोगुण नाहींसे होऊन सत्वगुणाची वृद्धि होते. सात्विकता हा स्थायिभाव बनतो. हा अनुभव प्रत्यक्ष आहे असें चोखोबा सांगतात. नामानें विषाचेंही अमृत बनतें.

**नामाचें सामर्थ्ये विष ते अमृत। ऐसी हे प्रचित आहे जीवा ॥**

चित्तांतील दुष्ट वासनेचें विष नाहीसें होऊन तेथून प्रेमामृताची सरिता वाहूं लागते. प्रेमामृताच्या उदयाबरोबर परमात्म मीलनाची पर्वणी लाभते. जीवाचा व शिवाचा संगम होतो. त्यासाठीं घरदार त्याग वा तीर्थतप पुरश्चरणाची गरज नसते.

**योग याग तप व्रत आणिदान। करितां साधन नाना कष्ट ॥**
**सुलभ सोपारे नाम विठोबाचे। सकळ साधनांचे मूळ बीज ॥**
**सुखाचें सुख नाहीं याता याती। बैसोनी एकांती नाम स्मरा ॥**
**त्रैलोक्य वैभव वोवाळुनी सांडावें। नाम सुखें घ्यावें विठोबाचें ॥**

घर सोडून रानांत गेले तरी शरीर, वासनादिक बरोबर येतातच—

**जयासाठीं जातो वनाप्रती । ते तो सांगाती येती वळें ॥**
**जयाचियासाठीं टाकिला संसार । ते तो बळवत्तर पाठी येती ॥**
**चोखा म्हणे नका होऊ परदेशी । चिंती विठोबाशी हृदयामाजीं ॥**

संसारांत राहूनच सत्संगती व नामाची आवडी धरावी. त्यामुळें पद्मपत्राप्रमाणें संसार करूनही अलिप्त राहशील.

**असोनी नसणें संसाराचे ठायीं । हाचि बोध पाही मना घ्यावा ॥**
**संतांची संगती नामाची आवडी । रिकामी अर्धघडी जावो नेदी ॥**
**काम क्रोध सुनेपरी करी दूर । सहपरिवारी दवडी बापा ॥**
**चोखा म्हणे सुख आपोआप घरा । नाहीं तर फजितखोरा जासी वाया ॥**

निर्गुण प्रभूच सगुण रूपानें अवतरतो. त्यामुळें दोन्ही रूपें त्याचीच. संत हे सगुणनिर्गुण दोन्ही मिळून प्रेमानंदात निमग्न असतात.

**निर्गुणा अंगी सगुण बाणलें । निर्गुण सगुण एकत्वा आले ॥**
**शब्दाची खूण जाणती ज्ञानी । येरा गावाळ अवघी कहाणी ॥**
**निवृत्ति ज्ञानदेव सोपान भले । निर्गुण सगुण त्याही गिळियलें ॥**
**चोखा म्हणे त्यांच्या पायींच्या पादुका । वागवितो देखा ऐक्यपणें ॥**

निर्गुण परमात्माच सगुणरुपानें पंढरींत उभा आहे. तो फक्त भाव पाहतो. जातीकडे पहात नाहीं.

**भाविकांच्या लोभा होउनि आर्तभूत । उभाचि तिष्ठत पंढरीये ॥**
**वर्ण अभिमान न धरी कांहीं चाड । भक्ति सुख गोड तया लागी ॥**
**भक्तीचा आळुका भावाचा भुकेला । न कळे ज्याची लीला ब्रह्मादिका ॥**

पंढरीनाथ हा जीवाचें जीवन आहे. तोच जीवनाचा नाथ आहे. त्याचें नाथत्व ओळखून जीवनांत त्याच्या प्रेमभक्तीचा रस अनुभविणें हें जीवनाचे सनाथत्व होय.

या रसानुभूतीस्तव पंढरी निर्माण झाली. पंढरीची वाट म्हणजे सनाथत्वाची प्रेमानुभूतीची वाट होय. या वाटेनें सर्वांनीं चालल्यास महालाभ पदरीं पडतो.

**टाळी वाजवावी गुढी उभारावी । वाट हे चालावी पंढरीसी ॥**
**खट नट यावे शुद्ध होउनी जावें । दवंडी पिटी भावें चोखामेळा ॥**

याप्रमाणें चोखोबांनीं दवंडी पिटून भागवत धर्माचा संदेश जगास सांगितला आहे. परमात्मभक्ति हे मानवी जीवनांतील अंतिम मूल्य होय. या मूल्याविना असणारे जीवन इतर कितीही गोष्टींनी समृद्ध असलें तरी ते दरिद्रीच होय. प्राणपणानें प्रत्येक व्यक्तीनें हें श्रेष्ठ मूल्य जतन केलें पाहिजे ही गोष्ट चोखोबांनीं स्वतःच्या आचरणानेंच दाखविली. अपघाती मृत्यूच्या प्रसंगीसुद्धां हें मूल्य त्यांनीं सांभाळलें. त्याचे झंकार त्यांच्या अस्थितून उमटले! आजकालच्या संघर्ष, मत्सर, द्वेष, सुखलोलुपता इत्यादि दुर्गुणांनीं बुजबुजलेल्या समाजास चोखोबांच्या संदेशाची व आदर्शाची तर अत्यंत गरज आहे. हा आदर्श व संदेश समाजांतील प्रत्येक व्यक्तीनें हृदयीं धरून आचरणांत आणला तरच याही दुरवस्थेतून पार पडण्याचें सामर्थ्य लाभूं शकेल व समाजांत सद्धर्म, सदाचार व सनाथत्व यांचें साम्राज्य नांदू लागेल.

# श्री संत चोखोबा महाराज यांचें चरित्र

लेखक—श्री. **रा. ग. करंदीकर,** वकील, मंगळवेढे

मंगळवेढे ही पुण्यभुमि आहे. पुष्कळ संतांची कर्मभुमि आहे. विशेषतः श्री संत चोखामेळा महाराज, श्री कान्होपात्रा व श्री संत दामाजीपंत या संतांचें नांवें मंगळवेढे प्रसिद्ध आहे. पंढरपूराचे दक्षिणेस चौदा मैलावर मंगळवेढे गांव आहे. श्री संत चोखामेळा हे संत ज्ञानेश्वर समकालीन होते. श्री चोखोबाचे एका अभंगावरून त्यांचे समकालीन कोण होते, तें समजते.

**सप्रेम निवृत्ती आणि ज्ञानदेव। मुक्ताबाईचा भाव विठ्ठल चरणीं ॥**
**सोपान सांवता गोरा तो कुंभार। नरहरि सोनार प्रेम भरित ॥**
**कबीर कमाल रोहिदास चांभार। आणिक अपार वैष्णव जन ॥**
**चोखा तया पायीं घाली लोटांगण। वंदितो चरण प्रेम भावें ॥**

या सर्व संत मंडळींचा सहवास व संत समागम श्रीचोखोबांस झाल्यामुळें त्यांचे ठिकाणीं परमेश्वराची निस्सिम भक्ती व वैराग्य निर्माण झालें होतें. बाकी संताप्रमाणें तेही एक अवतार पुरुष होते. मागील जन्मीं कृष्ण निंदा फार केली, म्हणून पूर्वी जरी निळाचा अवतार होता तरी याजन्मीं महार जन्म प्राप्त झाला असें त्यांनीं एका अभंगांत म्हटलें आहे. त्यांचे आईवडील हे श्रीपांडुरंगाचे भक्त असल्यामुळें व श्रीपांडुरंगानें त्याचे आईपासून एक आंबा ब्राह्मणाचे रुप घेऊन चोखून खाल्ला म्हणून या मुलाचें नांव चोखामेळा असें तिचे आईनें ठेविलें अशी आख्यायिका आहे.

पुष्कळ साधुसंताचे जन्म ठिकाण तारीख अथवा कुलवृत्तांत याची फारशी माहिती मिळत नाहीं. तसेंच थोडेसें श्री चोखामेळाबद्दल आहे. पण त्यांचे समकालीन जनाबाई, श्री संत नामदेव वगैरेंनी अथवा त्यांचे मागून झालेल्या श्री संत तुकाराम, महिपती वगैरेच्या अभंगातून जी माहिती मिळते त्यावरून त्यांचे चरित्राची रुपरेषा ध्यानांत येते.

श्री चोखामेळा यांचा जन्म कोणत्या गांवीं झाला हें नक्की सांगतां येत नाहीं. श्री महिपती म्हणतात श्री चोखामेळा पंढरपूरचे व पंढरपूरास राहात होते. कै. वि. ल. भावे आपल्या महाराष्ट्र सारस्वतांत म्हणतात कीं चोखामेळा मंगळवेढेचे राहणारे तर प्राचीन मराठी संतकवि या ग्रंथांत श्री जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर म्हणतात कीं एकदां डॉ. आंबेडकरांनीं त्यांना सांगितलें कीं चोखामेळा हे वऱ्हाड प्रांतातील असावे. पण वारकरी समाजाची निष्ठा आहे कीं चोखामेळा मंगळवेढ्याचे आहेत.

चोखामेळा यांचा जन्म कधीं झाला याबद्दल निश्चित शक अथवा तारीख मिळत नाहीं. त्यांचे मृत्यूबद्दल जसे जनाबाईचे व नामदेवाचे अभंग असून त्यांत शक महिनावार आहे तसा जन्म तारखेबद्दल एकादा अभंग मला सांपडला नाहीं.

श्री चोखामेळ्याचे सर्व घराणेंच भगवद्भक्त होतें. त्यांची बहिण निर्मला ही मंगळवेढे येथें रहात होती. असे कै. वा. ल. भावे म्हणतात; पण ती मेहूणपुरी येथे राहात होती, असे चोखामेळ्याची पत्नी सोयराबाई हिच्या एका अभंगात म्हटलें आहे. चोखोबाची बहिण निर्मला ही असेंच म्हणते—

**संसाराचे भय घेऊनी मानसी । चोखा मेहूणपूरासी जाता झाला ॥**
**देखोनि निर्मला आनंदे मनीं । धावोनी चरणीं मिठी घाली ॥**

निर्मला ही चोखोबाची बहिण असून तिचे सुद्धां पुष्कळ अभंग आहेत. बायको सोयराबाई हिनें केलेले पुष्कळ अभंग प्रसिद्ध आहेत. बंका हा सोयराबाईचा भाऊ. तो सुद्धां भगवद्भक्त होता व त्याचेही पुष्कळ अभंग प्रसिद्ध आहेत. ही सर्व मंडळी कशी वागत होती, याबद्दल श्री नामदेव महाराज आपल्या एका अभंगांत म्हणतात.

**चोखा आणि बंका सोयरा निर्मला । स्नान प्रातःकाळीं चंद्रभागे ॥**

अशा रितीनें प्रातःकाळीं स्नान करून गंध लावून श्री चोखामेळा महाद्वारीं येऊन श्री पांडुरंग दर्शन घेत असत. नंतर आपला कामधंदा करून पुन्हा सायंकाळीं महाद्वारीं बसून पांडुरंगाचें नामस्मरण करीत असत. चोखामेळा यांना पुष्कळ वर्षे मूल झालें नाहीं. तेव्हां मूल व्हावे अशी सोयराबाईची इच्छा होती. बंका म्हणतात.

**बहु दिवस करी प्रपंचकारण । परी नव्हे संतान तिजलागी ॥**
**बैसोनी एकांती आठवी पंढरीराणा । म्हणे का वो नारायणा विसरलासी ॥**
**चोखियाची कांता चिंताक्रांत मनीं । संसारी असोनि उदासवृत्ति ॥**

पण पुढें श्री पांडुरंग सोयराबाईस प्रसन्न झाले व ते वृद्ध ब्राह्मणाचें रूप घेऊन चोखोबाचे घरीं गेले, व तेथें त्यांनीं खावग्रास मागितलें. तिचे घरीं जें शिळेपाकें होतें तें थोडें श्री पांडुरंगानीं खाल्लें व उरलेलें थोडें सोयराबाईस प्रसाद म्हणून खाण्यास दिलें. त्यामुळें ती गरोदर राहिली.

**कौतुके आनंदे लोटला कांहीं काळ । तो आले असे फळ प्रसादाचे ॥**
**चोखियाची कांता झालीसे गर्भिण । लागलासे पूर्ण नववा मास ॥**

पण चोखामेळा यांची वृत्ति संसारांत नेहमीं उदास व वैराग्यपूर्ण होती. बायकोस नववा महिना लागला आहे. आतां बाळंतपणाची तयारी करा असें चोखोबास सांगताच–

**येरू म्हणे विठू पुरवील सामग्री । भार तयावरी घातिलासे ॥**

असें म्हणून चोखोबा मेहूणपुरी आपली बहिण निर्मळाकडे जाऊन बसले. घरीं बायकोस न कळवितां चोखोबा निर्मळेकडे आले आहेत असें कळताच निर्मला विचारते–

**न पुसता कां वा आलासी धांवत । वहिनी आकांत करतील कीं ॥**
**ऐसा हा घोर कोणे वागवावा । म्हणोनी तुझे गांवा वेगे आलों ॥**

याप्रमाणें चोखोबा मेहूणपूरी राहिले व निर्मळा सोयराबाईचे बाळंतपण करण्यास पंढरपूर येथें गेली. पण चोखोबांची स्थिती मात्र कशी झाली हें खालील ओळीवरून दिसेल.

**रात्रंदिवस छंद विठ्ठल नामाचा । नाहीं संसाराचा हेत मनीं ॥**
**बहु दिवस झाले खंती वाटे मना । पंढरीचा राणा आठवत ॥**

तिकडे चोखोबा परमेश्वरावर भार घालून नामस्मरण करीत बसले आहेत व इकडे कर्ममेळाचा जन्म होऊन श्रीपांडुरंग त्याचें बारसें करीत आहेत.

**उपजता कर्ममेळा । वाचे विठ्ठल सांवळा ॥**
**विठ्ठल रुक्मिनी । बारसें करी आनंदानें ॥**

काय हा भक्तीचा महिमा! प्रत्यक्ष श्रीपांडुरंग भक्ताचे सर्व मनोरथ पुरवित आहे. ही सर्व पार्श्वभूमि असल्यामुळें कर्ममेळासुद्धां मोठा भगवद्भक्त म्हणून

प्रसिद्ध झाला. अशा रितीनें हें घराणें संसार करीत होतें. पण चोखोबांची वृत्ति मात्र खालीलप्रमाणें होती—

**घरदार वोखटें अवघें फलकटें । दुःखाचें गोमटे सकळही ॥**
**नाशिवंतासाठीं रडती रांडा पोरें । काय त्याचे खरे स्त्री पुरुष ॥**

– महार म्हणून छळ –

सर्व माणसें ही परमेश्वराची लेकरें आहेत व म्हणून परमेश्वराची भक्ति करण्यास जात गोत आडवें येत नाहीं. भागवत धर्म व वारकरीपंथ हेंच सांगतो. पण ७००–८०० वर्षांपूर्वी समाजांतील रूढी अथवा वागणें पाहिलें तर मात्र चार्तुवर्ण फार कडक रितीनें पाळत असत व अस्पृश्य समाजास यामुळें त्रास होत असे. चोखोबा एवढे निस्सिम भक्त पण त्यांना देवळांत जाऊन पांडुरंगाचें दर्शन घेतां येत नसे. तरीसुद्धां याबद्दल तिटकारा येऊन त्यांनीं त्याबद्दल बंड केलें असें कोठें आढळत नाहीं. उलट याही परिस्थितींत भगवद्भक्तिकरतां येते हें चोखोबांनीं दाखवून दिलें. परमेश्वरास आळवतांना ते म्हणतात—

**हीन याती माझी देवा । कैसी घडेल तुझी सेवा ॥**
**मज दूर दूर हो म्हणती । तूज भेटू कवण्यारिती ॥**
**याती हिन मज म्हणती देवा । न कळे करूं तुमची सेवा ॥**

त्यावेळच्या समाजानें श्रीचोखामेळा यांस चांगलें वागविलें नाहीं अशाबद्दल दोन आख्यायिका आहेत. एक चोखामेळ्यांचे गळ्यांत श्रीपांडुरंगाचा हार दिसला म्हणून त्यांची छळणूक व दुसरे श्रीपांडुरंग चोखोबाचे घरीं जेवतात त्यामुळें देव बाटला म्हणून छळणूक. आख्यायिका, चमत्कार, दंतकथा यावर या विसाव्या शतकांत किती विश्वास ठेवायचा हें प्रत्येक व्यक्तीचे मानसिक स्थितीवर अवलंबून आहे. पण श्रीचोखोबा आपल्या अभंगांत परमेश्वराची आराधना करितांना म्हणतात—

**धांई धांई विठू चालूं नको मंद । मज मारिती बडवे कांहींतर अपराध ॥**
**विठोबाचा हार तुझ्या कंठी कैसा आला । शिव्या देऊनी मारा म्हणती देव कां बाटविला ॥**

पण त्या काळीं शिवाशिव, अस्पृश्यता फार होती असें दिसतें; कारण विटाळ, शिवाशिव याबद्दल चोखोबा म्हणतात—

**कोण तो सोंवळा कोण तो वोंवळा । दोहींका वेगळा विठ्ठल माझ्या ॥**
**वेदासी विटाळ शास्त्रास विटाळ । पुराणें अमंगळ विटाळाची ॥**
**जन्मतां विटाळ मरतां विटाळ । चोखा म्हणे विटाळ आदि अंती ॥**

निचाचे संगती देवो विटाळला । पाणी प्रक्षाळोनी सोंवळा केला ॥
कोण तो सोवळा वोंवळा तो कोण । विटाळाचें मूळ देहमूळ ॥
चोखामेळा म्हणे मज नवल वाटतें । विटाळ परते आहे कोण ॥

अशा स्थितींत सुद्धां या सर्व मनस्तापावर विठ्ठल चरणीं संपूर्ण भाव हें चोखोबांचें उत्तर आहे. त्या काळीं निर्गुण भक्तिपेक्षां सगुण भक्तीच जास्त दाखविली आहे. कृष्णावतारामध्यें श्रीकृष्ण यांनीं सगुण रुप धारण करून लिला केल्या व श्रीकृष्ण देव जरी असले तरी भक्ताचे घरीं राबत होते, असें दाखविलें आहे. पण या कलियुगांत श्रीपांडुरंग हे परमेश्वराचे रूप आहे व कृष्णावताराप्रमाणें श्रीपांडुरंग हे सगुण रूप धारण करून भक्तांत मिसळतात, त्यांचे बरोबर भोजन करितात भक्ताचे घरीं काम करीतात. हें आजच्या काळीं किती विश्वसनीय समजावें अशी कांहीं लोक शंका घेतात. पण परमेश्वराची सगुण रूपें त्यावेळच्या संतांनीं अभंगांतून कितीतरी ठिकाणीं गायिली आहेत.

ज्ञानियाची भिंत अंगेचि वोढला । ख्यातीती दाविली चांगदेवा ॥
एकनाथाचे घरीं सडा सारवण करी । उदक ते भरी गंद घाशी ॥
माळी सावत्याचें खुर्पण केलें । माजणें घडिले गोरीयाचे ॥
जनीयाचे घरी दळण कांडणें । केर ही भरी शेण्यावेची ॥

नवविधा भक्तीपैकी भक्तानें एकदां परमेश्वराचे ठिकाणीं आत्मसमर्पण केलें म्हणजे देव व भक्त हा भेद नाहींसा होऊन तादात्म्य निर्माण होतें. ही स्थिती या सगुण भक्तींत दाखविली आहे. हीच स्थिती पुढें नामदेव, एकनाथ महाराज यांनी दाखविली असून महिपतींने आपल्या भक्ति-विजय, संतलिलामृत, भक्तिलिलामृत वगैरे काव्य ग्रंथांमध्यें या भक्तीस अलंकार चढविले आहेत.

श्री संत नामदेव महाराज यांनीं चोखामेळाचे चरित्रावर जे अभंग रचिले त्यांत ते म्हणतात–

म्हणती या महारानें देव बाटविला । जिवें मारा त्याला बैल जुंपा ॥
वांधोंनियां पाय हाकियले बैल । धरुनि शिवळ विठा उभा ॥

या भक्ताची छळणूक थांबविण्याकरितां नामदेव म्हणतात–

समस्तासी तेव्हां दिलें दरुशन । केलें समाधान नामा म्हणे ॥

या छळाचा परिणाम काय झाला तर परमेश्वर भक्ति दृढ झाली. त्यावेळच्या समाजास चोखमेळा यांची योग्यता समजून आली व या संतास देवळांत जाण्यांत बंदी होती ती नाहींशी झाली. देव, संत व इतर मंडळी श्री चोखोबांचे

घरीं जेवावयास येऊं लागले व श्री चोखोबांचें स्थान त्यावेळच्या संत मंडळींत स्थीर झालें व पंढरीचे पांडुरंगाचा एक निस्सिम भक्त म्हणून चोखामेळ्यास मान देऊं लागला.

फक्त मनांत एक शंका येऊन जाते कीं ज्ञानेश्वर नामदेवाचे काळीं ही अस्पृश्यता नाहींशी झाली होती तर पुन्हां ती केव्हां दृढ झाली व १३०० व्या शतकापासून आज विसाव्या शतकापर्यंत अस्पृश्यता निवारण्यासाठीं पुन्हां कां प्रयत्न करावे लागले.

वारकरी पंथांत त्यावेळीं सहभोजन चालत होतें हें खालील अभंगावरून दिसते.

**चोख्याच्या अंगणी बैसल्या पंगती । स्त्री होती वाढत चोखीयाची ॥**

चोखोबाची भक्ति किती पराकोटींला गेली होती याचें वर्णन करितांना तुकाराम म्हणतात कीं अमृत शुद्ध करण्याकरितां इंद्रादिदेवसुद्धा या जेवणाचे पंक्तीचा लाभ घेत असत.

**चोखियाचे करी शुद्ध झालें अमृत । तुका म्हणे मात काय वानू ॥**

तुकाराम महाराजांचा काळ तीनशें वर्षांपूर्वींचा. त्यावेळींही महाराष्ट्रांत अस्पृश्यता व चार्तुवर्ण्य फार कडक पाळलें जात होतें. पण वारकरी समाजास शिकवणूक मात्र अस्पृश्यता पाळू नका अशी होती असें म्हणावें तर सन १९५८ सालीं सरकारास अस्पृश्यता निवारणकरिता कायदे कां करावे लागले. पंढरपूरचे दर्शन अस्पृश्यानाच काय पण ब्राह्मणांतील सकेशा विधवा स्त्रियांनाही घेतां येत नव्हतें. पण काळ बदलला. सुधारणा झपाट्यानें झाली व आतां हिंदूंतील स्पृश्यास्पृश्य भेदभाव नष्ट झाले आहेत.

## —अध्यात्म सिद्धी—

जातीवर परमेश्वर प्राती अवलंबून नाहीं. भक्तिभाव वाढत गेला म्हणजे अंतःस्फूर्ती होते व परमेश्वराची आळवणी करतांना मुखांतून अमृत वाणी बाहेर पडते. हेंच अक्षर वाङ्मय होय. श्री संत चोखामेळा यांचे अभंग वाचले म्हणजे यांचे शिक्षण किती झालें असेल असा विचार मनांत येतो. त्याकाळीं अस्पृश्यांना शिक्षण मिळत होतें काय व तेही इतक्या उच्च प्रकारचे कीं श्री संत चोखामेळा यांचे अभंगावरून द्वैत–अद्वैतासह गीतेतील सर्व तत्त्वज्ञान त्यांना माहिती असावें ? श्री संत चोखामेळा यांचे अभंग लिहिणारे अनंतभट या नांवाचे ब्राह्मण होते. त्यांचे परिश्रमामुळें ७०० वर्षांनंतर ही आज श्रीचोखामेळा यांचे २००–३०० अभंग आपणास वाचावयास मिळतात.

सद्गुरुकृपेशिवाय माणसांमधील अपूर्णता नाहींशी होत नाहीं. श्रीज्ञानेश्वर माऊलीचे श्री संत निवृत्तीनाथ जसे सद्गुरु, त्याप्रमाणें श्रीचोखामेळा यांनी श्री संत नामदेव महाराज यांना गुरु केलें होते.

**चोखा म्हणे माझा धन्य गुरुराव । दाखविला देव हृदयीं माझ्या ॥**
**चोखा म्हणे माझा नामदेव प्राण । घालीन लोटांगण जीवें भावें ॥**
**चोखा म्हणे माझ्या जीवीचा विसावा । पोकारितो धांवा नामदेवा ॥**

या सद्गुरुकृपेमुळें व संत समागमामुळें श्रीचोखामेळा यांना परमेश्वर चरणीं उत्कृष्ट भक्ति करीतां आली. संसार असार असून संसाराची सुखदुःखें ते भोगीत असत पण त्याची वृत्ति—

**असोनि नसणें संसाराचे ठायीं । हाची बोध पाहीं मना घ्यावा ॥**

अशी असल्यामुळें संसारांतील सुखदुःखें त्यांना तापदायक झालीं नाहींत. इतर संताप्रमाणें त्यांनी ही नामाचा महिमा पुष्कळ अभंगांतून वर्णन केला आहे.

**न लगे साचार याग यज्ञ विचार । जप निरंतर विठ्ठल नामीं ॥**
**नाम हें सोपें जपतां विठ्ठल । अवघेची फळ हाता लागे ॥**
**अवघ्या साधनाचें सार । रामकृष्ण हा उच्चार ॥**

याप्रमाणें कितीतरी अभंगातून त्यांनीं नामाचा महिमा गाईला आहे. यामुळें त्यांचे अंतःकरण नेहमींच शुद्ध राहून संत समागमामुळें त्यांचे आचरण ही पवित्र राहिलें. परमेश्वर प्राप्तीचा ध्यास दिवसेंदिवस वाढत गेला व संसारपाश तुटत चालले. संसारांत असून ही त्यांना तो पाश वाटत नव्हता. श्रीपांडुरंगाचे सान्निध्य हीच त्यांची घनिष्ट इच्छा होती.

**नलगे भक्ति मुक्ति वैकुंठीचा वास । सुखे पंढरीस राहीन देवा ॥**

परमेश्वर प्राप्तीनंतर वैकुंठवास हा प्रत्येक जण अपेक्षीत असतात. पण चोखामेळा म्हणतात.

**श्वान अथवा सुकर हो कां मार्जार । परी वैष्णवाचें घर देईं देवा ॥**

केवढी वैष्णवावर म्हणजे परमेश्वराचे भक्तावर श्रद्धा आहे पहा. प्रसिद्ध संत जनाबाई म्हणतात—

**वैष्णव तो एक चोखामेळा महार । जनी म्हणे निर्धार केला संतीं ॥**

पंढरपुरास दर एकादशीस यावयाचें पण नंतर परत जावयाचें असा प्रसंग नेहमीं होता. यामुळें परत मंगळवेढ्यास गेल्यावर त्यांचें अंतःकरणाची तळमळ फार

वाढत असे. श्रीपांडुरंगाचा सारखा ध्यास असल्यामुळें पंढरीस जाणारा कोणी वारकरी भेटला तरी चोखामेळा त्यास सांगत–

**कोण पंढरीस जाती वारकरी । तयाचे पायावरी भार माझे ॥**

या प्रमाणें भक्तिपूर्ण अंतःकरणानें परमेश्वराची आळवणी करीत चोखामेळा कालक्रमणा करीत असत. परमेश्वराची करूणा भाकीत असतांना ते म्हणतात–

**कोण माझा आतां करील परीहार । तुजवीण डोंगर उतरी कोण ॥**
**चोखा म्हणे मज ठ्यावें पदरांत । ठेवा माझे चित्त तुमचे पायीं ॥**

या प्रमाणें परमेश्वराची आराधना करीतांना त्यांचें मनांत परमेश्वराचे सगुण निर्गुण रूप दिसत होतें. निर्गुण रूपाची आराधना करितां करितां श्रीचोखामेळा म्हणतात–

**देवा नाहीं रुप देवा नाहीं नाम । देव हा निष्काम सर्वाठायीं ॥**
**चोखा म्हणे माझा संदेह फिटला । देव प्रगटला देहामाजीं ॥**

अशा तऱ्हेनें भगवद्भक्तिमध्ये रममाण झाले म्हणजे काय होतें तें पुढील अभंगांत म्हणतात–

**बैसोनि निवांत करीन चिंतन । काया वाचा मन सहीत देवा ॥**
**चोखा म्हणे मज सांगितलें कानीं । रामकृष्ण वाणी जप सदा ॥**

अशा रीतीनें रामकृष्ण जप करीत सदां समाधी सुख अनुभवत चोखामेळा कालक्रमणा करीत होते. यांतच अत्यानंद होता. आत्मसुख होते व मनःशांति लाभली होती. मन उचंबळून येत असे व–

**देखिला देखिला योगियाचा रावो । रुक्मादेवीना हो पंढरीचा ॥**

अशा तऱ्हेनें उद्गार अंतःकरण भरून बाहेर पडत असत. अशा रीतीनें हा भक्त परमेश्वर चरणीं रममाण झाला होता.

## —नियाण—

श्री संत चोखामेळा यांचे सर्व कुटुंबच परमेश्वराची भक्ति करणारें होतें. बायको सोयराबाई व मुलगा कर्ममेळाही वारकरी पंथाचे होते. बायकोचा भाऊ बंका हाही भगवत् भक्त होता. यामुळें घरचें सर्वच वातावरण भक्तीचें असें जरी असलें तरी निर्वाहापुरते पैसे मिळविण्यास त्यांना कष्ट करावे लागतच होते असें दिसतें. घरचें दारिद्र्य होतें. त्यामुळें मंगळवेढे येथें गावकूस बांधणेचें काम चालू होतांच पोट भरण्यास ते इतर महारांबरोबर मंगळवेढे येथें आले होते. चार महिने काम चालल्यावर अकस्मात एका दिवशीं ते गावकूस मोडून पडलें व

श्रीचोखामेळा बरोबर असंख्य महार तेथें मृत झाले असें श्रीसंत नामदेव महाराज परमेश्वरास सांगत आहेत.

**तयाखालीं महार बहू चूर झाले । चोख्यानें अर्पिले प्राण देवा ॥**

हा निर्याणाचा दिवस शालीवाहन शके बाराशें साठ प्रमाथी नांवाचे संवत्सर असून वैशाख वद्य पंचमी गुरुवार होता. ज्या जागीं हें शरीर पतन झालें तेथें मंगळवेढे येथें भर चौकांत रस्त्यावर एक स्मृति शिला होती. कैक वर्षें त्या शिलेचें पूजन मंगळवेढे येथील नागरिक करीत असत. एकदां ना. कै. बाळासाहेब खेर, माजी मुख्यमंत्री, मुंबई प्रांत, हे मंगळवेढे येथें आल्यावेळीं, प्रस्तुत लेखकांनीं त्यांना ही स्मृति शिला दाखविली. लोकांचे पायदळीं भर रहदारीचे चौकांत पायदळी ही असण्यापेक्षा त्यांचें योग्य स्मारक व्हावें अशी त्यांनी इच्छा प्रदर्शित केली. तेव्हां श्री संत चोखामेळा स्मारक समिती म्हणून एक समिती मंगळवेढे येथें स्थापन झालीं व त्या स्मृति शीलेवर उत्तम घुमटी बांधविली गेली. या घुमटीचे उद्घाटन श्रीमंत राजेसाहेब सांगली यांनी ता. १४–३–६० रोजी केलें आहे. दरवर्षी वैशाख वद्य पंचमीस येथें पुण्यतिथी साजरी होते. श्री चोखामेळा यांचे हें आकस्मिक निधन पंढरपुरी त्यांचे समकालीन संतांस फारच जाणवलें. खुद्द श्री पांडुरंग परमेश्वरांनीं श्रीनामदेव महाराज यांना मंगळवेढ्यास पाठविलें व श्री संत चोखामेळा यांच्या अस्थि आणणेस सांगितलें. विठ्ठल, विठ्ठल नामस्मरण इतकें मनींच रुजलें होतें असें नव्हे तर हाडींमांसी सुद्धा खिळलें होतें. हा नश्वर देह नष्ट झाला पण परमेश्वर चिंतन हाडींमांसी चालूच होतें. म्हणून ज्या अस्थितून विठ्ठल–विठ्ठल असा नामोच्चार होत होता त्या अस्थि श्री संत चोखामेळा यांच्या आहेत अशा दृढ भावनेनें श्री संत नामदेव महाराज यांनीं त्या गोळा करून पंढरपुरी आणल्या. सर्व भगवद्भक्तांनी समारंभपूर्वक त्यांना पांडुरंग चरणीं नामदेव पायरीजवळ स्थान दिलें असून पंढरपुरी वैशाख वद्य त्रयोदशीस त्यांची पुण्यतिथी साजरी होत आहे. अशा रितीनें हा संत महात्मा महाद्वारी पांडुरंग चरणी लीन झाला आहे.

श्री संत चोखामेळा होऊन गेले त्यांस ७०० वर्षे झाली. पण त्यांचे अभंगामुळें व त्यांचे दृढभक्तिमुळें त्यांची किर्ती महाराष्ट्रभर पसरली असून पंढरीस जातांना—

**टाळी वाजवावी गुढी उभारावी । वाट हे चालावी पंढरीची ॥**

अशा तऱ्हेनें अभंग म्हणत, परमेश्वर चिंतन करीत वारकरी पंढरपुरास जात असतात. अस्पृश्य समाजामध्यें त्यांचे इतके थोर संत महाराष्ट्रांत अजून झाले नाहींत. पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महारांचे पुढारी झाले; पण धार्मिक दृष्ट्या

त्यांचें स्थान वेगळें आहे. श्री संत चोखामेळा यांनी समाजास हिंदू म्हणून राहून परमार्थ प्राप्ती करून कशी घ्यावयाची हें शिकविलें. पण डॉ. आंबेडकर यांनीं हिंदूधर्म सोडून धर्मांतर करून नव बुद्ध होण्याचा आदेश महार समाजास दिला. आज हजारों महार धर्मांतर करून नवबुद्ध झाले आहेत. हिंदूधर्म व बुद्धधर्म यांमधील तत्त्व प्रणाली वेगळी आहे. म्हणून संत श्रीचोखामेळा यांनी जें चिरकाल टिकणारे अक्षर वाङ्मय अभंग रूपानें निर्माण केलें त्यांतील तत्त्व उरलेल्या हिंदू समाजानें पाळलें तरी ते हा भवसागर सुखानें तरून जातील.

**जन्मला देह पोशिला सुखाचा । काय भरंवसा याचा आहे ॥ १ ॥**
**एकलेचि यावे, एकलेचि जावें । हेचि अनुभवावें आपणचि ॥ २ ॥**
**कोण हे अवघे सुखाचे संगती । अंतकाळी होती पाठमोरे ॥ ३ ॥**
**चोखा म्हणे याचा न धरी भरंवसा । शरण जा सर्वेशा विठोबासी ।**

**॥ पुंडलिक वरदे हरी विठ्ठल ॥**
**॥ श्री ज्ञानदेव तुकाराम महाराज की जय ॥**
**॥ श्री संत चोखा महाराज की जय ॥**
**— श्री कृष्णार्पणमस्तु —**

## श्री संत चोखामेळा यांचे कांहीं मौलिक विचार

१) परमेश्वर प्राप्तीकरितां नामस्मरणाची सर दुसऱ्या कोणत्याही साधनांना येणार नाहीं.
२) जन्मास आपण एकटेच येतों व परत जातांना एकटेच जातों. अंतःकाळीं सर्व सगे सोयरे पाठमोरे होतात.
३) ज्याच्या मनांत दया, क्षमा, शांती नाहीं त्याच्या ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी व्यर्थ आहेत.
४) देव भावाचा भुकेला असल्यामुळें भक्ताचा अंकीत होतो.
५) कन्या पुत्र बाळें सुखाचे सांगाती । दुःख होतां जाती आपोआप ॥
६) ऊंस डोंगा परी रस नव्हे डोंगा । काय भूललासी वरलीया रंगा ॥
७) नामाचा गदारोळ केला तर भवव्यथा तुटेल अशी संतांची प्रतिज्ञा आहे.
८) सर्व भुनी दया संताची सेवा । हेचि देई देवा दुजें नको ॥
९) चोखा म्हणे आमुची जैशी कां वासना । तैशीच भावना होत जात ॥
१०) जें संतांनी लिहिलें आहे तें कल्पांतीही चुकणार नाहीं.

* * *

॥ श्रीगणेशाय नमः ॥

॥ श्रीविठ्ठलाय नमः ॥

# श्री चोखोबांची गाथा

## : मंगलाचरण :

श्रीगणेशाय नमः ॥ आरंभी आवडीं आदरें आलें नाम । तेणें सकळ सिद्धि जगीं जालें पूर्णकाम ॥ १ ॥ रामकृष्ण गोविंद गोपाळा । तूं माय माऊली जिवींचा जिव्हाळा ॥ धृ० ॥ तुझियेनि नामें सकळ संदेहो फिटला । बापरखुमादेवीवरा श्रीविठ्ठला ॥ २ ॥

देखिला देखिला योगियांचा रावो । रुक्मादेवीनाहो पंढरीचा ॥ १ ॥
पुंडलिकासाठीं युगें अठ्ठावीस । धरोनि बाळवेष भीमातटीं ॥ २ ॥
गाई गोपाळ वत्सें वैष्णवांचा मेळ । नाचती गोपाळ विठ्ठलछंदें ॥ ३ ॥
चोखामेळा तेथें वंदितो चरण । घाली लोटांगण महाद्वारीं ॥ ४ ॥

# चोखोबारायांचे अभंग

## – विठ्ठल –

१ अनादि निर्मळ वेदांचें जें मूळ । परब्रह्म सोज्वळ विटेवरी ॥ १ ॥
कर दोन्ही कटीं राहिलासे उभा । नीळवर्णप्रभा फांकतसे ॥ २ ॥
आनंदाचा कंद पाऊलें साजिरी । चोखा म्हणे हरी पंढरीये ॥ ३ ॥

२ सर्वही सुखाचें वोतिलें श्रीमुख । त्रिभुवन नायक पंढरीये ॥ १ ॥
कर दोन्हीं कटीं सम पाय विटे । शोभलें गोमटें बाळरूप ॥ २ ॥
जीवाचें जीवन योगियांचें धन । चोखा म्हणे मंडन तिन्ही लोकीं ॥ ३ ॥

३ देखिला देखिला योगियांचा रावो । रुक्मादेवीनाहो पंढरीचा ॥ १ ॥
पुंडलिकासाठीं युगें अठ्ठावीस । धरोनि बाळवेष भीमातटीं ॥ २ ॥
गाई गोपाळ वत्सें वैष्णवांचा मेळ । नाचत गोपाळ विठ्ठल छंदें ॥ ३ ॥

चोखामेळा तेथें वंदितो चरण । घाली लोटांगण महाद्वारीं ॥ ४ ॥

४ व्यापक व्यापला तिन्ही त्रिभुवनीं । चारी वर्ण वाणी विठू माझा ॥ १ ॥
शंख चक्र करीं वैजयंती माळा । नेसला पिवळा पीतांबर ॥ २ ॥
कटावरी जेणें कर हे ठेविले । ध्यान मिरविलें भीमातीरी ॥ ३ ॥
चोखा म्हणे माझा आनंदाचा कंद । नाम हें गोविंद मिरवलें ॥ ४ ॥

५ श्रवणाचें श्रवण घ्राणाचें जें घ्राण । रसने गोडपण विठ्ठल माझा ॥ १ ॥
वाचा जेणें उठी डोळा जेणें भेटी । इंद्रियांची राहाटी विठ्ठल माझा ॥ २ ॥
प्राण जेणें चळे मन तेणें वोळे । शून्यातें वेगळें विठ्ठल माझा ॥ ३ ॥
आनंदी आनंद बोधा जेणें बोध । सकळां आत्माशुद्ध विठ्ठल माझा ॥ ४ ॥
मुळाचें निजमूळ अकुळाचें कूळ । चोखा म्हणे निजफळ विठ्ठल माझा ॥५॥

६ निगमाचे शाखे आगमाचें फळ । वेद शास्त्रा बोल विठ्ठल हा ॥ १ ॥
पुराणासी वाड योगियांचें गुज । सकळां निजबीज विठ्ठल हा ॥ २ ॥
निगम कल्पतरू भक्तांचा मांदुस । तोही स्वयंप्रकाश विठ्ठल हा ॥ ३ ॥
चोखा म्हणे तो तूं जगाचें जीवन । संतांचें मनरंजन विठ्ठल हा ॥ ४ ॥

७ अनाम जयासी तेंच रूपा आलें । उभें तें राहिलें विटेवरी ॥ १ ॥
पुंडलिकाच्या प्रेमा युगें अठ्ठावीस । समचरणी वास पंढरीये ॥ २ ॥
चोखा म्हणे भक्तांचा कनवाळू । जाणे ळळा पाळू भाविकांचा ॥ ३ ॥

८ सकळा आगराचें जें मूळ । तो हा सोज्वळ विठू माझा ॥ १ ॥
वेदांचा विचार शास्त्रांची जे गती । तोचि हा श्रीपती विठू माझा ॥ २ ॥
कैवल्य देखणा सिद्धांचा जो राणा । भाविकासी खुणा विठू माझा ॥ ३ ॥
चोखा म्हणे माझ्या हृदयीं विंबला । त्रिभुवनीं प्रकाशला विठू माझा ॥४॥

९ सुंदर मुखकमळ कस्तुरी मळवटीं । उभा देखिला तटीं भीवरेच्या ॥ १ ॥
मकराकार कुंडलें श्रवणीं ढाळ । देती गळां वैजयंती मुक्तमाळा ॥ २ ॥
शंख चक्र गदा पद्म चहूं करीं । गरुडवाहन हरीं देखियला ॥ ३ ॥
चोखा म्हणे सर्व सुखाचें आगर । निरा भिवरा तीर विठ्ठल उभा ॥ ४॥

१० मुळींचा संचला आला गेला कोठें । पुंडलीक पेठे विटेवरी ॥ १ ॥
विठोबा देखणा विठोबा देखणा । योगियांचा राणा पंढरिये ॥ २ ॥

भाविका कारणें उभारोनि हात । वाट जो पहात अनुदिनी ॥ ३ ॥
चोखा म्हणे ऐसा भक्तांचा कृपाळ । दीनांचा दयाळ पंढरीये ॥ ४ ॥
११ श्रीमुख चांगलें कांसे पितांबर । वैजयंती हार रुळे कंठीं ॥ १ ॥
तो माझ्या जीविचा जिवलग सांवळा । भेटवा हो डोळां संतजन ॥ २ ॥
बहुतांचें धांवणें केलें नानापरी । पुराणें ही थोरी वानिताती ॥ ३ ॥
चोखा म्हणे वेदशास्त्रांसी जो साक्षी । तोचि आम्हा रक्षी नानापरी ॥४॥
१२ सुखाचें जें सुख चंद्रभागेतटीं । पुंडलिकापाठीं उभें असे ॥ १ ॥
साजिरें गोजिरें समचरण उभें । भक्ताचिया लोभें विटेवरी ॥ २ ॥
कर दोनी कटीं श्रीमुख चांगलें । शंख चक्र मिरवले गदा पद्म ॥ ३ ॥
चोखा म्हणे शोभे वैजयंती कंठी । चंदनाची उटी सर्व अंगी ॥ ४ ॥
१३ विठोबा पाहुणा आला आमुचे घरा । निंबलोण करा जीवें भावें ॥ १ ॥
पंचप्राण ज्योती ओंवाळुनी आरती । ओंवाळीला पती रखुमाईचा ॥ २ ॥
षड्रस पक्वानानें विस्तारिलें ताट । जेवूं एकवट चोखा म्हणे ॥ ३ ॥
१४ चोखट चांग चोखट चांग । एक माझा पांडुरंग ॥ १ ॥
सुख तयाचे चरणीं । अवघी सुकृतांची खाणी ॥ २ ॥
महापातकी नासलें । चोखट नाम हें चांगलें ॥ ३ ॥
महाद्वारीं चोखामेळा । विठ्ठल पाहातसे डोळां ॥ ४ ॥
१५ अवघा प्रेमाचा पुतळा । विठ्ठल पाहा उघडा डोळा ॥ १ ॥
जन्ममरणाची येरझारी । तुटे भवभय निर्धारी ॥ २ ॥
ऐसा प्रताप आगळा । गाये नाचे चोखामेळा ॥ ३ ॥
१६ पाहतां पाहतां वेधियेला जीव । सुखाचा सुखसिंधु पंढरीराव ॥ १ ॥
माझा हा मीपणा हरपला जाणा । कळल्या आगम निगमाच्या खुणा ॥२॥
भवसागराचा दाता । विठ्ठल विठ्ठल वाचे म्हणतां ॥३॥
उभा राहुनि महाद्वारीं । चोखामेळा दंडवत करी ॥४॥
१७ गोजिरें श्रीमुख चांगलें । ध्यानीं मिरवलें योगीयांच्या ॥१॥
पंढरी भूवैकुंठ भिवरेच्यातीरीं । वैकुंठीचा हरी उभा विटे ॥२॥
राई रखुमाई सत्यभामा नारी । पुंडलिकें सहपरिवारी आणियेला ॥३॥
वैजयंती माळ किरीट कुंडलें । प्रेमें आलिंगिलें चोखियानें ॥४॥

१८ आणिक दैवतें देतीं काय बापुडीं । काय याची जोडी इच्छा पुरे ॥१॥
तैसा नव्हे माझा पंढरीचा राजा । न सांगतां सहजा इच्छा पुरे ॥२॥
न लगे आटणी तपाची दाटणी । न लगे तीर्थाटणी काया क्लेश ॥३॥
चोखा म्हणे नाम जपतां सुलभ । रुक्मिणीवल्लभ जवळी वसे ॥४॥

१९ करी सूत्र शोभे कटावरी । तोचि हा सोनार नरहरी ॥१॥
पायी वाजती रुणझुण घंटा । तोचि नामयाचा नागर विठा ॥२॥
काम चरणींचा तोडरू । परिसा ऊठतसे डीगरू ॥३॥
दक्षिण चरणीचा तोडरू । जयदेव पदाचा गजरू ॥४॥
विटेवरी चरण कमळा । तो जाणा चोखामेळा ॥५॥

२० बहुत कनवाळु बहु हा दयाळु । जाणे ळळा पाळू भाविकांचा ॥१॥
जात वित गोत न पाहेचि कांहीं । घालावी ही पायीं मिठी उगी ॥२॥
न मागतां आभारी आपें आप होतो । भाविकासी देतो भुक्ती-मुक्ती ॥३॥
चोखा म्हणे ऐसा लाघवी श्रीहरी । भवभय वारी दरूशनें ॥४॥

२१ जया जे वासना तेचि पुरवीत । आपण तिष्ठत राहे द्वारीं ॥१॥
बळीचिया भावा द्वारपाळ होय । सुदामाचे खाय पोहे सुखें ॥२॥
विदुराचे घरीं आवडी कण्या खाय । हात पसरिताहे भाजी पाना ॥३॥
गौळीयाचे घरीं करीतसे चोरी । काला स्वयें करी गोपाळांसी ॥४॥
चोखा म्हणे ऐसा नाटकी श्रीहरी । तोचि हा पंढरी भीमातटीं ॥५॥

२२ बहुतांचें धांवणें केलें बहुतापरी । उदार श्रीहरि वैकुंठीचा ॥ १ ॥
तोचि महाराज चंद्रभागे तीरीं । उभा विटेवरी विठ्ठल देवो ॥ २ ॥
भक्तीचा आळुका भावाचा भुकेला । न कळे ज्याची लीला ब्रह्मादिकां ॥३॥
चोखा म्हणे तो हा नांदतो पंढरी । दरूशनें उद्धरी जडजीवां ॥ ४ ॥

२३ भक्तांचिया लोभा वैकुंठ सांडिलें । उभेचि राहिलें पंढरीये ॥ १ ॥
कनवाळु उदार तो हा श्रीहरि । जडजीवा उद्धरी नामें एका ॥ २ ॥
बांधियेलें ब्रीद तोडर चरणीं । त्रैलोक्याचा धनी पंढरीये ॥ ३ ॥
चोखा म्हणे आमुचा कैवारी विठ्ठल । नलगे काळ वेळ नाम घेतां ॥४॥

२४ ज्या सुखाकारणें योगी शिणताती । परी नव्हे प्राप्ति तयांलागीं ॥ १ ॥
तें प्रेमभावें पुंडलिका वोळलें । उघडेंचि आलें पंढरीये ॥ २ ॥

कर ठेवोनि कटी उभा पाठीमागें । भक्ताचिया पांगे बैसेचि ॥ ३ ॥
युग अठ्ठावीस होऊनियां गेलें । नाहीं पालटले अद्यापवरी ॥ ४ ॥
चोखा म्हणे ऐसा कृपाळू श्रीहरी । कीर्ति चराचरी वानिताती ॥ ५ ॥
२५ आपुलिया सुखा आपणचि आला । उगलाचि ठेला विटेवरी ॥ १ ॥
तें हें सगुण रुप चतुर्भूज मूर्ति । शंख चक्र हातीं गदा पद्म ॥ २ ॥
किरीट कुंडलें वैजयंती माळा । कांसे सोनसळा तेज फाके ॥ ३ ॥
चोखा म्हणे सर्व सुखाचें आगर । रुप मनोहर गोजिरें तें ॥ ४ ॥
२६ ज्याकारणें वेद श्रुति अनुवादिती । तो हा रमापती पंढरीये ॥ १ ॥
सुखाचें ठेवणें क्षीरसागर निवासी । तो हा पंढरीसी उभा विटे ॥ २ ॥
भाविकाकारणें उभवोनी हात । उदारपणें देत भुक्ति-मुक्ति ॥ ३ ॥
न पाहे उंच नीच याती कुळ । स्त्री क्षूद्र चांडाळ सरते पायीं ॥ ४ ॥
चोखा म्हणे ऐसा भावाचा भुकेला । म्हणोनियां स्थिरावला भीमातटी ॥५॥
२७ भाविकांच्या लोभा होऊनी आर्तभूत । उभाचि तिष्ठत पंढरीये ॥ १ ॥
काय करों प्रेम नकळे या देवा । गुंतोनिया भावा राहे सुखें ॥ २ ॥
वर्ण अभिमान न धरी कांहीं चाड । भक्तिसुख गोड तयालागीं ॥ ३ ॥
चोखा म्हणे ऐसी कनवाळु माऊली । कृपेची साउली दीनां करी ॥ ४ ॥
२८ अंगिकार करी तयाचा विसर । न पडे साचार तयालागीं ॥ १ ॥
तो हा महाराज चंद्रभागे तटी । उभा वाळुवंटी भक्तकाजा ॥ २ ॥
अनाथा कैवारी दीना लोभपर । वागवितो भार अनाथांचा ॥ ३ ॥
चोखा म्हणे माझी दयाळू माउली । उभी ती राहिली विटेवरी ॥ ४ ॥
२९ मज तो नवल वाटतसे जीवी । आपुली पदवी विसरले ॥ १ ॥
कवणिया सुखा परब्रह्म भुललें । गुंतोनि राहिलें भक्तभाके ॥ २ ॥
निर्गुण होतें तें सगुण पैं झालें । विसरोनि गेलें आपआपणा ॥ ३ ॥
चोखा म्हणे कैसा हा नवलाव । देवाधिदेव वेडावला ॥ ४ ॥
३० श्रीमुखाची शोभा कस्तुरी मळवट । उभा असे नीट विटेवरी ॥ १ ॥
कर दोनीं कटी कुंडल झळकती । तेज हे फांकती दशदिशा ॥ २ ॥
वैजयंती माळा चंदनाची उटी । टिळक लल्लाटीं कस्तुरीचा ॥ ३ ॥
चोखा म्हणे माझ्या जीवींचा जीवनु । पाहतां तनु मनु भुलोनी जाय ॥४॥

३१ उतरले सुख चंद्रभागे तटीं । पाहा वाळुवंटी बाळरुप ॥ १ ॥
बहुतां काळाचें ठेवणें योगियांचें । ध्येय शंकराचें सुख ब्रह्म ॥ २ ॥
जयालागीं अहोरात्र विवादती । तो भक्ताचिये प्रीती उभा असे ॥ ३ ॥
चोखा म्हणे सर्व सुखांचे आगर । न कळे ज्याचा पार श्रुति-शास्त्रां ॥ ४ ॥

३२ दुर्लभ होतें तें सुलभ पैं झालें । आपण नटलें सगुण रुप ॥ १ ॥
धरोनि आवडी पंढरीये आलें । उभेंचि राहिलें कर कटी ॥ २ ॥
युगे अपरंपार न कळे ज्याचा पार । वैष्णवांचा भार शोभतसे ॥ ३ ॥
दिंड्या गरुड टके पताका शोभती । बागडे नाचती हरिदास ॥ ४ ॥
चोखा म्हणे ऐसें धरोनिया भीडे । उभ उमी कोड पुरवितो ॥ ५ ॥

३३ आपणची नटलें रुप । भक्तासमीप राहिलें ॥ १ ॥
ऐसें ध्यान गोजिरें विटे । उभेंचि नेहटे देखिलें ॥ २ ॥
कर मिरविले कटावरी । तो हा वैकुंठीचा हरी ॥ ३ ॥
चोखा म्हणे श्रीमुख । पाहता हरपे ताहानभूक ॥ ४ ॥

३४ अगाध भूवैकुंठ नगरी । पंढरी हे चराचरी ॥ १ ॥
पुंडलिकें आणियेला । मौन्य उभा तोचि ठेला ॥ २ ॥
कटावरी ठेवोनी हात । उभा राहिला निवांत ॥ ३ ॥
चोखा म्हणे रुप आगळे । कानीं कुंडलें शोभलें ॥ ४ ॥

३५ आला सुखे पंढरीसी । गाई गोपाळा सरसी ॥ १ ॥
रुप धरोनी गोजिरें । पाहातां मना मनपण नुरे ॥ २ ॥
अंगी चंदनाची उटी । केशर कस्तुरी लल्लाटी ॥ ३ ॥
पीतांबर सोनसळा । कांसे मिरवला पिंवळा ॥ ४ ॥
चोखा म्हणे ठाण साजिरें । चरण विटेवरी मिरवले ॥ ५ ॥

३६ कोण जाणे याचे अंगीचिया कळा । सुखाचा सोहळा विटेवरी ॥ १ ॥
आपुलिया लोभें आपणचि आलें । आपणचि नटलें रुप देखा ॥ २ ॥
भक्तांचा प्रेम धरोनी आवडी । उभाविली गुढी विठ्ठलनामें ॥ ३ ॥
चोखा म्हणे ऐसे रंगोनी रंगले । पंढरीये राहिले भक्तांघरीं ॥ ४ ॥

अनुक्रम........................ वि ........................

३७ जयालागीं तप धांवा । तो हा उघडाचि पाहावा ॥ १ ॥
जयालागीं जप तप । तो हा मदनाचा बाप ॥ २ ॥
जयालागीं शिणवी काया । लागे तयाचिया पायां ॥ ३ ॥
चोखा म्हणे सुखाचें सुख । तो हा विटेवरी देख ॥ ४ ॥

३८ जयालागीं करिती योगादि साधनें । तें उभें केणें पंढरीये ॥ १ ॥
आपुलिया सुखें आपण नटलें । आहे तें संचलें जैसें तैसें ॥ २ ॥
कराया परिहार भोळ्या भाविकांचा । अभय करें साचा पालवितो ॥३॥
चोखा म्हणे मंडित सगुण रुपडें । ध्यान हें चोखडें मिरविलें ॥ ४ ॥

३९ करितसे धांवणें आपुलें म्हणवितां । वाहे थोर चिंता अनाथांची ॥ १ ॥
पतित पावन साजे ब्रीदावळी । पाप ताप जाळी दैन्य त्याचें ॥ २ ॥
आपुल्या अंगाची करोनी साउली । राखे जैसी माऊली बाळालागीं ॥३॥
चोखा म्हणे कृपाळु दीनाचें माहेर । जेणें धरियेले कर कटेवरी ॥ ४ ॥

४० केलासे कुढावा जगीं थोरपण । पतितपावन नाम सोपें ॥ १ ॥
तें हें अगुणाचें रुप तें गोजिरें । पाहा हो साजिरें भीमातीरी ॥ २ ॥
बाळ गोपाळाचें खेळतसे मेळी । नाचे गदारोळी आनंदानें ॥ ३ ॥
चोखा म्हणे माझें मनाचें मोहन । विश्रांतीचें स्थान भाविकांसी ॥ ४ ॥

४१ बहु मत ग्रंथ करितां पठण । सुख समाधान नव्हे तेणें ॥ १ ॥
वेदशास्त्र पुराण करितां श्रवण । सुखसमाधान नव्हे तेणें ॥ २ ॥
अष्टांग साधन करितां जप यज्ञ । सुख समाधान नव्हे तेणें ॥ ३ ॥
उपवास पारणें आणि धूम्रपान । सुख समाधान नव्हे तेणें ॥ ४ ॥
चोखा म्हणे सुख समाधान वृत्ति । पाहतां विठ्ठल मूर्ति विटेवरी ॥ ५ ॥

४२ सुखाची मिराशी । आमुची हे पंढरीसी ॥ १ ॥
बाप माझा विटेवर । उभा कटी ठेवोनी कर ॥ २ ॥
वाम भागी आमुची माता । रुक्मादेवी हे तत्वता ॥ ३ ॥
चोखा म्हणे सुखराशी । वोळली आम्हांसी कृपेनें ॥ ४ ॥

४३ पहा हो वैकुंठनिवासी । उभा भिवरेतीरासी ।
कट धरोनी हृषीकेशी । विटे समचरणीं देखिला ॥ १ ॥

धन्य धन्य बाळरुप । शोभलें गोमटें स्वरुप ।
जयासाठीं करिती तप । सिद्ध मुनि सर्वथा ॥ २ ॥
जो सकळ देवांचा हा देव । चतुर्भुज पंढरिराव ।
अतर्क्य ना भाव । तो देवाधिदेव विटेवरी ॥ ३ ॥
चोखा म्हणे ज्याची लीला । वेदशास्त्रां अगम्य कळा ।
पुंडलिकासी बोळला । भावबळें हृदयीं ॥ ४ ॥

४४ ज्याचे वर्णिता पवाडे । कळिकाळ पायीं दडे ॥ १ ॥
तो हा पंढरीचा राणा । रूपें अरूप देखणा ॥ २ ॥
वेद जया गाती । श्रुति म्हणती नेति नेति ॥ ३ ॥
भोळ्या भाविकांचा ऋणी । चोखा म्हणे माझी धणी ॥ ३ ॥

४५ काय वानू तुमचे पवाडे । तुम्हा पुढें देवराया ॥ १ ॥
मोठा ठकवाणा मोठा ठकवाणा । पंढरीचा राणा विठ्ठला तूं ॥ २ ॥
मद्याचिया गोडी लावियेले जगा । गोवियेलें पैं गा लिगाडासी ॥ ३ ॥
चोखा म्हणे देवा न कळे तुमची माव । आमुचा हा जीव पायीं असे ॥ ४ ॥

४६ बहु भुलवणा बहु भुलवणा । पंढरीचा राणा मनीं घ्याऊं ॥ १ ॥
न कळे न कळे शेषादिका माव । वेदशास्त्र हांव भरी झाले ॥ २ ॥
भागलीं पुराणें पळती रानोरान । न कळे महिमान तुमचे देवा ॥ ३ ॥
चोखा म्हणे साही दरूशनें वेडावली । तुमची तो चाली आहे ऐसी ॥ ४ ॥

४७ जो वेदासी आकळ पुराणांसी वाड । तो उभा असे उघड पंढरीये ॥ १ ॥
भावाचा भुकेला भावाचा भुकेला । भावाचा भुकेला विठु माझा ॥ २॥
लावण्यरूपडें तुळशीहार गळा । वैजयंती माळा रूळे कंठीं ॥ ३ ॥
मुगुट कुंडलें श्रीमुख शोभलें । ध्यानीं मिरविले भाविकांच्या ॥ ४ ॥
चोखा म्हणे माझा सुखाचा निधान । वोवाळीन प्राण कुरवंडी ॥ ५ ॥

४८ आवडीचें प्रेम नामया लाधलें । ते आम्हां फावलें जन्मोजन्मीं ॥ १ ॥
म्हणोनी पंढरी विटेवरी हरी । भिवरेचे तिरीं कर कटीं ॥ २ ॥
महा पातकियासी दरूशनें उद्धार । ऐसा दिला वर पुंडलिका ॥ ३ ॥
अठ्ठावीस युगें न बैसे खालीं । समचि पाउलीं उभा असे ॥ ४ ॥
चोखा म्हणे ऐसा भक्तांचा आळुका । कनवाळु देखा भाविकांचा ॥ ५ ॥

४९ उदार हा पंढरीराव । म्हणोनि धांव मन घेतें ॥ १ ॥
शरणागता पायापाशीं । अहर्निशी ठाव देतो ॥ २ ॥
न विचारी कुळकर्म । जपतां नाम दिननिशी ॥ ३ ॥
चोखा म्हणे ऐसा ठसा । धरिला भरवंसा म्हणोनी ॥ ४ ॥

५० अनाथाचा नाथ उभा विटेवरी । भक्तां अभय करीं पाळवितो ॥ १ ॥
भुक्ति मुक्ति भातुकें नर नारी बाळा । पुरवीतसे ळळा जया जैसा ॥ २ ॥
आवडीनें तयाचे कुरवाळी मुख । म्हणे माझें सुख देतों तुम्हां ॥ ३ ॥
चोखा म्हणे ऐसा भक्तांचा अंकिला । वर्तनसे बोला माजी तया ॥ ४ ॥

५१ जो न कळे वेदां शास्त्रां अगोचर । तो हा कटीं कर उभा विटे ॥ १ ॥
गोड गोजिरें ध्यान मिरविलें । तें आम्हां देखिलें पंढरीये ॥ २ ॥
संत समुदाय पताकांचे भार । करती जयजयकार महाद्वारीं ॥ ३ ॥
चोखा म्हणे सर्व सुखाची विश्रांती । तो हा रमापति पंढरीये ॥ ४ ॥

५२ लावण्याचा गाभा त्रैलोक्याची शोभा । विटेवरी उभा पंढरीये ॥ १ ॥
पाउलें गोजिरीं श्रीमुख शोभलें । ध्यान मिरविलें भिमातीरी ॥ २ ॥
वैजयंती माळा किरीट कुंडलें । परिधान केलें पीत वस्त्र ॥ ३ ॥
चोखा म्हणे ऐसा लावण्य पुतळा । तो आम्ही देखिला दृष्टी भरी ॥ ४ ॥

५३ धन्य पुंडलिक सखा । उभें केलें मायबापा ॥ १ ॥
निरा भिवरेचे तटीं । कट धरोनियां करीं ॥ २ ॥
महापापिया उद्धार । एका दरुशनें निर्धार ॥ ३ ॥
चोखा म्हणे विटेवरी । रूपसांवळें श्रीहरी ॥ ४ ॥

५४ जयासाठीं उगाचि आला । मौन्य धरोनी राहिला ॥ १ ॥
जोडोनिया दोन्ही पाय । उगाचि मुखाकडे पाहे ॥ २ ॥
न बोले भिडेनें कांहीं । उभा पाठीसी तो पाही ॥ ३ ॥
चोखा म्हणे पाहातां मुख । हारपली तहान भूक ॥ ४ ॥

५५ पाहा क्षीर सागरीचा हरी । तोचि आला भीमातीरी ॥ १ ॥
भक्ता पुंडलिका कारणें । केलें सुखें येणें पेणें ॥ २ ॥
पेठ वसविली पंढरी । भूवैकुंठ मही वरी ॥ ३ ॥

निरे भिवरेचे तटी । कर मिरवले कटीं ॥ ४ ॥
ठेविले विटेवरी समचरण । चोखा घाली लोटांगण ॥ ५ ॥

## पंढरी

५६ इनामाची भरली पेठ । भूवैकुंठ पंढरी ॥ १ ॥
चंद्रभागा वाळवंट । संत घनदाट नाचती ॥ २॥
टाळ मृदंग मोहरी । वैष्णव गजरी आनंदें ॥ ३ ॥
चोखा जातो लोटांगणी । घेत पायवणी संतांची ॥ ४ ॥

५७ टाळी वाजवावी गुढी उभारावी । वाट हे चालावी पंढरीची ॥ १ ॥
पंढरीचा हाट कउलांची पेठ । मिळाले चतुष्ट वारकरी ॥ २ ॥
पताकांचे भार मिळाले अपार । होतो जय जयकार भीमातीरी ॥ ३ ॥
हरिनाम गर्जतां भय नाहीं चिंता । ऐसें बोले गीता भागवत ॥ ४ ॥
खट नट यावें शुद्ध होऊनि जावें । दवंडी पिटी भावें चोखामेळा ॥ ५ ॥

५८ विठ्ठल विठ्ठल गजरीं । अवघी दुमदुमली पंढरी ॥ १ ॥
होतो नामाचा गजर । दिंड्या पताकांचे भार ॥ २ ॥
निवृत्ति ज्ञानदेव सोपान । अपार वैष्णव ते जाण ॥ ३ ॥
हरिकीर्तनाची दाटी । तेथें चोखा घाली मिठी ॥ ४ ॥

५९ पंढरीचें सुख नाहीं त्रिभुवनीं । प्रत्यक्ष चक्रपाणी उभा असे ॥ १ ॥
त्रिभुवनीं समर्थ ऐसें पैं तीर्थ । दक्षिणमुख वाहात चंद्रभागा ॥ २ ॥
सकळ संतांचा मुगुटमणि देखा । पुंडलीक सखा आहे जेथें ॥ ३ ॥
चोखा म्हणे तेथें सुखाची मिराशी । भोळ्या भाविकासी अखंडित ॥ ४ ॥

६० जाणतें असोनी नेणतें पैं झालें । सुखाला पावलें भक्तांचिया ॥ १ ॥
कैसा हा नवलाव सुखाचा पहा हो । न कळे ज्याची माव ब्रह्मादिकां ॥२॥
तो हरी समर्थ पंढरीये उभा । त्रैलोक्याची शोभा शोभतसे ॥ ३ ॥
चोखा म्हणे आमुचे दिनांचें माहेर । तें पंढरपूर भीमातटीं ॥ ४ ॥

६१ न करी आळस जाय पंढरीसी । अवघी सुखराशी तेथें आहे ॥ १ ॥
पाहातां भिंवरा करी एक स्नान । घाली लोटांगण पुंडलिका ॥ २ ॥
कान धरोनी सुखें नाचा महाद्वारीं । तया सुखासरि दुजी नाहीं ॥ ३ ॥
पाहाता श्रीमुख हरे ताहान भूक । चोखा म्हणे सुख विठुपायीं ॥ ४ ॥

६२ वैकुंठ पंढरी भिंवरेचे तीरीं । प्रत्यक्ष श्रीहरि उभा तेथें ॥ १ ॥
रुप हे सांवळें गोड तें गोजिरें । धणि न पुरे पाहतां जया ॥ २ ॥
कांसे सोनसळा नेसला पिंवळा । वैजयंती माळा गळां शोभे ॥ ३ ॥
चोखा म्हणे ऐसें सगुण हें ध्यान । विटे समचरण ठेवियेलें ॥ ४ ॥

६३ सुखाची सुख राशि पंढरीसी आहे । जावोनिया पाहे अरे जना ॥ १ ॥
अवघाचि लाभ होईल तेथीचा । न बोलवे वाचा मौनावली ॥ २ ॥
अवघिया उद्धार एकाचि दर्शनें । भुक्ति-मुक्ती केणें मिळे फुका ३ ॥
प्रत्यक्ष चंद्रभागा अमृतमय साचार । जडजीवा उद्धार पहातां दृष्टी ॥ ४ ॥
चोखा म्हणे आनंदें नाचा महाद्वारीं । वाचे हरिहरि म्हणे सुखें ॥ ५ ॥

६४ पुंडलिकें सुख दाखविलें लोकां । विठ्ठल नाम नौका तरावया ॥ १ ॥
जाय पंढरीसी जाय पंढरीसी । पाहे विठोबासी डोळेभरी ॥ २ ॥
अवघा पर्वकाळ तयाचियेपायीं । नको आणिके ठायीं जाउं वाया ॥३॥
चोखा म्हणे ऐसा लाभ बांधा गांठी । जावोनिया मिठी पायीं घाला ॥४॥

६५ अवघी पंढरी भूवैकुंठ नगरी । नांदतसे हरि सर्वकाळ ॥ १ ॥
चतुर्भुजमूर्ति शंख चक्र करीं । पीतांबरधारी श्यामवर्ण ॥ २ ॥
श्रीमुख शोभलें किरीट कुंडलें । तेंचि मिरवलें चंद्रसूर्य ॥ ३ ॥
पीतांबरी कांसे सोनसळा विराजे । सर्वांगीं साजे चंदनउटी ॥ ४ ॥
मिरवले कर दोनीं कटावरी । ध्यान तें त्रिपुरारि ध्यात असे ॥ ५ ॥
सनकादिक भक्त पुंडलिक मुनी । सुखसमाधानी सर्वकाळ ॥ ६ ॥
आनंदाचा कंद उभा विटेवरी । चोखा परोपरी नाचतसे ॥ ७ ॥

६६ बहुत हिंडलों देशदेशांतर । परी मन नाहीं स्थिर झालें कोठें ॥ १ ॥
बहुत तीर्थें फिरोनियां आलों । मनासवें झालों वेडगळचि ॥ २ ॥
बहुत प्रतिमा ऐकिल्या पाहिल्या । मनाच्या राहिल्या वेरझारा ॥ ३ ॥
चोखा म्हणे पाहतां पंढरी भूवैकुंठ । मनाचे हे कष्ट दूर गेले ॥ ४ ॥

६७ कोठें एक कोठें दोन । आहे परिपूर्ण पंढरीये ॥ १ ॥
कोठें देव कोठें तीर्थ । आहे सर्व पंढरीये ॥ २ ॥
कोठें आसन कोठें वसन । विटे समचरण पंढरीये ॥ ३ ॥
कोठें निजे कोठें बैसे । उभाची असे पंढरीये ॥ ४ ॥

चोखा म्हणे कोठें कांहीं । उभारुनी बाही पंढरीये ॥ ५ ॥

६८ देव हा उभा देव हा उभा । देव हा उभा विटेवरी ॥ १ ॥
सर्वाठायीं देव उभा । त्रैलोक्य शोभा पंढरीये ॥ २ ॥
देव पाहा कोणी देव पाहा कोणी । उभा समचरणीं विटेवरी ॥ ३ ॥
चोखा म्हणे सुखाची सुखराशी । आमुची मिराशी पंढरीये ॥ ४ ॥

६९ वारी पंढरीची तोचि वारकरी । दया क्षमा बरी वसे तेथें ॥ १ ॥
तोचि माझा जीव प्राणाचाहि प्राण । जीव वोवाळीन तयावरी ॥ २ ॥
आसनीं शयनीं पंढरीचें ध्यान । वाचे नारायण जप सदां ॥ ३ ॥
चोखा म्हणे तोचि माझा हे सांगाती । तयाचे संगती देव जोडे ॥ ४ ॥

७० एक वेळां पंढरी वाचे जो उच्चारी । मोक्ष त्याचे घरीं नांदतसे ॥ १ ॥
सदां सर्व काळ विठ्ठल चिंतन । करिती कीर्तन दिवस राती ॥ २ ॥
ते माझे सोयरे सज्जन सांगाती । जे आठविती विठोबासी ॥ ३ ॥
चोखा म्हणे ते परलोकीचे सखे । गाती नाम मुखें विठोबाचे ॥ ४ ॥

७१ पंढरी पंढरी वाचे जो उच्चारी । तोचि संसारी तरे जाणा ॥ १ ॥
ऐसा हा वर आहे सकळिकां । पुंडलिकें देखा मागितलें ॥ २ ॥
युगें अठ्ठावीस कर दोनीं कटीं । उभा असे तटीं भिवरेच्या ॥ ३ ॥
जोडोनियां पाय उभारोनी बाह्या । दरूशनें देता हे मोक्ष मुक्ती ॥ ४ ॥
चोखा म्हणे ऐसी दिली असे भाक । साक्ष पुंडलिक तयापासीं ॥ ५ ॥

७२ जयाची वासना जयापरि असे । तैसी पुरवीतसे पांडुरंग ॥ १ ॥
विठ्ठल हें नाम जगासी तारक । ऐसी दिली भाक पुंडलिका ॥ २ ॥
पंच महापातकी गांजले तिहीलोकीं । तया मोक्ष मुक्ती पंढरीये ॥ ३ ॥
चंद्रभागे स्नान करी प्रदक्षिणा । घाली लोटांगणा महाद्वारीं ॥ ४ ॥
चोखा म्हणे वर्म संतीं सांगितलें । तेंचि धरिलें हृदयकमळीं ॥ ५ ॥

## आत्मनिवेदन

७३ शुद्र चोखामेळा करी नामाचा सोहळा ॥ १ ॥
यातीहीन मी महार । पूर्वीं निळाचा अवतार ॥ २ ॥
कृष्णनिंदा घडली होती । म्हणोनि महार जन्मप्राप्ती ॥ ३ ॥
चोखा म्हणे विटाळ । आम्हां पूर्वीचें हें फळ ॥ ४ ॥

## काला–बालक्रिडा

७४ नेणतें तयासी नेणता लहान । थोरा थोरपणें दिसे बरा ॥ १ ॥
पावा वाहे वेणु खांदिया कांबळा । रुळताती गळां गुंजहार ॥ २ ॥
मुखीं दहींभात कवळ काल्याचें । उष्टें गोपाळांचें खाय सुखें ॥ ३ ॥
चोखा म्हणे ऐसा वैकुंठीचा हरी । गोपाळा गजरी काला वांटी ॥ ४ ॥

७५ कवतुक गोकुळीं करी गोपाळांसी । खाय उच्छिष्टासी दहीं भात ॥ १ ॥
चोरितसे लोणी घरोघरीं त्यांचें । खावोनी तयाचें म्हणे नाहीं ॥ २ ॥
गौळणी गाऱ्हाणें देतां मातेपासी । देखोनी तियेसी हांसतसे ॥ ३ ॥
डाई धरोनिया जाय तिचे घरा । करी चाराचुरा खापराचा ॥ ४ ॥
सोडोनी गोधनें जाय यमुनेतटीं । धांवे धेनुपाठीं करी काला ॥ ५ ॥
चोखा म्हणे ऐसें दावोनी लाघव । आपुली ती माव कळों नेदी ॥ ६ ॥

७६ कोणासी हें वर्म न कळे तुमचे । ब्रम्हादिक पिसे वेडे झाले ॥ १ ॥
तयासी न कळे तुमचें लाघव । केली असे माव बाळपणीं ॥ २ ॥
वेडावोनी ब्रह्मा लागतसे चरणीं । तुमची करणी न कळे कांहीं ॥ ३ ॥
चोखा म्हणे तुमचा ऐसा तो खेळ । असे तो आकळ वेदशास्त्रां ॥ ४ ॥

७७ गोधनें चारी गोपाळांसवें । चोरूनी शिदोऱ्या त्यांच्या खाय ।
नाहीं म्हणोनी खरी आण वाहे । खोटें खरें तेथें न पाहें ॥ १ ॥
ऐसा वैकुंठीचा सांवळा हरी । खेळू खेळे गोकुळा माझारी ।
बाळपणी केल्या दैत्या भोंवरी । पांडवा साहाकारी हरि जाला ॥ २ ॥
इंद्र कोपतां शिळा धारी । नखावरी धरियेला गिरी ।
काळिया कंसासुरा मारी । तोचि श्रीहरी पंढरीये ॥ ३ ॥
चोखा म्हणे भावाचा लंपट । म्हणोनी नावडे वैकुंठ ।
येथें आवडले वाळवंट । पुंडलिक पेठ आवडी ॥ ४ ॥

## –परिपूर्णता – समाधान–

७८ देवा नाहीं रूप देवा नाहीं नाम । देव हा निष्काम सर्वांठाई ॥ १ ॥
डोळियाचा डोळा दृष्टीच भासला । देव प्रकाशला आदिअंती ॥ २ ॥

नवल वाटलें नवल वाटलें । देव कोंदाटले मागें पुढें ॥ ३ ॥
चोखा म्हणे माझा संदेह फिटला । देव प्रगटला देहामाजीं ॥ ४ ॥
७९ नवल पाही नवल पाही । पाहो जावें तेणें पाहिलें नाहीं ॥ १ ॥
निर्गुणीं सगुण सगुणीं निर्गुण । दोहींचें कारण तेच ठाई ॥ २ ॥
चोखा म्हणे पाहतां पाहणें लपावें । हृदयीं बिंबलें हृदयचि ॥ ३ ॥
८० आम्हां आनंद झाला आम्हां आनंद झाला । देवोचि देखिला देहामाजीं ॥१॥
देखणें ऊडालें पाहणें लपालें । देवें नवल केलें देहामाजीं ॥ २ ॥
मागें पुढें देव रिता ठाव कोठें । हृदयींच भेटे देहीं देव (देवो) ॥ ३ ॥
चोखा म्हणे देव देखिला पंढरी । उभा भीमातीरीं विटेवरी ॥ ४ ॥
८१ कर्मातें वाळिले धर्मातें वाळीलें । सर्व हारपलें जेथिचें तेथें ॥ १ ॥
विधीतें वाळिलें निषेधा गिळिलें । सर्व हारपलें जेथिचें तेथें ॥ २ ॥
वेदातें वाळीलें शास्त्रातें वाळीलें । सर्व हारपलें जेथिचें तेथें ॥ ३ ॥
चोखा म्हणे माझा संदेह फिटला । देहींच भेटला देव आम्हां ॥ ४ ॥

## — करूणा —

८२ धांव घाली विठु आतां चालुं नको मंद ।
मज मारिती बडवे कांहींतरी अपराध ॥ १ ॥
विठोबाचा हार तुझ्या कंठीं कैसा आला ।
शिव्या देऊनी मारा म्हणती देव कां बाटला ॥ २ ॥
तुमचे दारीचा कुतरा नका मोकलूं दातारा ।
अहो चक्रपाणी तुम्ही आहां जीमेदारा ॥ ३ ॥
कर जोडोनी चोखा विनवितो देवा । बोलिलों उत्तर याचा राग नसावा ॥४॥
८३ असेंच करणें होतें तुला । तरी कां जन्म दिला मला ॥ १ ॥
जन्म देवोनी सांडीलें । कांहो निष्ठुर मन केलें ॥ २ ॥
कोठें गेलां माझे वेळीं । केलें कोणाचें सांभाळी ॥ ३ ॥
चोखा म्हणे देवा नको मोकलूं केशवा ॥ ४ ॥
८४ जनक तूं माझा जननी जगाची । करुणा आमुची कां हो नये ॥ १ ॥
कासया संसार लावियेला पाठी । पडलीसे तुटी तुमची माझी ॥ २ ॥

जन्म जरा मरण आम्हां सुख दुःख । पाहासी कौतुक काय देवा ॥ ३ ॥
गहिंवरुनी चोखा उभा महाद्वारीं । विनवी जोडुनी करी विठोबासी ॥ ४ ॥

८५ भवाचीया भेणें येतों कांकूळती । धांवे करुणामूर्ति देवराया ॥ १ ॥
पडीलोंसे मायामोहाचीये जाळीं । येवोनी संभाळी देवराया ॥ २ ॥
कवणाची आस पाहूं कोणीकडे । जीविंचें सांकडे वारी देवा ॥ ३ ॥
गहिंवर नावरें चोखियाचे मनीं । धांवे चक्रपाणी देवराया ॥ ४ ॥

८६ नेत्रीं अश्रुधारा उभा भीमातीरीं । लक्ष चरणावरी ठेवोनीयां ॥ १ ॥
कां गा मोकलीलें न येसी गा देवा । काय मी केशवा चुकलोंसे ॥ २ ॥
नेणे करूं भक्ती नेणे करूं सेवा । न येसी तूं देवा कळलें मज ॥ ३ ॥
चोखा म्हणे माझ्या जीविचा विसावा । पुकारितो धांवा म्हणोनिया ॥४॥

८७ यातीहीन मज म्हणती देवा । नकळे करूं तुमची सेवा ॥ १ ॥
आम्हां नीचांचे तें काम । वाचे गावें सदां नाम ॥ २ ॥
उच्छिष्टाची आस । संत दासाचा मी दास ॥ ३ ॥
चोखा म्हणे नारायणा । पदरीं घेतलें मज दीना ॥ ४ ॥

८८ हीन याती माझी देवा । कैसी घडे तुझी सेवा ॥ १ ॥
मज दूर दूर हो म्हणती । तुज भेटूं कवण्यारीती ॥ २ ॥
माझा लागतांची कर । सिंतोडा घेताती करार ॥ ३ ॥
माझ्या गोविंदा गोपाळा । करूणा भाकी चोखामेळा ॥ ४ ॥

८९ ऐसा पुत्र देगा देवा । जग म्हणे त्याला बाबा ॥ १ ॥
ऐसा भक्तराज गुंडा । त्याचा तिहींलोकीं झेंडा ॥२ ॥
इतुकें न देवे तुझ्यानें । माझें करी गा निसंतान ॥ ३ ॥
दोहीं माजी एक लेखा । बोले केशवदास चोखा ॥ ४ ॥

९० माझा तंव अवघा खुंटला उपाय । रिता दिसे ठाव मजलागीं ॥ १ ॥
करितोचि दिसे अवघेचि वाव । सुख दुःख ठाव अधिकाधिक ॥ २ ॥
लिगाडाची माशी तैसी झाली परी । जाये तळिवरी सुटका नव्हे ॥ ३ ॥
चोखा म्हणे अहो दीनांच्या दयाळा । पाळा कळवळा माझा देवा ॥ ४ ॥

९१ भ्रमण (श्रम) न करितां भागलों जी देवा । न मिळे विसावा मज कोठें ॥१॥
लागलेंसें कर्म आमुचे पाठारी । आतां कोणावरी बोल ठेऊं ॥ २ ॥
सांपडलो वैरियाचे भांडवली । न कळे चिखलीं रोवियेलों ॥ ३ ॥
चोखा म्हणे अहो पंढरीनिवासा । तुम्हांविण फांसा उगवी कोण ॥ ४ ॥

९२ जन्मांची वेरझारी । तुम्हांवीण कोण वारी ।
जाचलों संसारीं । सोडवण करी देवराया ॥ १ ॥
शरण शरण पंढरिराया । तुम्हां आलों यादवराया ।
निवारोनियां भया । मज तारा या सागरीं ॥ २ ॥
तुम्हांविण माझें कोडें । कोण निवारी सांकडें ।
मी तों झालों असे वेडें । उपाय पुढें सुचेना ॥ ३ ॥
चोखा म्हणे दीनानाथा । आतां निवारी हे भवव्यथा ।
म्हणोनी ठेवितसे माथा । चरणांवरी विठूच्या ॥ ४ ॥

९३ तुम्हांसी शरण बहुत मागें आले । तयांचे साहिले अपराध ॥ १ ॥
तैसा मी पामर यातिहीन देवा । माझा तो कुढावा करा तुम्ही ॥ २ ॥
नाहीं अधिकार उच्छिष्टा वेगळा । म्हणवोनी कळवळा पाळा माझा ॥३॥
चोखा म्हणे मज कांहीं तें न कळे । नामाचिया बळें काळ कंठी ॥ ४ ॥

९४ आम्ही कोणावरी सत्ता । करावी बा पंढरिनाथा ।
होईल साहाता । दुजा तत्वता तो सांगा ॥ १ ॥
तूंचि बळिया शिरोमणि । आहेसि त्रिभुवनीं ।
देवाधिदेव मुगुटमणि । कींव भाकणें यासाठीं ॥ २ ॥
केला माझा अंगिकार । आतां कां करितां अव्हेर ।
तुमचा तुम्ही साचार । करा विचार मायबापा ॥ ३ ॥
जन्मोजन्मींचा पोसणा । तुमचाचि नारायणा ।
भाकितों करुणा । आना मना चोखा म्हणे ॥ ४ ॥

९५ आन साधनें सायास । कांहीं न करी आयास ।
नामाचाचि उल्हास । हृदयीं वास असावा ॥ १ ॥

हेचि मागतसे देवा । हीच माझी भोळी सेवा ।
पायांसी केशवा । हाचि हेवा मानसीं ॥ २ ॥
जन्म देई संतांघरीं । उच्छिष्टाचा अधिकारी ।
आणिक दुजी थोरी । दारीं परवरी लोळेन ॥ ३ ॥
नका मोकलूं दातारा । विनंति माझी अवधारा ।
अहो रुक्मादेवीवरा । आवरा पसारा चोखा म्हणे ॥ ४ ॥

९६ अखंड माझी सर्व जोडी । नामोच्चार घडोघडी ॥
आतां न पडे सांकडी । पडो कबाडी वाया दुःखाचिया ॥ १ ॥
हाचि मानिला निर्धार । आतां न करी वाउगा विचार ॥
वांया काय बा करकर । धरोनी धीर बैसलों ॥ २ ॥
धरणें घेऊनि तुमचे द्वारीं । बैसेन उगाच मी गा हरी ॥
कांहीं न करी भरोवरी । नाम हरी गाईन ॥ ३ ॥
तुमची लाज तुम्हासी । आपुलिया थोरपणासी ॥
ब्रीद बांधिलें चरणासीं । ते चोख्यासी दाखवी ॥ ४ ॥

९७ नको मज मान अथवा अपमान । दोहींचें कारण मज नाहीं ॥ १ ॥
सुख अथवा दुःख संचिताचा ठेवा । संकल्पाचा ठेवा जैसा तैसा ॥ २ ॥
जन्म मरण हें तो बांधिलें पदरीं । वाया हाव भरी येणें संगें ॥ ३ ॥
चोखा म्हणे ऐसा नेमियेला नेम । तेचि हें वर्म भोगूं आतां ॥ ४ ॥

९८ संसाराचें नाहीं भय । आम्हां करील तो काय ।
रात्रंदिवस पाय । झालों निर्भय आठवितां ॥ १ ॥
आमुचें हें निजधन । जोडियेले तुमचे चरण ।
आणि संतांचें पूजन । हेंचि साधन सर्वथा ॥ २ ॥
कामक्रोधादिक वैरी । त्यासी दवडावे बाहेरी ।
आशा तृष्णा वासना थोरी । पिडिती हरि सर्वदां ॥ ३ ॥
आतां सोडवी या संगासी । न करीं पांगिला आणिकांसी ।
चोखा म्हणे हृषिकेशी । अहर्निशीं मज द्यावें ॥ ४ ॥

९९ देवा कां हें साकडें घातिलें । निवारा हें कोडें माझें तुम्ही ॥ १ ॥
समर्थें आपुल्या नामासी पाहावें । मनीं उमजावें आपुलिया ॥ २ ॥
यातिहीन आम्हां कोण अधिकार । अवघे दूरदूर करिताती ॥ ३ ॥
चोखा म्हणे ऐसा हीन नरदेह । पडिला संदेह काय करूं ॥ ४ ॥

१०० तुम्ही वाढविलें तुम्ही पोशियिलें । तुम्हीच दाविलें जग मज ॥ १ ॥
तुमचा प्रकार तुमचा तुम्ही जाणा । आमुचिया खुणा जाणों आम्ही ॥२॥
तुम्हांसी तो मीड कासयाची देवा । हेचि केशवा सांगा मज ॥ ३ ॥
चोखा म्हणे काय बोलूं येयावरी । माझा तूं कैवारी देवराया ॥ ४ ॥

१०१ आतां कोठवरी । मीड तुमची धरूं हरि ॥ १ ॥
दार राखीत बैसलों । तुम्ही दिसे मोकलिलों ॥ २ ॥
ही नीत नव्हे बरी । तुमची साजे तुम्हां थोरी ॥ ३ ॥
चोखा म्हणे काय बोलों । आमुचे आम्ही वायां गेलों ॥ ४ ॥

१०२ करोनियां दया । सांभाळा जी देवराया ॥ १ ॥
मी तो पतीत पतीत । तुमचाचि शरणांगत ॥ २ ॥
लाज येईल तुमचे नांवा । मज उपेक्षितां देवा ॥ ३ ॥
आपुलें जतन । करा अभय देवोन ॥ ४ ॥
चोखा म्हणे हरि । आतां मीड न धरी ॥ ५ ॥

१०३ तुम्ही आतां उपेक्षितां । काय चाले माझी सत्ता ॥ १ ॥
तुमच्या उच्छिष्ठाचा दास । ऐसा माझा विश्वास ॥ २ ॥
नामा वांचोनी कांहीं नेणें हेंचि दृढ धरिलें मनें ॥ ३ ॥
चोखा म्हणोनी पडतो पाया । कृपा करा देवराया ॥ ४ ॥

१०४ घेतलासे भेव । आतां न चले उपाव ॥ १ ॥
आतां आलें आड । एकाहुनी एक वाड ॥ २ ॥
पाहे आपुलिया चाडा । देखे अवघीच पीडा ॥ ३ ॥
सुखाचिया वाटे । अवघे दुखाःचेच पेटे ॥ ४ ॥
जो जो धरूं जाय संग । चोखा म्हणे होय भंग ॥ ५ ॥

१०५ धरोनी विश्वास राहिलोंसें द्वारीं । नाम श्रीहरि आठवीत ॥ १ ॥
कळेल तैसें करा जी दातारा । तारा अथवा मारा पांडुरंगा ॥ २ ॥
मी तंव धरणें घेवोनी बैसलों । आतां काय बोलों येयापरी ॥ ४ ॥
चोखा म्हणे माझा हाचि नेम आतां । तुम्ही कृपावंत सिद्धि न्यावा ॥ ४ ॥

१०६ आतां नको भरोवरी । तूं तों उदार श्रीहरि ॥ १ ॥
शरणांगता पायापाशीं । अहर्निशी राखावें ॥ २ ॥
ब्रीद गाजे चराचरी । कृपाळु हरि दीनाचा ॥ ३ ॥
चोखा म्हणे भरंवसा । दृढ सरसा मानला ॥ ४ ॥

१०७ अवघें मंगळ तुमचें गुणनाम । माझा तो श्रम पाहातां जाये ॥ १ ॥
गोड हें गोजिरें नाम तुमचें देवा । आठव हा द्यावा मजलागीं ॥ २ ॥
या परतें मागणें दुजें नाहीं आतां । पुरवावी अनाथनाथा आळी माझी ॥३॥
चोखा म्हणे देवा होउनी उदार । ठेवा कृपाकर माथां माझ्या ॥ ४ ॥

१०८ ओंगळ वासना टाकिली जाळोनी । घातली चरणीं मिठी देवा ॥ १ ॥
गोड अथवा कडू तुमचे तुम्ही जाणा । माझी ती वासना अमंगळ ॥२॥
मन नाहीं हातीं करितां खटपट । वाउगा बोभाट काय बोले ॥ ३ ॥
चोखा म्हणे तुम्ही आहेत सुजाण । माझी आठवण कांहीं धरा ॥ ४ ॥

१०९ अधिकार माझा निवेदन पाई । तुम्ही तो गोसावी जाणतसां ॥ १ ॥
अवघ्या वर्णा माजी हीन केली जाती । विटाळ विटाळ म्हणती क्षणोक्षणीं ॥२
कोणीही अंगिकार न करिती माझा । दूर हो जा अवघे म्हणती ॥ ३ ॥
चोखा म्हणे तुम्ही घ्याल पदरीं । तरीच मज हरी सुख होय ॥ ४ ॥

११० तुमच्या चरणी जें कांहीं आहे । तें सुख पाहे मज द्यावें ॥ १ ॥
सर्वांसी विश्रांति तेथें मन ठेवी । तें सुख शांति देई मज देवा ॥ २ ॥
सर्वांभूतीं दया संतांची ते सेवा । हेंचि देई देवा दुजें नको ॥ ३ ॥
चोखा म्हणे आणिक दुजें नको कांहीं । जीव तुझें पायीं देईन बळी ॥४॥

१११ कांहीं केशिराजा दुजें पैं धरितां । हें तो आश्चर्यता वाटे मज ॥ १ ॥
एकासी आसन एकासी वसन । एक तेचि नग्न फिरताती ॥ २ ॥

एकासी कदान्न एकासी मिष्टान्न । एका न मिळे कोरान्न मागतांची ॥३॥
एकासी वैभव राज्याची पदवी । एक गांवोगांवीं भीक मागे ॥ ४ ॥
हाचि न्याय तुमचे दिसतो कीं घरीं । चोखा म्हणे हरी कर्म माझें ॥५॥

११२ साच जें होतें तें दिसोनियां आलें । आतां मी न बोले तुम्हां कांहीं ॥१॥
तुमचें उचित तुम्हीच करावें । आम्ही सुखें पाहावें होय तैसें ॥ २ ॥
विपरीत सुपरीत तुमचीये घरीं । तुमची तुम्हां थोरी बरी दिसे ॥ ३ ॥
चोखा म्हणे ऐसा हा नवलाव । न कळेचि भाव ब्रह्मादिकां ॥ ४ ॥

११३ कशासाठीं तुम्हां शरण रिघावें । आमुचें वारावें सुखदुःख ॥ १ ॥
आमुचें संचित भोग क्रियामान । तुमचें कारण तुम्ही जाणा ॥ २ ॥
आमुचा तों येथें खुंटलासे लाग । न दिसे मारग मोकळाचि ॥ ३ ॥
चोखा म्हणे काय करूं आतां । तुमची हे सत्ता अनावर ॥ ४ ॥

११४ जिकडे पाहे तिकडे बांधलोंसे हरी । सुटायाचा करी बहु यत्न ॥ १ ॥
परी तें वर्म मज न कळे कांहीं । अधिकचि डोहीं बुडतसे ॥ २ ॥
एका पुढें एक पडती आघात । सारितां न सरत काय करूं ॥ ३ ॥
चोखा म्हणे येथें न चलेचि कांहीं । धांवे माझे आई विठाबाई ॥ ४ ॥

११५ मजचि कां करणें लागला विचार । परी वर्म साचार न कळे कांहीं ॥१॥
कैशी करूं सेवा आणिक ते भक्ती । न कळे विरक्ती मज कांहीं ॥ २ ॥
आणिक तो दुजा नाहीं अधिकार । कैसा हा विचार करूं आतां ॥३॥
चोखा म्हणे बहु होती आठवण । कठिण कठिण पुढें दिसे ॥ ४ ॥

११६ काय हें मातेसी बाळें शिकवावें । आपुल्या स्वभावें वोढतसे ॥ १ ॥
तैसाच प्रकार तुमचीये घरीं । ऐसीच निर्धारी आली वाट ॥ २ ॥
तेचि आजी दिसे वोखटें कां झालें । संचिताचें बळें दिसे ऐसें ॥ ३ ॥
चोखा म्हणे हा तो तुम्हां नाहीं बोल । आमुचें सखोल कर्म दिसे ॥ ४ ॥

११७ वावरलें मन करी धांवा धांवी । यांतुनी सोडवी देवराया ॥ १ ॥
लागलासे चाळा काय करूं आतां । नावरे वारितां अनावर ॥ २ ॥
तुमचें लिगाड तुम्हीच वारावें । आम्हांसी काढावें यातोनियां ॥ ३ ॥
चोखा म्हणे तरीच जीवा होय सुख । नका आतां दुःख दाऊं देवा ॥ ४ ॥

११८ धीर माझे मना । नाहीं नाहीं नारायणा ॥ १ ॥
बहुचि जाचलों संसारें । झालों दुःखाचे पाझरे ॥ २ ॥
भोग भोगणें हें सुख । परी शेवटीं आहे दुःख ॥ ३ ॥
भारवाही झालों । वाउग्या छंदा नागवलों ॥ ४ ॥
दया करा पंढरीराया । चोखा लागतसे पायां ॥ ५ ॥

११९ जयांचियासाठीं जातो वनाप्रती । ते तों सांगाती येती बळें ॥ १ ॥
जयांचियासाठीं टाकिला संसार । ते तों बलवत्तर पाठीं येती ॥ २ ॥
जयाचिया भेणें घेतिलें कपाट । तो तेणें वाट निरोधिली ॥ ३ ॥
जयाचिया भेणें त्यागियेलें जग । तो तेणें उद्योग लावियेला ॥ ४ ॥
चोखा म्हणे नको होऊं परदेशी । चिंती विठोबासी हृदयामाजीं ॥ ५ ॥

१२० श्वान अथवा सूकर होका मार्जार । परी वैष्णवाचें घर देई देवा ॥ १ ॥
तेणें समाधान होय माझ्या जीवा । न भाकीं कींव आणिकासी ॥ २ ॥
उच्छिष्ट प्रसाद सेवीन धणिवरि । लोळेन परवरी कवतुकानें ॥ ३ ॥
चोखा म्हणे कोणी जातां पंढरीसी । दंडवत त्यासी घालीन सुखें ॥ ४ ॥

१२१ इतुकेंच देई रामनाम मुखीं । संतांची संगतीं सेवा सार ॥ १ ॥
निरंतर घोष जयाचे मंदीरी । तयाचिये घरीं सुखें मज ॥ २ ॥
उच्छिष्ट धणिवरी पोटभरि धाये । दुजी नको सोय देवराया ॥ ३ ॥
चोखा म्हणे माझी पुरवावी आळी । माय तूं माउली कृपाळु देवा ॥ ४ ॥

१२२ मायामोहो जाळे गुंतलोंसे बळें । यांतोनी वेगळें करी गा देवा ॥ १ ॥
न कळेचि स्वार्थ अथवा परमार्थ । बुडालोंसे निभ्रांत याचमाजीं ॥ २ ॥
न घडे देवार्चन संतांचें पूजन । मन समाधान कधीं नव्हे ॥ ३ ॥
नसतेचि छंद लागती अंगासी । तेणें कासावीस जीव होय ॥ ४ ॥
चोखा म्हणे याही चोरें नागविलों । माझा मीचि झालो शत्रु देवा ॥ ५ ॥

१२३ कवणावरी आतां देऊं हें दूषण । माझें मज भूषण गोड लागे ॥ १ ॥
गुंतलासे मीन विषयाचे गळीं । तैसा तळमळी जीव माझा ॥ २ ॥
गुंतला हरिण जळाचिया आशा । तो गळां पडे फांसा काळपाश ॥ ३ ॥

वारितां वारेना सारितां सारेना । कितीसा उगाणा करूं आतां ॥ ४ ॥
चोखा म्हणे ऐसा पडलों प्रवाहीं । बुडतसों डोहीं भवाचिया ॥ ५ ॥

१२४ आतां कोठवरी करूं विवंचना । कां हे नारायणा तुम्हां न कळे ॥ १ ॥
सांपडलों जाळीं गुंतलोंसे गळीं । जीव हळहळी बाऊगाचि ॥ २ ॥
कामक्रोधांचे सांपडलों हातीं । बहुत फजीति होय तेणें ॥ ३ ॥
नेणो कैसे दुःख पर्वतायेवढें । सुख राई पाडें झालें मज ॥ ४ ॥
चोखा म्हणे तुमचें नाम न ये वाचें । बहु संकल्पाचें वोझें माथा ॥ ५ ॥

१२५ किती धांवा धांवी करावी कोरडी । न कळें कांहीं जोडी हानि लाभ ॥ १
जे जे करितों तें तें फळकट । वाउगेंचि कष्ट दुःख भोगी ॥ २ ॥
निवांत बैसोनीं नामाचें चिंतन । करूं जातां मन स्थिर नाहीं ॥ ३ ॥
दान धर्म करूं तो नाहीं धन पदरीं । जन्माचा भिकारी होउनीं ठेलों ॥ ४ ॥
चोखा म्हणे ऐसा करंटा मी देवा । काय तुझी सेवा करूं आतां ॥ ५ ॥

१२६ अहो करुणाकरा रुक्मिणीच्या वरा । उदारा धीरा पांडुरंगा ॥ १ ॥
काय म्यां पामरें वानावें जाणावें । न कळे कैसें गावें नाम तुमचें ॥ २ ॥
विध अविध कोणता प्रकार । न नेणों कळे साचार मजलागीं ॥ ३ ॥
चोखा म्हणे मज कांहींच न कळे । उगाचि मी लोळे महाद्वारीं ॥ ४ ॥

१२७ नाहीं देह शुद्ध याति अमंगळ । अवघे वोंगळ गुण दोष ॥ १ ॥
करूं जातां विचार अवघा अनाचार । आणिक प्रकार काय बोलूं ॥ २ ॥
वाणी नाहीं शुद्ध धड न ये वचन । धिःकारिती जन सर्व मज ॥ ३ ॥
अंग संग कोणी जवळ न बैसे । चोखा म्हणे ऐसें जीवित माझें ॥ ४ ॥

१२८ कोण माझा आतां करील परिहार । तुजवीण डोंगर उतरी कोण ॥ १ ॥
तूं वो माझी माय तूं वो माझी माय । दाखवी गे पाय झडकरी ॥ २ ॥
बहु कनवळा तुझिया गा पोटीं । आतां नको तुटी करूं देवा ॥ ३ ॥
चोखा म्हणे मज ध्यावें पदरांत । ठेवा माझें चित्त तुमचें पायीं ॥ ४ ॥

१२९ बहु कनवाळु होसी गा देवराया । म्हणोनी सखया शरण आलों ॥१॥
निवारी या तापापासोनी सोडवीं । करुणा भाकावी किती तुम्हां ॥२॥

माझियाचि काजा विलंब दातारा । कां न करीं त्वरा देवराया ॥ ३ ॥
चोखा म्हणे बहु पडिलों काचणीं । सोडवी चक्रपाणी वेगीं आतां ॥४॥

१३० बरें हें वाईट आहे माझे भाळीं । तें सुखें हो बळी जीवें माझ्या ॥ १ ॥
आतां कोणावरी रुसों नये देवा । भोग वो भोगावा आपुलाचि ॥ २ ॥
आहे जें संचित तैसें होत जात । वाउगा वृत्तांत बोल काय ॥ ३ ॥
चोखा म्हणे आतां बहु लाज वाटे । झालें जें वोखटें कर्म माझें ॥ ४ ॥

१३१ सुखाचिया लागीं करितों उपाव । तो अवघेंचि वाव दिसो येतें ॥ १ ॥
करितां तळमळ मन हें राहिना । अनावर जाणा वासना हे ॥ २ ॥
अवघेंचि सांकडें दिसोनियां आलें । न बोलावें तें भले कोणापुढें ॥ ३ ॥
चोखा म्हणे मी पडिलों गुऱ्हाडीं । सोडवीं तातडी यांतूनीयां ॥ ४ ॥

१३२ धरोनियां आशा टाकिलासे ठाव । अवघाचि वाव झाला दिसे ॥ १ ॥
कवणासी सांकडें सांगूं पंढरीराया । कांहो न ये दया माझी तुम्हां ॥ २ ॥
बाळकाचे परी लडिवाळपणें । तुमचें पोसणें मी तों देवा ॥ ३ ॥
चोखा म्हणे मज तुम्ही मोकलितां । काय आमुची कथा आतां चाले ॥४॥

१३३ अहो पतित पावना पंढरीच्या राया । भक्त विसाविया मायबापा ॥ १ ॥
धांवे दुडदुडा आपुलिया काजा । येई गरुडध्वजा मायबापा ॥ २ ॥
दाही दिशा उदास तुम्हांविण झाल्या । न करी पांगिला दुजीयासी ॥३॥
चोखा म्हणे आतां दावी मज वाट । मग मी बोभाट न करी कांहीं ॥४॥

१३४ कळेल तैसे बोल तुजचि बोलेन । भीड मी न धरीन तुझी कांहीं ॥ १ ॥
काय करूं देवा दाटलों जाचणीं । न या चक्रपाणी सोडवण्या ॥ २ ॥
कोठवरी धांवा पोकारूं केशवा । माझा तंव हेवा खुंटलासे ॥ ३ ॥
चोखा म्हणे आतां पुरे चाळवण । आमुचें कारण जाणों आम्ही ॥ ४ ॥

१३५ वारंवार किती करूं करकर । माझा तंव आधार खुंटलासे ॥ १ ॥
न बोलावें आतां हेंचि शहाणपण । होऊनी पाषाण पडों द्वारीं ॥ २ ॥
केव्हां तरी तुम्हां होईल आठवण । हाचि एक भाव धरूं आतां ॥ ३ ॥
चोखा म्हणे मग येशील गिवांसेत । तो वरी चित्त दृढ करूं ॥ ४ ॥

१३६ माझा मी विचार केला असे मनीं । आतां नारायणा पुरे तुमचें ॥ १ ॥
तुम्हांवरी भार घातिलेसें बोझें । हेचि मी माझें जाणतसे ॥ २ ॥
वाउगें बोलावें दिसे फलकट । नाहीं बळकट वर्म आंगीं ॥ ३ ॥
चोखा म्हणे सुखें बैसेन धरणा । तुमच्या थोरपणा येईल लाज ॥ ४ ॥

१३७ जगामध्यें दिसे वरें कीं वाईट । ऐसाचि बोभाट करीन देवा ॥ १ ॥
आतां कोठवरी धरावी हे भीड । तुम्ही तो उघड जाणतसां ॥ २ ॥
ब्रीदाचा तोडर बांधलासे पायीं । त्रिभुवनीं ग्वाही तुमची आहे ॥ ३ ॥
चोखा म्हणे जेणें न ये उणेपण । तेंचि तें कारण जाणा देवा ॥ ४ ॥

१३८ मी तो विकलों तुमचिये पायीं । जीवभाव सर्वहि अर्पियेला ॥ १ ॥
माझा मीच झालों उतराई देवा । तुमचें तुम्ही पाहा आम्हांकडे ॥ २ ॥
नवमास माता वोझें वाहे उदरीं । तैसीच ही परी तुमची माझी ॥ ३ ॥
अपत्य आपुलें फिरे देशोदेशीं । ही लाज कोणासी चोखा म्हणे ॥ ४ ॥

१३९ आपुल्या आपण सांभाळोनी घ्यावें । आहे नाहीं ठावें तुम्हां सर्व ॥ १ ॥
वायांची करणें लौकिकाचा गोवा । कोठवरी देवा बोलणें हें ॥ २ ॥
अंगा नाहीं आलें तंव तें साहालें । खादलें पचलें तरी तें हित ॥ ३ ॥
चोखा म्हणे तुमचें तुम्हांसी सांगणें । माझें यांत उणें काय होतें ॥ ४ ॥

१४० अगाध हे कीर्ति विठ्ठला तुमची । महिमा आणिकांची काय सांगों ॥१॥
पुराणें भागलीं नेति नेति शब्द । श्रुतीचा अनुवाद खुंटलासे ॥ २ ॥
शेषादिकां जेथें न कळेचि अंत । तेथें मी पतित काय वानूं ॥ ३ ॥
चोखा म्हणे माझा नाहीं अधिकार । कैसा हा विचार होईल नेणों ॥४॥

१४१ समर्थासी रंकें शिकवण जैशी । माझी वाणी तैशी बडबड ॥ १ ॥
शुभ हे अशुभ न कळे बोलतां । परि करी सत्ता लंडपणें ॥ २ ॥
उच्छिष्टाची आशा भुंकतसे श्वान । तैसा मी एक दिन आहे तुमचा ॥३॥
चोखा म्हणे एका घासाची चाकरी । करितों मी द्वारीं तुमचीया ॥ ४ ॥

१४२ नेणों तुमचे मन कठिण कां झालें । मज कांहीं न कळे पूर्व कर्म ॥१॥
किती आठवण मागिलाची करूं । तेणें पडे विचारु पुढीलासी ॥ २ ॥
आतां अवघड दिसतें कठीण । मनाचें हें मन चिंता डोही ॥ ३ ॥

चोखा म्हणे काय करुं तें आठवेना । निवांत वासना कई होय ॥ ४ ॥

१४३ कांहीं तरी अभय न मिळे उत्तर । ऐसे कां निष्ठुर झालां तुम्ही ॥ १ ॥
मी तों कळवळोनी मारितसे हांक । तुम्हां पडे धाक कासयाचा ॥ २ ॥
बोलोनि उत्तरें करी समाधान । एवढेंचि दान मज द्यावें ॥ ३ ॥
चोखा म्हणे माझी पुरवावी आस । न करी उदास माझे माये ॥ ४ ॥

१४४ आतां कणकण न करी वाउगी । होणार तें जगीं होउनी गेलें ॥ १ ॥
दारी परवरी झालोंसें पोसणा । तुम्हांसी करुणा न ये कांहीं ॥ २ ॥
होयाचें तें झालें असो कां उदास । धरोनिया आस राहों सुखी ॥ ३ ॥
चोखा म्हणे मज हेंचि बरें दिसे । न लावी पिसें जिवा कांहीं ॥ ४ ॥

१४५ बरें झालें येथें आलोंसे सायासें । सुखदुःख लेशे भोगोनियां ॥ १ ॥
मागिला लागाचें केलेसें खंडण । तेणें समाधान वृत्ति होय ॥ २ ॥
एकसरें मन ठेविलें बांधोनी । निवांत चरणी तुमचीया ॥ ३ ॥
चोखा म्हणे काम क्रोध तोडियेले । येर ते ही केले देशधडी ॥ ४ ॥

१४६ आतां याचा संग (अर्थ) पुरे पुरे देवा । येऊं द्या कनवाळा तुम्हांलागी ॥१॥
गुंतलोंसे काढा यांतोनी बाहेरी । माझें तो हरि कांहीं न चाले ॥ २ ॥
वारंवार करुणा करितों देवराया । कां न ये कनवाळा तुम्हांलागीं ॥३॥
चोखा म्हणे आतां न करा उदास । पुरवावी आस मायबापा ॥ ४ ॥

१४७ अहो पंढरीराया विनवितों तुज । अखंड संतरज लागो मज ॥ १ ॥
नामाची आवडी उच्चार हा कंठीं । करी कृपा दृष्टी मजवरी ॥ २ ॥
पंगतीचे शेष उच्छिष्ट प्रसाद । तेणें सर्व बाध हरे माझा ॥ ३ ॥
चोखा म्हणे माझा हाचि नवस । पुरवी सावकाश देवराया ॥ ४ ॥

१४८ आतां कासया हा दाखवितां खेळ । म्यां तंव सकळ जाणितला ॥ १ ॥
जेथें ब्रह्मादिक वेडे पिसे झाले । न कळे वहिलें तयांलागीं ॥ २ ॥
कोणासी हा पार न कळे तुमचा । काय बोलों वाचा कीर्ति तुमची ॥३॥
चोखा म्हणे तुमचा अविट हा खेळ । भुललें सकळ ब्रह्मांडचि ॥ ४ ॥

१४९ पाहा लाघवी सूत्रधारी । कैसी नाचवी धरोनी दोरी ॥ १ ॥
चारी खाणी चारी वाणी । लक्ष चौऱ्यांशीचा धनी ॥ २ ॥

त्रैलोक्य वैभव ज्याची सत्ता । चोखा म्हणे माझ्या ताता ॥ ३ ॥

१५० किती किती लडिवाळें । कवतुकें पुरविले लळे ॥ १ ॥
तया परिस तुझे घरीं । भुललासे देखो हरि ॥ २ ॥
नावडे आसन वसन । नावडेचि सिंहासन ॥ ३ ॥
भूक ताहान नाठवे कांहीं । चोखा म्हणे नवल पाही ॥ ४ ॥

१५१ जें नेणतें ना जाणतें भलें । तें त्वां भुलविलें तयासी ॥ १ ॥
धन्य देवाचा आगळा । काय वर्णू तुझी लीला ॥ २ ॥
माझिया बापातें गिंवसिलें । मोकळेचि उभें केलें ॥ ३ ॥
कैसा हा तुझा नवलाव । चोखा म्हणे देवांचा तूं देव ॥ ४ ॥

१५२ सुखें पंढरिराया । माझी निववावी काया ॥ १ ॥
बहु तापलों संसारा । कोठवरी वेरझारा ॥ २ ॥
अवघें दुःखाचें सांकडें । न सरेचि हें कोडें ॥ ३ ॥
शिणलों दातारा । चोखा म्हणे मज तारा ॥ ४ ॥

१५३ जें कांहीं करितों तें वायाचि जाय । न कळे उपाय साच कांहीं ॥ १ ॥
धरूं आतां गोड़ लागतसे कडु । तैसा हा उघडु माया मोह ॥ २ ॥
नाथिलेंचि सारें मृगजळ प्राणी । काय लाभ हानि पाहतिया ॥ ३ ॥
चोखा म्हणे ऐसें वांयाचि सकळ । वाटतें नवल मज याचें ॥ ४ ॥

१५४ न लगे भुक्ति मुक्ति वैकुंठीचा वास । सुखें पंढरीस राहीन देवा ॥ १ ॥
आणिक सांकडे घडोत नानापरी। परी मी पंढरी सोडोनी न वजे कोठें ॥२॥
खावयासी जरी न मिळेचि अन्न । उदक सवान धणिवरी ॥ ३ ॥
कोणी निंदो कोणी म्हणोत कां वेडा । जेणें नव्हे पीडा भजनासी ॥ ४ ॥
चोखा म्हणे मज आहे हेंच सुख । आणिकें ठायीं दुःख नानापरीचें ॥५॥

१५५ कैसा मी वानूं कैसा मी वानूं । कैसा ध्याना आणूं पांडुरंग ॥ १ ॥
कैसी ते सेवा करूं ते प्रकार । नव्हेचि अंतर स्थिर माझें ॥ २ ॥
वारितां हें मन न येचि हातां । कितीसी हे चिंता करूं आतां ॥ ३ ॥
चोखा म्हणे येथें खुंटला उपाय । कैसेनि पाय आतुडती ॥ ४ ॥

१५६ काय मानूं आतां निश्चिति देहासी । हा तो काळामुखीं जाईल कीं ॥१॥
वाउगा वाढलों वाउगा पोसलों । वाउगाचि झालों हाव भरी ॥ २ ॥
न घडेचि कांहीं संतांचें पूजन । नोहे सेवा जाण करूं त्यांची ॥ ३ ॥
ज्ञातिहीन देह करी कळकळ । लागली तळमळ कैसें करूं ॥ ४ ॥
बाळ तरुणपण नासलें या लोभें । अवघें माझें माझें म्हणितलें ॥ ५ ॥
आतां अवसान सेवटासी आलें । अवघें पळाले टाकोनियां ॥ ६ ॥
झाकिले डोळे उघडे ते केले । न दिसे आपुलें कोणी आतां ॥ ७ ॥
चोखा म्हणे मज आलासे गहिंवर । न सुचे विचार काय करूं ॥ ८ ॥

१५७ न सुचे मज कांहीं शेवट हा आला । आजि वरि झाला वारावार ॥१॥
आतां अवसान कोणाचें चिंतन । नव्हे मज जाण माया मोहें ॥ २ ॥
केलें तें अवघें झालें फलकट । वाउगा बोभाट करोनी काई ॥ ३ ॥
वाया गा पसारा माझें आणि तुझें । गुंतलों वाउगें मृगजळा ॥ ४ ॥
चोखा म्हणे मज न कळे हें कांहीं । उपायचि नाहीं दुजा आतां ॥५॥

१५८ काया ही वाउगी जातसे वाया । आतां देवराया काय करूं ॥ १ ॥
सुख तें चांगलें तें हि वाया जाण । न सुचे उपाय काय करूं ॥ २ ॥
हात पाय हे तो दिसती बरवे । हे हि वाया गेले काय करूं ॥ ३ ॥
चोखा म्हणे सारे जातील हे लया । आतां देवराया तूंचि माझा ॥ ४ ॥

१५९ एक वेळां करी शीतळ तळमळ । मग मी मळमळ न करी कांहीं ॥ १ ॥
चिंतोनिया पाय राहीन धणीवरी । सुख तें अंतरीं सांठवीन ॥ २ ॥
लाग या लोभाचा न धरी आधार । घालीन सर्व भार तुजवरी ॥ ३ ॥
चोखा म्हणे आतां वारा हें सांकडें । भवाचें तें कोडें भय देवा ॥ ४ ॥

१६० माझें मज हें झालेंसे पारखें । नवल कवतुकें मज वाटे ॥ १ ॥
होऊनी काबाडी वागविलें सारें । माझे मजवर फिरलेसें ॥ २ ॥
वोखटें गोमटें तोंडीचे घातिलें । पिंड हे पोसिले सुखासाठीं ॥ ३ ॥
चोखा म्हणे झालों एकटा एकला । पळाली अवकळा देखोनियां ॥ ४ ॥

१६१ आतां याचा छंद नकोसा हा झाला । वोकुंठा आला संसाराचा ॥ १ ॥
विटलें जें अन्न घेतसे चिळशी । तैसे ये विषयीं झालें असे ॥ २ ॥

आतां हें अवघे दु:खाचे प्रकार । न सोसवे धीर धरवेना ॥ ३ ॥
चोखा म्हणे आतां पुरे याचें जिणें । पुढील तें पेणें अंतरलें ॥ ४ ॥

१६२ सोस हा बहुत केलासे लागाचा । परी वाउगाचि साचा शीण झाला ॥ १ ॥
पुढील चुकले मागील मुकले । दोनी ठाव गेले काय करूं ॥ २ ॥
लिगाडाची मासी गोडपणा गुंतली । फडफडे बुडाली अधिकाधिक ॥ ३ ॥
चोखा म्हणे मीन गळाते गिळी । मग तळमळी न चले कांहीं ॥ ४ ॥

१६३ आणिकाचे आणिक मत । तेणें होत चित्त तळमळ ॥ १ ॥
म्हणोनिया पाय धरोनिया जीवीं । राहिलोंसे ठायीं आपुलिया ॥ २ ॥
सर्व इंद्रियांची बांधोनिया मोट । ठेविले निकट विठुपायीं ॥ ३ ॥
चोखा म्हणे ऐसा करोनीं निर्धार । घातियेला भार विठुवरी ॥ ४ ॥

१६४ एकांति बैसोनि करी गुज गोष्टी । धरोनि हनुवटी बुझावित ॥ १ ॥
नको बा मानूं संसाराचा शीण । तुज एक खूण सांगतो मी ॥ २ ॥
होणार ते होय न होणार ते न होय । सुख दुःख पाहे कर्माधिन ॥ ३ ॥
देव म्हणे चोख्या नको मानूं शीण । तुज माझी आण भक्तराया ॥ ४ ॥

१६५ कासया मानिसी दु:खाचे पर्वत । पुरवीन हेत सर्व तुझा ॥ १ ॥
महाद्वारीं सुख सुखाची जे राशी । ते नामयासी प्राप्त झालें ॥ २ ॥
त्या सुखाचा अधिकारी तुज मी करीन । दृष्टी ठेवीन हे तुजवरी ॥ ३ ॥
तूं माझा प्राण जिवाचा आवडता । तुज मी तत्वतां न विसंबे ॥ ४ ॥
चोखा म्हणे देवा पुरवी माझा ळळा । विसंबे दयाळा मजलागी ॥ ५ ॥

१६६ तुमच्या कृपेचे पोसणें मी हरी । तुम्हांविण दु:ख वारी कोण माझें ॥ १ ॥
भव ताप श्रम निवारी दयाळा । मागणें गोपाळा हेचि असे ॥ २ ॥
काया वाचा मनें संतांची ते सेवा । आन नको हेवा दुजा कांहीं ॥ ३ ॥
चोखा म्हणे देवा नका धरूं दुजें । उतरा हें वोझे संसाराचें ॥ ४ ॥

१६७ काम क्रोध वैरी लागले पाठीं । पाडिलीसे तुटी तुमची माझी ॥ १ ॥
आतां लवकरी सोडवी दातारा । चुकवा वेरझारा जन्ममरण ॥ २ ॥
बहु काकलतों येतों करुणा करा । न दिसे दुजा थारा तुम्हाविण ॥ ३ ॥
चोखा म्हणे तूं आमुची माऊली । कृपेची साऊली करी देवा ॥ ४ ॥

१६८ देवा तुम्ही उदार असा त्रिभुवनीं । तोडर चरणीं ब्रीदावळी ॥ १ ॥
ती आजि माझी पुरवावी आस । नका करूं उदास जीवित्वासी ॥ २ ॥
न करी न करी आन साधनासी । गाईन सर्व भावेंसी नाम तुमचें ॥ ३ ॥
चोखा म्हणे देवा हीं माझी वासना । पुरवा नारायणा कोड माझें ॥ ४ ॥

१६९ कासया करूं तपाचे डोंगर । आणिक अपार व्रतदान ॥ १ ॥
कासया जाऊं दूर दिगंतरी । राहीन पंढरी पशुयाती ॥ २ ॥
कासया उपवास निराहार पारणें । संत संग पेणें जन्मोजन्मीं ॥ ३ ॥
कासया विधिनिषेधाची मात । सुखाचा सांगात तुमचा माझा ॥ ४ ॥
कासया भ्रमण देश तीर्थाटणी । सेवीन पायवाणी संता घरीं ॥ ५ ॥
कासया करावें पंचाग्नि साधन । उच्छिष्ट भक्षीन संताद्वारीं ॥ ६ ॥
चोखा म्हणे सुख येईल घरासी । जाईन संतांसी शरण देवा ॥ ७ ॥

१७० मागें तुम्ही कोणी उपेक्षिलें । ब्रीद हें गाजलें त्रिभुवनीं ॥ १ ॥
ध्रुव उपमन्यु प्रल्हाद राखिला । उद्धार तो केला गजेंद्राचा ॥ २ ॥
ब्रह्महत्याराशि वाल्या घडलें । रामायण केलें रामा आधीं ॥ ३ ॥
अजामेळ नष्ट गणिका कुंटिणी । तारिली भिल्लीणी नामासाठीं ॥ ४ ॥
कंसादि असुर महादुराचार । उतरिला भार भक्तांहातीं ॥ ५ ॥
पुंडलिकाचे भक्ती ठेवोनी कर कटीं । उभा वाळुवंटी पंढरीये ॥ ६ ॥
चोखा म्हणे ऐसी अनाथांची माउली । ती आम्ही पाहिली निजदृष्टी ॥७॥

१७१ काय हें दुःख किती ह्या यातना । सोडवी नारायणा यांतोनियां ॥ १ ॥
जन्मावें मरावें हेंचि भरोवरी । चौऱ्यांशीची फेरी भोगाभोग ॥ २ ॥
तुम्हासी करुणा न ये माझी देवा । चुकवा हा गोवा संसाराचा ॥ ३ ॥
चोखा म्हणे माझा निवारावा शीण । म्हणोनी लोटांगण घाली जीवें ॥४॥

१७२ जन्मोजन्मींचे तुम्ही सांगाती । कां हो मज घातिलें भ्रांती । नाहीं कोठें सुख विश्रांती । पंढरीवांचोनी सर्वथा ॥ १ ॥ विठोबा कां न कळे तुम्हां । सर्व जगाचा तूं आत्मा । पुराण पुरुष परमात्मा । आम्हा दीना उपेक्षिसी ॥ २ ॥ पाहा न्याय नाहीं तुमचे घरीं । एका दुःख एक राज्य करी । ऐसी नीत नव्हे बरी । साजे थोरी थोरपणें ॥ ३ ॥

चोखा म्हणे नवलाव । आम्हा न कळे ठाव भाव । तुमचा कैसा घाव ढाव । कांहींच तो विठोबा ॥ ४ ॥

१७३ शरणांगता मोकलितां । काय येईल तुमचे हातां । पुराणें सांगती जुनाट कथा । ते सर्व अप्राप्त ॥ १ ॥ शरणांगता अव्हेर । करितां बोल लागेल फार । ऐसा माझा निर्धार । डांगोरा पिटीन ॥ २ ॥ ब्रीद कां बांधिले चरणीं । तें सोडी सोडी चक्रपाणी । वायांचि झालीसे कहाणी । कोण निर्वाणी सोडी मज ॥ ३ ॥ चोखा म्हणे तुम्ही सुजाण । वेदां न कळे महिमान । श्रुति शीणती नेति नेति म्हणोन । तेथें मी दीन काय वानूं ॥ ४ ॥

१७४ आम्हां तो न कळे कांहीं हे विंदान । ठेविली पायीं जाण डोई देवा ॥ १ ॥
काढा जी दयाळा भवाचें हें जाळें । गुंतलोंसे बळें माया पाशीं ॥ २ ॥
हाव भरी मन करी माझें तुझें । बैसलासे वोझें माथा भार ॥ ३ ॥
चोखा म्हणे देवा अहो तुम्हा सुजाणा । तुमच्या तुम्ही मना उमजावें ॥ ४ ॥

१७५ काम क्रोध लोभ सुने लागलेसे पाठी । पाडिलासे तुटी परमार्थी ॥ १ ॥
गोडाचें गोड तें झालें कडु । मुळीचें जें कडु तें झालें गोडु ॥ २ ॥
ऐसा हा अनुभव आपुल्याच देहीं । पाहातां पाहाणें गेलें ठायींच्या ठायीं ॥३॥
चोखा म्हणे ऐसा नवलाव गोष्टी । देहविदेहाची खुंटली गांठी ॥ ४ ॥

१७६ जीविंचा जिवलग प्राणांचा तो प्राण । धरीन चरण जीवें भावें ॥ १ ॥
आषाढी–कार्तिकी पंढरीची वारी । होईल तया घरीं पशुयाती ॥ २ ॥
विठ्ठल नामाचा छंद जया मनीं । संसार काचणी तया नाहीं ॥ ३ ॥
चोखा म्हणे नाहीं दुजा छंद मनीं । जागृती स्वप्नीं पंढरिराव ॥ ४ ॥

१७७ काय जाणों तुमचा महिमा । मज न कळे अधमा । भक्ति भाव प्रेमा । कांहीं न कळे विठोबा । गातो नाचतों भलते छंदें । आपुले मनाचे आनंदें । नकळे भेदा भेदें । मज कांहीं विठोबा ॥ २ ॥ शरण संताचे पायीं । पडोन राहीन तये ठायीं । उच्छिष्टासोयी । हीच आस विठोबा ॥३॥ चोखा म्हणे हेचि देई । वास तुमचे पायीं । मागणें दुजें नाहीं । हेचि एक विठोबा ॥ ४ ॥



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वलभ्य
अनुक्रम........................ वि ...................
क्रमांक ........................ नोंद दि ...............

१७८ बहु जन्म बहु फेरे । बहु शिणलों वेरझारें । वाळलें पांझरे । दया न ये विठोबा ॥ १ ॥ आतां पुरे तुमच्या गोष्टी । कोरडे चाळवण दृष्टी । झालों बहु कष्टी । दु:ख भरे विठोबा ॥ २ ॥ किती संसाराचा छंद । राति दिवस हाचि धंदा । रामकृष्ण हरि गोविंद । नाठवेचि विठोबा ॥ ३ ॥ चोखा म्हणे नको मुक्ति । घडो संतांची संगती । उच्छिष्ट पंगती । हेचि द्यावें विठोबा ॥ ४ ॥

## – नाम –

१७९ भेदाभेद कर्म न कळे त्याचें वर्म । वाऊगाची श्रम वाहाती जगीं ॥ १ ॥
नामापरता मंत्र नाहीं त्रिभुवनीं । पाप ताप नयनीं न पडेचि । २ ॥
वेदाचा अनुभव शास्त्रांचा अनुवाद । नामची गोविंद एक पुरे ॥ ३ ॥
चोखा म्हणे मज कांहींच न कळे । विठ्ठलाचे बळें नाम घेतों ॥ ४ ॥

१८० त्रैलोक्य वैभव ओवाळोनी सांडावें । नाम सुखें घ्यावें विठोबाचें ॥ १ ॥
आणिक साधनें आहेत बहुतांपरी । नामाची ती सरी न पवती ॥ २ ॥
म्हणोनि सुलभ विठ्ठल एक नाम । गातां नाचतां प्रेमें मुक्ती तया ॥ ३ ॥
चोखा म्हणे माझा अनुभव उघडा । भवभय पीडा येणें वारे ॥ ४ ॥

१८१ हातींच्या कांकणा कासया आरसा । धरावा भरंवसा विठ्ठलनामीं ॥ १ ॥
नलगे साचार याग यज्ञ विचार । जप निरंतर विठ्ठलनामीं ॥ २ ॥
योग्यांचिया वाटे नलगे खटपट । नामचि फुकट जपा आधीं ॥ ३ ॥
चोखा म्हणे सुख संतांचे संगतीं । नाम अहोरात्रीं जप करा ॥ ४ ॥

१८२ नाशिवंतासाठीं करितोसी आटी । दृढ धरा कंठीं एक नाम । १ ॥
भवासी तारक विठ्ठलची एक । नाहीं आणिक सुख येतां जातां ॥ २ ॥
एक एक योनी कोटि कोटी फेरा । नरदेहीं थारा तईच लाभे ॥ ३ ॥
चोखा म्हणे येथें एकची साधन । संतांसीं शरण जाई सुखें ॥ ४ ॥

१८३ आम्हां न कळे ज्ञान न कळे पुराण । वेदांचें वचन न कळे आम्हां ॥ १ ॥
आगमाची आठी निगमाचा भेद । शास्त्रांचा संवाद न कळे आम्हां ॥२॥
योग याग तप अष्टांग साधन । न कळेचि दान व्रत तप ॥ ३ ॥
चोखा म्हणे माझा भोळा भाव देवा । गाईन केशवा नाम तुझें ॥ ४ ॥

१८४ आम्हां अधिकार उच्छिष्ट सेवन । संतांचें पूजन हेंचि बरें ॥ १ ॥
सुलभ सोपारें विठोबाचें नाम । आणिक नाहीं वर्म दुजें कांहीं ॥ २ ॥
आवडीनें नाम गाईन उल्हासें । संतांच्या सहवासें खेळीं मेळीं ॥ ३ ॥
चोखा म्हणे माझी आवडी ही देवा । पुरवावी केशवा जन्मोजन्मीं ॥ ४ ॥

१८५ केला अंगिकार । उतरिला माझा भार ॥ १ ॥
अजामेळ पापराशी । तो ही नेला वैकुंठासी ॥ २ ॥
गणिका नामेंचि तारिली । चोखा म्हणे मात केली ॥ ३ ॥

१८६ योग याग तप व्रत आणि दान । करितां साधन नाना कष्ट ॥ १ ॥
सुलभ सोपारें विठोबाचें नाम । सकळ साधनांचें मूळबीज ॥ २ ॥
येणें भवव्यथा तुटेल जीवाची । प्रतिज्ञा संतांची हीच असे ॥ ३ ॥
म्हणोनि नामाचा करा गदारोळ । म्हणे चोखामेळ विठ्ठल वाचे ॥ ४ ॥

१८७ नामाचें सामर्थ्य विष तें अमृत । ऐसी हे प्रचीत आहे जीवा ॥ १ ॥
तें नाम सोपें विठ्ठल विठ्ठल । नको काळ वेळ जपें आधीं ॥ २ ॥
नेम धर्म कांहीं नलगे साधन । सुखें नारायण जप करी ॥ ३ ॥
चोखा म्हणे मज भरंवसा नामाचा । येणें कळिकाळाचा भेव नाहीं ॥४॥

१८८ अखंड नामाचें चिंतन सर्वकाळ । तेणें सफळ संसार होय जनां ॥ १ ॥
सर्व हें मायीक नाशिवंत साचें । काय सुख याचें मानितसां ॥ २ ॥
निर्वाणी तारक विठोबाचें नाम । येणें भवश्रम दूर होय ॥ ३ ॥
चोखा म्हणे नाम जपें दिन निशी । येणें सदां सुखी होसी जना ॥ ४ ।

१८९ गणिका अजामेळें काय साधन केलें । नामचि उच्चारिलें स्वभावतां ॥१॥
नवल हें पहा नवल हें पहा । अनुभवें अनुभवा देहामाजीं । २ ॥
उच्चारितां नाम वैकुंठीचे पेणें । ऐसें दुजें कोणें आहे कोठें ॥ ३ ॥
ब्रह्महत्या जयासी घडल्या अपार । वाल्हा तो साचार उद्धरिला ॥ ४ ॥
सुकराटें नाम न येचि मुखासी । मारा मारा ध्यासी स्मरता झाला ।५॥
चोखा म्हणे ऐसा नामाचा महिमा । उद्धार अधमा स्त्रीशूद्रां ॥ ६ ॥

१९० नाम हें सोपें जपतां विठ्ठल । अवघेंचि फळ हातां लागे ॥ १ ॥
योग याग तप जप अनुष्ठान तीर्थ व्रत दान नाम जपतां ॥ २ ॥

सुखाचें सुख नाहीं यातायाती । बैसोनी एकांती नाम स्मरा ।। ३ ।।
चोखा म्हणे येणें साधेल साधन । तुटेल बंधन भवपाश ।। ४ ।।

१९१ महादोष राशि पापाचे कळप । नामें सुखरुप कलियुगीं ।। १ ।।
म्हणोनि आळस करूं नका कोणी । नाम जपा वाणी सर्वकाळ ।। २ ।।
आसनीं शयनीं नामाचा आठव । आन ठावाठाव करूं नका ।। ३ ।।
चोखा म्हणे खातां जेवितां वाचें । नाम श्रीविठ्ठलाचें उच्चारावें ।। ४ ।।

१९२ अवघ्या साधनांचे सार । राम कृष्ण हा उच्चार ।। १ ।।
येणें घडे सकळ नेम । वाचे नाम जपतांचि ।२ ।।
भाग्यें होय संतभेटी । सांगूं गोष्टी सुखाच्या ।। ३ ।।
चोखा म्हणे मज आनंद झाला । जीवलग भेटला मायबाप ।। ४

१९३ माझ्या तो मनें केलासे विचार । आणिक प्रकार नेणें कांहीं ।। १ ।।
नाम वेळोवेळां आठवावे वाचे । दुजें आणिकांचें भय नाहीं ।। २ ।।
आवडी बैसली विठूचे चरणीं । आतां दुजेपणीं नाहीं गोष्टी ।। ३ ।।
चोखा म्हणे दृढ केलोंसे संतीं । म्हणोनी विश्रांति जीवा झाली ।। ४ ।।

१९४ आमुचें संचित जैसें जैसें आहे । तेथें तो उपाय न चले कांहीं ।। १ ।।
सुखें आठवीन तुमचें हें नाम । न होय तेणें श्रम जीवा कांहीं ।। २ ।।
कासया करूं जिवासी आटणी । नाम निर्वाणी तारीतसे ।। ३ ।।
मागेंही तरले पुढेंही तरती । चोखा म्हणे चित्तीं दृढ वसो ।। ४ ।।

१९५ सुखाकारणें करी तळमळ । जपें सर्व काळ विठ्ठल वाचें ।। १ ।।
तेणें सर्व सुख होईल अंतरा । चुकती वेरझारा जन्ममरण ।। २ ।।
न लगे वेचावें धनाचिये पेटी । धरा नाम कंठीं विठोबाचे ।। ३ ।।
बैसोनी निवांत करावें चिंतन । रामकृष्ण नारायण दिननिशीं ।। ४ ।।
चोखा म्हणे ऐसा करावा निर्धार । नाम एकसार विठोबाचें ।। ५ ।।

१९६ भवाचें भय न धरा मानसीं । चिंता अहर्निशी राम नाम ।। १ ।।
मंत्र हा सोपा न लगे सायास । जपा रात्रंदिवस सुलभ तें ।। २ ।।
दुर्लभ सर्वांसी न ये जो ध्यानासी । वेडावले ऋषि जयालागीं ।। ३ ।।
आदिनाथ कंठीं जप हा सर्वदा । पवित्र हें सदा अखंड जपे ।। ४ ।।
चोखा म्हणे येथें सर्वाधिकार । उंच नीच अपार तरले नामें ।। ५ ।।

१९७ राम हीं अक्षरें सुलभ सोपारी । जपतां निर्धारी पुरे कोड ॥ १ ॥
मागें बहुतांसी उद्धरिलें देखा । ऐसें बळ आणिका नाहीं अंगीं ॥ २ ॥
नानामृत पाठ घेई कां घुटिका । होईल सुटिका संसाराची ॥ ३ ॥
नाम हेंचि सार नाम हेंचि सार । भवसिंधु उतार दो अक्षरीं ॥ ४ ॥
चोखा म्हणे नाम सुलभ सोपारें । जपावें निर्धारें एका भावें ॥ ५ ॥
१९८ कोणासी सांकडें गातां रामनाम वाचें । होय संसाराचें सार्थक तेणें ॥१॥
येणें दो अक्षरीं उतराल पैलपार । नाम निरंतर जप करा ॥ २ ॥
अनंततीर्थराशि वसे नामापाशीं । ऐसी साक्ष देती वेदशास्त्रें ॥ ३ ॥
चोखा म्हणे हेचि ग्रंथांचे पैं सार । राम हा निर्धार जप करी ॥ ४ ॥
१९९ अवघा आनंद राम परमानंद । हाचि लागो छंद माझे जीवा ॥ १ ॥
हेंचि साधन निकें जगासी उद्धार । आणिक साचार दुजें नाहीं ॥ २ ॥
क्रोधांचे न पडतां आघात । वाचे गातां गीत राम नाम ॥ ३ ॥
चोखा म्हणे ऐसा भरंवसा नामाचा । जेथें कळिकाळांचा रीघ नाहीं ॥४॥
२०० वोखटें गोमटें असोत नरनारी । दोचि अक्षरीं पावन होती ॥ १ ॥
न लगे अधिकार वर्णावर्ण धर्म । नाम परब्रह्म येचि अर्थी ॥ २ ॥
योगयागादि जपतप कोटी । एक नाम होठी घडे तेंचि ॥ ३ ॥
चोखा म्हणे ऐसा आहे शिष्टाचार । नाम परिकर श्रीरामाचें ॥ ४ ॥
२०१ मोहळा मक्षिका गुंतली गोडीसी । तैशापरी मानसीं नाम जपे ॥ १ ॥
मग तुज बंधन न घडे सर्वथा । राम नाम म्हणतां होसी मुक्त ॥ २ ॥
न करी कायाक्लेश उपवास पारणें । नाम संकीर्तनें कार्यसिद्धी ॥ ३ ॥
चोखा म्हणे एकांती लोकांती नाम जपे श्रीराम ।
तेणें होसी निष्काम इये जनीं ॥ ४ ॥
२०२ आतां माझा सर्व निवेदिला भाव । धरोनी एक ठाव राहिलोंसे ॥ १ ॥
जेथें काळाचाहि न पुरे हात । तयाचे पायीं चित्त समर्पिलें ॥ २ ॥
भय नाहीं चिंता कोणता प्रकार । झालोंसे निर्भय नाम बळें ॥ ३ ॥
चोखा म्हणे आतां लागलासे झरा । विठोबा दातारा याचि नामें ॥ ४ ॥
२०३ सरळ वांकुडें अबद्ध चोखडें । वाचें नाम पुढें विठ्ठलहरी ॥ १ ॥
भोळेपणें गावें देवा तेंचि पाहावें । दांभिका तें न ये स्वप्नीं देखा ॥२॥

कान धरोनी नाचे महाद्वारीं साचें । अवघ्या तपाचें हेंचि तप ॥ ३ ॥
चोखा म्हणे मज सांपडली खूण । नामयानें जाण दाखविली ॥ ४ ॥

२०४ गातां नाम विठ्ठलाचें । भय नाहीं त्या यमाचें ॥ १ ।
ऐसा धरावा विश्वास । नाम जपा सावकाश ॥ २ ॥
जप तप तीर्थाटणीं । नको आटणी दाटणी ॥ ३ ॥
सायासाचें नाहीं काम । अखंड जपे राम नाम ॥ ४ ॥
चोखा म्हणे हेंचि सार । वेदशास्त्रांचा निर्धार ॥ ५ ॥

२०५ येणें जाणें दोनी खुंटती मारग आणिक नाहीं लाग माझे आंगीं ॥१॥
सुलभ हें सोपें नाम आठवितां । हरि हरि म्हणतां कार्य सिद्धी ॥ २ ॥
सोपें वर्म आम्हां सांपडले निकें । येणें भव दुःखें पीडा टळे ॥ ३ ॥
चोखा म्हणे संतीं सांगितली खूण । तेंचि प्रमाण मानूं आतां ॥ ४ ॥

२०६ नामाचें सामर्थ न न कळे ब्रह्मादिकां । वेडावली देखा वेदशास्त्रें ॥ १ ॥
तें कलियुगीं सुलभ पैं झालें । उभें तें राहिलें पंढरीये ॥ २ ॥
आगमा निगमां न कळेची पार । तो गोकुळीं साचार चोरी करी ॥ ३ ॥
जयालागी श्रुति अनुवादतां भागली । ठकलीच ठेली नेति शब्दें ॥४॥
चोखा म्हणे ऐसा दुर्लभ सर्वांसी । तो हा पंढरीसी उभा विटे ॥ ५ ॥

२०७ योग याग जप तप अनुष्ठान । नामापुढें शीण अवघा देखे ॥ १ ॥
नामचि पावन नामचि पावन । अधिक साधन दुजें नाहीं ॥ २ ॥
कासया फिरणें नाना तीर्थाटणी । कासया जाचणी काया क्लेश ॥ ३ ॥
चोखा म्हणे सुखें जपतां विठ्ठल । सुफळ होईल जन्म त्याचा ॥ ४ ॥

२०८ नामाचें चिंतन माझें हेचि अनुष्ठान । यापरतें साधन न कळे कांहीं ॥ १ ॥
नामाचि सार नामाचि सार । उतरेल भवपार पैलतीर ॥ २ ॥
आणिक सायास नको काया क्लेश । नामाविण सोस करूं नको ॥ ३ ॥
चोखा म्हणे मज भरवंसा नामाचा । जेथें कळिकाळाचा रीघ नाहीं ॥ ४ ॥

२०९ नामाचा महिमा त्रिभुवनीं थोर । तरले अपार जीवजंतु ॥ १ ॥
नामेंचि नेलें पातकी वैकुंठी । नाम जपे कंठीं शिवराणा ॥ २ ॥

गजेंद्र गणिका अजामेळ वाल्हा । नामेंचि पावला निजपद ॥ ३ ॥
चोखा म्हणे नाम साराचें हें सार । कलियुगीं उद्धार जडजीवा ॥ ४ ॥

२१० आनंदें वाजवावी टाळी । विठ्ठल म्हणा वेळोवेळीं ॥ १ ॥
अवघा मंगळचि दिन । विठ्ठल विठ्ठल निज धन ॥ २ ॥
अवघ्या धर्माचें हें सार । विठ्ठल नामाचा उच्चार ॥ ३ ॥
आन दुजें नेणो कांहीं । चोखा म्हणे विठ्ठल गाई ॥ ४ ॥

२११ न करी न करी कांहीं खटपट । वाउगा बोभाट परता सारूं ॥ १ ॥
न करूं आळस नाम मुखीं गातां । तेणें भय चिंता निवारेल ॥ २ ॥
अवघा परिहार होईल दुःखाचा । छंद या नामाचा लागलिया ॥ ३ ॥
अवघेंचि सुखें आपे आप घरा । येतील दातारा तुमच्या बळें ॥ ४ ॥
तें नाम सोपें वाचे जप करी । आणिकाची न करी आस आतां ॥ ५ ॥
चोखा म्हणे वेळोवेळां नाम । गातां निजधाम जोडतसे ॥ ६ ॥

२१२ भवदुःख हरण नाम नारायण । हेंचि चिंतन करा सुखें ॥ १ ॥
नारायण गाय नारायण ध्याय । वाचे सदां गाय नारायण ॥ २ ॥
आसनीं शयनीं नारायण नाम । तेणें भवश्रम निवारले ॥ ३ ॥
नारायण नामें निवाली हे काया । सुफळ जन्म तया चोखा म्हणे ॥ ४ ॥

२१३ नारायण नाम सुलभ हें सोपें । अखंड तूं जपे सदाकाळीं ॥ १ ॥
नका धरूं आशा मनशा कल्पना । नाम नारायण सुखें जपे ॥ २ ॥
अकाळ हें काळी नारायणी टाळी । जपतां होय होळी पातकांची ॥ ३ ॥
चोखा म्हणे नाहीं आणिक साधन । नाम नारायण हेंचि पुरे ॥ ४ ॥

२१४ आपुल्या स्वहिता वाचेसी उच्चारा । आळस न करा क्षणभरी ॥ १ ॥
जाईल हा देहा वाउगाचि उगा । अभ्रांची छाया जयापरी ॥ २ ॥
असारा साराचे नका पडूं भरी । सार तेंचि धरी हरिनाम ॥ ३ ॥
चोखा म्हणे नाम हाचि मंत्र सुगम । नको आन श्रम जाय वाया ॥ ४ ॥

२१५ अखंड चिंतन मनासी । तोचि आवडे देवासी ।
या परतें साधनासी । दुजें मानसी धरूं नका ॥ १ ॥

हेंचि तपाचें महातप । पूजाध्यान अवघा जप ।
आन नाहीं वा संकल्प । नाम जप सर्वदां ॥ २ ॥
मग सुखा नाहीं पार । अवघा देखे जगदाकार ।
दुजा न देखे संचार । आपपर सारिखें ॥ ३ ॥
अवघी निवारली गुंती । उडोनी गेली माया भ्रांती ।
चोखा म्हणे कमळापती । दुजी विश्रांति नको मज ॥ ४ ॥

## – संत –

२१६ सप्रेम निवृत्ति आणि ज्ञानदेव । मुक्ताईचा भाव विठ्ठल चरणीं ॥ १ ॥
सोपान सांवता गोरा तो कुंभार । नरहरी सोनार प्रेम भरेत ॥ २ ॥
कवीर कमाल रोहिदास चांभार । आणिक अपार वैष्णव जन ॥ ३ ॥
चोखा तया पायीं घाली लोटांगण । वंदितो चरण प्रेमभावें ॥ ४ ॥

२१७ कोणी पंढरीसी जाती वारकरी । तयांचे पायांवरी भाळ माझे ॥ १ ॥
आनंदें तयांसी भेटेन आवडी । अंतरीची गोडी घेईन सुख ॥ २ ॥
ते माझें मायबाप सोयरे सज्जन । तयां तनु मन वोवाळीन ॥ ३ ॥
चोखा म्हणे ते माहेर निजाचें । जन्मोजन्मांतरिचे साहाकारी ॥ ४ ॥

२१८ आजि दिवस धन्य सोनियाचा । जीवलग विठोबाचा भेटलासे ॥ १ ॥
तेणें सुख समाधान झाली विश्रांति । दुजे नाठवती चित्तीं कांहीं ॥ २ ॥
समाधानें जीव राहिला निश्चळ । गेले हळहळ त्रिविध ताप ॥ ३ ॥
चोखा म्हणे आनंद वाटलासे जीवा । संतांचे पाय केशवा देखियेले ॥४॥

२१९ वेध कैसा लागला वो जीवा । नाठवेचि हेवा दुजा कांहीं ॥ १ ॥
पंढरीचे वाटे येती वारकरी । सुखाची मी करी मात तयां ॥ २ ॥
माझ्या विठोबाचें गाती जे नाम । ते माझे सुख धाम वारकरी ॥ ३ ॥
लोटांगणें सामोरा जाईन तयांसी । क्षेम आनंदेसी देईन त्यांसी ॥ ४ ॥
चोखा म्हणे माझा प्राणाचा तो प्राण । जाईन वोवाळोन जीवें भावें ॥५॥

२२० माझा शिण भाग अवघा हरपला । विठोबा देखिला विटेवरी ॥ १ ॥
अवघ्या जन्मांचें सार्थक पैं झालें । समचरण देखिलें डोळेभरी ॥ २ ॥
चंद्रभागे तीरीं नाचती वारकरी । विठ्ठलनाम गजरी आनंदानें ॥ ३ ॥

दिंड्या गरुड टके पताकांचें भार । होतो जयजयकार नामघोष ॥ ४ ॥
तो सुखसोहळा देवांसी दुर्लभ । आम्हां तो सुलभ चोखा म्हणे ॥ ५ ॥

२२१ माझ्या मना तूं धरी कां विचार । न करी प्रकार आन कांहीं ॥ १ ॥
पंढरीसी कोणी जाती वारकरी । सुखें त्यांचे घरी पशुयाती ॥ २ ॥
तयाचिया सवें घडेल चिंतन । चंद्रभागे स्नान एकादशी ॥ ३ ॥
जागर क्षिरापती वैष्णवा सांगाते । घडेल आपैतें लाभ मज ॥ ४ ॥
चोखा म्हणे घडेल संतांची संगती । सहज पंगती बैसेन मी ॥ ५ ॥

२२२ ते माझे सोयरे सज्जन सांगाती । जे आठविती विठोबासी ॥ १ ॥
तयांचे संगती बहु लाभ झाला । ठेवा जो जोडला पांडुरंग ॥ २ ॥
मागिला पुढिला झाला परिहार । तें माझें माहेर भेटलेंसे ॥ ३ ॥
तयांचे संगती सुखाची विश्रांती । जे कां आठविती विठोबासी ॥ ४ ॥
चोखा म्हणे ते भवाचे तारक । वैकुंठनायक दाखविती ॥ ५ ।

२२३ धन्य ते सभाग्य नर आणि नारी । करिताती वारी पंढरीची ॥ १ ॥
तयांचे चरणीं माझा दंडवत । जे नेमें माझ्या गात विठोबासी ॥ २ ॥
दिवाळी दसरा अवघे पर्वकाळ । नांदती सकळ तया घरीं ॥ ३ ॥
चोखा म्हणे धन्य धन्य ते संसारी । नेमें करिती वारी पंढरीची ॥ ४ ॥

## —: उपदेश :—

२२४ वाढलें शरीर काळाचें हें ग्वाजें । काय माझें तुझें म्हणतोसी । १ ॥
बाळ–तरुण–दशा आपुलेच अंगीं । आपणची भोगी वृद्धपण ॥ २ ॥
आपुला आपण न करि विचार । काय हें अमर शरीर याचें ॥ ३ ॥
चोखा म्हणे भुलला मोहळाचे परी । मक्षिकें निर्धारी वेढीयेला ॥ ४ ॥

२२५ असोनि नसणें संसाराचे ठाई । हाची बोध पाही मना ध्यावा ॥ १ ॥
संतांची संगती नामाची आवडी । रिकामी अर्ध घडी जावों नेदी ॥ २ ॥
काम क्रोध सुनेपरी करी दूरी । सहपरिवारी दवडी बापा ॥ ३ ॥
चोखा म्हणे सुख आपेंआप घरा । नाहीं तर फजीतखोरा जासी वायां ॥४॥

२२६ जन्मला देह पोशिला सुखाचा । काय भरंवसा याचा आहे ॥ १ ॥
येकलेंचि यावें येकलेंचि जावें । हेंचि अनुभवावें आपणाची ॥ २ ॥
कोण हे आघवे सुखाचे संगती । अंतकाळीं होती पाठीमोरे ॥ ३ ॥
चोखा म्हणे याचा न धरी भरंवसा । शरण जा सर्वेशा विठोबासी ॥४॥

२२७ असोनि नसणें या नांव स्वार्थ । येथेंचि परमार्थ सुखी होय ॥ १ ॥
स्वार्थ परमार्थ आपुलेचि देहीं । अनुभवोनी पाही तुझा तूंचि ॥ २ ॥
सुख दुःख देही (दोन्ही) वाहुं नको ओझें । मी आणि माझें परतें सारी ॥३॥
चोखा म्हणे तोची योगियांचा राणा । जिहीं या खुणा अनुभविल्या ॥४॥

२२८ धिक् तो आचार धिक् तो विचार । धिक् तो संसार धिक् जन्म ॥ १ ॥
धिक् तें पठण धिक् तें पुराण । धिक् यज्ञ हवन केलें तेणें ॥ २ ॥
धिक् ब्रह्मज्ञान वाउग्या ह्या गोष्टी । दयाक्षमा पोटी शांति नाहीं ॥ ३ ॥
धिक् तें आसन जटाभार माथा । वायांचि हे कंथा धरिली जेणें ॥ ४ ॥
चोखा म्हणे धिक् जन्मला तो नर । भोगी नरक घोर अंतकाळीं ॥ ५ ॥

२२९ चंदनाचेसंगें बोरीया बाभळी । हेकळी टाकळी चंदनची ॥ १ ॥
संताचिया संगें अभाविक जन । तयाच्या दर्शनें तेचि होती ॥ २ ॥
चोखा म्हणे ऐसा परमार्थ साधावा । नाहीं तरी भार वाहवा खरा ऐसा ॥३॥

२३० देही देखिली पंढरी । विठू अविनाश विटेवरी ॥ १ ॥
रुक्मिणी अंगना । आत्मा पुंडलीक जाणा ॥ २ ॥
आकार तितुका नासे । निराकार विठ्ठल दिसे ॥ ३ ॥
ऐसें गुज ठायीचा ठायी । चोखा म्हणे लागा पायीं ॥ ४ ॥

२३१ अखंड समाधी होऊनी ठेलें मन । गेलें देहभान विसरोनी ॥ १ ॥
विधिनिषेध भेणें न मोडे समाधी । तुटली उपाधी लिगाडाची ॥ २ ॥
चालतां बोलतां न मोडे समाधी । मूळ अंतर शुद्धी कारण हें ॥ ३ ॥
चोखा म्हणे ऐसा समाधी सोहळा । जाणे तो विरळा लक्षामाजीं ॥४॥

२३२ तुटला आयुष्याचा दोरा । येर वाउगा पसारा ॥ १ ॥
टाकोनी पळती रांडा पोरें । अंती होती पाठमोरे ॥ २ ॥

अवघे सुखाचे सांगती । कोणी कामा नये अंतीं ॥ ३ ॥
चोखा म्हणे फजितखोर । माझें माझें म्हणे घर ॥ ४ ॥

२३३ डोळियाचा देखणा पाहतांच दिठी । डोळाच निघाला देखण्या पोटी ॥१॥
डोळ्याचा देखणा पाहिला डोळा । आपेंआप तेथें झांकला डोळा ॥२॥
चोखा म्हणे नवलाव झाला । देखणा पाहतां डोळा विराला ॥ ३ ॥

२३४ फुलाचे अंगी सुवास असे । फूल वाळलीया सुवास नासे ॥ १ ॥
मृत्तिकेचे घट केले नानापरी । नांव ठेविलें रांझण माथण घागरी ॥ २ ॥
विराली मृत्तिका फुटले घट । प्राणी कां फुकट शोक करी ॥ ३ ॥
चोखा म्हणे ऐसें मृगजळ पाही । विवेकी तिये ठायीं न गुंतेची ॥ ४ ॥

२३५ देह बुद्धीवेगळें जें आकारलें । निर्गुण तें सगुणपणें उभें ठेलें ॥ १ ॥
देव पहा तुम्ही देव पहा । तुम्ही देव पहा तुम्ही आपुले देहीं ॥ २ ॥
उघडाची देवो जगीं प्रकाशला । नागव्याक्तानें देव ग्रासीला ॥ ३ ॥
चोखा म्हणे नागवे उघडे झाले एक । सहज मीपण देख मावळले ॥४॥

२३६ दुःखरुप देह दुःखाचा संसार । सुखाचा विचार नाहीं कोठें ॥ १ ॥
कन्या पुत्रबाळें सुखाचे सांगाती । दुःख होतां जाती आपोआप ॥ २ ॥
सोयरे धायरे कवणाचे कवण । अवघा वाटे शीण मना माझ्या ॥ ३ ॥
चोखा म्हणे अहो पंढरीनिवासा । सोडवी भवपाशा पासोनिया ॥ ४ ॥

२३७ देहीं देखिली पंढरी । आत्मा अविनाश विटेवरी ॥ १ ॥
तो हा पांडुरंग जाणा । शांति रुक्मिणी निजांगना ॥ २ ॥
आकारलें तितुकें नासे । आत्मा अविनाश विठ्ठल दिसे ॥ ३ ॥
ऐसा विठ्ठल हृदयीं ध्यायी । चोखामेळा जडला पायीं ॥ ४ ॥

२३८ कोणें देखियेलें जग । पांडुरंगा मी नेणें ॥ १ ॥
मौन्यें पारुषली वाणी । शब्दखाणी विसरली ॥ २ ॥
एका आधी कैंचे दोन । मज पासोन मी नेणें ॥ ३ ॥
चोखामेळा म्हणती संत । हे ही मात उपाधी ॥ ४ ॥

२३९ पांडुरंगी लागो मन । कोण चिंतन करी ऐसें ॥ १ ॥
देहभाव विसरला । देव गेला बुडोनी ॥ २ ॥

जीव उपाधी भक्ती वंद्य । तेथें भेद जन्मला ॥ ३ ॥
मुळींच चोखामेळा नाहीं । कैंचा राही विटाळ ॥ ४ ॥

२४० ऊंस डोंगा परी रस नव्हे डोंगा । काय भुललासी वरलीया रंगा ॥ १ ॥
कमान डोंगी परी तीर नोहे डोंगा । काय भुललासी वरलीया रंगा ॥ २ ॥
नदी डोंगी परी जळ नव्हे डोंगें । काय भुललासी वरलीया रंगा ॥ ३ ॥
चोखा डोंगा परी भाव नव्हे डोंगा । काय भुललासी वरलीया रंगा ॥४॥

२४१ भाक ( भाव ) समुद्रीं भरियलें केणें । आणियलें नाणें द्वारकेचें ॥ १ ॥
बाराही मार्गांची वणीज्ज करी । पंढरी हे पुरीं नामदेव ॥ २ ॥
चोखा म्हणे लोटांगणी जाऊं । नामदेव पाहूं केशवाचा ॥ ३ ॥

२४२ देव म्हणे नारदासी जाय निर्मळा तीर्थासी ॥ १ ॥
तीर्थ निर्मळे संगमीं । स्नान करी नारदस्वामी ॥ २ ॥
नारदाची नारदी सरी । धन्य धन्य मेहुणपुरी ॥ ३ ॥
चोखा म्हणे हेंची देई । स्नान घडो तये ठायीं ॥ ४ ॥

२४३ घरदार वोखटें अवघें फलकटें । दुःखाचें गोमटें सकळही ॥ १ ॥
नाशिवंतासाठीं रडती रांडा पोरें । काय त्याचें खरें स्त्रीपुत्र ॥ २ ॥
लावूनियां मोह भुलविलें आशा । त्याचा भरंवसा धरिती जन ॥ ३ ॥
सकळही चोर अंती हे पळती । चोखा म्हणे कां न गाती रामनाम ॥४॥

२४४ संतांचा अनुभव संतची जाणती । येर ते हांसती अभाविक ॥ १ ॥
नामाचा प्रताप प्रल्हादची जाणें । जन्ममरण जेणें खुंटविलें ॥ २ ॥
सेवेचा प्रकार जाणे हनुमंत । तेणें सिताकांत सुखी केला ॥ ३ ॥
सख्यत्वें पूर्णता अर्जुना बाणली । ऐक्यरुपें चाली मिरवली ॥ ४ ॥
चोखा म्हणे ऐसा आहे श्रेष्ठाचार । तेथें मी पामर काय वानूं ॥ ५ ॥

२४५ आला नरदेहीं पाहीं । शुद्धी नेणें ठायींचे ठायीं ॥ १ ॥
करी प्रपंच कावाड । भार वाही खर द्वाड ॥ २ ॥
न ये रामनाम मुखीं । नाहीं कधीं संत ओळखी ॥ ३ ॥
करी वाद अपवाद । नाहीं अंतःकरण शुद्ध ॥ ४ ॥
मळ नासोनी निर्मळ । चोखा म्हणे गंगाजळ ॥ ५ ॥

२४६ निर्गुणा अंगीं सगुण बाणलें । निर्गुण सगुण एकत्वा आलें ॥ १ ॥
शब्दाची खूण जाणती ज्ञानी । येरा गबाळा अवघी कहाणी ॥ २ ॥
निवृत्ती ज्ञानदेव सोपान भले । निर्गुण सगुण त्याहीं गिळियेलें ॥ ३ ॥
चोखा म्हणे त्यांच्या पायींची पादुका । वागवितो देखा ऐक्यपणें ॥ ४ ॥

२४७ आपुला विचार न कळे जयांसी । ते या संसारासी पशु आले ॥ १ ॥
पशूचा उपयोग बहुतांपरी आहे । हा तो वायां जाय नरदेह ॥ २ ॥
परि भ्रांति भुली पडलीसे जीवा । आवडी केशवा नाठविती ॥ ३ ॥
चोखा म्हणे नाम जपतां फुकाचें । काय यांचें वेचे धन वित्त ॥ ४ ॥

२४८ वाया हांव भरी नका घालूं मन । चिंतावे चरण विठोबाचे ॥ १ ॥
हेंचि साधन साराचें सार । येणें भवपार उतरती ॥ २ ॥
न करी आळस नामाचा क्षणभरी । काम क्रोध दुरी पळे येणें ॥ ३ ॥
दया क्षमा शांति संतांची संगती । यां परती विश्रांति दुजी नाहीं ॥४॥
चोखा म्हणे दृढ धरावा विश्वास । नामाचा निजध्यास सर्वकाळ ॥ ५ ॥

२४९ वाया हांव भरी गुंतले कबाडी । करिताती जोडी पुढीलाची ॥ १ ॥
ऐसे ते वोंगळ देख आंधळे । भोगिताती बळें सुखदुःख ॥ २ ॥
नाशिवंत अवघे मानियेलें साच । करिती हव्यास जन्मोजन्मीं ॥ ३ ॥
चोखा म्हणे यासी काय उपदेश । भोगी नर्कवास कल्पवरी ॥ ४ ॥

२५० तुम्ही तो सांकडें बहुत वारिलें । आतां कां उगलें बोलूं देवा ॥ १ ॥
आजीवरि पडिलों लिगाडाचे गुंतीं । तेणेंचि फजिती झाली दिसे ॥ २ ॥
झाला दिसे मज मोकळा मारग । धिक्कारिती जग मागें पुढें ॥ ३ ॥
चोखा म्हणे ऐसें विपरीत देखिलें । तें साचचि संचलें मनीं माझ्या ॥४॥

२५१ न करी सायासाचें काम । गाईन नाम आवडीं ॥ १ ॥
यापरतें कांहीं नेणें । आन साधनें कोणतीं ॥ २ ॥
सुखाचेंचि अवघें झालें । नाहीं उरलें दुःखातें ॥ ३ ॥
चोखा म्हणे भवनदीउतार । नामें पैलपार तरेन ॥ ४ ॥

२५२ लिहिलें संचितीं न चुके कल्पांतीं । वायां कुंथाकुंथी करूनी काय ॥१॥
जन्ममरण सुखदुःखाचें गांठोडें । हें तों मागें पुढें बांधलेसें ॥ २ ॥

निढळींचीं अक्षरें साच तेचि खरें । आतां वोरबार करील कोण ॥ ३ ॥
चोखा म्हणे आमुची जैशी कां वासना । तैशीच भावना होत जात ॥४॥

२५३ नेणों कोणें काय देवासी दिधलें । मागत वहिलें तयापाशीं ॥ १ ॥
पेरावें जें शेतीं तेचि फळ प्राप्ती । वाया काय गुंती आपुले मनीं ॥ २ ॥
तेव्हां घ्यावें हेंचि पूर्वापार । पुराणी विचार हाचि आहे ॥ ३ ॥
चोखा म्हणे उगें देवासी रुसती । आपुले मनाप्रती पुसती ना ॥ ४ ॥

२५४ कशासाठीं आतां करूं मी घोकणी । जिवासी आटणी काय काज ॥१॥
लिहिलें संचितीं न चुके कल्पांतीं । वाउगी कां भ्रांति धरूं जीवीं ॥ २ ॥
होणार तें होय न होणार तें न होय । वाउगा उपाय शीण मानूं ॥३॥
चोखा म्हणे ऐसी उफराटी चाली । आजि म्यां देखिली तुमचे घरीं ॥४॥

२५५ जन्मांचें साकडें नाहीं माझे कोडें । जेणें तुम्हां पडे वोझें देवा ॥१॥
कोणत्याही कुळीं उंच नीच वर्ण । हे मज कारण नाहीं त्याचें ॥२॥
वैष्णवाचे घरीं लोळेन परवरी । करीं अधिकारी उच्छिष्टाचा ॥ ३ ॥
चोखा म्हणे जया घडे पंढरीची वारी । तयाचिये घरीं पशुयाती ॥ ४ ॥

२५६ बैसोनि निवांत करीन चिंतन । काया वाचा मनसहित देवा ॥ १ ॥
नामाचा आठव हेचि सोपें वर्म । अवघें कर्माकर्म पारुषति ॥ २ ॥
या परतें साधन आन कांहीं नेणें । अखंड वाचे म्हणे रामकृष्ण ॥ ३ ॥
सुलभ हा मंत्र तारक जीवासी । येणें भवासी उतार होय ॥ ४ ॥
चोखा म्हणे मज सांगितलें कानीं । रामकृष्ण वाणीं जप सदा ॥ ५ ॥

२५७ नेणपणें मिठी घालीन पदरा । बैसेन द्वारांत तयाचिया ॥ १ ॥
आशा हे पाठी घेवोनी सांगातें । निचेष्ठ निरुतें भरीन माजी ॥ २ ॥
लाभाचा हा लाभ येईल माझे हातीं । मग काय चिंता करणें काज ॥३॥
चोखा म्हणे मज हेचि वाटे गोड । आणिक नाहीं चाड दुजी कांहीं ॥४॥

२५८ बावरे मन रात्रंदिवस झालें । नावरे वाहिलें काय करूं ॥ १ ॥
येणें माझा कैसा घेतिलासे लाहो । आतां कोठें जावों देशांतरी ॥ २ ॥
न धरी तयाची संगतीची गोडी । झाली वोढावोढी साच दिसे ॥ ३ ॥
चोखा म्हणे याचा न तुटे संबंध । येणें मज बाध लाविलासे ॥ ४ ॥

२५९ याचिया छंदा जे लागले प्राणी । त्याची धुळधाणी केली येणें ॥ १ ॥
याचा संग पुरे याचा संग पुरे । अंतरीं ते उरे हांव हांव ॥ २ ॥
स्वार्थ परमार्थी घातिलासे चिरा । किती फजीतखोरा बुझवावें ॥ ३ ॥
न जावें तेथें हाटेची जाय । करूं नये तें करी स्वयें न धरीं कांहीं ॥४॥
चोखा म्हणे तुज तुझीच आण । होई समाधान घटिकाभरी ॥ ५ ॥
२६० उदंड नागवले वाहावले पुरीं । ऐसी याची थोरी काय सांगों ॥ १ ॥
ब्रह्मादिक जेणें बहु नागविले । सिद्ध ऋषि भुलविले येणें देखा ॥ २ ॥
इंद्रादि चंद्रा लावियेले काळें । कामाचिया बळें अहिल्येसी ॥ ३ ॥
प्रत्यक्ष शूळपाणि तपियां मुगुटमणी । तो हिंडवीला वनीं भिल्लणीमागें ॥४॥
वृंदेचे घरीं विष्णु धरणें करी । अभिलाष करी मनें धरिला ॥ ५ ॥
चोखा म्हणे येणें बहु नाडियेले । काय आतां बोल याजपुढें ॥ ६ ॥
२६१ मागें बहुतांनीं केलीसे आटणी । ते मी काचणी करूं नेणें ॥ १ ॥
नाहीं अधिकार तैसा या जीवा । उगेचि धांवा धांवा करूं मनें ॥ २ ॥
सहावेल तें वोझें वाहावें मस्तकीं । भार झाल्या चुकी कुंथा कुंथी ॥ ३ ॥
चोखा म्हणे पाहावा आपुला विचार । तरीच पैलपार भवनदी ॥ ४ ॥
२६२ नेणो काय आवडी भक्तांची जीवा । म्हणोनी केशवा लोभापर ॥ १ ॥
आपुलें थोरपण सांडोनी परतें । वैकुंठ सरते केलें जेणें ॥ २ ॥
लोभाळु मायाळु दीनांचा दयाळु । दुष्टांचा काळु प्रत्यक्ष हा ॥ ३ ॥
शरण शरण म्हणतां होय त्याचा दास ।
न पाहे याति कुळास चोखा म्हणे ॥ ४ ॥
२६३ आम्हांसी हा संसार दाखविला । गोड गोड भला म्हणो जगीं ॥ १ ॥
प्रिया पुत्र धन आप्त हे सोयीरे । ते म्हणती साचोकारे माझें माझें ॥ २ ॥
प्रत्यक्ष ते भुलले मृगजळासी । ममता संसाराची ऐसी आहे ॥ ३ ॥
पुढील विचांर न करी साचार । यमाचा पाहुणेर भोगी सुखें ॥ ४ ॥
चोखा म्हणे यासी पडिलीसे भ्रांती । माझें माझें म्हणती घरदार ॥ ५ ॥
२६४ उदंड शहाणे होवोत तार्किक । परी न कळे अलौकिक महिमा कांहीं ॥१॥
उदंड वाचन जरी झालें साचें । परी महिमान ययाचे न कळे कांहीं ॥ २ ॥
उदंड ब्रह्मज्ञान सांगताती गोष्टी । परी अनुभव कसवटी एका नाहीं ॥ ३ ॥

संतांचे उदंड घेताती सोंग । कामनेचा त्याग करितां नये ।। ४ ।।
उदंड वैराग्य दाखविती जन । परी वासना भोग त्याग त्यागितां नये ।।५।।
कीर्तनीं सांगती अनुभव गोष्टी । परी धन कांता दृष्टी त्याग नव्हे ।। ६ ।।
चोखा म्हणे हे तो पोटाचे बांधले । म्हणोनीं पांगिले घरोघरीं ।। ७ ।।

२६५ स्त्री पुत्र धन कोणाचें हें कोण । याचा अभिमान धरती प्राणी ।। १ ।।
देवांचा हा देव तया ठकविती । बापुड्या पूजिती मायराण्या ।। २ ।।
अगाडे बगाडे करिती नवस । ते काय आस पुरविती ।। ३ ।।
चोखा म्हणे ऐसे आंधळे आहे जन । नाशिवंत धन मागताती ।। ४ ।।

२६६ एकाची फजीती होती ते पाहती । शाहाणे गुंतती तये ठायीं ।। १ ।।
आपुला आपण पायीं घाली खोडा । मग चरफडा करीतसे ।। २ ।।
कोसल्याचे परी मानिताती सुख । पुढें निर्गमा दुःख गांड फाडी ।। ३ ।।
गोडपणें मासीं गुंतलीं लिगाडी । तैसी होय जोडी स्त्री पुत्रां ।। ४ ।।
चोखा म्हणे याचा संग नव्हे बरा । किती फजीतखोरा सांग आतां ।। ५ ।।

२६७ माकडाचे परी हालविती मान । दावी थोरपण जगामध्यें ।। १ ।।
खहिता मुकले खहिता मुकले । बळें झाकी डोळे नाक धरी ।। २ ।।
माळा आणि मुद्रा दाविताती सोंग । डोलविती अंग रंग नाहीं ।। ३ ।।
पोटाचा पोसणा विटंबना करी । भीक दारोदारी मागतसे ।। ४ ।।
चोखा म्हणे ऐसा जगामध्यें भोंदु । तया कोण साधु म्हणे देवा ।। ५ ।।

२६८ साधन तें एक जगासी प्रमाण । परदारा परधन वमन जैसें ।। १ ।।
ऐसा ज्याचा भाव तोचि एक साधु । येर अवघे भोंदु जगामाजीं ।।२।।
काम आणि क्रोध जिरवोनी अंतरी । वाचे हरि हरि जप करी ।। ३ ।।
आन वासना विराली कल्पना । शांति क्षमा ह्या जाणा अंगी वसे ।। ४ ।।
चोखा म्हणे याचा भार वाही देव । ऐसा ज्याचा भाव एकविध ।। ५ ।।

२६९ विषयाचे लोलंगित गुंतले हे जन । न कळे साधन यासीं कांहीं ।। १ ।।
जन्मती मरती जन्मती मरती । ऐसी हे फजिती होती जाती ।। २ ।।
काय हे आंधळे जाणोनियां झाले । झाकिताती डोळे देखोनिया ।। ३ ।।
चोखा म्हणे ऐसे भुलोनिया गेले । शेवटीं खाती टोले गांडीवरी ।। ४ ।।

२७० सुखाची सुखराशी आम्हासी वोळली । ती गाय देखिली पंढरीये ॥ १ ॥
ज्ञानदेवा फावली नामदेवा लाधली । प्रेमें पान्हा घाली भाविकांसी ॥२॥
गोरा आणि सांवता परिसा भागवत । वासुरें पाजित आवडीनें ॥ ३ ॥
चोखा म्हणे गाय ती पंढरीये आहे । एक वेळां पाहे अरे जना ॥ ४ ॥

२७१ अखंड समाधि नामाच्या चिंतनें । साधियेलें पेणें वैकुंठीचें ॥ १ ॥
तोचि योगी जाणा सिद्धाचा तो राणा । अनुभविल्या खुणा सर्व जेणें ॥२॥
ऐहिक परत्र साधिलें साधन । तोडोनी बंधन काम क्रोध ॥ ३ ॥
चोखा म्हणे तोचि योगियांचा रावो । देवांचा तो देवो हृदयीं ज्याच्या ॥४॥

२७२ सुख पाहावया नाना उपाय । अवघेंचि होय दुःखमय ॥ १ ॥
ऐसी हे चाली उफराटी देखिली । वाउगी ती बोली श्रम वाया ॥ २ ॥
दोराचा सर्प भासतसे साचा । तैसा हा देहाचा परिणाम ॥ ३ ॥
चोखा म्हणे याचे मानिताती कोड । कैसे हे दगड जन्मा आले ॥ ४ ॥

२७३ जया जे वासना तया ती भावना । होतसे जाणा आदिअंतीं ॥ १ ॥
कामाचे विलग आवरावें चित्त । क्रोधाचा तो ऊत शांतवोनी ॥ २ ॥
ममता ही माया दंभ अहंकार । आवरावे साचार शांति सुखें ॥ ३ ॥
चोखा म्हणे याचा न धरावा संग । तरीच पांडुरंग हाता लागे ॥ ४ ॥

२७४ मागें बहुतानें हेंचि वारिलें । तेणें ते पावले निजधाम ॥ १ ॥
तयाचिया वाटे चालूं जातां सुख । अवघेंचि दुःख निरसेल ॥ २ ॥
बहुतांचा हाचि आहे उपदेश । तोचि सुखरस सेऊं आतां ॥ ३ ॥
चोखा म्हणे आम्हां सांपडली वाट । मारग हा नीट येतां जातां ॥ ४ ॥

२७५ षड्रस पक्वान्न भोजनीं बैसतां । मक्षिके तत्वतां घात केला ॥ १ ॥
जातीचा स्वभाव अमंगळ आहे । कवणें तेथें लाहे भिन्न भिन्न ॥ २ ॥
श्वानाचा स्वभाव बैसतांहि गादी । नरकादि शुद्धि पाहो धांवे ॥ ३ ॥
आपुलें पारखे न कळेचि तया । भुंके भलतिया स्वभावेंचि ॥ ४ ॥
चोखा म्हणे तैसें दुर्जनाचें जिणें । सदा लाजिरवाणें जनांमध्यें ॥ ५ ॥

## — भाव —

२७६ आमुचा आम्ही केला भावबळी । भावें वनमाळी आकळीला ॥ १ ॥
भावची कारण भावची कारण । भावें देव शरण भाविकासी ॥ २ ॥

निजभावबळें घातिलासे वेढा । देव चहुंकडा कोंडियेला ॥ ३ ॥
चोखा म्हणे देव भावाचा बांधला । भक्तांचा अंकिला म्हणुनी झाला ॥४॥

२७७ शुद्ध भाव शुद्धमती । ऐसें पुराणें वदती ॥ १ ॥
जयासाठीं जप तप । तो हा विश्वाचाचि बाप ॥ २ ॥
नामें पातकी तारिले । जड जीव उद्धरिले ॥ ३ ॥
विश्वास दृढ धरा मनीं । चोखा मिठी घाली चरणीं ॥ ४ ॥

## – विटाळ –

२७८ नीचाचे संगती देवो विटाळला । पाणीये प्रक्षाळोनि सोंवळा केला ॥ १॥
मुळिंच सोंवळा कोठें तो गोंवळा । पाहतां पाहाणें डोळा जयापरी ॥२॥
सोवळ्याचे ठाई सोंवळा आहे । वोंवळ्या ठाई वोंवळा कां न राहे ॥३॥
चोखा म्हणे देव दोहींच्या वेगळा । तोचि म्यां देखिला दृष्टीभरी ॥४॥

२७९ पंचही भूतांचा एकची वीटाळ । अवघाची मेळ जगीं नांदे ॥ १ ॥
तेथें तो सोंवळा वोंवळा तो कोण । विटाळाचें कारण देहमूळ ॥ २ ॥
आदिअंती अवघा वीटाळ संचला । सोंवळा तो झाला कोण न कळे ॥३॥
चोखा म्हणे मज नवल वाटतें । विटाळापरतें आहे कोण ॥ ४ ॥

२८० उपजले विटाळीं मेले ते विटाळीं । राहिले विटाळीं ते ही जाती ॥ १ ॥
रडती पडती ते ही वेगें मरती । परी नाम न गाती भुली भ्रमें ॥ २ ॥
कायरे हा देह सुखाचा तयासी । उघडाची जासी अंतकाळीं ॥ ३ ॥
चोखा म्हणे याचा न धरी भरंवसा । अंती यम फांसा गळां पडे ॥४॥

२८१ कोण तो सोंवळा कोण तो वोंवळा । दोहींच्या वेगळा विठ्ठल माझा ॥१॥
कोणासी विटाळ कशाचा जाहला । मुळींचा संचला सोंवळाची ॥२॥
पांचांचा विटाळ येकाचिये आंगा । सोंवळा तो जगामाजीं कोण ॥३॥
चोखा म्हणे माझा विठ्ठल सोंवळा । अरुपें आगळा विटेवरी ॥ ४ ॥

२८२ वेदासी विटाळ शास्त्रासी विटाळ । पुराणें अमंगळ विटाळाचीं ॥ १ ॥
जीवासी विटाळ शिवासी विटाळ । काया अमंगळ विटाळाची ॥ २ ॥
ब्रह्मिया विटाळ विष्णूसी विटाळ । शंकरा विटाळ अमंगळ ॥ ३ ॥
जन्मतां विटाळ मरतां विटाळ । चोखा म्हणे विटाळ आदिअंतीं ॥ ४ ॥

२८३ काळाचा विटाळ जीवशिवा अंगीं । बांधलासे जगीं दृढ गांठीं ॥ १ ॥
विटाळी विटाळ चवदाही भुवनीं । स्थावर जंगम व्यापुनी विटाळची ॥२॥
सुखासी विटाळ दुःखासी विटाळ । विटाळीं विटाळ वाढलासे ॥ ३ ॥
विटाळाचे अंगीं विटाळाचें फळ । चोखा तो निर्मळ नाम गाय ॥ ४ ॥

## – भक्तवत्सलता –

२८४ भक्तांच्या कैवारा न होय पाठमोरा । धांवतसे सैरा तया काजा ॥ १ ॥
धर्माघरीं झाडी वाहतसे पाणी । काढिलें निर्वाणी आगीतुनी ॥ २ ॥
गौळीयाचे घरीं गाई राखी सुखें । कालाही कौतुकें सर्वे करी ॥ ३ ॥
ज्ञानियाची भिंत अंगेंचि चोढिली । ख्याती ती दाविली चांगदेवा ॥४॥
माळी सांवत्याचें खुर्पग केलें । भाजणें घडिलें गौरियाचें ॥ ५ ॥
सोनार चांभार शिंपी तो नामा । जिवाहुनी प्रेमा तयावरी ॥ ६ ॥
जनीचिया घरीं दळगें कांडणें । केरही भरणें शेण्या वेची ॥ ७ ॥
चोखा म्हणे ऐसा भक्तांचा कनवाळू । जाणें तो ळळापाळू भाविकांचा ॥८॥

२८५ एकदां ऐसें नवल झालें । देव अकल्पित आले ॥ १ ॥
येवोनि बैसले परवरी । म्हणे देई कांहीं नेहरी ॥ २ ॥
जनी म्हणे देवराया । आपुल्या हातें घेई सखया ॥ ३ ॥
देवें अवघें पाहिलें । तो झाकणी झाकण ठेविलें ॥ ४ ॥
लाहे लाहे देव गेला । झाकणी कण्या घेउनी आला ॥ ५ ॥
धरोनी जनीचा हात । धास घालीत मुखांत ॥ ६ ॥
दोघे जेवोनियां धाले । तृप्तीचे ते ढेंकर दिले ॥ ७ ॥
चोखा उभा तो बाहेरी । उष्ट्यासाठीं पदर पसरी ॥ ८ ॥

२८६ घरही झाडणें साळीहि कांडणें । केर तो भरणें अंगणीचा ॥ १ ॥
आणितसे पाणी वेगें चक्रपाणी । घाळितसे वेणी आपुले हातें ॥ २ ॥
बैसोनि निवांत पाहांत केशांत । उवा तो मारीत लाहे लाहे ॥ ३ ॥
चोखा म्हणे हें तो प्रेमाचें काज । न धरी कांहीं लाज थोरवीची ॥ ४ ॥

२८७ काय दुकाळें झालेसे भुकाळु । म्हणोनिया दळूं लागे जनीसी ॥ १ ॥
सिळें तें वाळले कुटके तियेचे । पाचां सातां दिवसांचे खाय सुकें ॥२॥

मोडके खाटले वाकळेची शेज । तेथें तुज नीज आली देवा ॥ ३ ॥
पाहांटे वेचोनी आणितसे सेणी । चोखा म्हणे धनी आमुचा तो ॥ ४ ॥

२८८ नामदेवा हातीं स्वयें दूध प्याला । अपमान केला बादशहाचा ॥ १ ॥
करितां कीर्तन देऊळ फिरविलें । प्रत्यक्ष दाविलें अवंढयासी ॥ २ ॥
अकबरें गाय वत्स मारियेलें । कीर्तनीं उठविले नामदेवें ॥ ३ ॥
परिसा भागवतें परिस पैं दिधला । राजाईनें ठेविला आपणापासीं ॥ ४ ॥
तयालागीं वाळुवंटीं परिस केले । अज्ञान निरसिलें परिसीयाचें ॥ ५ ॥
चोखा म्हणे ऐसी कृपेची माऊली । आम्हां ती वोळली जन्मोजन्मीं ॥ ६ ॥

२८९ वैकुंठ सोपें केलेसे पायरी । ऐसी हे थोरी काय वानूं ॥ १ ॥
तो माझा जीवीचा प्राण हा विठ्ठल । भाविकासी बोल प्रेमाची हे ॥ २ ॥
अमृतासी उणें वाचे उच्चारितां । सुलभ सर्वथा आवडीचें ॥ ३ ॥
चोखा म्हणे तो हा विठ्ठल पंढरी । नामयाचे घरीं करी कामें ॥ ४ ॥

२९० शिणले वेद चारी । साही नेणती निर्धारी ॥ १ ॥
तो आपुलिया लाजा । धांवे भक्ताचिया काजा ॥ २ ॥
ज्ञानियाची भिंत वोढी । गोरियाचें मडकें घडी ॥ ३ ॥
माळि सांवत्यास । खुर्पू लागे सावकाश ॥ ४ ॥
ऐसा भक्तांचा अंकिला । चोखा म्हणे भला भला ॥ ५ ॥

२९१ आमुची भावना आम्हासी फळली । उफराटी चाली दिसोनी आली ॥१॥
तुमचे संगती कोण सुख झालें । आमुचे आम्हां कळले वर्म त्याचें ॥ २ ॥
प्रल्हादें घेतिला तुमचा नाम छंद । केला असे वध पितियाचा ॥ ३ ॥
पहा ते रावण कुंभकर्ण सहपरिवारें । मारियलें वैरें तुम्ही त्यासी ॥ ४ ॥
अज्ञान बाळका लागलासे छंद । गोविला अढल पद देवोनिया ॥ ५ ॥
ब्राह्मणाचे पोर रडे दुधासाठीं । दिली तया वाटी क्षिरसिंधु ॥ ६ ॥
द्रौपदी कारणें कौरवांची शांती । करोनी धर्माप्रती राज्य दिलें ॥ ७ ॥
ऐसेचि ठकविले मोठे मोठे जाणा । कितीसा उगाणा करूं तुमचा ॥८॥
नामयासी वेडे पिसें केलें त्वां हरी । काय तुझी थोरी सांगूं आतां ॥ ९ ॥

माळि कुंभाराचें निसंतान केलें। आपणचि उठविलें मूल त्याचें ॥१०॥
चोखा म्हणे ऐसा विपरीत खेळ। खेळतां सकळ तुम्ही देवा ॥ ११ ॥

२९२ न म्हणे याति कुळ। शुचि अथवा चांडाळ ॥ १ ॥
कैशी प्रीत आवडीची। पोहे भक्षी कोरडेचि ॥ २ ॥
खावोनिया भाजी पान। घाली दुर्वासा भोजन ॥ ३ ॥
पाहा विदुराच्या कण्या। आवडल्या माझ्या धन्या ॥ ४ ॥
चोखा म्हणे जनीच्या घरीं। दळूं लागतो श्रीहरी ॥ ५ ॥

२९३ पाहा नामयाचे घरीं। सेटया होऊन धान्यभरी ॥ १ ॥
गोष्टी बोले राजाईसी। सांगू नका नामयासी ॥ २ ॥
विठ्ठल सेटी नाम माझें। कोठें बोलूं नका बोजे ॥ ३ ॥
ऐसें बोलोनीं तियेसी। देव आले राऊळासी ॥ ४ ॥
नामा घरासी जो आला। पाहोनी बोले गोनाईला ॥ ५ ॥
आजि दिसतो नवलाव। सकळ सुखाचें वैभव ॥ ६ ॥
गोणाई म्हणे विठ्ठल सेटी। धान्य घेऊनी गोणी लोटी ॥ ७ ॥
नामा हांसे आपुले मनीं। वेगी धांवे हे ब्राह्मणी ॥ ८ ॥
बोलावोनी ब्राह्मणासी। धान्य वाटिलें तयासी ॥ ९ ॥
ऐसा नवलाव देखोन। चोखा घाली लोटांगण ॥ १० ॥

२९४ ऐसा आवडी भुकेला। भक्तिसाठीं लाचावला ॥ १ ॥
अवघें ठेविलें परते। थोरपण हें निरुतें ॥ २ ॥
मानापमान न पाहे कांहीं। भुलला भक्ति भावा ठायीं ॥ ३ ॥
चोखा म्हणे नवल कळा। नानापरी दावी लीळा ॥ ४ ॥

## —महार समाजाच्या स्थितीचें वर्णन—

२९५ येथें तो संग आहे दुर्जनांचा। म्हणोनी शीण त्याचा होत आहे ॥ १ ॥
यातीचा प्रकार अमंगळ खाणार। मद्यमांस आहार करिताती ॥ २ ॥
मुखें तें वाईट बोलती कश्मळ। तेणें हळ हळ जीव करी ॥ ३ ॥
चोखा म्हणे ऐसा पडिलों काचणी। सोसूं हे जाचणी कोठवरी ॥ ४ ॥

२९६ बहुत प्रकार बहुत या जगाचे । काय वानूं त्याचे गुणदोष ॥ १ ॥
नीच हे याति अनामिक नांव । तेथें भावाभावा कोण कैचा ॥ २ ॥
चाहाड चोर जार भ्रष्ट ते साचे। हिनत्व जन्मांचें पदरीं आहे ॥ ३ ॥
चोखा म्हणे त्यांचे संगती पडिलों । बहु हे पीडिलों वियोगानें ॥ ४ ॥

## –श्री पांडुरंगरायाचा वियोग –

२९७ रात्रंदिवस पडिलों हाव भरीं । मातीची उकरी कुसुवाची ॥ १ ॥
विसरलों रूप विसरलों ध्यान । विसरलों भजन तुझें देवा ॥ २ ॥
भलें या विठ्ठलें घातलें साकडें । काय माझें कोडें तुम्हां होतें ॥ ३ ॥
करोनियां आस बैसलोंसे द्वारीं । चोखा म्हणे कां बाहेरी मोकलिलें ॥ ४ ॥

२९८ येथें तो दुःखाचे डोंगर आठवती । वाटतसे खंती मना माझ्या ॥ १ ॥
कां हो पंढरीराया परदेशी केलें । कोणी न देखे आपुलें काय करूं ॥ २ ॥
आठवे पंढरी आठवे महाद्वार । संतांचा भार आठवतो ॥ ३ ॥
आठवतो नामा पुंडलिक सखा । चोखा म्हणे देखा तळमळ वाटे ॥४॥

२९९ आई रखुमाई आठवे सत्यभामा । धरिलासे प्रेमा मजवरी ॥ १ ॥
संत समारंभ आठवे मानसीं । गजर वाळुवंटी आठवे तो ॥ २ ॥
आठवे निरा आणि ती भीवरा । आठवे माहेरा पंढरीये ॥ ३ ॥
चोखा म्हणे आठवे श्रीमुख चांगलें। तें डोळियां परतें झालें देवा ॥ ४ ॥

३०० रुदन स्फुंदन अहर्निशी करी । परी वाचे हरी हरी जप सदां ॥ १ ॥
न लागे गोड खातां पाणी पितां । आवडी सर्वथा पंढरीची ॥ २ ॥
निद्रा न लागे करी ऊठी बसी । म्हणे देवा ऐसी तुटी कां केली ॥ ३ ॥
दिन रात हेचि होय मनीं चिंता । चोखा म्हणे आतां काय करुं ॥ ४ ॥

३०१ केधवां सुटेन ऐसें जालें जीवा । गोवियेलें देवा कांहीं येथें ॥ १ ॥
आतां झडकरी धांवे लवकरी । सोडवी बाहेरी मजलागीं ॥ २ ॥
प्राण हा कंठीं धरीला तुजसाठीं । निर्वाण दृष्टी पाहसी काय ॥ ३ ॥
चोखा म्हणे वांया चालिलासे वेळ । आला असे काळ निकट दिसे ॥ ४ ॥

३०२ देहांत अवसान भरलेसे दिसे । म्हणोनी पंढरी निवासे मोकलिलें ॥ १ ॥
कर्मांचे संचित प्रालब्धाचा भोग । न सुटे भागाभाग निढळीचा ॥२॥

तया अक्षरासी न पडेचि उणें । भोग तो भोगणें सुखदुःख ॥ ३ ॥
चोखा म्हणे देवा तुझ्याकडे काय । आमुचें तें होय पूर्व कर्म ॥ ४ ॥

३०३ माझा तो समय निकट दिसे आला । लेख तो लेखिला तैसें झालें ॥ १ ॥
जन्मोनी पोसणा तुमचाच दास । आतां निकट सहवासी अंतरलों ॥ २ ॥
उच्छिष्टाची आस सरलीसे दिसे । प्रारब्धा सरसें वोढवलें ॥ ३ ॥
चोखा म्हणे माझा दंडवत पायीं । करी आतां साई कृपेची तूं ॥ ४ ॥

## –नामदेव गुरु–स्तुति–

३०४ भक्तिभाव मज तुम्ही दाखविला । आनंद सोहळा सुखाचाचि ॥ १ ॥
तें प्रेम मज नये सांगतां । कोंदाटलों चित्ता सुखानंदें ॥ २ ॥
रुपदृष्टी धाय पाहातां न समाये । बोलतांचि न ये काय करुं ॥ ३ ॥
चोखा म्हणे धन्य नामया तूं गुरु । फेडिला आधारु जीवित्वाचा ॥ ४ ॥

३०५ ब्रह्मादिकां माव न कळे हें लाघव । तेथें हे जीव नेणती कांहीं ॥ १ ॥
ऐसें जें चरित्र केलेंसें देवें । तें सुखें गावें अहर्निशी ॥ २ ॥
भलतिया भरी पडुं नये साच । नामाचा भरंवसा जीवें धरा ॥ ३ ॥
चोखा म्हणे तुम्ही माय हो माउली । कृपेची साउली नामदेवा ॥ ४ ॥

३०६ मोकाट हें मन करितां बावरें । हिंडतां वावरे न सांपडेचि ॥ १ ॥
तयाचिये पायीं दृढ घाली बेडी । न करी वोढा वोढी कोणी मग ॥२॥
निवांतचि राहे ऐसा हा उपाय । नेणे आन सोय दुजी कांहीं ॥ ३ ॥
चोखा म्हणे तुम्ही जें शिकविलें । तेचि फळा आलें नामदेवा ॥ ४ ॥

३०७ अवघ्याचि लोभें अवघेचि आलें । अवघें संचलें अवघें रुप ॥ १ ॥
अवघें गोजिरें अवघें साजिरें । अवघ्या परिहारें अवघेंचि ॥ २ ॥
अवघें आनंदाचें अवघेचि वोतिलें । अवघे प्रकाशलें अवघेपणें ॥ ३ ॥
चोखा म्हणे अवघें नामया फावलें । अवघेचि दाविलें तेणें मज ॥ ४ ॥

३०८ धन्य धन्य नामदेवा । केला उपकार जीवा ॥ १ ॥
माझा निरसिला भेवो । दाखविला पंढरिरावो ॥ २ ॥
मंत्र सांगितला सोपा । निवारलें भव तापा ॥ ३ ॥
माझी कृपेची माऊली । चोखा म्हणे पान्हा घाली ॥ ४ ॥

३०९ माझें सुख मज दाखविलें। पावन केलें तिहीं लोकीं ॥ १ ॥
नवलाव झाला नवलाव झाला। हृदयींच दाविला देव मज ॥ २ ॥
निवारोनी भव ताप। दाविलें रुप प्रत्यक्ष। ३ ।
चोखा म्हणे नामदेवा। चुकविला हेवा जन्म मरण ॥ ४ ॥

३१० बोल जो बोलतां तोचि मावळला। आतां काय बोला बोलावें तें ॥१॥
बोलाचें बोलणें खुंटलें बोलवरी। बोलाचीच परी नाठवे ते । २ ॥
कोणासी तो बोल कोणे तो बोलावा। उरला नाहीं ठावा बोलण्यासी ॥३॥
चोखा म्हणे नामया तें बोलणें खुंटलें। बोलीं बोल आटले सर्व दिसे ॥४॥

३११ अवघें वर्म कळलें आतां। बोलतां लाज वाटे चित्ता ॥ १ ॥
ही बरी नव्हे गोष्टी। अंतर बाहेर करी दृष्टी ॥ २ ॥
वर्म आलें नाहीं हातां। तोंवरी वाव सर्वथा ॥ ३ ॥
नामा म्हणे चोखयासी। खूण कळली नाहीं तुसी ॥ ४ ॥

३१२ विपरीत हे कहाणी ऐकतां नवल। पाहतां सखोल ज्ञानदृष्टी ॥ १ ॥
तें सुख आपुलें आपण भोगावें। येरा काय सांगावें वेडगळासी ॥ २ ॥
जयाच्िया मनीं साच नाहीं भाव। अवघाचि ठाव वोस तया ॥ ३ ॥
चोखा म्हणे अहो नामया सुजाणा। केशवासी खुणा पुसों जावें ॥ ४

३१३ काय पाहूं काय ध्याऊं। काय गाऊं कवणातें ॥ १ ॥
कोठें जाऊं कोठें राहूं। कोठें पाहूं काय तें ॥ २ ॥
कोठें सुख कोठें दुःख। कोठें अवघें पाहाणें देख ॥ ३ ॥
चोखा म्हणे नामया सुजाणा। वोळखोनी खुणा सांगे मज ॥४॥

३१४ पाहातां पाहाणें लया गेलें। तें पाहाणें नामया आलें ॥ १ ॥
अवघें डोळां जें ग्रासिलें। तेंचि नामया फावलें ॥ २ ॥
जया नाहीं रूप नांव। गांव ना ठाव नामयातें ॥ ३ ॥
चोखा म्हणे नामदेवा। बरवे चोज दाविलें जीवा ॥ ४ ॥

३१५ धन्य धन्य नामदेव। माझा निरसला भेव ॥ १ ॥
विठ्ठल मंत्र त्रिअक्षरी। खूण सांगितली निर्धारी ॥ २ ॥

ठेवोनी माथां हात । दिलें माझें मज हित ॥ ३ ॥
दावियेलें तारूं । चोखा म्हणे माझा गुरु ॥ ४ ॥

३१६ आजि सोनियाचा दिवस धन्य झाला । प्रत्यक्ष भेटला नामदेव ॥ १ ॥
माझें मज दिलें माझें मज दिलें । माझें मज दिलें प्रेमसुख ॥ २ ॥
बहुत आटणी करितां दाटणी । सुखाचें सुख मनीं कोंदाटलें ॥ ३ ॥
माझा मज देव दावियेला देहीं । मी तूं पण गेलें ठायीच्या ठायीं ॥ ४ ॥
चोखा म्हणे माझा जीवीचा विसावा । पोकरितों धांवा नामदेवा ॥ ५ ॥

३१७ न करी न करी आणिक साधन । नामयानें खूण सांगितली ॥ १ ॥
संसार सागर भरला दुस्तर । तारक निर्धार विठ्ठल हा ॥ २ ॥
मंत्रांचा हा मंत्र त्रिअक्षरी सोपा । तुटताती खेपा जन्म मरण ॥ ३ ॥
चोखा म्हणे माझा धन्य गुरुराव । दाखविला देव हृदयीं माझ्या ॥ ४ ॥

३१८ नव्हे तें कैसें दिसों लागलें । पाहों गेलों तें नामयानें खादलें ॥ १ ॥
कोणा वो सांगूं कोणा वो सांगूं । कोणा वो सांगूं नामदेवा ॥ २ ॥
दृष्टीचें परतें दृष्टिच भासलें । दृश्य आणि दृष्टि नामया लाधलें ॥ ३ ॥
चोखा म्हणे तें नामया फावलें । मुळीचें संचलें जैसें तैसें ॥ ४ ॥

३१९ जें मन गांजलें विषयाचें पोखें । तें केलें पारखें कृपादृष्टी ॥ १ ॥
कामं आणि क्रोध जे जीवें मारिलें । दंभ मान केलें दूर देशी ॥ २ ॥
आशा आणि ममता दवडीली चिंता । नाहीं भय आतां संसाराचें ॥३॥
चोखा म्हणे अवघा संदेह फिटला । उपकार हा केला नामयानें ॥ ४ ॥

३२० बहु दुर्लभ होतें तें सुलभचि झालें । तेथें मन गुंतलें सर्व भावें ॥ १ ॥
तें रूप अरूप रुपाची वेगळें । हृदयी बिंबलें सर्व काळ ॥ २ ॥
नामगोष्टी अवघी भरली हे सृष्टी । द्वैत भाव पोटीं नाहींसा झाला ॥ ३ ॥
चोखा म्हणे ज्याचा उपदेश भला । सहज निरसला भेदाभेद ॥ ४ ॥

३२१ अनुभवें सार पाडिला विसर । केला संवसार देशधडी ॥ १ ॥
कैसें हें लाघव गुरुराया केलें । मज दावियेलें माझें हित ॥ २ ॥
बहु काळवरी वाह्नातसे चिंता । ती आजि सर्वथा दूर केली ॥ ३ ॥
चोखा म्हणे या नामयाचे पाय । न विसंबे वो माय जन्मोजन्मीं ॥४ ॥

३२२ बहू हीन याति देह अमंगळ । न कळे चोखाळ चोखट तें ॥ १ ॥
परी इहीं केलें मज कृपादान । निरसिलें अज्ञान मळकट ॥ २ ॥
बहुतां परीचा बहुतांचा बोल । तो झाला फोल कृपादृष्टी ॥ ३ ॥
म्हणोनी जीवें धरियेलें पाय । चोखा म्हणे काय बोलूं आतां ॥ ४ ॥

३२३ अवघें वाळिलें अवघें चाळिलें । अवघें पाळिलें सुखें आजी ॥ १ ॥
अवघें वंदिलें अवघें निंदिलें । अवघें पाळिलें सुखें आजी ॥ २ ॥
अवघें गाजलें अवघें पांगलें । अवघें पाळिलें सुखें आजी ॥ ३ ॥
अवघे या नामयाते अवघे रंगले । अवघे चोखियाते भरोन उरले ॥४॥

३२४ आपुलें आपण करावें कारण । दुजीयासी खूण न कळेचि ॥ १ ॥
जयाचा ठेवा तो तयासीच ठावा । येरा कळे हेवा त्याचा कांहीं ॥२॥
जयाची ती खूण तयासीच ते ठावी । येरा नेणें जीवी सोय त्याची ॥ ३ ॥
चोखा म्हणे माझा नामया तो भला । उगाणा दाविला अनुभवाचा ॥ ४ ॥

३२५ मोकाटाचे परी हिंडे दारोदारीं । शुद्धि ते न धरी काय करूं ॥ १ ॥
न कळे न कळे विंदान ययाचें । भांबावलों साचे बोलवेना ॥ २ ॥
शब्दाचा शब्द खुंटला प्रकार । कैसा हा विचार न सुचे कांहीं ॥ ३ ॥
चोखा म्हणे अहो नामया श्रीगुरू । कैसा हा प्रकारु सांगा मज ॥ ४ ॥

३२६ अखंड ते चित्त वेडावलें मन । कोण आवरोन धरी यासी ॥ १ ॥
काय बा करावें काय बा करावें । बोखटें सांगावें कवणापाशीं ॥ २ ॥
न करावें तें करिताहे बळें । आमुचिये मेळे न मिळेची ॥ ३ ॥
चोखा म्हणे आतां कवणासी लागूं । तोंडायाचा सांगू नामदेवा ॥ ४ ॥

३२७ असंग हा संग होतसे अन्याय । कवण तो उपाय न सुचे यासी ॥१॥
अवघाचि मातेरा केलासे देहाचा । साच ते सुखाचा नाश केला ॥ २ ॥
बीज ना फळ फोलकट झालें । सेवटासी आलें रितें माप ॥ ३ ॥
मोजितां मोजिलें दृष्टीनें पाहिलें । चोखा म्हणे गेलें वायाविण ॥ ४ ॥

३२८ गोणी भरियेली रितिया मापाची । भाव अभावाची बैलापाठीं ॥ १ ॥
आवडीच्या हाटा घेऊनियां जाय । आशा दंभ पाहे गिऱ्हाईक ॥ २ ॥

मांडिलें दुकान घातिला पसारा । झाला सारा वारा बाजाराचा ॥ ३ ॥
चोखा म्हणे हाट संपोनिया गेला । एकला उरला नामदेव ॥ ४ ॥

३२९ किती या हाटासी येवोनिया गेले । आहे ते संचले जैसे तैसें ॥ १ ॥
बहुतांचे मत बहुत प्रकार । वाण हा अपार निवडिला ॥ २ ॥
जो जया आवडे तोचि घेतो वाण । पुढील कारण विसरोनि ॥ ३ ॥
चोखा म्हणे अवघा वाण तो देखिला । रिकामाची आला नामदेव । ४ ॥

३३० किती किती वाण एकचि प्रकार । न करितां सारासार न भरे गोणी ॥१॥
नवल वाटलें हाटाते गुंतलें । रिकामें आले गेले वायाविण ॥ २ ॥
फिरत फिरत जे जे वाण पाहाती । हांवचि भरती रिती गोणी ॥ ३ ॥
चोखा म्हणे हें तो न कळे लाधव । वोळखे जो धांव डाव विरळा एक ॥४॥

३३१ नामदेवें आजि उपकार केला । हाटाचा हाट चौबारा ठेला ॥ १ ॥
अवघ्या वाणांची देवोनिया गांठ । बांधली मोट सरळ तेणें ॥ २ ॥
अवघ्या पसारा उघड जो होता । झाकिला तत्वता निजबळें ॥ ३
चोखा म्हणे आतां वाणचि पावलों । गोणी विसरलों हाटामाजीं ॥

३३२ कैसा हा हाट कवणाची गोणी । वेगळाचि राहिला मालधणी ॥ १ ॥
कवणाचा वाण विकितसे कवण । अवघा पसारा ठेवी झाकोन ॥ २ ॥
मावळला दिन झाकलासे हाट । अवघा बोभाट वारलासे ॥ ३ ॥
चोखा म्हणे माप भरियेले सिगें । आतां कोणाचे पदरीं देऊं उगे ॥ ४ ॥

३३३ सांज झाल्यावरी हाटा कोण पुसे । सहज ते नासे वाणावाण ॥ १ ॥
नाहीं तो हाट नाहीं तो पसारा । पडिला अंधार चहूंकडे ॥ २ ॥
गोणी रिती झाली माप उलंडिलें । गिऱ्हाइक गेलें जेथिचें तेथें ॥ ३ ॥
अवघें हें नवल नामयानें दाविलें । चोखिया लाधलें जन्मोजन्मीं ॥ ४

३३४ करणेंचि नाहीं रितियाचा शोक । कासया हव्यास लाभ नाहीं ॥ १ ॥
पुढेंही आड मागें दिसे विहीर । ऐसिया विचारी पडिलोंसे ॥ २ ॥
बहु रंगे रंग रंगोनी दाटला । परि कोण प्याला तयापरी ॥ ३ ॥
चोखा म्हणे ऐसा सर्वही प्रकार । किती कर कर करूं वाया ॥ ४ ॥

३३५ कोणाचा संग धरुं कोणासाठीं । तो दुःखाचीच मिठी पडे तेणें ॥ १ ॥
म्हणोनी नामयाचे धरियले पाय । आठवितां होय समाधान ॥ २ ॥
सुखाचें सुख मज दावियेलें डोळा । आनंद सांवळा विटेवरी ॥ ३ ॥
चोखा म्हणे माझा नामदेव प्राण । घालीन लोटांगण जीवें भावें ॥ ४ ॥

## ज्ञानेश्वर स्तुति

३३६ सुख अनुपम संतांचे चरणीं । प्रत्यक्ष अलंका भुवनीं नांदतसे ॥ १ ॥
तो हा महाराज ज्ञानेश्वर माऊली । जेणें निगम वल्ली प्रगट केली ॥ २ ॥
संसारी आसक्त माया मोहेरत । ऐसे जे पतित तारावया ॥ ३ ॥ ॥
चोखा म्हणे श्रेष्ठ ज्ञानदेवी ग्रंथ । वाचिता सनाथ जीव होती ॥ ४ ॥

३३७ उघडोनी वेदार्थाचा ठेवा । केला तरणोपाय जीवा ॥ १ ॥
ऐसा समर्थ ज्ञानदेव । तया चरणीं ठेवा भाव ॥ २ ॥
प्रत्यक्ष प्रचित लोचनीं । अस्थि विरती जीवनीं ॥ ३ ॥
पुढें सोन्याचा पिंपळ । ऐसी साक्ष असे अढळ ॥ ४ ॥
कर जोडोनिया दोन्ही । चोखा जातो लोटांगणी ॥ ५ ॥

३३८ महाविष्णूचा अवतार । प्राण सखा ज्ञानेश्वर ॥ १ ॥
आदिनाथाचा अवतार । निवृत्ति म्हणती साचार ॥ २ ॥
चतुराननाचा अवतार । तो हा सोपान निर्धार ॥ ३ ॥
आदिमाया मुक्ताबाई । चांगा उपदेशिला पाही ॥ ४ ॥
ऐशा संतांच्या चरणीं । चोखा घालतो लोळणी ॥ ५ ॥

३३९ धन्य धन्य महाराज । केलें अनाथाचें काज ॥ १ ॥
घेवोनी अवतार । उतरिला भुमिभार ॥ २ ॥
महापातकी तारिले । ब्रीद त्रिभुवनीं गाजलें ॥ ३ ॥
ज्यांच्या पापा नाहीं गणती । वैकुंठीं त्या केली वस्ती ॥ ४ ॥
ऐसा नामाचा महिमा । चोखा म्हणे झाली सीमा ॥ ५ ॥

३४० ज्ञानेश्वर नामें धरिला अवतार । क्षेत्र अलंकापूर इंद्रायणी ॥ १ ॥
अद्वैत ज्ञानाची करूनी उजरी । टीका ज्ञानेश्वरी ग्रंथ केला ॥ २ ॥

अमृत अनुभवी गरूगम्य ज्ञान । दाऊनियां जन उद्धरिले ॥ ३ ॥
बाराशतें अठरा शक शालिवाहान । दुर्मुख अभिधान संवत्सर ॥ ४ ।
कृष्ण त्रयोदशी कार्तिक हा मास । बैसे समाधीस ज्ञानदेव ॥ ५ ॥
जातीहीन चोखा विनवी जोडुनि कर । समाधी निर्धार संजीवनी ॥ ६ ॥

## —संकीर्ण—

३४१ कैसा या लोभें गोवियेला । हा तो आपैसाचि राहिला ॥ १ ॥
मज तो वाटे चोज याचें । खातां खादलें खाय साचें ॥ २ ॥
ऐसी काय तुझी भीड । पडली ते न कळे गूढ ॥ ३ ॥
चोखा म्हणे भुलवण्या । धन्य नामया शाहाण्या ॥ ४ ॥

३४२ पंधरा सतरांचा हो मेळा । कारखाना झाला । वाजविती आपुल्या कळा । प्रेमबाळा आनंदे ॥ १ ॥ झडतो नामाचा चौघडा । ब्रह्मी ब्रह्मरूपीचा हुडा । संत ऐकती कोडा । प्रेमबाळा आनंदें ॥ २ ॥ जनाबाई घड्याळ मोगरी । घटिका भरितां टोला मारी । काळ व्यर्थची गेला तरी । गजर करी आनंद ॥ ३ ॥ रामा दामा दोनी काळू ॥ नारा विटा दमामे फेळू । चोघी सुना चारी हेळु । कडकडा बोल उमटती ॥ ४ ॥ गोंदा म्हादा कर्णेकरी । नादे दुमदुमली पंढरी । आऊबाई प्रेम तुतारी । मंजुळ स्वर उमटती ॥ ५ ॥ गोणाबाई नवबद्ध पल्ला । नाद अंबरी कोंदला । राजाई झांज मंजुळ बोला । मंजुळस्वर उमटती ॥ ६ ॥ तेथें चोखा बारीदार । काटवण इंधन आणि सार । अवघे झाडवाणी महार । उतरले पार संत संगे ॥ ७ ॥

## —जोहार—

३४३ जोहार मायबाप जोहार । तुमच्या महाराचा मी महार ॥ १ ॥
बहु भुकेला जाहलों । तुमच्या उष्ट्यासाठीं आलों ॥ २ ॥
बहु केली आस । तुमच्या दासाचा मी दास ॥ ३ ॥
चोखा म्हणे पाटी । आणिली तुमच्या उष्ट्यासाठीं ॥ ४ ॥

३४४ कोपटी तळपती गाई । हाडाचीं बेडी पडेल पायीं । तोंड चुकवितां इज्जत जाई । मग वाचोनियां काय कीजे मायबाप ॥ १ ॥ जोहार

पाटील बाजी । चावडी चलाना कां जी । ऐसें सांगत आलों आजी । बहुत बाकीं थकली कीं मायबाप ॥ २ ॥ हिमायत येथें न चले कांहीं । वार्ता पुढें भाई । वरते पाय खालीं डोई । नव महिने होईल कीं मायबाप ॥ ३ ॥ उगली कां कोंडितां गुरें । गांविची कां बुजवितां द्वारें । फेडा झाला बरोबर नका उणे पुरें कीं मायबाप ॥ ४ ॥ यंदा आली देवाची पाळी । तोंडें कां जी करितां काळीं । चावडी चला या वेळीं । शिव्या गाळी घेऊं नका कीं मायबाप ॥ ५ ॥ कुळकर्णी आपुल्या स्वाधीन करा । आडखर्चांचा ताळा धरा । दयाळु मायाळु बाप करा । येईल मुजरा निजसत्वें कीं मायबाप ॥ ६ ॥ विठु पाटलाचा महार । चोखामेळ्याचा जोहार । सकळ संतांचा कारभार । मज नफराचे शिरीं कीजे मायबाप ॥ ७ ॥

३४५ जोहार मायबाप जोहार । मी विठोबारायाचा महार । हिशेब देतों तारोतार । लंवे बाकीचा कारभार । मज नफराचे शिरीं कीं जी मायबाप ॥ १ ॥ सकाळींच मी निजून उठतो ॥ आईबापाचे नांवें पांच ग्रास घेतों । झाडोनी पाटी दरबार आणितों । अविद्या केर पुंजा कीं० ॥ २ ॥ आवास जेवा सांगोन येतो । रखुमाईस तुकडा मागून खातों ॥ सारी रात गवरापासीं जागतों । बीज सेवितों प्रेमाचें कीं ॥ ३ ॥ मी नफर चोरुं नेणें आंग । हाती वागवितो धन्याची ढांग । यमदूत देखतां सुमाग । त्याचे ढुंगावरी लगबगे हाणतो कीं ॥ ४ ॥ माझे धन्याचे हातीं । अठरा पगड निपजल्या याती । सात वार सत्तावीस नक्षत्रें पंधरा तिथी । दिनरात वर्षाचे किती कीं ॥ ५ ॥ येवढें तरी जगड्व्याळ । ब्रह्मयानें केलें विशाळ । परी तें काय गा परवांचें बाळ । माझें धन्याचे कमळ नाळा माजी बुळ बुळ । करित होतें कीं ॥ ६ ॥ कायसी ब्रह्मयाची कहाणी । महादेव सेवितो पायवणी । महाथोर बैसले खेचर ध्यानीं । परी तो मनीं न सांपडे कीं ॥ ७ ॥ आम्हांसी नाकळे म्हणाल जरी । तरी खेळविनो पंचतत्वाची दोरी । पाप पुण्याचा निवाडा करी । द्वैत राक्षस संहारी कीं ॥ ८ ॥ चारी खाणी चारी वाणी । चौऱ्यांशी लक्ष जीव योनी । स्थावर जंगम अणुरेणूचा धणी । करणी

करून वेगळा कीं ॥ ९ ॥ येवढी याची आटणी दाटणी । ऐसी याची नका करुं घोकणी । यमाजी मारील हुसणी । काढील तांबडें पाणी । बोळं नेदी कीं ॥ १० ॥ देहपूर पाठणीचें ठाणें । यमाजी दूताचें झालिया धांवणें । मग जीवाजी मर्दमानें कोठें चुकवोनि पळतील कीं ॥ ११ ॥ विठूरायाचा मर्द निजबीज । आहे मी नफर सरदाज कांनीं ऐकतां आवाज । आलों महाराज जवळ कीं ॥ १२ ॥ वैकुंठाहुनी माझ्या धन्याची उडी । नरसिंहरुपें सोडीं । हूस मारुन पोट फोडी । या हिरण्याकश्यपाचें कीं० ॥ १३ ॥ नरसो बाबाजी स्वता खंब । त्याचा कारभार वेगळेचि थोंब । मोठा रागीट एकचि बोंब । रोडगे बंब मागतो कीं० ॥ १४ ॥ परी तो आमुचा आहे सखा भाऊ । एकमेकांचे आवडते जीऊ । ऐसें ध्यान पहावया जाऊं । नफराचा ठाऊ नुरे कीं० ॥ १५ ॥ विठोबाची करितों चाकरी । खावया मागतों भाकरी । अखंड चोखा महाद्वारीं । कृपा दीनांवरीं करा कीजी मायबाप ॥ १६ ॥

## –श्री पांडुरंगरायांना शेवटला निरोप व मागणें–

३४६ माझी तूं माउली माझी तूं माउली । माझी तूं माउली विठ्ठला तूं ॥ १ ॥
मज कां मोकलिलें वेगळें कां केलें । कां बा धाडियेलें मंगळवेढ्या ॥ २ ॥
काय माझा भार झालासे जोजार । म्हणोनि केलें दूर पायांपरतें ॥ ३ ॥
चोखा म्हणे मज द्रव्याची नाहीं चाड । तुझें नाम गोड मुखीं गातां ॥ ४ ॥

३४७ पुढें आतां मज उपजवी पंढरी । अथवा हरिदासा घरीं देई जन्म ॥ १ ॥
हेंचि वारंवार मागणें तुम्हा देवा । विसावीया जीवा मायबापा ॥ २ ॥
अंतकाळीं मज परदेशी केलें । माझेंचि फळलें पाप दिसे ॥ ३ ॥
चोखा म्हणे विठ्ठला हेंचि मज देई । जन्मोजन्मीं घेई सेवा माझी ॥ ४ ॥

३४८ राहिली वासना पायासवें चाड । आन नाहीं कोड माझें कांहीं ॥ १ ॥
तुमची कृपादृष्टी असावी मजवरी । आणि नामया सेजारी सुखवस्ती ॥ २ ॥
महाद्वारापुढें मज ठाव द्यावा । हेंचि केशवा मागतसे ॥ ३ ॥
चोखा म्हणे आजि वाटते उदास । घडिये घडिये आस पंढरीची ॥ ४ ॥

## –प्रसाद–

३४९ वासुदेव दिंडी गान। प्रसाद मागूं आले दान। आणिक आले कोण कोण। त्यांचीं नावें परीसावी ॥ १ ॥ ब्राह्मण क्षत्रिय शूद्र वाणी। मागूं आल्या चारी खाणी। लिहिणार जोशी पंडित गणी। चाटे भाट आले ते ॥ २ ॥ गोंधळ डफ गाणें बहीरव जोगी। बाळ संतोषी आणि बैरागी। फकीर डाकुलता तो वेगी। कान फाड्या आला तो ॥ ३ ॥ सारमंडळी आलासे। राहा विनोदें बोलतसे चोखा महार जोहार करितसे। प्रसाद देई म्हणोनी ॥ ४ ॥

**पुंडलीक वरदा हरि विठ्ठल। श्री ज्ञानदेव तुकाराम ॥**

* * *

# चोखामळा महाराजांच्या समाधीचे अभंग

—नामदेवराय

१ मंगळ वेढ्या भोवतें कुसूं घालावया। महारासी न्यावया दूत आले ॥१॥
महारासमागमें चोखामेळा गेला। काम तें लागला करावया ॥ २ ॥
सर्वकाळं वाचे विठ्ठलनाम छंद। आठवी गोविंद वेळोवेळां ॥ ३ ॥
चार महिने याचि रीतीनें लोटलें। कुसूं कडाडिलें आकस्मात ॥ ४ ॥
तयाखालीं महार बहु चुर झालें। चोख्यानें अर्पिले प्राण देवा ॥ ५ ॥
देव म्हणे नाम्या त्वां जावें तेथें। त्याच्या आस्थि येथें घेऊनि याव्या ॥६॥
नामा म्हणे देवा कैशा ओळखाव्या। विठ्ठल नाम जयामध्यें निघेल ॥ ७ ॥

२ ऐकोनियां कानीं अंचळी भराव्या। आणोनियां द्याव्या आम्हापासीं ॥१॥
शालिवाहन शके बाराशें साठ। प्रमाथी नाम स्पष्ट संवत्सर ॥ २ ॥
वैशाख वद्य पंचमी सुदीन। गुरुवारी प्रयाण करी चोखा ॥ ३ ॥
चोखा माझा जीव चोखा माझा भाव। कुळ धर्म देव चोखा माझा ॥ ४ ॥
काय त्याची भक्ति काय त्याची शक्ति। मी हि आलों व्यक्ति तयासाठीं ॥५॥
माझ्या चोखियाचे करिती जे ध्यान। तया कधीं विघ्न पडो नेदी ॥ ६ ॥
नामदेवें आस्थि आणिल्या पारखोनी। घेत चक्रपाणी पितांबरी ॥ ७ ॥

३ देवाच्या अंचळी उठिला गजर । विठ्ठलनाम अंबर गर्जतसे ॥ १ ॥
संत समुदाय पताकांचें भार । लोटले गजर ऐकावया ॥ २ ॥
वद्य त्रयोदशी वैशाख शुक्रवार । नामाचा गजर महाद्वारीं ॥ ३ ॥
ऐसी आनंदानें नामाच्या गजरीं । दिली महाद्वारीं समाधि त्या ॥ ४ ॥
आस्थि निक्षेपण आपुलिया हातें । करुनि अनंतें पाषाण ठेवी ॥ ५ ॥
राही रखुमाई कुर्वंडी करिती । सत्यभामा आरति ओंवाळीत ॥ ६ ॥
नामा म्हणे धन्य विठोबाची कृपा । जाईन माझ्या बापा ओंवाळून ॥७॥

# चोखामेळा चरित्र

**—नामदेवराय**

चोखामेळ्यानें पाजियेलें दहीं । पडों दिलें नाहीं उणें त्याचें ॥ १ ॥ तयाचें चरित्र परिसावें सादर । करितों नमस्कार सतजनां ॥ २ ॥ तयाची जे कांता तयाच सारिखी । भावार्थ नेटकी आवडीची ॥ ३ ॥ साधन द्वादशी आली एके काळी । उठोनि प्रातःकाळी काय बोले ॥ ४ ॥ उठी उठी कांते स्वयंपाक करी । आतां येतील हरि पारण्यासी ॥ ५ ॥ तंव एक्या ब्राह्मणें आइकिली मात । तेणें दिवाणास सांगितलें ॥ ६ ॥ दिवाणानें दूत पाठविले त्यासी । चोखामेळियासी धरूनि आणा ॥ ७ ॥ दूती जाऊनियां धरूनि आणिलें । म्हणे काय झालें चोखामेळां ॥ ८ ॥ विठोबासी दहीं पार्जीत असतां । कां हो माझ्या हातां आसडिलें ॥ ९ ॥ रडतो हा कां रे समेसी पुसती । तो म्हणे वृत्तांत ऐसा झाला ॥ १० ॥ रुसूनियां विठो गेला म्हणूऊनि । रडे दीर्घध्वनी करूनिया ॥ ११ ॥ म्हणति या महारानें देव बाटविला । जिवें मारा याला बैल जुंपा ॥ १२ ॥ बांधोनियां पाय हांकियले बैल । धरूनि शिवळ विठो उभा ॥ १३ ॥ उडती आसूड बैलांचें पाठीं । मारितां हिंपुटी थोर झाली ॥१४॥ तयाची ते कांता उभी राहूनियां । म्हणे देवराया हात काढी ॥ १५ ॥ खाइलें जेविलें त्याचा हा उपकार । दुबळीचा भ्रतार मारूं पाहसी ॥ १६ ॥ पाळिलें पोसिलें माझिया धन्यासी । उतराई झालासी ओढावया ॥ १७ ॥ अन्नाची त्वां क्रिया नाहीं रे राखिली । रांडकी त्वां केली चोखियाची ॥ १८ ॥ काढी हात

आतां जाय परता उसण्या । जाय पोट पोसण्या येथूनियां ॥ १९ ॥ चोखा म्हणे रांडे विश्वाचा पोसणा । संतांचा देखणा विठो माझा ॥ २० ॥ जन लोक पुसती कोणा बोलतीस । ते म्हणे तुम्हांस काय दिसे ॥ २१ ॥ अनंत ब्रह्मांडें जयाचें उदरीं । त्यानें चहूंकरीं धरियेलें ॥ २२ ॥ पीतांबरधारी घन:श्याम मूर्ती । रखुमाईचा पति विठ्ठल हा ॥ २३ ॥ समस्तांसी तेव्हां दिलें दरूशन । केलें समाधान नामा म्हणे ॥ २४ ॥

# चोखोबांच्या स्त्रीचें बाळंतपण

चोखोबाची कांता असे ती गर्भिण । झाले तीस पूर्ण नव मास ॥ १ ॥ करूनि विनंति पतिसी बोलत । असावें साहित्य घरामाजीं ॥ २ ॥ ऐकूनियां चोखा करीत विचार । कोणें ऐसा घोर वागवावा ॥ ३ ॥ न पुसतां गेला वहिणीच्या गांवा । आनंदें केशवा आळवीत ॥ ४ ॥ दोन प्रहर झाले न येती भोजना । कांता विचारणा करीतसे ॥ ५ ॥ शोध करितांना संध्याकाळ झाली । पति माझा गेला कोणीकडे ॥ ६ ॥ विरक्तासी मी तों सांगितलें काम । कैसा झाला भ्रम माझे बुद्धी ॥ ७ ॥ अहो पांडुरंगा आणा त्यासी आतां । न सांगे मी वार्ता संसाराची ॥ ८ ॥ झाली तेव्हां श्रमी । प्रसूत वेळा आली । विठाई धांवली तेचि वेळां ॥ ९ ॥ चोखोबाची बहिण झाला सारंगधर । वहिणी उघडा द्वार हांका मारी ॥ १० ॥ दोघीही भेटल्या तेव्हां आनंदानें । आलें तें रुदन चोख्याकांते ॥ ११ ॥ बरें बाई तुम्हां देवानें धाडिलें । पती माझा गेला कोणीकडे ॥ १२ ॥ चाणाक्ष बायका तुम्ही अनिवार । अज्ञान भ्रतार तुमचे गांवीं ॥ १३ ॥ म्हणोनियां तुम्ही सांगता त्या काम । विरक्तासी श्रम वाटतसे ॥ १४ ॥ दादा माझा सुज्ञ आधींच हें श्रुत । होयाचें तें होत आपणची ॥ १५ ॥ केली त्वां सूचना आला माझ्या घरा । त्यानें केली त्वरा मजलागी ॥ १६ ॥ सर्वही साहित्य दिलें म्हणे आतां । नका करूं चिंता वहिनी कांहीं ॥ १७ ॥ सर्वहि साहित्य होतें तिजपाशीं । ऋद्धिसिद्धि दासी तयाचिया ॥ १८ ॥ प्रसुत ते झाली पुत्र झाला तिला । आनंद वाटला पांडुरंगा ॥ १९ ॥ वांटिली शर्करा सर्वत्र यातीसी । माझ्या

चोखोबासी पुत्र झाला ॥ २० ॥ लावुनि उटणें न्हाणियले तिला । श्रम तिचा गेला सर्वांगाचा ॥ २१ ॥ पांचवीही केली तिनें आनंदानें । घातलें भोजन याती लागीं ॥ २२ ॥ तेरावे दिवशीं बाळ ते पाळणा । घालितसे राणा वैकुंठीचा ॥ २३ ॥ साडी आणि चोळी आंगडें टोपडें । आणियलें कोणे रखमाइनें ॥ २४ ॥ बोलावुनि सुवासिनी पाळणां घातलें । नाम तें ठेविलें कर्ममेळा ॥ २५ ॥ बारसेंहि केलें तिनें आनंदानें । घातलें भोजन सर्व याती ॥ २६ ॥ चोखोबासी मास झाला बहिणीघरीं । विचारी अंतरीं चोखा तेव्हां ॥ २७ ॥ सोडोनियां आलों प्रपंचाचे भये । अंतरले पाय देवाजीचे ॥ २८ ॥ सद्गदित झालें तयाचें अंतर । प्रेम अश्रुनीर वाहे डोळा ॥ २९ ॥ येतो बाई आतां कृपा असो द्यावी । सांगोन पाठवी आपल्या हातें ॥ ३० ॥ आतां जातें वहिणी आपुल्या गांवाला । रागें भरतील मला धनी माझे ॥ ३१ ॥ ऐकूनियां बोले चोखोबाची कांता । नका जाऊं आतां बाई तुम्ही ॥ ३२ ॥ येऊं द्या घरधनी करतील बोळवण । काय मी उत्तीर्ण होऊं आतां ॥ ३३ ॥ काय काय आठवूं तुमचे उपकार । न पडे विसर जन्मोजन्मीं ॥ ३४ ॥ दादा माझा असे पांडुरंग भक्त । सदां त्याचें चित्त देवावरी ॥ ३५ ॥ मान्य करी वहिनी तयाचें वचन । तेणेंचि कल्याण असे तुमचे ॥ ३६ ॥ सद्गदित झालें दोघांचें अंतर । प्रेम अश्रुनीर वाहे डोळां ॥ ३७ ॥ सांभाळी हा आता माझा कर्ममेळा । येईल चोखामेळा घरीं आतां ॥ ३८ ॥ थांबा बाई आता शिवते मी चोळी । न लगे वनमाळी बोलतसे ॥ ३९ ॥ पुसोनि सर्वांसी गेला तो सांवळा । आला चोखामेळा घरालागीं ॥ ४० ॥ येवोनिया कांता वंदित चरण । दिलें उचलोन बाळ हातीं ॥ ४१ ॥ बाई आतां गेल्या भेटल्या वाटेसी । खंती या जिवासी वाटे त्याची ॥ ४२ ॥ सांगितला त्यासी सकळ वृत्तांत । सद्गतित चित्त चोखा झाला ॥ ४३ ॥ कैसि बाई येथें आले पांडुरंग । धन्य तुझें भाग्य भेटी झाली ॥ ४४ ॥ सद्गदित झालें दोघांचें अंतर । प्रेम अश्रुनीर वाहे डोळां ॥ ४५ ॥ भक्तांसी संकट पडों नेदी देव । घालीतसे धांव त्यांच्या काजा ॥ ४६ ॥ विष्णुदास नामा वंदी त्याचे चरण । वर्णितसे गुण वारंवार ॥ ४७ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नोंद दि: ........

# चोखामेळा चरित्र

—श्री **एकनाथ महाराज**

१ अमृतासी रोग स्वर्गी जाहला पाही । अमरनाथा तेही गोड नसे ॥ १ ॥
नारदातें प्रश्न करी अमरनाथ । शुद्ध हें अमृत कोठें होय ॥ २ ॥
सांगे तये वेळीं ऐका हे भूतळीं । सांगे नव्हाळी तुम्हांपाशीं ॥ ३ ॥
पंढरी वैकुंठ आहे भूमीवरी । पुंडलिकाचे द्वारीं देव उभा ॥ ४ ॥
अनाथाचा नाथ विटेवरी उभा । एकाजनार्दनी गाभा लावण्याचा ॥५॥

२ पंढरीची मात सांगे नारदमुनी । संतांचे कीर्तनीं नाचे देव ॥ १ ॥
नामाच्या गजरें नाचताती संत । सुरवरांचा तेथें काय पाड ॥ २ ॥
तिही लोका पाहतां ऐसें नाहीं कोठें । कैवल्याची पेठ पंढरी देखा ॥३॥
ऐकोनी अमरनाथ संतोषला मनीं । एकाजनार्दनी नारद सांगे ॥ ४ ॥

३ तयां ठायीं जातां शुद्ध होय अमृत । नारदें ही मात सांगितली ॥ १ ॥
तेव्हां एकादशी आली सोमवारी । विमान पंढरी उतरलें ॥ २ ॥
अमृताचें ताट घेउनी आला इंद्र । गर्जती सुरवर जयजयकारें ॥ ३ ॥
देव सुरवर आले पंढरीसी । नामा कीर्तनासी उभा असे ॥ ४ ॥
सुरवर देव बैसले समस्त । कीर्तनीं नाचत नामदेव ॥ ५ ॥
एकाजनार्दनी देव कीर्तनासी । सांडोनी स्वर्गासी इंद्रराव ॥ ६ ॥

४ ऐसा समुदाय चंद्रभागे तीरी । तेव्हां आपुले घरीं चोखा होता ॥ १ ॥
एकादशी व्रत करती दोघेंजण । उपवास जाग्रण निशीमाजी ॥ २ ॥
तीन प्रहर जाहले उपवास जाग्रण । चोखामेळा म्हणे स्त्रीसी तेव्हां ॥३॥
तुझिया घरासी येऊं पारण्यासी । सांगून मजसी गेला देव ॥ ४ ॥
एकाजनार्दनी चोखा करी करुणा । तेव्हां नारायणा जाणवलें ॥ ५ ॥

५ चोखामेळियाची ऐकोनी करुणा । चालिले भोजना देवराव ॥ १ ॥
नामदेवासहित अवघे गणगंधर्व इंद्रादिक देव चालियले ॥ २ ॥
जाउनी नारद सांगे चोखियासी । तुझिया घरासी येती देव ॥ ३ ॥
ऋद्धिसिद्धि आल्या चोखियाचे घरीं । जाहली ते सामोग्री भोजनाची ॥४॥

रुक्मिणी सहित आला पंढरीनिवास । चोखियाचे घरास आले वेगी ॥५॥
चोखामेळा गेला पुढें लोटांगणी । उचलोनी देवांनीं आलंगिला ॥ ६ ॥
एकाजनार्दनी ऐसा चोखियाचा भाव । जाणोनी आले देव भोजनासी ॥७॥

६ चोख्याचे अंगणीं बैसल्या पंगती । स्त्री ते वाढिती चोखियाची ॥ १ ॥
अमृताचें ताट इद्रें पुढें केलें । शुद्ध पाहिजे केलें नारायणा ॥ २ ॥
तेव्हां देवराव पाचारी चोखियासी । शुद्ध अमृतासी करी वेगी ॥ ३ ॥
चोखामेळा म्हणे काय हें अमृत । नामापुढें मात काय याची ॥ ४ ॥
अमृताचे ताट घेउनी आला इंद्र । हेतु गा पवित्र करी वेगी ॥ ५ ॥
चोखियाची स्त्री चोखा दोघेजण । शुद्ध अमृत तेणें केलें देखा ॥ ६ ॥
चोखियाच्या घरीं शुद्ध होय अमृत । एकाजनार्दनी मात काय सांगूं ॥७॥

७ बैसल्या पंगती चोखियाच्या अंगणीं । जेवी शारंगपाणी आनंदानें ॥१॥
नामदेवासहित अवघे गणगंधर्व । इंद्रादिक देव नारदमुनी ॥ २ ॥
चोखामेळा म्हणे दोन्ही जोडोनी कर । मज दुर्बळा पवित्र केलें तुम्हीं ॥३॥
यातीहीन मी अमंगळ महार । कृपा मजवर केली तुम्ही ॥ ४ ॥
पंढरीचे ब्राह्मण देखतील कोणही । बरें मजलागुनीं न पाहती जन ॥५॥
ऐसें ऐकोनियां हांसती सकळ । आनंदें गोपाळ हास्य करी ॥ ६ ॥
विडे देऊनिया देवें बोळविलें । इंद्रादिका गेले स्वस्थानासी ॥ ७ ॥
पंढरीचे ब्राह्मणी चोख्यासी छळिलें । तेंहीं संपादिलें नारायणें ॥ ८ ॥
एकाजनार्दनी ऐशी चोखियाची मात । जेवी पंढरीनाथ त्याचे घरीं ॥९॥

* * *

# श्रीसंत चोखोबा यांची आरती

ओंवाळूं आरती शुद्ध चोखामेळा ।
घेतां नाम चोखियाचे तुटे भवबंध ज्वाला ॥ १ ॥

शुद्ध एकादशी आंबा देवानें चोखीला ।
संतोषला देव जन्म चोखा पावला ॥ २ ॥

संत समुदाय चोखीयाचे घरीं ।
शुद्ध म्हणोनिया दहीं पीतसे हरि ॥ ३ ॥
स्वर्गी अमरनाथाचें अमृत नासलें ।
चोख्याचे करंगुळी शुद्ध अमृत झालें ॥ ४ ॥
समाधि महाद्वारीं दिली विठ्ठल चरणीं ।
ओंवाळती सत्यभामा राहि माता रुक्मिणी ॥ ५ ॥
जयांचिये अस्थि विठ्ठल विठ्ठल स्मरती ।
अखंड प्रेम भावें वंका तयासी वंदीती ॥ ६ ॥

ह. भ. प. श्री. **सिताराम दिगंबर सर्वगोड,**
( चोखामेळा पुजारी, पंढरपूरक्षेत्र यांचेकडून आलेली )

## –संत सोयराबाईचे अभंग–

१ अहो पंढरीच्या राया । दंडवत तुमच्या पाया ॥ १ ॥
तूंचि उदार त्रिभुवनीं । ऋद्धि सिद्धि तुझे चरणीं ॥ २ ॥
भुक्ति मुक्तीचा तूं दाता । मी तों काय वानूं आतां ॥ ३ ॥
बैसेन महाद्वारीं । म्हणे चोख्याची महारी ॥ ४ ॥

२ येई येई गरुडध्वजा । विटे सहित करीन पूजा ॥ १ ॥
धूप दीप पुष्पमाळा । तुज समर्पूं गोपाळा ॥ २ ॥
पुढें ठेवोनियां पान । वाढी कुटुंबी तें अन्न ॥ ३ ॥
तुम्हां योग्य नव्हे देवा । गोड करूनियां जेवा ॥ ४ ॥
विदुरा घरच्या पातळ कण्या । खासी मायबाप धन्या ॥ ५ ॥
द्रौपदीच्या भाजी पाना । तृप्ती झाली नारायणा ॥ ६ ॥
तैसी झाली येथें परी । म्हणे चोख्याची महारी ॥ ७ ॥

३ उपाधी भक्तांपाठीं । कां जगजेठी लाविली ॥ १ ॥
तोडा तोडा मायाजाळें । कृपाबळें आपुलिया ॥ २ ॥
नका पाहूं गुणदोष । पूर्वीची भाष सांभाळा ॥ ३ ॥
जगीं असुनी तूं बा हरी । म्हणे चोख्याची महारी ॥ ४ ॥

४ हीन मी काय वानूं देवा । तुम्ही केशवा उदार ॥ १ ॥
करा माझें समाधान । दाखवा चरण आपुलें ॥ २ ॥
लोटलेंसे महानदी । नाहीं शुद्धी देहाची ॥ ३ ॥
बुडत्यें काढावें बाहेरी । म्हणे चोख्याची महारी ॥ ४ ॥

५ नाहीं उरली वासना । तुम्हां नारायणा पाहतां ॥ १ ॥
उरला नाहीं भेदाभेद । झालें शुद्ध अंतर ॥ २ ॥
विटाळाचें होतें जाळें । तुटलें बळें नामाच्या ॥ ३ ॥
चौदेहाची सुटली दोरी । म्हणे चोख्याची महारी ॥ ४ ॥

६ अवघा रंग एक झाला । रंगी रंगला श्रीरंग ॥ १ ॥
मी तूं पण गेलें वायां । पाहतां पंढरीच्या राया ॥ २ ॥
नाहीं भेदाचें तें काम । पळोनी गेले क्रोध काम ॥ ३ ॥
देहीं असुनी तूं विदेही । सदा समाधिस्थ पाही ॥ ४ ॥
पाहते पाहणें गेलें दुरी । म्हणे चोख्याची महारी ॥ ५ ॥

७ देहासी विटाळ म्हणती सकळ । आत्मा तो निर्मळ शुद्ध बुद्ध ॥ १ ॥
देहींचा विटाळ देहींच जन्मला । सोंवळा तो झाला कवणधर्मे ॥ २ ॥
विटाळा वांचोनी उत्पत्तीचें स्थान । कोण देह निर्माण नाहीं जगी ॥३॥
म्हणुनी पांडुरंगा वानितसे थोरी । विटाळ देहांतरी वसतसे ॥ ४ ॥
देहाचा विटाळ देहीच निर्धारी । म्हणतसे महारी चोखियाची ॥ ५ ॥

८ माय तूं माउली अनाथाची देवा । धांवे देवाधिदेवा लवलाहे ॥ १ ॥
पतित पावन नाम गाजे त्रिभुवनीं । भक्तशिरोमणी तुम्ही देवा ॥ २ ॥
अनाथांचें धांवणें करणें चक्रपाणी । सकळ मुगुटमणी विठ्ठला तूं ॥३॥
मज अव्हेरितां कोण म्हणेल थोरी । म्हणतसे महारी चोखीयाची ॥४॥

९ शीण वाटतसे मना । नारायणा न पाहतां ॥ १ ॥
वाया आचार विचार । सदां मलीन अंतर ॥ २ ॥
सोंगाचें तें सोंग । दावी रंग कथेचा ॥ ३ ॥
परधनी सदा मन । वरी दावितसे डोलून ॥ ४ ॥
ऐसा नर तो दुराचारी । म्हणे चोख्याची महारी ॥ ५ ॥

१० जन हें आंधळे भुलले पैं वायां । विठ्ठल सखया वांचोनियां ॥ १ ॥
भुलली बापुडी पायीं तेणें बेडी । कोण तोडातोडी करील त्यांची ॥२॥
यमाची यातना होईल बा जेव्हां । सोडविल तेव्हां कोण त्यासी ॥ ३ ॥
याचलागी म्हणा रामकृष्ण हरी । म्हणतसे महारी चोखियाची ॥ ४ ॥

११ वाउगें घरदार वाउगा संसार । वाउगें शरीर नाशिवंत ॥ १ ॥
एक नाम सार वाउगा पसार । नामचि निर्धार तरती जन ॥ २ ॥
वाउग्या या गोष्टी वाउग्या कल्पना । वाउग्या ब्रह्मज्ञाना कोण पुसे ॥३॥
वाउग्या व्युत्पत्ती वाउग्या शब्द आटी । वाउग्या ज्ञान गोष्टी बोलून काई ॥४॥
वाउगें तें मन स्थीर नाहीं तरी । मग कैचा हरी मिळे तया ॥ ५ ॥
वाउगे ते बोल बोलणें तोंवरी । म्हणतसे महारी चोखियाची ॥ ६ ॥

१२ बैसोनी एकांती बोले गुजगोष्टी । घालोनियां मिठी चरणासी ॥ १ ॥
बहु दीस झाले वाटतसे खंती । केधवां भेटती बाई मज ॥ २ ॥
तुम्हासी तों चाड नाहीं आणिकांची । परी वासना आमुची अनिवार ॥३॥
सोयरा म्हणे चला जाऊं तेथवरी । गुजगोष्टी चारी बोलूं कांहीं ॥ ४ ॥

१३ सोयरा म्हणे पती । मनी आली बाइची खंती ॥ १ ॥
चोखा सोयरा कर्ममेळा । भेटूं आले त्या निर्मळा ॥ २ ॥
झाली निर्मळेची भेटी । सोयरा पायीं घाली मिठी ॥ ३ ॥
धन्य बाई मेहुणपुरी । म्हणे चोख्याची महारी ॥ ४ ॥

१४ दोघी बैसल्या सुखासनी । सोयरा न्याहाळीतसे नयनीं ॥ १ ॥
कृपाळुवा माझा बाप । विठ्ठल निर्मळ एकरूप ॥ २ ॥
अवघ्या सांगतां वृतांता । रडे चोखियाची कांता ॥ ३ ॥
विठ्ठल रुपाचिये थोरी । म्हणे चोखियाची महारी ॥ ४ ॥

१५ उपजता कर्ममेळा । वाचे विठ्ठल सांवळा ॥ १ ॥
विठ्ठल नामाचा गजर । वेगें धांवे रुक्मिणीवर ॥२ ॥
विठ्ठल रुक्मिणी । बारसे करी आनंदानी ॥ ३ ॥
करी साहित्य सामुग्री । म्हणे चोख्याची महारी ॥ ४ ॥

१६ निर्मळेसी करितां स्नान । कोटी प्रयाग समान ।। १ ।।
तेथें करितां अन्नदान । स्वयें तुष्टे नारायण ।। २ ।।
तेथें करितां प्रदक्षिणा । कोटि तीर्थें घडलीं जाणा ।। ३ ।।
ऐसी विख्यात मेहुणपुरी । म्हणे चोख्याची महारी ।। ४ ।।

१७ टाळ दिंडीचा गजर । विठ्ठल नामाचा उच्चार ।। १ ।।
दोष पळाले कपाटी । नाम उच्चारितां ओठी ।। २ ।।
योग यागादि साधनें । अवघियांसी येथें पेणें ।। ३ ।।
सुख नाहीं संसारी । म्हणे चोख्याची महारी ।। ४ ।।

१८ गर्जती नाचती आनंदें डोलती । सप्रेम फुंदती विठ्ठल नामें ।। १ ।।
तया सुखाचा पार न कळे ब्रह्मादिकां । पुंडलिकें देखा भुलविलें ।। २ ।।
नावडे वैकुंठ नावडे भुषण । नावडे आसन वसन कांहीं ।। ३ ।।
कीर्तनीं गजरी नाचतो श्रीहरी । म्हणतसे महारी चोखियाची ।। ४ ।।

१९ आनंद सोहळा आषाढी पंढरी । कीर्तन गजरी वाळुवंटी ।। १ ।।
होतो जयजयकार आनंद सोहळा । अमृत गळाला वैष्णवासी ।। २ ।।
नाठवे भावना देहाचा विसर । विठ्ठल उच्चार संतजनीं ।। ३ ।।
तेथें जीवें भावें प्रेमाची आरती । लोटांगणी जाती सोयरा भावें ।। ४ ।।

२० पंढरीचे ब्राह्मणें चोख्यासी छळीलें । तयालागीं केलें नवल देवें ।। १ ।।
सकळ समुदाव चोखियाचे घरीं । ऋद्धि सिद्धी द्वारीं तिष्ठताती ।। २ ।।
रंगमाळा सडे गुढीया तोरणें । आनंद कीर्तन वैष्णवाचे ।। ३ ।।
असंख्य ब्राह्मण बैसल्या पंगती । विमानी पाहती सुरवर ।। ४ ।।
तो सुख सोहळा दिवाळी दसरा । ओवाळी सोयरा चोखीयासी ।। ५ ।।

२१ अवघे सुखाचे सांगाती । दुःख होतां पळती आपोआप ।। १ ।।
भार्या पुत्र भगिनी माता आणि पिता । हे अवघे सर्वथा सुखाचेचि ।। २ ।।
इष्ट आणि मित्र स्वजन सोयरे । सुखाचे निर्धारें आप्तवर्ग ।। ३ ।।
अंतकाळीं कोणी नये बरोबरी । म्हणतसे महारी चोखियाची ।। ४ ।।

२२ माझें माझें म्हणुनी गुंतले हावभरी । वाया या संसारी मृगजळा ।। १ ।।
आपली आपण करा आठवण । संसार बंधन तोडा वेगी ।। २ ।।

नाम निज नौका विठ्ठल हें तारूं । भवाचा सागरू उतरील ॥ ३ ॥
हाचि पैं विश्वास धरावा अंतरी । म्हणतसे महारी चोखियाची ॥ ४ ॥

२३ पंच महा पातकी विश्वास घातकी । राम नामें सुखी विश्वजन ॥ १ ॥
महा पापराशी वाल्हा तो तारिला । उद्धार तो केला गणिकेचा ॥ २ ॥
पुत्राचिया नामें वैकुंठाची गती । अजामेळा मुक्ती हरीनामें ॥ ३ ॥
नामेंची तरले नर आणि नारी । म्हणतसे महारी चोखियाची ॥ ४ ॥

२४ कोण या पांगिळा होइल संसारा । कन्या पुत्र दारा त्यजोनियां ॥ १ ॥
कां हे गुंतले वायां मृगजळा । कां यांसी कंटाळा येईच ना ॥ २ ॥
कां हे नाठविती हरीनाम चित्तीं । येतां जातां फजिती किती होती ॥३॥
कां हे न धरिती संत समागम । कासयाचा भ्रम पडिला यांसी ॥ ४ ॥
स्वप्नाचीये परी गुंतले नरनारी । म्हणतसें महारी चोखियाची ॥ ५ ॥

२५ आमची तो दशा विपरीत झाली । कोण आम्हां घाली पोटामध्यें ॥ १ ॥
आमचें पालन करील बा कोण । तुजविग जाण दुजें आतां ॥ २ ॥
कळेल तें करा तुमचे उचित । माझी तो नित निवेंदिली ॥ ३ ॥
सोयरा म्हणे माझा जीवप्राण तुम्ही । आणिक तो आम्ही कोठें जावें ॥४॥

२६ जें तुम्हां कळे तें करा गोमटें । वरें कां वोखटे गोड दिसे ॥ १ ॥
मी तो झालें बोलोनी उतराई । तुमचिये पायीं समर्पिलें ॥ २ ॥
होता जो वृत्तांत माझिये जीवींचा । बोलियेला वाचा तुम्हांपुढें ॥ ३ ।
सोयरा म्हणे माझें सकळ गणगोत । तुंचि माझें हित करी देवा ॥ ४ ॥

२७ येई वो विठ्ठले येई लवकरी । धांवे तूं सत्वरी मजलागी ॥ १ ॥
आमुचा विचार आतां काय देवा । सांभाळी केशवा मायबापा ॥ २ ॥
आतां कवणाची पाहूं मी वास । अवघेंचि वोस दिसतसे ॥ ३ ॥
सोयरा म्हणे अहो पंढरीच्या राया । आमुची ती दया येऊं द्यावी ॥ ४ ॥

२८ माझें मन तुमचें चरणी । तूंचि माझा देवा धणी ॥ १ ॥
धरणें घेऊनी दारांत । बैसलेंसे नाम गात ॥ २ ॥
दुजा धंदा कांहीं नेणें । तुमचें कृपेचें पोसणें ॥ ३ ॥

द्वारीं बैसोनी हांका मारी । म्हणे चोखयाची महारी ॥ ४ ॥

२९ कां बा उदास मज केलें । कोण म्हणे तुम्हां भलें ॥ १ ॥
आम्ही बैसलोंसें दारी । दे दे म्हणोनी मागतों हरि ॥ २ ॥
घेऊनी बैसलासी बहुतांचे । गोड कैसें तुम्हां वाटे ॥ ३ ॥
ही नीत नव्हे बरी । म्हणे चोखियाची महारी ॥ ४ ॥

३० किती किती बोलूं देवा । किती करूं आतां हेवा ॥ १ ॥
बहु चाळवणा तूं होसी । नाहीं कां रे म्हणे मजसी ॥ २ ॥
आतां न धरी तुमची भीड । मज नाहीं दुजी चाड ॥ ३ ॥
किती बोलूं देवा । आतां राग न धरावा ॥ ४ ॥
धरणें घेतिलें तुमचे द्वारी । म्हणे चोखयाची महारी ॥ ५ ॥

३१ किती शिणताती प्रपंच परमार्थी । परी न घडे सर्वथा हित कोणा ॥ १ ॥
न घडे प्रपंच न घडे परमार्थ । न घडेचि स्वार्थ दोन्हीं विषी ॥ २ ॥
एकाची एकास न पडेचि गांठी । तेणें होय कष्टी सुखदुःखे ॥ ३ ॥
सोयरा चोखियाची म्हणे पंढरीराया । दंडवत पाया तुमचिया ॥ ४ ॥

३२ सलगीनें बहु बोलिलें उत्तर । परी तुम्ही उदार मायबाप ॥ १ ॥
उदार तों तुम्ही तिही लोकि कीर्ति । म्हणोनी कमळापती शरण आलें ॥ २ ॥
रंजले गांजले पोकारिती धांवा । त्यांच्या धांवण्यासी धांवा मायबापा ॥ ३ ॥
सोयरा म्हणोन दंडवत घाली । तूं माय माउली पांडुरंगा ॥ ४ ॥

३३ आमुचे सुख दुःख कोण दुजा वारी । तुम्हीच श्रीहरि मायबाप ॥ १ ॥
तुमच्या उच्छिष्टाची धरोनियां आस । बैसलें रात्रं-दिवस धरणें करी ॥ २ ॥
परी तुम्हां नये आमुची करूणा । केधवां येईल मना तुमचिया ॥ ३ ॥
काम क्रोध लोभ मदमत्सर वैरी । हे झडकरी वारी मायबापा ॥ ४ ॥
म्हणोनी धरिलें तुमचे पदरा । म्हणतसे सोयरा चोखियाची ॥ ५ ॥

३४ शिणल्या भागल्यांचा तूंचि विसावा । धांवें तूं केशवा मायबापा ॥ १ ॥
किती किती मन आवरोनी धरूं । परी न सुचे विचारू काय करूं ॥२॥
तुम्ही तंव समर्थ आपुल्याच भारें । आमुचें खोटें खरें काय जाणा ॥ ३ ॥
मी तो बैसलें तुमचिये द्वारीं । म्हणतसे महारी चोखियाची ॥ ४ ॥

३५ संतासी तो खूण बाणली तुमची । तरी कां आमुची सांडी केली ॥१॥
काय साचपण मानूं आतां देवा । न कळे हा गोंवा उगवा कधीं ॥२॥
रात्रंदिवस भ्रमलें हें मन । नव्हे समाधान काय करूं ॥ ३ ॥
सोयरा म्हणे अहो पंढरीनिवासा । लवकरी फांसा तोडा आतां ॥ ४ ॥

३६ हीन दीन म्हणोनी कां गा मोकलिलें । परी म्यां धरिलें पदरीं तुमच्या ॥१॥
आतां मोकलितां नव्हे नित बरी । थोग साजे थोरी थोरपणें ॥ २ ॥
शरण आलिया दावितसां पाठी । काय घोर गोष्टी वानूं देवा ॥ ३ ॥
सोयरा म्हणे अहो पंढरीनिवासा । तुमचा तो ठसा त्रिभुवनीं ॥ ४ ॥

३७ नामेंचि तरले नर आणि नारी । तरले दुराचारी हरिनामें ॥ १ ॥
पाहा अनुभव आपले अंतरीं । नामेंचि उद्धरी जडजीवां ॥ २ ॥
नामेंचि भुक्ति नामेंचि मुक्ति । नामेंचि शांती सुखदुःख ॥ ३ ॥
नामा परते सार नाहीं हो निर्धारी । म्हणतसे महारी चोखियाची ॥ ४ ॥

३८ नामाचा भरंवसा मानिलासे सार । उतरले पार भवनदी ॥ १ ॥
नाम हें सोपें नाम हें सोपें । नाम हें सोपें मुखीं गातां ॥ २ ॥
नामाची आवडी सदां सर्वकाळ । नाहीं काळ वेळ नाम गातां ॥ ३ ॥
नामेंचि जन तरती संसारी । म्हणतसे महारी चोखियाची ॥ ४ ॥

३९ नामाचें चिंतन करा सर्वकाळ । नाहीं काळ वेळ नामालागीं ॥ १ ॥
सुलभ हें सोपें नाम आठवितां । हरि हरि म्हणता मोक्षमुक्ती ॥ २ ॥
सायासाचें नाहीं येथें हें साधन । नामाचें चिंतन करा सुखें ॥ ३ ॥
नामाचें सामर्थ्य जपतां श्रीहरी । म्हणतसे महारी चोखियाची ॥ ४ ॥

४० आणिक देवाचें न करा साधन । वायां होय शीण आदि अंतीं ॥ १ ॥
आपुलिया पोटा आणिकां पीडिती । ते काय पुरविती मन इच्छा ॥ २ ॥
रीटी सुठी लागी पीडिताती जगा । हेंचि त्यांचे अंगा देवपणा ॥ ३ ॥
म्हणोनी तयांचे नका पडूं भरी । म्हणतसे महारी चोखियाची ॥ ४ ॥

४१ नामाचें चिंतन अखंड जया वाचे । हेंचि साधनाचें सार एक ॥ १ ॥
मागिल परीहार पुढें बारे शिण । नाम बीज खूण सांगितली ॥ २ ॥

अवघ्या उपाधि तुटताती नामें । भाविकांसी वर्म सोपें हेंचि ॥ ३ ॥
आणिक नका पडूं गव्राळाचे भरी । म्हणतसे महारी चोखियाची ॥ ४ ॥

४२ नामेंचि पावन होती जगीं जाण । नाम सुलभ म्हणा विठोबाचें ॥ १ ॥
संसार बंधनें नामेंचि तुटती । भुक्ति आणि मुक्ति नामा पासी ॥ २ ॥
नाम हे जपतां पाप ताप जाय । अनुभव हा आहे जनामाजीं ॥ ३ ॥
नामाचा गजर वाचे जो उच्चारी । म्हणतसे महारी चोखियाची ॥ ४ ॥

४३ सदां सर्वकाळ नामाचा छंद । रामकृष्ण गोविंद जपे सदां ॥ १ ॥
अखंड वाचेसि नाहीं पैं खंडण । नाम नारायण सुलभ हें ॥ २ ॥
सुखदुःख कांहीं न पडे आघात । होय मन शांत जपतां नाम ॥ ३ ॥
सोयरा म्हणे मज आलीसे प्रचित । नामेंचि पतित उद्धरती ॥ ४ ॥

४४ सुखाचें हें नाम आवडीनें गावें । वाचें आळवावे विठोबासी ॥ १ ॥
संसार सुखाचा होईल निर्धार । नामाचा गजर सर्वकाळ ॥ २ ॥
काम क्रोधांचे न चलेचि कांहीं । आशा मनशा पाहीं भूर होती ॥ ३ ॥
आवडी धरोनी वाचें म्हणे हरि हरि । म्हणतसे महारी चोखियाची ॥ ४ ॥

४५ नवल पाहा नामाचें विंदान । पातकी पावन इहलोकीं ॥ १ ॥
कलियुगामाजीं सोपें हें साधन । वाचें रामकृष्ण जपे सदा ॥ २ ॥
भवसागरंत नाम निज नौका । रामकृष्ण सखा उच्चारितां ॥ ३ ॥
म्हणोनी आळस नको करूं संसारीं । म्हणतसे महारी चोखियाची ॥४॥

४६ सुलभ सोपें वाचे नाम गातां । पापाच्या चळथा पळती पुढें ॥ १ ॥
वाचे हरी हरी जो कोणी उच्चारी । नर अथवा नारी पवित्र ते ॥ २ ॥
जात वित गोत नको हा विचार । हरिनाम सार कलिमाजीं ॥ ३ ॥
सोयरा म्हणे मज नामाची आवडी । जाय देशोधडी कळिकाळ ॥ ४ ॥

४७ जयाचिये वाचे विठोबाचें नाम । तयाचा तो जन्म सफळचि ॥ १ ॥
तयासी काचणी नाहीं वा जाचणी । यम पायवणी वंदी त्याची ॥ २ ॥
हेंचि निजसार नामाचा उच्चार । मंत्र हा निर्धार सुलभचि ॥ ३ ॥
सोयरा म्हणे पावन हें नाम । जपतां सुखधाम वैकुंठीचें ॥ ४ ॥

४८ कळिकाळ कापे नाम उच्चारितां । विठ्ठल म्हणतां कार्य सिद्धी ॥ १ ॥
त्रिअक्षरी जप सुलभ सोपारा । वाचें तो उच्चारा सर्व काळ ॥ २ ॥
भवताप श्रम हरे भवव्यथा । आन नका पंथा जाऊं कोणी ॥ ३ ॥
नामाचा विश्वास दृढ धरा अंतरीं । म्हणतसे महारी चोखियाची ॥ ४ ॥

४९ किती हें सुख मानिती संसाराचें । काय हें साचें मृगजळ ॥ १ ॥
अभ्रीची छाया काय साच खरी । तैसीच हे परी संसाराची ॥ २ ॥
मी आणि माझें वागविती भार पूढील । विचार न करतां ॥ ३ ॥
कां हे गुंतले स्त्रीपुत्रधना । कांहीं वासना न सुटे यांची ॥ ४ ॥
सोयरा म्हणे अंतीं कोण सोडंवील । फजिती होईल जन्मोजन्मीं ॥ ५ ॥

५० किती हे मरती किती हे रडती । कितिक हांसती आपआपणा ॥ १ ॥
पाहातां विचार काय हें खरें । खोट्या लागी झुरे प्राणी देखा ॥ २ ॥
मरती ते काय रडती ते काय । हांसती ते काय कवण कवणा ॥ ३ ॥
कवण तो मेला कवण तो राहिला । हांसती रडती कवणाला न कळे कांहीं ॥४
सोयरा म्हणे याचें नवल वाटतें । परि नाठविते देवा कोणी ॥ ५ ॥

५१ पंच हीं भूतें अवघा त्यांचा खेळ । आत्मा तो निर्मळ शुद्ध आहे ॥ १ ॥
तेथें मरतें तें कोण राहते तें कोण । जयाचें कारण तोचि जाणे ॥ २ ॥
वायाचि वोझें घेतीं आपुलातें शिरीं । वाउगें हांव भरी होती वाया ॥ ३ ॥
सोयरा म्हणे यांचें वाटतें नवल । न कळे कांहीं वोल परमार्थाची ॥ ४ ॥

५२ देखोनी आंधळे कां बा जन होती । न कळे यां गति मजलागीं ॥ १ ॥
एकातें मरतां आपणचि देखती । तयासी रडती आपणचि ॥ २ ॥
हा कैसा नवलाव न कळे यांचा भाव । कोण घाव डाव आम्हांलागीं ॥३॥
अवघेचि मज नवलाची परी । म्हणतसे महारीं चोखियाची ॥ ४ ॥

५३ याचिये संगती अपायचि मोठा । दुःखाचा शेलवटा भागा आला ॥१॥
आतां पुरे हरि आतां पुरे हरि । सोडवी निर्धारी यांतोनिया ॥ २ ॥
बहुतचि खंती करितसे मन । दाखवा चरण मजलागीं ॥ ३ ॥
गहिंवर नावरे उदास अंतरी । म्हणतसे महारी चोखियाची ॥ ४ ॥

५४ कोण दुजा वारी शीण । तुम्हां विण उगला ॥ १ ॥
माय बाप बहिण आई । दुजें तुजविण नाहीं ॥ २ ॥
घेतिलें पदरीं । आतां न टाकावें दुरी ॥ ३ ॥
अवघी माझी वासना । पुरवावी नारायणा ॥ ४ ॥
आतां नका धरूं दुरी । म्हणे चोखियाची महारी ॥ ५ ॥

५५ बहुतां परी वानितसे देवा । न कळे केशवा कांहीं मज ॥ १ ॥
सेवा कैसी करूं काय ध्यान धरूं । न कळे साचार कांहीं मज ॥ २ ॥
कैसी ती भक्ति करावी देवा । न कळे कांहीं हेवा दुजा मज ॥ ३ ॥
तुमच्या उच्छिष्टाची आस निर्धारी । म्हणतसे म्हारी चोखियाची ॥ ४ ॥

५६ उदारा पंढरिराया नको अंत पाहूं । कोठ वरि मी पाहूं वाट तुझी ॥ १ ॥
माय तूं माउली जीवींचा जिव्हाळा । पुरवावा ळळा माय बाप ॥ २ ॥
सर्वांपरी उणें दिसतें कठिण । आतां नका शीण मानूं माझा ॥ ३ ॥
निवांतचि ठेवा तुमचिये दारी । म्हणतसे महारी चोखियाची ॥ ४ ॥

५७ आजि माझा सर्व पुरवा नवस । देखिलें पायांस विठोबाच्या ॥ १ ॥
अनंता जन्माचें फिटलें सांकडें । कोंदाटलें पुढें रुप त्याचें ॥ २ ॥
आठवीत होतें गोमटी पाऊलें । तीचि देखियेली विटेवरी ॥ ३ ॥
आनंद नसमाय मनाचे अंतरीं । म्हणतसे महारी चोखियाची ॥ ४ ॥

५८ चोखा बैसतां समाधीसी ॥ निर्मळा आली पंढरीसी ॥ १ ॥
पाहोनी आनंद सोहळा । म्हणे विठ्ठल दयाळा ॥ २ ॥
चोखा मेळविला रुपीं । माझी आतां कोण गती ॥ ३ ॥
देव बैसोनी निकटी । निर्मळासी सांगे गोष्टी ॥ ४ ॥
एसें देखोनिया नयनीं । सोयरा मिठी घाली चरणीं ॥ ५ ॥

५९ ऐसा आनंद सोहळा । निर्मळा पाहे आपुले डोळां ॥ १ ॥
आनंद न माय गगनीं । वैष्णव नाचती रंगणी ॥ २ ॥
जेथें नाहीं भेदाभेद । अवघा भरला गोविंद ॥ ३ ॥
तया सुखाची सुखराशी । बोळली ती निर्मळेसी ॥ ४ ॥
सोयरा देखोनी आनंदली । वेळोवेळां विठु न्याहाळी ॥ ५ ॥

६० ऐसा आनंदांत एक मासवरी । राहिली निर्धारी पंढरीये ॥ १ ॥
नित्य जावोनियां चंद्रभागेस्नान । घाली लोटांगण पुंडलिका ॥ २ ॥
क्षेत्र प्रदक्षिणा नामाच्या गजरी । येवोनी महाद्वारी हरि वंदी ॥ ३ ॥
सोयरा म्हणे ऐसा सारोनिया नेम । वाचें गाय नाम विठोबाचे ॥ ४ ॥

६१ चोखा निर्मळा एकरुप । दरुशनें हरे ताप ॥ १ ॥
वाचे विठ्ठल नाम छंद । नाहीं भेद उभयतां ॥ २ ॥
तीर्थ उत्तम निर्मळा । वाहे भागीरथी जळा ॥ ३ ॥
ऐसी तारक मेहुणपुरी । म्हणे चोख्याची महारी ॥ ४ ॥

६२ पुसोनी सर्वांसी निर्मळा निघाली । येउनी पोंहचली मेहुणपुरी ॥ १ ॥
सर्वकाळ छंद वाचें नाम गाय । आठवीत आहे चोखियासी ॥ २ ॥
म्हणे विठोबा दयाळा मागणें आहे तुज । तुझा भक्तराज सांभाळी तूं ॥३॥
सोयरा म्हणे ऐसा सुखाचा सोहळा । भोगी अवलीळा निर्मळा ती ॥ ४ ॥

# संत बंका महार यांचे अभंग

१ चरण मिरवले विटेवरी दोनीं । ध्यातसे ध्यानीं सदाशिव ॥ १ ॥
तो हा पंढरीराव कर दोनीं कटीं । उभा असे तटीं भीवरेच्या ॥ २ ॥
मुगुट कुंडलें श्रीमुख शोभलें । ध्यानीं मिरविलें योगियाच्या ॥ ३ ॥
बंका म्हणे सर्व सिद्धीचा दातार । भक्तां अभयकर देत असे ॥ ४ ॥

२ प्रेमाचा पुतळा विठोबा सांवळा । उभा तो देखिला भीमातटीं ॥ १ ॥
कर कटावरी पाउलें साजिरी । शंख चक्र करीं मिरवतसे ॥ २ ॥
योगियांचा राणा गोपी मोहन कान्हा । भक्तीचा आंदणा घरोघरीं ॥ ३॥
बंका म्हणे ऐसा कृपेचा कोवळा । पाळी भक्तळा प्रेमासाठीं ॥ ४ ॥

३ सांवळें सगुण उभें कर कटीं । मूर्ति हे गोमटी बाळरूप ॥ १ ॥
शंख चक्र करीं ते कटावरी । पीतांबर धारी चतुर्भुज ॥ २ ॥
लावण्याचा गाभा श्रीमुख चांगलें । श्रीवत्स शोभलें हृदयावरी ॥ ३ ॥
बंका म्हणे धन्य देवांचा हा देव । वैकुंठीचा राव पंढरीये ॥ ४ ॥

४ जें सुख ऐकतां मन तें निवांत । तेचि मूर्तिमंत विटेवरी ॥ १ ॥
साजिरें गोजिरें श्रीमुख चांगलें । कर मिरवले कटावरी ॥ २ ॥
समचरण दोनी शोभती पाउलें । ध्यान मिरवलें पंढरीये ॥ ३ ॥
आनंदी आनंद सुखाचा सुखराशी । घाली चरणासी बंका मिठी ॥ ४ ॥

५ आधीच निर्मळ वदन सोज्वळ । विठोबा दयाळू पंढरीये ॥ १ ॥
समचरण गोड गोजिरीं पाउलें । कर मिरवले कटावरी ॥ २ ॥
ध्यान दिगंबर तुळशीमाळा गळां । पांघुरला पिंवळा पीतांबर ॥ ३ ॥
बंका म्हणे सर्व सुखाचें आगर । तो हा विटेवर विठ्ठल देवो ॥ ४ ॥

६ न कळे वो मात्र आगमा निगमा । जयाचा महिमा श्रुति शास्त्रां ॥ १ ॥
तो म्यां डोळे भरी पाहिला श्रीहरी । भीवरेचे तिरीं विठ्ठलरूप ॥ २ ॥
सुखाचा सागर भक्तांचा कैवारी । ब्रीद चराचरीं गाजतसे ॥ ३ ॥
बंका म्हणे ऐसा जयाचा महिमा । सुलभ तो आम्हां भाविकांसी ॥ ४ ॥

७ येणें जाणें दोनी खुंटले मारग । अवघा केला त्याग इंद्रियांचा ॥ १ ॥
एक धरिला मनीं पंढरीचा राणा । वेदशास्त्र पुराणां अकळ तो ॥ २ ॥
आगमाची आटी निगमा न कळे । बहुत शीणले वाखाणितां ॥ ३ ॥
बंका म्हणे तो हा पहा विटेवरी । पाउलें गोजिरीं कर कटीं ॥ ४ ॥

८ संसार दुःखें पीडिलों दातारा । किती येरझारा जन्म मरण ॥ १ ॥
सोडवी गा देवा भवाची काचणी । जातो आडरानीं विषयसंगें ॥ २ ॥
भवाचिया डोहीं बुडतों वेळोवेळां । कां नये कळवळा तुज देवा ॥ ३ ॥
बंका म्हणे तुम्ही जरी मोकलिलें । कवणातें वहिलें शरण जाऊं ॥ ४ ॥

९ आपुलिया ब्रीदा आपण सांभाळी । तूंचि माझा बळी मायबाप ॥ १ ॥
तुम्हांविण कोणा जाऊं मी शरण । कां हो अभिमान नये माझा ॥ २ ॥
हीन याती दीन पतीत आगळा । म्हणोनि कळवळा नये माझा ॥ ३ ॥
बंका म्हणे अहो पंढरिनिवासा । तुजविण आशा दुजी नाहीं ॥ ४ ॥

१० कासया गा मज घातिलें संसारा । पाडिलें विसरा तुमच्या नामा ॥ १ ॥
कोठवरी हांव करितों दिवस राती । गुंतलोंसें भ्रांती माया मोहें ॥ २ ॥

न कळे उकला करितां येरझारी । माझा मीच वैरी झालों दिसे ॥ ३ ॥
बंका म्हणे सुख संताचे संगती । ती मज विश्रांती द्यावी देवा ॥ ४ ॥

११ उपाधीच्या भेणें आलोंसें शरण । काया वाचा मनें सहित देवा ॥ १ ॥
तूं माझा मायबाप सकळ वित्त गोत । तूं माझें गणगोत पंढरिराया ॥ २ ॥
तूं माझी साउली तूं माझी गाउली । प्रेमाची माउली तूंचि माझी ॥ ३ ॥
बंका म्हणे तुज विकिला जीव प्राण । काया वाचा मन सत्य देवा ॥४॥

१२ नाहीं प्रेम भाव न कळे मान्यता । सलगी बोलतां सुख वाटे ॥ १ ॥
अखंड नामावळी गाईन वेळोवेळीं । नित्य ती दिवाळी आम्हां घरीं ॥ २ ॥
संत समागम वैष्णवांचा हाट । पंढरीये पेठ दुमदुमली ॥ ३ ॥
बंका म्हणे सुख तयाचे संगती । बैसेन पंगती हरिदासा ॥ ४ ॥

१३ भांबावोनी प्राणी संसारी गुंतले । माझें म्हणोनि श्रमले भव नदी ॥ १ ॥
नामाची सांगडी न वांधिती कोणी । चौऱ्यांशीची खाणी भोगिताती ॥२॥
आपुला आपण झाला असे वैरी । हिंडे दारोदारी भिक मागा ॥ ३ ॥
बंका म्हणे नाम सांडोनी विठ्ठल । वाचे बोलती बोल वाउगाची ॥ ४ ॥

१४ न कळे योग याग तपादि साधनें । नेणेंची लक्षण यांचें कांहीं ॥ १ ॥
सुलभ सोपारे नाम आठवितां । न पडेची गुंता कर्म धर्म ॥ २ ॥
विधि निषेधाचें न घेवो ओझें । आणीक सहजें न कळे कांहीं ॥ ३ ॥
बंका म्हणे मज नामाचा आधार । उतरेन पार भवनदी ॥ ४ ॥

१५ मनाचेनि मनें केला हा निर्धार । भवसिंधुपार तरावया ॥ १ ॥
नामची चांगलें नामची चांगलें । जडजीव उद्धरले नेणों किती ॥ २ ॥
नाम निज नौका संताची संगती । हेचि श्रीपती द्यावी मज ॥ ३ ॥
बंका म्हणे देवा पुरवावी आळी । देईन जीव बळी संतांपायीं ॥ ४ ॥

१६ हीन याती पतीत अपराधी दुर्बळ । परि तुम्हीं दयाळ दीनानाथ ॥ १ ॥
अनाथा कैवारी त्रिभुवनीं ठसा । नामाचा भरंवसा त्रिभुवनीं ॥ २ ॥
नाम घेतां कोणी न दिसे वायां गेला । ऐसाची गमला भावबळें ॥ ३ ॥
बंका म्हणे सर्वज्ञा विठोबा दयाळा । पुरवावा लळा हाची माझा ॥ ४ ॥

१७ भोळ्या भाविकांसी सांपडलें वर्म । सुलभ हें नाम विठोबाचें ॥ १ ॥
भवाचा उतार हरिनाम सांगडी । जाऊं पैलथडी हेळामात्रें ॥ २ ॥
आनंद सोहळा हरिकथा माउली । भाविकां बोळली प्रेम पान्हा ॥ ३ ॥
वंका म्हणे माझा हाची निर्धार । येणें संसार देशधडी ॥ ४ ॥

१८ ज्ञानियाचा राजा ज्ञानेश्वर माउली । खेचरा बोळ्ली कृपासिंधु ॥ १ ॥
ज्ञानदेवा चरणीं खेचर शरण । नामदेवा पूर्ण कृपा केली ॥ २ ॥
नामदेवें हात चोखियाचे शिरी । विठ्ठल ती अक्षरी उपदेशिलें ॥ ३ ॥
बंका म्हणे माझा चोखा गुरू माउली । तयाचे पाउलीं लोटांगण ॥ ४ ॥

१९ चोखा चोखट निर्मळ । तया अंगी नाहीं मळ ॥ १ ॥
चोखा सुखाचा सागर । चोखा भक्तीचा आगर ॥ २ ॥
चोखा प्रेमाची माउली । चोखा कृपेची साउली ॥ ३ ॥
चोखा मनाचें मोहन । बंका घाली लोटांगण ॥ ४ ॥

२० सुखाचा सागर चोखा हा निर्धार । काय मी पामर गुण वानूं ॥ १ ॥
धन्य प्रेम पान्हा पाजूनियां मातें। केलें असे सरतें आपणा माजी ॥ २ ॥
आनंदी आनंद दाविलासे डोळां । दिली जीवनकळा माझी मज ॥ ३ ॥
बंका म्हणे माझी प्रेमाची माउली । कृपेची साउली केली मज ॥ ४ ॥

२१ एक एकादशी जरी होय पंढरीसी । सुकृताच्या राशी ब्रह्म नेणें ॥ १ ॥
चंद्रभागे तीरी चतुर्भुज नरनारी । तेथें उभा हरी पंढरीराव ॥ २ ॥
परतोनि मागुता ऐसा कई होसी । जाउनी पंढरीसी पाहे डोळां ॥ ३ ॥
तुझे देह गेह ऐसें पैं न म्हण । साधीं हें निधान पांडुरंग ॥ ४ ॥
पुनरपि संसारा न येसी मागुता । आणिक सर्वथा ऐसा नाहीं ॥ ५ ॥
बंका म्हणे पहाल भजाल देही । तापत्रय गेलें सर्वेही पांडुरंगीं ॥ ६ ॥

२२ पांडुरंगावाचोनी दुजा कोण सखा । निर्वाणीचा देखा मायबाप ॥ १ ॥
तारीतसे एका नावासाठीं जगा । ऐसा हा पैं बा श्रेष्टाचार ॥ २ ॥
गणिका गजेंद्र यासी उद्धरिलें । प्रत्यक्ष तारिलें अजामेळा ॥ ३ ॥
बंका म्हणे ऐसा आहे हा भरंवसा । मज तंव सर्वेशा विठोबाचा ॥ ४ ॥

२३ भक्तांची आवडी धरोनी हृषीकेशी । उभा पंढरीसी विटेवरी ॥ १ ॥
नामदेवासाठीं दूध पिये वाटी । मिराबाइचें घोटी विष स्वयें ॥ २ ॥
जनीच्चिया संगें दळूं कांडूं लागे । चोखामेळ्या संगें ढोरें वोढी ॥ ३ ॥
बंका म्हणे ऐसा भक्तांचा आळुका । ज्ञानियाची देखा भिंत वोढी ॥ ४ ॥

२४ पहा हो नवल गोरियाचे घरीं । कुल्लाळ भीतरी स्वयें झाला ॥ १ ॥
त्रैलोकीं गमन तें झालें गाढव । आपुलें वैभव परतें ठेवी । २ ॥
गोणी भरोनियां स्वयें आणी हरी । त्याचें साहित्य करी रखुमाई ॥ ३ ॥
बंका म्हणे ऐसी आवडी भक्ताची । बोलतां वेदांची वाचा मौन्य ॥ ४ ॥

२५ कोण भाग्य तया सेना न्हावियाचें । नीच काम त्याचें स्वयें करी ॥१॥
घेउनी धोकटी हजामत करी । आरसा दावी करीं बादशहासी ॥ २ ॥
कसाबाचे घरी विकीतसे मांस । राका मेहल्यास हुंडी भरी ॥ ३ ॥
बंका म्हणे ज्याचे पुराणी पवाडे । तो भक्त सांकडें वारीतसे ॥ ४ ॥

२६ आपुल्या भक्तांचा धरोनि अभिमान । सगुण निर्गुण रुप धरी ॥ १ ॥
जयाची वासना तेची पुरवीत । उभा राहे तिष्ठत बळीचे द्वारीं ॥ २ ॥
विदुराचे घरीं आवडी खाय कण्या । धांवतसे धांवण्या भाजी पाना ॥३॥
बंका म्हणे अंब ऋषी कारणें । दहा जन्म घेणें गर्भवास ॥ ४ ॥

२७ गोकुळीं लाघव गौळियांचे घरीं । रांगता श्रीहरी स्वयें झाला ॥ १ ॥
दही दूध लोणी चोरोनियां खाये : नाहीं म्हणोनी वाहे आण मातें ॥२॥
गाई चारी सुखें करीतसे काला । ठकवी देवाला ब्रह्मादिकां ॥ ३ ॥
बंका म्हणे ऐसा लाघवी सूत्र धारी । कीर्ति चराचरी वाढलीसे ॥ ४ ॥

२८ वासना उडाली तृष्णा मावळली । कल्पना गळाली अहंकृती ॥ १ ॥
तोची भक्त जाणा दया शांती वसे । काम क्रोध फासे न बांधी त्या ॥ २ ॥
मोह ममतेचे तोडोनियां जाळें । केलें निजबळें तृणप्राय ॥ ३ ॥
बंका म्हणे तोची प्राणाचाही प्राण । आणीक प्रमाण नाहीं मज ॥ ४ ॥

२९ चोखियाचे घरीं चोखियाची कांता । सोयरा तत्वतां नाम जीचें ॥ १ ॥
बहु दिवस करी प्रपंच कारण । परि नव्हे संतान तिजलागी ॥ २ ॥

बैसोनिया एकांतीं आठवी पंढरीराणा। म्हणे कां वो नारायणा विसरलासी ।३।
आमुचीया कुळी नाही वो संतान । तेणें वाटे शीण मना माझ्या ॥ ४ ॥
ऐकोनी पंढरीराव हांसलासे मनीं । म्हणे ऐकें रुक्मिणी गोष्ठ एक ॥ ५ ॥
चोखियाचे कांता चिंताक्रांत मनीं । संसारी असोनी उदास वृती ॥ ६ ॥
पोटीं नाहीं मूल करी तळमळ । बंका म्हणे विठ्ठल काय करी ॥ ७ ॥

३० चोखियाचे घरा आले नारायण । होउनी ब्राह्मण दीनें वृद्ध ॥ १ ॥
हातांमध्यें कांठी सांवळा जगजेठी । तुळसीमाळा कंठी बुका भाळी ॥२॥
कांपत कांपत जातसे चांचरी । मोठा नट धारी घरघेणा ॥ ३ ॥
चोखियाचे घर पुसतसे लोकां । वैकुंठीचा सखा भक्त काजा ॥ ४ ॥
दुरोनियां पाहे चोख्याची अंतुरी । तव तो आला द्वारीं चोखियाच्या ॥५॥
हांसत कांपत मुखानें बोलत । लाळही गळत मुखावाटे ॥ ६ ॥
बंका म्हणे ऐसा पंढरीचा राणा । देखिला नयना सोयराई ॥ ७ ॥

३१ तुळसी वृंदावनी उभा तो ब्राह्मण । पुसे घरीं कोण आहे बाई ॥ १ ॥
कोणाचें हें घर दिसते साजिरें । मुलें आणि लेकुरें काय आहे ॥ २ ॥
ऐकोनि उत्तर चोखियाची कांता । प्रेमजळ नेत्रां भरियेले ॥ ३ ॥
म्हणे घरधण्यासी विठोबाचा छंद । आठविती गोविंद रात्रं दिवस ॥ ४ ॥
संसारी सुख नाहीं अणुमात्र । सदां अहोरात्र हाय हाय ॥ ५॥
पोटी ही संतान न देखेची कांहीं । वांया जन्म पाही झाला माझा ॥ ६ ॥
बंका म्हणे ऐसी बोलोनीयां मात । घाली दंडवत ब्राह्मणासी ॥ ७ ॥

३२ मग पंढरीराणा बोलतसे वाणी । आलों मी दुरोनी येचि मार्गे ॥ १ ॥
क्षुधा मज बहु लागली साजणी । देई कांहीं आणोनी फराळासी ॥ २ ॥
येरी म्हणे आम्ही नीच याती महार । कैसा हा विचार करूं आतां ॥ ३ ॥
येरू म्हणे माझा जाऊं पाहे प्राण । यातीसी कारण नाहीं मज ॥ ४ ॥
कांहीं तरी अन्न असेल शिळें मिळें । देई येची वेळे लवकरी ॥ ५ ॥
बंका म्हणे ऐसें लाघव श्रीहरी । करोनि पसरी हात पुढें ॥ ६ ॥

३३ सोयराइनें मनीं करोनी विचार । म्हणे हा अविचार करूं कैसा ॥ १ ॥
हा तंव आहे वृद्ध ब्राह्मण । दंत कानहीन दुर्बळ तो ॥ २ ॥

यासी अन्न देतां आपुला विचार । मज मारामार करिती लोक ॥ ३ ॥
विन्मुख हा जातां पति रागावेल । बोल हा लागेल कपाळासी ॥ ४ ॥
बंका म्हणे ऐसा करोनी निर्धार । ठेवी पायांवर डोई तेव्हां ॥ ५ ॥

३४ आम्ही तो जातीचे आहे ती महार । तुम्ही तो थोर उंच वर्ण ॥ १ ॥
अन्नपाणी देतां निंदितील जन । करतील ताडण मजलागीं ॥ २ ॥
ऐकोनियां मात येरू बोले वचन । यातीसी कारण नाहीं मज ॥ ३ ॥
माझा तूं वांचवी अन्न देउनि प्राण । पुढील कारण पाहूं नको ॥ ४ ॥
ऐकोनी उत्तर सोयरा उठली । घरामध्यें आली लवलाही ॥ ५ ॥
दहीं आणि भात घेतला वाटीभरी । आणोनियां करीं दिला तिनें ॥ ६ ॥
बंका म्हणे हरी खावोनी तुष्टला । म्हणे माग मला देतों तुज ॥ ७ ॥

३५ येरी म्हणे मज काय देतां स्वामी । उच्छिष्टाचे आम्ही धणी असों ॥ १ ॥
तुमचे कृपेचा प्रसाद तुम्ही ठेवा । तोचि प्रियदेवा आहे आम्हां ॥ २ ॥
येरू म्हणे घास घेई माझा करीं । मूल तें निर्धारी होईल तुज ॥ ३ ॥
ऐकतां आनंदें घाली लोटांगण । वंदिले चरण जीवें भावें ॥ ४ ॥
बंका म्हणे ऐसें लाघव करोनी । गेलासे निघोनी चक्रपाणी ॥ ५ ॥

३६ इतुक्या माजी चोखा घरासी तो आला । वृत्तांत निवेदिला सोयराई ॥१॥
येरू म्हणे हें काय अनुचित केलें । बोल ते लाविले आपणासी ॥ २ ॥
जातिचे तो महार जग जाणताती । आपुली फजिती आपुल्या हातें ॥ ३ ॥
कासयाचा पुत्र कोणाचा तो कोण । आपुलें कारण साधीं आधीं ॥ ४ ॥
बंका म्हणे ऐसे बोल ते ऐकोनी । सोयरा चरणीं घाली मिठी ॥ ५ ॥

३७ कौतुकें आनंदें लोटला कांहीं काळ । तों आलें असे फळ प्रसादाचें ॥१॥
चोखीयाची कांता जालीसे गर्भीण । लागलासे पूर्ण नववा मास ॥ २ ॥
स्वभावें विनंती करी पतीलागीं । घरीं नाहीं सामोग्री कैसें करूं ॥ ३ ॥
बंका म्हणे ऐसी ऐकोनिया मात । निघाला त्वरित वहिणी घरा ॥ ४ ॥

३८ न पुसतां गेला बहिणीचीया घरा । गांव मेहुणपुरा नांदतसे ॥ १ ॥
नाम तें निर्मळ निर्मळेचे तीरी । वाचे निरंतरी नाम घोष ॥ २ ॥

चोखा तैसी बहिण बहिण तैसा चोखा । सदा नाम मुखा विठोबाचे ॥३॥
बंका म्हणे धन्य ज्याचा अमृत जन्म । निघे अस्थी नाम विठोबाचें ॥४॥

३९ चोखियाचे घरीं नवल वर्तलें । पाहुणे ते आले देवराव ॥ १ ॥
सोयरा निर्मळा होत्या दोघीं घरीं । पाहुणा श्रीहरि आला तेव्हां ॥२॥
खोपट मोडकें द्वारी वृंदावन । बैसे नारायण तया ठायीं ॥ ३ ॥
दोघीं प्रेम भरित धरिती चरण । घालिती लोटांगण जीवें भावें ॥ ४ ॥
कोठोनियां स्वामी आलेती तें सांगा । येरू म्हणे पैं गा दूर देशी ॥५॥
झाले दोन प्रहर क्षुधेनें पीडिलों । म्हणोनियां आलों तुमचे सदनीं ॥६॥
कोणाचें हे घर सांगा हा निर्धार । ते म्हणती महार आम्हीं असो ॥७॥
येरू म्हणे घरीं कोण अधिकारी । कैसी चाले परी संसाराची ॥ ८ ॥
मग त्या ऐकोनी तयाचे बोलणें । म्हणती देवाजीनें निकें केलें ॥ ९ ॥
बंका म्हणे ऐसा कृपाळु श्रीहरि । चोखियाचे घरीं राहे सुखें ॥ १० ॥

—×—

# संत कर्ममेळा यांचे अभंग

१ अखंड तें मन ठेवलें चरणीं । आणिक तें ध्यानीं आहे माझे ॥ १ ॥
गोड गोजिरी विठोबाचीं पाउलें । सुखें म्यां ठेविलें मस्तकासी ॥ २ ॥
वायां तोंडपिटी करा कशासाठीं । तुमची तो रहाटी कळों आली ॥ ३॥
कर्ममेळा म्हणे लोटांगण पायीं । मागणें तें देई हेंचि एक ॥ ४ ॥

२ साधनाच्या कांहीं न पडे कचाटीं । जावोनी कपाटीं काय पाहूं ॥ १ ॥
सुंदर श्रीमुख विटे जें शोभलें । कर मिरविले कटावरी ॥ २ ॥
तो हा श्रीहरी उभा भिवरेतीरीं । भक्तां अभयकरी पालवितो ॥ ३ ॥
कर्ममेळा म्हणे सर्व सुखाचें आगर । तो हा विटेवर उभा असे ॥ ४ ॥

३ आमुचा बाप तुझा पोसणा । कां हो नारायणा विसरसी ॥ १ ॥
धाकुटपणा मज न्हाणियेलें । आतां कां हो कठिण केलें ॥ २ ॥
ब्रीद सांभाळी विठ्ठला । तरिच भलेपण तुला ॥ ३ ॥
म्हणे चोखियाचा कर्ममेळा । देवा न विसरावें मला ॥ ४ ॥

४ कशासाठीं पोसियेलें । हें तूं सांग बा विठ्ठलें ॥ १ ॥
मज कोण आहे गणगोत । न दिसे बरी तुझी नीत ॥ २ ॥
मोकलित दातारा । काय येते तुझे पदरा ॥ ३ ॥
म्हणे चोखियाचा कर्ममेळा । वोखटपण येईल तुला ॥ ४ ॥

५ आमुची केली हीन याती । तुज कां न कळे श्रीपती ॥ १ ॥
जन्म गेला उष्टें खातां । लाज न ये तुमचे चित्ता ॥ २ ॥
आमचे घरीं भात दहीं । खावोनी कैसा म्हणसी नाहीं ॥ ३ ॥
म्हणे चोखियाचा कर्ममेळा । कासया जन्म दिला मला ॥ ४ ॥

६ तुमच्या संगतीचें काय सुख आम्हां । तुम्हां मेघश्यामा न कळे कांहीं ॥१॥
हीनत्व आम्हांसी हीनत्व आम्हांसी । हीनत्व आम्हांसी देवराया ॥ २ ॥
गोड कधीं न मिळेचि अन्नें । सदा लाजीरवाणें जगामध्यें ॥ ३ ॥
तुम्हांसी आनंद सुखाचा सोहळा । आमुचे कपाळा वोखटपण ॥ ४ ॥
चोखियाचा म्हणे कर्ममेळा देवा । हाचि आमुचा ठेवा भागाभाग ॥५॥

७ चोख्यासाठी देवें बहु नवल केलें । तयाचें खादलें भात दहीं ॥ १ ॥
म्हणोनी ब्राह्मणें बांधविला चोखा । सोडविलें देखा तुम्ही त्यासी ॥ २ ॥
तयाचिया मागें आमुचा सांभाळ । कैसा तूं दयाळ करितोसी ॥ ३ ॥
कर्ममेळा म्हणे पंढरीरायातें । आतां आहे आमुतें कोण सांगा ॥ ४ ॥

८ उचित अनुचित आमुचे भागासी । आलें हृषीकेशी वाटतसे ॥ १ ॥
तुम्हांसी विसर पडियेलासे माझा । हें तंत्र केशीराजा कळलें मज ॥ २ ॥
नागवें उघडें वागविलें खांदीं । म्हणोनी उपाधी सांडियेली ॥ ३ ॥
कर्ममेळा म्हणे नाम हें चांगलें । गोडा गोडावलें गोडपणें ॥ ४ ॥

९ आमुच्या बापाच्या पुण्याचिया राशी । म्हणोनी जेविलासे त्याचे घरीं ॥१॥
तेव्हां तुज काय उपवास होते । म्हणोनी सांगातें जेविलेती ॥ २ ॥
तईंचा तूंचि देवा झालासि पारिखा । आम्हां कां सारिखा न धरसी ॥ ३ ॥
कर्ममेळा म्हणे तुज आमुची आण । आमुची निजखूण दावीं देवा ॥ ४ ॥

१० पाळिलीं पोसिलीं तुमचिया नावें । तें वर्म ठावें झालें आतां ॥ १ ॥
नष्ट क्रियमाण होसी तूंचि देवा । काय बा केशवा म्हणों तुज ॥ २ ॥

विश्वाचा साक्षी असोनि वेगळा । तयासी लागला बोल देवा ॥ ३ ॥
कर्ममेळा म्हणे तुमची हे नित । तुम्हासी उचित गोड वाटे ॥ ४ ॥

११ आजिवरि धरली आस । परी मनीं झाली निरास ॥ १ ॥
आतां शरण जाऊं कवणा । तुजविण नारायणा ॥ २ ॥
दुःखसागरी लोटलें । कोण काढील वहिलें ॥ ३ ॥
म्हणे चोखियाचा कर्ममेळा । देवा येऊं द्या कळवळा ॥ ४ ॥

१२ तुमचा तो कळला भाव । माझा झाला पारखा ठाव ॥ १ ॥
घेवोनी बैसलासी ठेवणें । माझे द्यावें मजकारणें ॥ २ ॥
कायसा करिसी वादावाद । मुळींच खुण्टलासे भेद ॥ ३ ।
कर्ममेळा म्हणे हरी । तुम्हां नज नाहीं उरी ॥ ४ ॥

१३ नेणता म्हणूनी चाळविसी मज । परी जीवीचें गुज कळेचिना ॥ १ ॥
न कळे न कळे तुमचें मानस । मी तो कासाविस जीवें झालों ॥ २ ॥
बोलतां न येचि बहुत प्रकार । प्रथमचि भार वागविला ॥ ३ ॥
कर्ममेळा म्हणे ऐक पंढरीराया । बोलियेलें वाया बोल नको ॥ ४ ॥

१४ न कळे न कळे तुमचें महिमान । सलगी पायीं जाण करितसे ॥ १ ॥
कमाविलें जेणें तेंचि देई मज । येवढेंचि काज माझें आहे ॥ २ ॥
जाणीवा शाहाणीव नको भरोवरी । नेणतें मी हरि पोसणें तुमचें ॥ ३ ॥
कर्ममेळा म्हणे जीवींची निजखूण । दाखवा चरण तुमचे देवा ॥ ४ ॥

१५ भरंवसा मानिला परी झाली निरास । म्हणोनी कासावीस जीवें झालों ॥१॥
बोलिल्या वचना तें कांहीं साचपण । नयेचि दिसोन अद्यापवरी ॥ २ ॥
किती किती मन आवरूनी धरूं । कवणासी विचारूं पुसूं आतां ॥ ३ ॥
कर्ममेळा म्हणे कर्महीन माझें । भोगणें सहजें सहज असे ॥ ४ ॥

१६ झालों परदेशी एकटा येकला । परी तुझा अंकिला दास देवा ॥ १ ॥
आतां बुझावण करणें तुम्हांसी । मी तो पायांपासी ठाव मागे ॥ २ ॥
मोकलितां तुम्ही कोण पुसे मज । थोरीव सहज बुडालीसे ॥ ३ ॥
कर्ममेळा म्हणे आतां दंडवत । करा माझें हित तुम्ही देवा ॥ ४ ॥

१७ आतां येथवरी । मज नका बोलूं हरी ॥ १ ॥
तुमचें आहे तुम्हा ठावें । माझें म्यांच करावें ॥ २ ॥
आमुच्या संचिता । तुम्हां बोल काय आतां ॥ ३ ॥
माझें मन मज ग्वाही । वायां बोलोनियां काई ॥ ४ ॥
कर्ममेळा म्हणे जाणा । तुमचें माझें नारायणा ॥ ५ ॥

१८ बहु अपराध घडले मजसी । म्हणोनी तुम्हांसी पडली तुटी ॥ १ ॥
आमुचें संचित जैसें जैसें आहे । तैसें तैसें होय आपेआप ॥ २ ॥
तुम्हांसी हो बोल नाहीं नारायणा । आमुच्या आचरणा ग्वाही तुम्ही ॥ ३ ॥
कर्ममेळा म्हणे तुम्हांसी बोल । वाया काय फोल वेंचूं देवा ॥ ४ ॥

१९ सुख दुःख दोन्हीं आमुचे पदरीं । पूर्वीच निर्धारी बांधियेली ॥ १ ॥
आतां का वाईट म्हणो कशासाठीं । आपुली ती राहाटी भोगूं आम्ही ॥ २ ॥
तुम्ही तो व्यापक सर्वांसी निराळें । आमुची कर्मफळें भोगूं आम्ही । ३ ॥
कर्ममेळा म्हणे वचन प्रमाण । आमुची निजखूण कळली आम्हां ॥ ४ ॥

२० आमुच्या बापाचें ठेवणें । कां तूं न देसी आम्हां कारणें ॥ १ ॥
कैसी तुझी नीत बरी । मागतां शिणलों मी हरी ॥ २ ॥
वाउग्या येरझारा । किती कराव्या दातारा ॥ ३ ॥
कर्ममेळा म्हणे हरी । किती मागावें निर्धारी ॥ ४ ॥

२१ आहेसी ठाउक मागां संतजनां । रिणाईत जाणा बहुतांचा ॥ १ ॥
घेणें ज्याचें त्यास देणें नाहीं हरी । ऐसी हे परि जाणतसी ॥ २ ॥
साजतसे तुम्हां थोर थोरपण । आमुचें कारण आम्हीं जाणों ॥ ३ ॥
कर्ममेळा म्हणे पंढरिनिवासा । आपुला तो ठसा सांभाळावा ॥ ४ ॥

२२ आपण वाढवावें आपण बुडवावें । ऐसी रिती बरवें तुमचे घरीं ॥ १ ॥
पाळिल्या पोसिल्या विसर पाडावा । समर्थाच्या नांवा लाज येते ॥ २ ॥
रंक मी भिकारी उच्छिष्टाचा अधिकारी । काय भीड हरि माझी तुम्हां । ३ ॥
कर्ममेळा म्हणे पंढरिनिवासा । उगवा हा फांसा लवकरी ॥ ४ ॥

२३ जरी तुम्हां उबग आलासे दीनांचा । अभिमान कोणाचा कोणाकडे ॥ १ ॥
तारूं जाणें उदक आपण वाढविलें । हें तुम्हां न कळे कैसें देवा ॥ २ ॥

यापरि पोसणा तुमचे उच्छिष्टाचा । भार तयाचा तुम्हां झाला ॥ ३ ॥
कर्ममेळा म्हणे जोडोनी ठेविलें । तेंचि वहिलें मज देई ॥ ४ ॥

२४ नाहीं मी मागत आणिकाचें कांहीं । आमुचें आम्हां देई पांडुरंगा ॥ १ ॥
समर्थ म्हणोनी धरितों पदरा । वाउगा पसारा दाऊं नको ॥ २ ॥
ब्रीद बांधिलें कासया चरणीं । तें सोडी चक्रपाणी पांडुरंगा ॥ ३ ॥
कर्ममेळा म्हणे तुज आमुची आण । नको निर्वाण करूं आतां ॥ ४ ॥

२५ जें जें दिसें व्यापलें तें तें फलकट । वाउगा बोभाट करोनी काई ॥१॥
विश्वीं विश्वंभर संतांचें वचन । तेंचि प्रमाण मानूं आतां ॥ २ ॥
नामाची आवडी परमार्थ रोकडा । नासे भव पीडा संसाराची ॥ ३ ॥
कर्ममेळा म्हणे सुलभ सोपारें । साच हेंचि खरें वर्म एक ॥ ४ ॥

२६ संतांची संगती आवडे या जीवा । आणिक केशवा दुजें नको ॥ १ ॥
वाया हाव भरी होऊं नेदीं मन । राखा आवरोन तुमचें तुम्ही ॥ २ ॥
कर्ममेळा म्हणे पंढरिनिवासा । पुरवावी आशा हीचि माझी ॥ ३ ॥

२७ आणिक वासना नाहीं दुजी मना । संतचरणीं जाणा मस्तक हें ॥१॥
घालीन लोटांगण वंदीन पायधुळी । पूर्व कर्मा होळी होय तेणें ॥ २ ।
नामाची आवडी सर्वकाळ वाचे । दुजें साधनचि नेणें कांहीं ॥ ३ ॥
कर्ममेळा म्हणे ही माझी वासना । पुरवा नारायणा सर्वभावें ॥ ४ ॥

# संत निर्मळाबाईचे अभंग

१ तिहीं त्रिभुवनीं विस्तारिली कीर्ती । तो हा श्रीपती उभा विटे ॥ १ ॥
अनाथाचा नाथ पतित पावन । हें आम्हां वचन सांपडलें ॥ २ ॥
नाम धारकाच्या लागेन चरणीं । घेईन पायवणी पोटभरी ॥ ३ ॥
आनंदें निर्भर नाचेन महाद्वारीं । संत अधिकारी तेथीचे जे ॥ ४ ॥
निर्मळा करी प्रेमाची आर्ती । करोनी श्रीपति वोवाळित ॥ ५ ॥

२ मज नामाची आवडी । संसार केला देशधडी ॥ १ ॥
सांपडलें वर्म सोपें । विठ्ठल नाम मंत्र जपे ॥ २ ॥

नाहीं आणिक साधन । सदां गाय नारायण ॥ ३ ॥
निर्मळा म्हणे देवा । छंद येवढा पुरवावा ॥ ४ ॥

३ कृपेच्या सागरा परिसा विनवणी । मस्तक चरणीं असो माझा ॥ १ ॥
बहुत प्रकार मज तें कळेना । घातली चरणा मिठी बळें ॥ २ ॥
देह मन चित्त करी तळमळ । न चालेचि बळ काय करूं ॥ ३ ॥
न सुटे संसार पडतसे मिठी । तेणें पडे तुटी तुम्हां सवें ॥ ४ ॥
निर्मळा म्हणे काय करूं आतां । तुम्ही तो परतें मोकलिलें ॥ ५ ॥

४ चहूंकडे देवा दाटला वणवा । कां न ये कनवा तुजलागीं ॥ १ ॥
सांपडलें संधी संसाराचे अंगीं । सोडवी लगबगी मायबापा ॥ २ ॥
बहु मज उबग आला असे देवा । धांवे तूं केशवा लवलाही ॥ ३ ॥
तुजविण मज कोण गणगोत । तूंचि माझा हितकर्ता देवा ॥ ४ ॥
निर्मळा म्हणोनी पायीं घाली मिठी। परतें न लोटीं मायबापा ॥ ५ ॥

५ सुख अणुमात्र नाहीं संसारी । सदां हावभारी रात्रंदिवस ॥ १ ॥
न घडे न घडे नामाचें चिंतन । संताचें पूजन न घडेचि ॥ २ ॥
न बैसे मन एके ठायीं निश्चळ । सदा तळमळ अहोरात्र ॥ ३ ॥
निर्मळा म्हणे चोखिया सुजाणा । पंढरीचा राणा जीवीं धरी ॥ ४ ॥

६ कां हो पांडुरंगा मज मोकलिलें । पराधीन केलें जिणें माझें ॥ १ ॥
किती हे जाचणी संसार घसणी । करिती दाटणी काम क्रोध ॥ २ ॥
आशा मनशा तृष्णा बहू या वोढाळ । लाविलासे चाळा येणें मज ॥३॥
निर्मळा म्हणे जीवीच्या जीवना । येऊं द्या करूणा देवराया ॥ ४ ॥

७ जीवीचें सांकडें वारीं देवराया । अहो पंढरीराया धांवां वेगीं ॥ १ ॥
कां बा मोकलितां शरण आलिया । कां बा न ये दया तुम्हांलागीं ॥२॥
अनाथ परदेशी तुम्हांविण कोण । सुखें समाधान करा माझें ॥ ३ ॥
तुमचिया पोटीं वहु वाव आहे । अधीर हा होय जीव माझा ॥ ४ ॥
निर्मळा म्हणे बोलण्याची मात । माझा तो वृत्तांत निवेदिला ॥ ५ ॥

८ नाहीं मज आशा आणिक कोणाची । स्तुति मानवाची करुनी काय ॥१॥
काय हे देतील नाशिवंत सारे । यांचे या विचारें यांसी न पुरे ॥२॥
ऐसें ज्याचें देणें कल्पांती न सरे । तेंचि एक बरें आम्हांलागीं ॥ ३ ॥
जो भक्तांचा विसावा वैकुंठनिवासी । तो पंढरीसी उभा विटे ॥ ४ ॥
निर्मळा म्हणे सुखाचा सागर । लावण्य आगर रुप ज्याचें ॥ ५ ॥

९ अनंता जन्मांचें सुकृत पदरीं । तोचि उच्चारी होठी हरिनाम ॥ १ ॥
अनंता जन्माचें पुण्य जयागांठी । तोचि उच्चारी होठी हरिनामा ॥ २ ॥
अनंता जन्माचें तपादि साधन । तोचि नारायण जपे नाम ॥ ३ ॥
अनंता जन्मांची सोडियेली जोडी । तरीच लागे गोडी हरिनामीं ॥ ४ ॥
निर्मळा म्हणे अनंता जन्माचें । उच्चारतां वाचे पाप जाय ॥ ५ ॥

१० परमार्थ साधावा बोलती या गोष्टी । परी न ये हातवटी कांहीं त्यांची ॥१॥
शुद्ध भक्तिभाव नामाचें चिंतन । हेंचि मुख्य कारण परमार्था ॥ २ ॥
निंदा दोष स्तुति मान अपमान । वमनासमान लेखा आधीं ॥ ३ ॥
परद्रव्य परान्न परनारीचा विटाळ । मानावा अढळ परमार्थी ॥ ४ ॥
निर्मळा म्हणे हाचि परमार्थ । संतांचा सांगात दिननिशीं ॥ ५ ॥

११ न होई पांगिला संसाराचे ठायीं । आणिक प्रवाहीं पडूं नको ॥ १ ॥
चित्त शुद्ध करी मन शुद्ध करी । वाचे हरि हरि जप सदा ॥ २ ॥
या परतें साधन आन नाहीं दुजें । हेंचि केशवराजे सांगितलें ॥ ३ ॥
निर्मळा म्हणे चोखिया सुजाणा । अनुभवीं खुणा मना तूंचि ॥ ४ ॥

१२ संसाराचें भय घेवोनी मानसीं । चोखा मेहुणपुरीसी जाता झाला ॥१॥
देखोनी निर्मळा आनंदली मनीं । धांवोनी चरणीं मिठी घाली ॥ २ ॥
बैसोनी शेजारी पुसे सुखमात । वहिनीं क्षेमवंत आहेत कीं ॥ ३ ॥
निर्मळा म्हणे पुढील विचार । कैसा तो साचार सांगे मज ॥ ४ ॥

१३ ऐकोनिया मात चोखा सांगे तिसी । पूर्ण नव मासांसी भरियेलें ॥ १ ॥
साहित्य सामुग्री नाहीं कांहीं घरीं । म्हणोनी निर्धारी बोलियेली ॥ २ ॥
ऐसा हा घोर कोणें वागवावा । म्हणोनी तुझे गांवा वेगें आलों ॥ ३ ॥
निर्मळा म्हणे अनुचित केलें । तुम्हां काय वहिलें म्हणो आतां ॥ ४ ॥

१४ वडील तूं बंधु असोनी अविचार । केला कां निर्धार सांग मज ॥ १ ॥
न पुसतां कां बा आलासि धांवत । वहिनी आकांत करतील कीं ॥ २ ॥
येरू म्हणे विठु पुरविल सामोग्री । भार तयावरी घातिलासे ॥ ३ ॥
निर्मळा म्हणे ही बरी नोहे गोष्टी । विठोबासी कष्टी करणें काज ॥ ४ ॥

१५ ऐसे आनंदानें एक मास राहिला । परी हेत गुंतला पांडुरंगी ॥ १ ॥
रात्रंदिवस छंद विठ्ठल नामाचा । नाहीं संसाराचा हेत मनीं ॥ २ ॥
भोजन सारूनी बैसले एकांती । निर्मळा बोलती चोखियासी ॥ ३ ॥
बहु दिस झाले खंती वाटे मना । पंढरीचा राणा आठवत ॥ ४ ॥
गोडधड जिवासी ते कांहीं । कई हो डोई पायीं ठेवीन मी ॥ ५ ॥
निर्मळा म्हणे अहो देवराया । भेटी लवलाह्या देई मज ॥ ६ ॥

१६ चोखा म्हणे निर्मळेसी । नाम गाये अहर्निशी ॥ १ ॥
तेणें संसार सुखाचा । इह परलोक साचा ॥ २ ॥
साधन हेंचि थोर असे । शांति क्षमा दया वसे ॥ ३ ॥
ऐकतांचि आनंदली । निर्मळा मिठी चरणीं घाली ॥ ४ ॥

१७ संसाराचें कोण कोड । नाहीं मज त्याची चाड ॥ १ ॥
एका नामेंचि विश्वास । दृढ घालोनियां कांस ॥ २ ॥
जेथें न चले काळसत्ता । विठोबाचें नाम गातां ॥ ३ ॥
शास्त्रें पुराणें वदती । नाम तारक म्हणती ॥ ४ ॥
निर्मळा म्हणे नामसार । वेदशास्त्रांचा निर्धार ॥ ५ ॥

१८ अनाथांचा नाथ कृपावंत देवा । घडो तुमची सेवा अहर्निशीं ॥ १ ॥
अठ्ठाविस युगें विटेवरी उभा । वामभागीं शोभा रूक्मादेवी ॥ २ ॥
पतित पावन गाजे ब्रीदावळी । पुरवावी आळी हीच माझी ॥ ३ ॥
उभा विटेवरी ठेवोनी चरण । म्हणतसे बहिण चोखियाची ॥ ४ ॥

१९ कां बा पंढरिराया मोकलिलें मज । नाठवेचि मज दुजें कांहीं ॥ १ ॥
मज तंव असे पायांसवें चाड । आणिक कैवाड कांहीं नेणें ॥ २ ॥
चोखियासी सुख विश्रांति दिधली । माझी सांड केली दिसतसे ॥ ३ ॥
निर्मळा म्हणे तुम्ही तो सुजाण । माझा भाग शीण कोण वारी ॥ ४ ॥

२० रात्रंदिवस मन करी तळमळ । बहु हळ हळ वाटे जीवा ॥ १ ॥
काय करूं आतां पाउलें न दिसती । पडिलीसे गुंती न सुटे गळे ॥ २ ॥
बहु हा उबग आला संसाराचा । तोडा फांसा याचा मायबापा ॥ ३ ॥
निर्मळा म्हणे आतां दुजेपण । चोखियाची आण तुम्हां असे ॥ ४ ॥

२१ आजिवरी तुम्हीं तयासी पाळिलें । अपराध साहिले चोखियाचे ॥ १ ॥
तयाचिया पाठी आमुचा कंटाळा । आला कां दयाळा सांगा मज ॥ २ ॥
हीन दीन मी पातकांची राशी । शरण पायांसी जीवें भावें ॥ ३ ॥
निर्मळा म्हणे तुम्ही तो दयाळ । म्हणोनी सांभाळ करा माझा ॥ ४ ॥

२२ आतां बहु बोलणें सारोनियां ठेवा । उगवा हा गोंवा मायबापा ॥ १ ॥
संसाराचा छंद नकोसा हा झाला । परमार्थ भला संतांसंगें ॥ २ ॥
जें आहे कडु तें तें लागे गोडु । गोडाचे जें गोडु तें लागे कडु ॥ ३ ॥
निर्मळा म्हणे सुख तुमचे पायीं । आणिक मी कांहीं नेणें दुजें ॥ ४ ॥

२३ तुमचा भरंवसा धरोनी मानसीं । दृढ पायांसी शरण आलें ॥ १ ॥
आतां कळेल तो करावा विचार । मी आपुला भार उतरिला ॥ २ ॥
मांडीवरी मान ठेविली संपूर्ण । पुढील कारण जाणोनियां ॥ ३ ॥
निर्मळा म्हणे तारा अथवा मारा । तुमचें तुम्ही सारा वोझें आतां ॥ ४ ॥

२४ आनंदें वोविया तुम्हासी गाईन । जीवें भावें वोवाळीन पायांवरी ॥ १ ॥
सुकुमार साजिरीं पाउलें गोजिरीं । ते हे मिरवली विटेवरी ॥ २ ॥
कटावरी कर धरोनी श्रीहरी । उभा भीमातीरी पंढरीये ॥ ३ ॥
महाद्वारीं चोखा तयाची बहीण । घाली लोटांगण उभयतां ॥ ४ ॥

दि. ........
अनुक्रम ........

# — सच्छिष्याला वाहिलेली श्रद्धांजलि ! —

चोखा माझा जीव चोखा माझा भाव । कुलधर्म देव चोखा माझा ॥ १ ॥
काय त्याची भक्ति काय त्याची शक्ति । मीहि आलों व्यक्तीं तयासाठीं ॥ २ ॥
माझ्या चोखियाचें करिती जे ध्यान । तया कधीं विघ्न पडो नेदी ॥ ३ ॥
नामदेवें अस्थि आणिल्या पारखोनी । घेत चक्रपाणी पितांबरी ॥ ४ ॥

—नामदेवराय.

# श्रीचोखोबांना वाहिलेली स्तुतिसुमनांजलि !

**( १ ) जनाबाई :**

१ यातिहीन चोखामेळा । त्यासी भक्तीचा कळवळा ॥ १ ॥
त्याचा झाला म्हणीयारा । राहे घरीं धरी थारा ॥ २ ॥
देव जेवितो त्याच्या घरा । त्याचा भक्तिभाव खरा ॥ ३ ॥
देव बाटविला त्यानें । ऐसें जनी गाये गाणें ॥ ४ ॥

२ चोखामेळा संत भला । तेणें देव भुलविला ॥ १ ॥
भक्ति आहे ज्याची मोठी । त्याला पावतो संकटीं ॥ २ ॥
चोखामेळ्याची करणी । तेणें देव केला ऋणी ॥ ३ ॥
लागा विठ्ठल चरणीं । म्हणे नामयाची जनी ॥ ४ ॥

**( २ ) सोयराबाई—**

चोखा निर्मळ एक रूप । दरुशनें हरे ताप ॥ १ ॥
वाचे विठ्ठल नाम छंद । नाहीं भेद उभयतां ॥ २ ॥
तीर्थ उत्तम निर्मळा । वाहे भागीरथी जळा ॥ ३ ॥
ऐसी तारक मेहुणपुरी । म्हणे चोख्याची महारी ॥ ४ ॥

**( ३ ) बंका महार :**

चोखा चोखट निर्मळ । तया अंगी नाहीं मळ ॥ १ ॥
चोखा सुखाचा सागर । चोखा भक्तीचा आगर ॥ २ ॥
चोखा प्रेमाची माउली । चोखा कृपेची साउली ॥ ३ ॥
चोखा मनाचें मोहन । बंका घाली लोटांगण ॥ ४ ॥

**(४) नरहरि सोनार :**

धन्य पुंडलिक भक्त निवडला । अक्षयीं राहिला चंद्रभागीं ॥ १ ॥
भक्त नामदेव अक्षयी जडला । पायरी तो झाला महाद्वारीं ॥ २ ॥
ज्ञानोबा सोपान निघती हे भक्त । अक्षयी राहत परब्रह्मी ॥ ३ ॥
बोधराज भला वचनीं गोविला । कीर्तनी राहिला पांडुरंग ॥ ४ ॥
साधुसंत फार येती थोर थोर । ऊभा निरंतर चोखामेळा ॥ ५ ॥

**(५) श्री एकनाथ महाराज—**

चोखियाची भक्ति कैसी । प्रेमें आवड देवासी ॥ १ ॥
ढोरें वोढी त्याचे घरीं । नीच काम सर्व करी ॥ २ ॥
त्याचे स्त्रीचें बाळंतपण । स्वयें करी जनार्दन ॥ ३ ॥
ऐसी आवड भक्ताची देखा । देव भुलले तया सुखा ॥ ४ ॥
नीच याती न मनीं कांहीं । एकाजनार्दनी भुलला पाही ॥ ५ ॥

**(६) श्री तुकाराम महाराज :**

१ पवित्र तें कुळ पावन तो देश । जेथें हरिचे दास जन्म घेती ॥ १ ॥
कर्मधर्म त्यांचा जाला नारायण । त्यांचेनी पावन तिन्हीं लोक ॥ २ ॥
चोखामेळा बंका जातीचा महार । त्यासी सर्वेश्वर ऐक्य करी ॥ ३ ॥
यातायाती धर्म नाहीं विष्णुदासा । निर्णय हा ऐसा वेदशास्त्री ॥ ४ ॥
तुका म्हणे तुम्ही विचाराचे ग्रंथ । तारिले पतित नेणें किती ॥ ५ ॥
२ उंच निच कांहीं नेणें हा भगवंत । तिष्ठे भाव भक्ति देखोनियां ॥ १ ॥
दासीपुत्र कण्या विदुराच्या भक्षी । दैत्या घरीं रक्षीं प्रल्हादासी ॥ २ ॥
नरहरी सोनारा घडो फुंकू लागे । चोख्यामेळ्या संगें ढोरें ओढी ॥ ३ ॥
पुंडलिकासाठीं अझुनि तिष्ठत । तुका म्हणे मात धन्य त्याची ॥ ४ ॥

**(७) रंगनाथस्वामींचे पुतणे काशीराज अण्णा उर्फ योगिराज :**

आला चोखामेळा महार । स्वामी करीतसे जोहार ।
त्याचा करोनिया उद्धार । संतमेळीं स्थापिला ॥

**(८) महीपती बोवा :**

आरती संतमंडळी । हातीं घेऊनि पुष्पांजली ।
ओंवाळीन पंचप्राणें । त्यांचे चरण न्याहाळी ॥
कबीर आणि पाठक नामा । चोखा परिसा भागवत ॥ आरती ॥

**(९) मोरोपंत :**

गावा नच मानावा चोखामेळा महार सामान्य ।
ज्याच्या करिं साधूचा चोखामेळा महारसामान्य ॥

**(१०) पांडुरंग बोवा :**

कोठें कागद तारिसी, दळिसि तूं कोठें पशू ओढिसी ।
कोणाचें रिण वारिसी परि मला कां हातिचा सोडिसी ? ॥

**(११) अनामी :**

धांव पाव सांवळे विठाबाई कां मनि धरिली अढीं ।
अनाथ मी अपराधी स्मरतों उतरा पैलथडी । विठोबा कां मनि० ॥ धृ ॥
एकनाथा घरि पाणि वाहिलें गंगेच्या कावडी ।
कबीराचे ते शेले विणुनी त्यांची घालिसी घडी ॥ कां० ॥
चोखामेळ्याचे घरीं येऊनी ओढिसी ढोरें तांतडी ।
त्याची स्त्री बहु हाका मारी कोठें दिधली दडी ॥ कां ॥

**(१२) स्वामी स्वरूपानंद, रत्नागिरी :**

अनंत ब्रह्मांडें साठविसी पोटीं । तो तूं भक्तिसाठीं विकलासी ॥ १ ॥
काय नेणों तुज भक्ति कां आवडे । अर्जुनाचे घोडे खाजविसी ॥ २ ॥
कां गा तूं बळीचा होसी द्वारपाळ । रानीं ध्रुव बाळ सांभाळिसी ॥ ३ ॥
होसी विटु घेड फेडिसी तूं देणें । दामाजी कारणें धांव घेसी ॥ ४ ॥
एकनाथा घरी वाहसी कां पाणी । शेले कोण विणी कबिराचे ॥ ५ ॥
चोखामेळ्या संगें कोण गुरें ओढी । डेरे कोण घडी गोरोबाचे ॥ ६ ॥
जनाबाईसंगें कोण दळूं लागे । आवडीनें सांगे गुज–गोष्टी ॥ ७ ॥
स्वामी म्हणे देवा तूंचि विश्वंभर । भक्तांचा चाकर स्वय होसी ॥ ८ ॥

**(१३) संत दासगणु महाराज, पंढरपूर :**

चोख्या! अपुलेपणा तुज दिला ये बैस या आसनीं ।
ऐसें बोलून त्या धरी निजकरें, ढाळी असूं लोचनीं ॥
देवांनीं जयघोष शब्द करितां चोखा समाधीमधें ।
गेला; वंदन त्या अजून करिती वारीस येतां बुधें ॥

# संतांच्या संगती –

**(१) श्रीज्ञानेश्वर :**

१ हें उपजे आणि नाशे । तें मायावशें दिसे । येरवी तत्वता वस्तु जे असे । ते अविनाशचि ॥

अनादि सिद्ध हें आघवें । होत जात स्वभावें । तरीं तुवां कां शोचावें । सांगे मज ॥

३ म्हणोनि जें जें उचित । आणि अवसरे करुनि प्राप्त । तें कर्म हेतुरहित । आचरे तूं ॥

४ मनाचा मार न करितां । इंद्रिया दुःख न देतां । एथ मोक्ष असे आयता । श्रवणाचि माजि ॥

५ तैसा हृदयामध्यें मी रामु । असतां सर्व सुखाचा आरामु । कां भ्रांतासी कामु । विषयावरी ॥

६ अर्जुना ऐसा हा जाणावा । सकळात्मकु देखावा । मग सहजें शोकु आघवा । हरेल तुझा ॥

७ म्हणोनि सानें थोर न म्हणावें । उंच नीच भाव सांडावे । एक मीचि ऐसें मानावें । वस्तुजातातें ॥

८ पैं आपुलें जें साचें । तें कल्पांतीही न वचे । हें जाणोनि गताचें । न शोची जो ॥

९ जो आत्मलाभा सारिखें । गोमटें कांहींचि न देखे । म्हणोनि भोग विशेखें । हरिखेजेना ॥

१० ना ना कृषीवळु आपुलें । पांघुरवी पेरिलें । तैसें झाकी निपजलें । दान पुण्य ॥

११ मी कवण पां केतुला । कवणाचा क जाहला । या निरुतीकरितां बोला । कल्प गेले ॥

१२ सकल तीर्थांचिये धुरे । जियें कां मातापितरें । तया सेवेसि कीर शरीरें । लोण कीजे ॥

१३ देह तंव पांचाचें जालें । हें कर्माचे गुणी गुंथले । भंवतसे चाकीं सूदलें । जन्ममृत्यूच्या ॥

१४ तरी परमात्मा ऐसें । जे एक वस्तु असे । तें जया दिसे । ज्ञानास्तव ॥

१५ म्हणोनि अभ्यासासि कांहीं । सर्वथा दुष्कर नाहीं । यालागीं माझ्या ठायीं । अभ्यासें मिळ ॥

१६ सुवर्ण मणि सोनया । ये कल्लोळ जैसा पाणिया । तैसा मज धनंजया । शरण ये तूं ॥

१७ हरि मुखें म्हणा हरि मुखें म्हणा पुण्याची गणना कोण करी ॥
१८ नित्यनेम नामीं ते प्राणी दुर्लभ । लक्ष्मीवल्लभ तयां जवळीं ॥
१९ हरि उच्चारणीं अनंत पापराशी । जातील लयासी क्षणमात्रें ॥
२० जात वित्त गोत कुळशीळ मात । भज कां त्वरीत भावना युक्त ॥
२१ सायासें करिसी प्रपंच दिननिशी । हरिसी न भजसी कवण्यागुणें ॥

## ( २ ) श्रीनिवृत्तिनाथ :

१ संसार सुफळ हरिनाम उच्चारितां । येऱ्हवीं मरतां अधोगति ॥ १ ॥
संसार असारु श्रीपति साचारु । नामेंवीण पारु न पविजे ॥ २ ॥
हरि हरि म्हणता उतरले पार । दूर्धर संसार तरले र या ॥ ३ ॥
निवृत्तीचा जप हरि हा उच्चार । संसार सागर तारक हरि ॥ ४ ॥

२ भक्तीचें महिमान भक्तांसी फळलें । दिनकाळ केलें ब्रह्मार्पण ॥ १ ॥
ब्रह्मार्पण राम संतोषरुप जाला । ब्रह्मचिरुप केला आपणाऐसा ॥ ध्रु० ॥
सर्व ब्रह्मराम वेदादिक शब्द । आपण गोविंद सर्वांघटीं ॥ २ ॥
निवृत्तीनें ब्रह्म देखिलें परिपूर्ण । माजीं सनातन ब्रह्म सुखें ॥ ३ ॥

## ( ३ ) श्रीसोपानदेव :

गोविंद माधव हा जप आमुचा । नाहीं प्रपंचाचा आम्हा लेश ॥ १ ॥
गोविंद स्मरणें नित्यता पारणें । हरिनाम पठणें मोक्ष मुक्ति ॥ ध्रु० ॥
न लगती तीर्थें एक गोविंद पुरे । वेगी कृष्ण धुरें वोळंगो सदां ॥ २ ॥
सोपान सांगत गोविंद स्मरणें । नित्यता पैं ध्यानें गोविंद ऐसें ॥ ३ ॥

## ( ४ ) मुक्ताबाई :

अलिप्त संसारीं हरिनाम पाठें । जाईन वैकुंठें मुक्तलग ॥ १ ॥
हरिविण मुक्त न करी हो सर्वदां । संसार आपदा भव तोडीं ॥ ध्रु० ॥
आशेच्या निराशी अचेतना मारी । चेतविला हरि आपरुपें ॥ २ ॥
मुक्ताई जीवन्मुक्तचि सर्वदा । अभिन्न पैं भेदा भेदियलें ॥ ३ ॥

## ( ५ ) चांगदेव :

भावें भक्ति करुनी वैराग्य जोडसी । तरि तूं पावसी ब्रह्मसुख ॥ १ ॥
ज्ञानतत्वीं करी करी हा विचार । निर्गुणी आकार निरामय ॥ ध्रु० ॥
चांगया सोय धरी ज्ञान वटेश्वरी । मुक्ताई जिव्हारीं बोधकरी ॥ २ ॥

**( ६ ) नामदेवराय :**

१ संसार सागर भरला दुस्तर । विवेकी पोहणार विरळा संत ।। १ ।।
कामाचिया लाटा अंगीं आदळती । नेणों गेले किती पोहोनिया ।। २ ।।
भ्रम हा भोवरा फिरवी गरगरा । एक पडिले धरा चौऱ्यांशीच्या ।। ३ ।।
नावाड्या विठ्ठल भवसिंधु तारुं । भक्ता पैलपारु उतरीतो ।। ४ ।।
नामा म्हणे नाम स्मरा श्रीरामाचें । भय कळिकाळाचें नाहीं तुम्हां ।। ५ ।।

२ आलेनो संसारा सोडवणें करा । शरण जा उदारा पांडुरंगा ।। १ ।।
प्रपंच न सरे कदां कल्पकोडी । वासनेचि बेडी पडे पायीं ।। २ ।।
व्यर्थ माया देवी गर्भवास गोवी । नश्वर भोगवी नाना योनी ।। ३ ।।
नामा म्हणे पहा विचारुनि मनीं । स्मरावा निर्वाणीं पांडुरंग ।। ४ ।।

**( ७ ) कबीर :**

संतो भाई हारी बीन कोई नही आपना ।। ध्रु० ।।
मट्टी खण खण मेहेल बनाया । मूरख कहे घर अपना ।। १ ।।
आवेगा जमडा लेजावेगा जिवडा । तो नही मेरा कोई तेरा ।। २ ।।
कोई लुटे धन माल खजिना । कोई लुटे जोबन वारा ।। ३ ।।
राम परंपद कोई न लुटे । लुटे कबीर बिचारा ।। ४ ।।

**( ८ ) सूरदास :**

ऐसे संतनकी सेवा कर मन ऐसे संतनकी सेवा ।। धृ ।। शील संतोख सदा ऊर जिनके नाम रामको लेवा ।। १ ।। आन भरो सो ह्रदय नहि जिनके। भजन निरंजन देवा ।। कर० ।। ।। २ ।। जीन मुक्त फिरे जगमाही । ज्यु नादर मुनी देवा ।। ३ ।। जिनके चरन कमलकुं इच्छत । प्रयाग जमुना रे वा ।। कर० ।। ४ ।। सुरदास कर उनकी संग । मिले निरंजन देवा ।। कर० ।। ।। ५ ।।

**( ९ ) मीराबाई :**

हाती घोडा महाल खजीना । दे दवलतपर लातरे । करीयो प्रभुजीकी बात सबदीन । करीयो प्रभुजीकी बात ।। धृ० ।। मा बाप और बेहेने भाई । कोई नहीं आयो सातरे ।। १ ।। मीराके प्रभु गिरिधर नागर ।
भजन करो दीन रात रे ।। २ ।।

**( १० ) कान्होपात्रा :**

नामें दोष जळती । नामें पापी उद्धरती ।। १ ।।
हें आलें अनुभवा । सत्य जीवा प्रत्यया ।। २ ।।

नामें अपार तारिले । नामें जीवन मुक्त केलें ॥ ३ ॥
कान्होपात्रा नाम घेतां । पायीं जडली तत्वता ॥ ४ ॥

**( ११ ) गोरा कुंभार :**

देवा तुझा मी कुंभार । नासी पापाचे डोंगर ॥ १ ॥
ऐशा संतप्तें हो जाती । घडे साधूची संगती ॥ २ ॥
पूर्णकृपा भगवंताची । गोरा कुंभार मागे हेचि ॥ ३ ॥

**( १२ ) नरहरी सोनार :**

देह जन्मला व्यर्थ । झाले पापाचे पर्वत ॥ १ ॥
कांहीं नाहीं तीर्थ केलें । जन्मूनिया व्यर्थ झालें ॥ २ ॥
दान धर्म नाहीं केला । देह मसणवटी गेला ॥ ३ ॥
नरहरी सेवक सद्‌गुरुचा । दास हो साधुसंतांचा ॥ ४ ॥

**( १३ ) सांवता माळी :**

मागणें तें आम्हां नाहीं हो कोणासी । आठवावें संतासी हेंचि खरें ॥ १ ॥
पूर्णभक्त आम्हां ते भक्ति दाविती । घडावी संगती तयाशीच ॥ २ ॥
सांवता म्हणे कृपा करी नारायणा । देव तोचि जाणा असे मग ॥ ३ ॥

**( १४ ) सेनान्हावी :**

१ उदार तुम्ही संत । माय बाप कृपावंत ॥ १ ॥
केवढा केला उपकार । काय वाणूं मी पामर ॥ २ ॥
जडजीवा उद्धार केला । मार्ग दाखविला सुपंथ ॥ ३ ॥
सेना म्हणे उतराई । होतां कांहीं दिसेना ॥ ४ ॥

२ म्हणा हरि हरि । अवघे सकळ नर नारी ॥ १ ॥
येणें तुटेल बंधन । भाग निवारील शीण ॥ २ ॥
प्रेमें घ्यारे मुखीं नाम । हरे सकळही श्रम ॥ ३ ॥
सेना म्हणे चित्तीं धरा । बळकट रखुमाईच्या वरा ॥ ४ ॥

**( १५ ) भागु महारीण :**

१ मी रे अपराधी मोठी । मज घालावे बा पोटी ॥ १ ॥
मी रे तान्हुलें अज्ञान । म्हूण कां देऊं नये स्तन ॥ २ ॥
अवघ्या संतां तूं भेटसी । मी रे येकली परदेशी ॥ ३ ॥
भागु म्हणे विठोबासीं । मज धरावें पोटिसी ॥ ४ ॥

२ आलों तुझ्या दर्शनाशी । भेट द्यावी बा आम्हासी ॥ १ ॥
सर्व संत हो राउळीं । मी रे येकली तळमळी ॥ धृ० ॥
करुणा आईक विठाई । मज बाळा भेटी देई ॥ २ ॥
देव आले हो बाहेरी । मज नेलें खांद्यावरी ॥ ३ ॥

### ( १६ ) श्रीएकनाथ महाराज :

१ सकळ साधनांचें सार । मुखीं नामाचा उच्चार ॥ १ ॥
सकळ तपांचें जें सार । मुखीं नामाचा उच्चार ॥ २ ॥
सकळ ज्ञानाचें जें सार । मुखीं नामाचा उच्चार ॥ ३ ॥
सकळ ब्रह्मविद्येचें जें घर । एका जनार्दनाचें माहेर ॥ ४ ॥

२ संत भलते याती असो । परी विठ्ठल मनीं वसो ॥ १ ॥
तया घालीन लोळणी । घेईन मी पायवणी ॥ २ ॥
ज्ञाती कुळासी संबंध । मज नाहीं भेदाभेद ॥ ३ ॥
भलते ज्ञातीचा । विठ्ठल उच्चारी वाचा ॥ ४ ॥
तेथें पावन देह चारी । एका जनार्दनी निर्धारी ॥ ५ ॥

### ( १७ ) श्री तुकाराम महाराज :

१ सुख पाहतां जवापाडें । दुःख पर्वता एवढें ॥
२ चित्तीं नाहीं आस । त्याचा पांडुरंग दास ॥
३ वैष्णव तो जया । अवघी देवावरी माया ॥
४ देव सारावे परते । संत पूजावे आरते ॥
५ तुका म्हणे करुनि दावी । त्याचे पाय माझे जीवीं ॥
६ विटाळ तो परद्रव्य परनारी । येथुनी जो दुरी तो सोंवळा ॥
७ भाव तैसें फळ । न चले देवापाशीं बळ ॥
८ दया क्षमा शांती । तेथें देवाची वसती ॥
९ आशा बद्ध तो जगाचा दास । पूज्य तो उदास सर्व जना ॥
१० चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती । व्याघ्र हे न खाती सर्प तया ॥
११ पवित्र तो देह वाणी पुण्यवंत । जो वदे अच्युत सर्वकाळ ॥
१२ निश्चयाचें बळ । तुका म्हणे तेचि फळ ॥
१३ तरिच जन्मा यावें । दास विठ्ठलाचे व्हावें ॥
१४ लोकां सांगे ब्रह्मज्ञान । आपण कोरडा पाषाण ॥
१५ बोले तैसा चाले । त्याची वंदावी पाउलें ॥
१६ शुद्ध बीजा पोटीं । फळें रसाळ गोमटी ॥

१७ सत्य संकल्पाचा दाता नारायण । सर्व करी पूर्ण मनोरथ ॥
१८ आंधळ्यासी जन अवघेचि आंधळे । आपणासी डोळे दृष्टी नाहीं ॥
१९ चणे खावे लोखंडाचे । तरीच ब्रह्मपदीं नाचे ॥
२० जरी आलें राज्य मोळविक्या हातीं । तरी तो मागुती व्यवसायी ॥
२१ असाध्य तें साध्य करितां सायास । कारण अभ्यास तुका म्हणे ॥

**( १८ ) श्रीरामदास :**

१ नरदेहाचें उचित । कांहीं करावें आत्महित ।
यथानुशक्त्या चित्त वित्त । सर्वोत्तमी लावावें ॥

२ मुर्खामाजी परम मूर्ख । जो संसारी मानी सुख ।
या संसारदुःखाएवढें दुःख । आणीक नाहीं ॥

३ जो अन्न देतो उदरासी । शरीर विकावें लागे त्यासी ।
मा जेणें घातलें जन्मासी । त्यासी कैसें विसरावें ॥

४ जो संसार दुःखें दुखवला । जो त्रिविध तापें पोळला ।
तोचि एक अधिकारी जाला । परमार्थासी ॥

५ संसार संगें सुख जाहलें । ऐसें देखिलें ना ऐकिलें ॥

६ जो जाणेल भगवंत । तया नांव बोलिजे संत ।
जो शाश्वत आणि अशाश्वत । निवाडा करी ॥

७ देह बुद्धीच्या अंती । सकळांसि एकचि प्राप्ती ॥

८ अक्षरे गाळून वाची । कां ते घाली पदरींची ।
निगा न करी पुस्तकाची । तो एक मूर्ख ॥

९ संसार त्याग न करितां । प्रपंच उपाधि न सांडतां ।
जनामध्यें सार्थकता । विचारेंचि होय ॥

१० गुप्ततेंचि प्रगटवावें । असाध्य तेंचि साधावें ।
कानडेचि अभ्यासावें । निरंतर ॥

**( १९ ) शेख महंमद :**

ऐसें केलें या गोपाळें । नाहीं सोंवळें ओंवळें ॥ १ ॥
काटे केतकीच्या झाडा । आंत जन्मला केवडा ॥ २ ॥
फणसा अंगीं काटे । आंत अमृताचे साठे ॥ ३ ॥
नारळ वरुता कठिण । परी अंतरी जीवन ॥ ४ ॥
शेख महंमद अविंध । त्याचे हृदयीं गोविंद ॥ ५ ॥

ठाणे ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ......... वि ........
ग्रंथांक ......... नोंद दि ........



( २० ) निळोबाराय :

रंगले ते संतसंगें । झाले अंगें शुद्ध बुद्ध ॥ १ ॥
देवचि संत देवचि संत । आणि कांहीं करीत देवचि ते ॥ २ ॥
कैचें तेथें व्यवधान । ब्रह्म सनातन पावविता ॥ ३ ॥
निळा म्हणे न लभे देवा । आणिती भावा त्या संत ॥ ४ ॥

( २१ ) वामन पंडीत :

हरिचरण सरोजीं चित्सुधासारपानें ।
भ्रमर परमयोगी गुंजती नाम गानें ॥ १ ॥
हरति सकळ दुःखें, हीं सुखाची निधानें ।
वद वद वद जिव्हे ! वासुदेवाभिधानें ॥ २ ॥

( २२ ) रामकृष्ण परमहंस :

१ ईश्वर त्याचे शब्द आणि त्याचे भक्त हे सर्व एकच आहेत.

२ अध्यात्मिक विषयाकडे ओढा असलेल्या लोकांची सामाजिक वर्णव्यवस्था किंवा बंधन यांना न जुमानतां एक निराळीच जात बनते. वर्णाश्रम बंधनें निरनिराळीं असलीं तरी पारमार्थिक वृत्तीच्या माणसांची एक निराळीच जात असते.

३ हे माते ! मी मोठा आहे, मी ब्राह्मण आहे आणि ते नीच महार आहेत इत्यादि सर्व भावना माझ्यांतून नाहींशा कर. कारण ते निरनिराळीं स्वरुपें धारण करणाऱ्या तुझ्याशिवाय दुसरे कोण आहेत.

४ ज्याच्यापाशीं श्रद्धा आहे त्याच्या जवळ सर्व कांहीं आहे. ज्याच्यापाशीं श्रद्धा नाहीं त्याला प्रत्येक वस्तूची वाण असते.

५ या कलियुगाला योग्य, खरी उपासना, आणि आध्यात्मिक अभ्यास म्हणजे प्रेमरुप ईश्वराच्या नामाचा अखंड जप हाच आहे.

( २३ ) स्वामी विवेकानंद :

१ प्रत्येक व्यक्तीमध्यें दिव्यत्व आहे. म्हणून आपल्या हीन दीन परित्यक्त अशा देशबांधवांची सेवा हीच ईश्वराची सेवा हे लक्षांत ठेवा. जगांतील लुळे-पांगळे, दीन-दरिद्रि, वेडे आणि खुळे, रोगी आणि महारोगी, पतित आणि पातकी हे सर्व आपल्या मुक्तीसाठींच निर्माण झालेले आहेत. त्यांची सेवा करण्याची तुम्हाला संधि मिळाली म्हणून ईश्वराचे आभार माना. सर्व जग प्रकाशमय करून सोडा.

२ खऱ्या धर्माचा लोप झाला. वेडगळ रूढी बळावल्या. समुद्र-प्रवास करूं नको, या लोकांना शिवूं नको. त्या लोकांच्या पंक्तीला बसूं नको, मंगळवारी रुसूं नको, शनिवारी हसूं नको, असल्या आचरट आज्ञा धर्माच्या नांवाखालीं थैमान घालूं लागल्या. राष्ट्रधर्माचा लोप झाला म्हणून आपण सातशें वर्षे गुलामगिरींत पडलों. व्यभिचारासारखीं अघोर पातकें केलीं तरी आपली जात बिघडत नाहीं, पण खाण्यापिण्यांत जात बिघडते. हें सर्व बदललें पाहिजे. आपले प्रचारक युरोप आणि अमेरिका येथें पाठविले पाहिजेत.

३ पूर्वी हिंदुस्थानावर माझें निरतिशय प्रेम होतें. आज माझ्या मायभूमींतील नुसता रजःकणही मला पवित्र वाटतो. हिंदुस्थानासारखें पुण्यक्षेत्र जगांत नाहीं असें मला वाटतें.

४ पायाखालीं तुडविले गेलेल्या लक्षावधि गरीब लोकांना मुसलमानांच्या राज्यांत सुखाचे दिवस दिसले. आपल्यापैकी एकपंचमांश प्रजा मुसलमान कां झाली ? त्याचें कारण हेंच होय. केवळ तरवारीच्या धारेनेंच मुसलमानी धर्माचा इतका प्रसार येथें झालेला नाहीं. जाळपोळ आणि कापाकापी या साधनांनीं मुसलमानी धर्म येथें इतका फैलावला असें म्हणणें मूर्खपणाचें आहे. पूर्वीच्या प्रमाणें एक पंचमांश लोक मुसलमान झाले, त्याप्रमाणें एकपंचमांश काय पण अर्धे लोकहि ख्रिस्ती होतील. असें होऊं नये अशी खबरदारी तुम्हीच घेतली पाहिजे. मलबारांत ज्या रस्त्यांतून एखादा उच्चवर्णीय ब्राह्मण जात असेल त्यावरून एखाद्यां महाराला जाण्याची परवानगी तेथें नाहीं. पण तेच त्यानें एकादें वेडेवाकडें इंग्रजी नांव घेतलें किंवा तोच उद्यां एकादा हुसेनमिया झाला कीं त्याचा सारा विटाळ नष्ट होतो.

मुसलमान लोक हिंदुस्थानांत प्रथम आले त्यावेळीं हिंदूंची संख्या साठ कोटी होती असें फेरिस्तानें कोठेंसें म्हटल्याचें मला आठवतें. आपल्या धर्मांतून बाहेर जाणारा प्रत्येक मनुष्य आपणास मुकतो. एवढेंच नव्हे तर उलट आपल्या शत्रूंच्या संख्येत भर घालतो.

## ( २४ ) श्री गोंदवलेकर महाराज :

१ भगवंताचें स्मरण करावें म्हणजे प्रपंच सोपा जातो.

२ नामांत एका आनंदाशिवाय दुसरें कांहीं नाहीं.

३ भगवंताच्या स्मरणामध्यें अभिमानाचें मरण आहे.

४ बाईला मूल झालें कीं त्याच्यावर ती आपोआप प्रेम करते. तसें नाम मुखीं आलें कीं सत्कर्में आपोआपच होऊं लागतात.

५ नाम हें प्रारब्धानें येत नाहीं आणि कर्मानें जात नाहीं.

६ प्रपंचाच्या गर्दीमध्यें भगवंताचें स्मरण ठेवण्यासाठीं उत्सव, सण वगैरे असतात.

७ कधीं चुकणें, कधीं बरोबर येणें याचेंच नांव अभ्यास होय.

८ प्रपंचांत ज्याला विश्वास म्हणतात त्यालाच परमार्थात श्रद्धा असें म्हणतात.

९ काळजी करणें म्हणजे भगवंतावर भरंवसा नसणें होय.

१० संतांची आज्ञा पालन करणे म्हणजे संत सेवा होय.

११ अभिमान रहित राहिल्याशिवाय भक्ति करतां येणार नाहीं.

१२ जेथें आळस माजला तेथें परमार्थ बुडाला.

१३ श्रद्धा हें परमार्थाचे भांडवल आहे.

१४ जो जिवंतपणीं वासनारहित राहिला त्याला सुखदुःख नाहीं.

१५ प्रत्येकाला प्रपंचाची अत्यंत जरुर आहे. पण आपण त्याला वाजवीपेक्षां जास्त महत्व देतों व त्यामुळें सर्व बिघडतें.

## ( २५ ) गुरुवर्य शं. वा. दांडेकर :

१ विष्णुदासांचें कार्य फार मोठें आहे. तें दुसरा कोणी करूं शकत नाहीं.

२ संत हे काळें शरीर गोरे करीत नाहींत, तर सूक्ष्म बदलवितात, दुष्ट वासना घालवितात. त्यांच्या सहवासानें देह तादात्म्य नष्ट होतें.

३ ज्याला केवळ दुःखाचाच अनुभव असतो तो जगाकडे चांगल्या दृष्टीनें पाहूं शकत नाहीं. साधुसंतांना जगानें त्रास दिला तरी ते कारुण्यानेंच जगाकडे बघतात.

४ आपल्या शास्त्रांनीं व्यक्ति, समाज इत्यादि सर्वतोपरीनें विचार करून कर्मे ठरविलीं आहेत. पण तितका सूक्ष्म विचार लोकांत नसल्यामुळें रुढी वाढल्या आणि पुढें त्यानांच महत्त्व आलें.

५ काव्य, तत्वज्ञान आणि अनुभव यांचा परिपाक म्हणजे संत वाङ्मय होय.

६ संत वाङ्मय म्हणजे नुसतें तत्वविवेचक ग्रंथ नव्हेत, तर तें ईश्वर दर्शन आहे. त्याचा अनुभव घेण्यासाठीं संतच हवेत.

७ पाषाण हृदयी खळाला सुद्धां पाझर फोडणारें त्रैलोक्यांतील स्थान म्हणजे पंढरी होय.

८ पंढरींत देव निजलेला नाहीं. निजलेला मनुष्य काम न करण्याचाच संभव अधिक. देव बसलेलाही नाहीं, उभा आहे. तो दुसऱ्याला काम सांगितलें तरी

" त्यांना पडूं द्या हो ! मी आतां करून येतों " असें म्हणतो. देवाच्या उभें राहाण्यांत भक्ताचें काम करण्याची उताविळता दिसते.

९ लोकांना शंकराचार्य नकोत. ज्ञानोबा, तुकोबा यापैकीं कोणी नकोत. कारण ते वैराग्याचा उपदेश करतात प्रपंचांत ऐश्वर्य कसें वाढेल तें सांगणारा त्यांना हवा आहे.

१० सध्यां माणसांचीं मूल्यें बदलूं लागली आहेत. लोकांना लुबाडून जो श्रीमंत होतो, तो हुशार मानला जातो आणि सदाचारानें राहून जो गरिबींत दिवस काढतो, तो बावळट ठरतो.

११ सध्यां नीति-अनीति लोक मतानें ठरूं लागली आहे. वास्तविक ज्याच्यावर भगवंताचा प्रसाद झाला आहे तो सांगतो तें शास्त्र.

—मननीय बोल

संग्रा० **रामदासबोवा मनसुख**

## ( २६ ) पुरंदरदास :

अस्पृश्य गांवांत राहात नसून ते गांवाबाहेर राहातात असें कोणी व कां म्हणावें ? आपल्या धन्याविरुद्ध कट करणारा नोकर अस्पृश्य होय. घेतलेलें ऋण न फेडणारा अस्पृश्य होय. आदरणीय व पूज्य तसेंच वडिलधाऱ्या मंडळींना नमस्कार न करणारा अस्पृश्य होय; आणि विठ्ठलाचा कधीं विचारहि न करणारा हा खरोखर दुसरा अस्पृश्य होय.

# अभंगांची वर्णानुक्रमणिका

## चोखोबाराय

### अ


अखंड नामाचें १८८
अखंड माझी ९६
अखंड समाधी होऊनी २३१
अखंड चिंतन २१५
अखंड तें चित्त वेडावलें ३२६
अखंड समाधी नामाच्या २७१
अगाध हे कीर्ति १४०
अगाध भूवैकुंठ ३४
अंगिकार करी २८
अधिकार माझा १०९
अनादि निर्मळ १
अनाम जयासी ७
अनाथाचा नाथ ५०
अनुभवे सार ३२१
अवघा आनंदराम १९९
अवघा प्रेमाचा १५
अवघ्या साधनाचें १९२
अवघी पंढरी भूवैकुंठ ६५
अवघ्याची लोभें ३०७
अवघें वाळिलें १२३
अवघें वर्म कळलें ३११
अवघें मंगळ तुमचें १०७
असेंच करणें होतें ८३
असोनि नसणें या नांव २२७
असोनि नसणें संसाराचे २२५
असंग हा संग ३२७
अहो करुणाकरा १२६
अहो पतितपावना १३३
अहो पंढरीराया १४७


### आ


आई रखुमाई आठवे २९९
आणिक दैवतें देती १८
आणिकाचे आणिक १६३
आजि दिवस धन्य २१८
आजि सोनियाचा ३१६
आतां कणकण न १४४
आतां कासया हा १४८
आतां कोठवरी भीड १०१
आतां कोठवरी करूं १२४
आतां नको भरोवरी १०६
आतां माझा सर्व २०२
आतां याचा अर्थ (संग) १४६
आतां याचा छंद १६१
आन साधनें सायास ९५
आनंदे वाजवावी २१०
आगणचि नटले ३३
आपुला विचार २४७
आपुल्या आपण १३९
आपुल्या स्वहिता २१४
आपुलिया सुखा २५
आपुलें आपण ३२४
आमुचा आम्ही केला २७६
आमुची भावना २९१
आमुचें संचित १९४
आम्हां अधिकार १८४
आम्हां आनंद ८०
आम्हां न कळे १८३

आम्हां तो न कळे १७४
आम्हांसी हा संसार २६३
आम्ही कोणावरी ९४
आला नरदेही पाही २४५
आला सुखें पंढरिसी ३५
आवडीचें प्रेम नामया ४८

इ

इतकेचि देई रामनाम १२१
इनामाची भरली पेठ ५६

उ ऊ ओ

उतरले सुख चंद्रभागे ३१
उदंड नागवले २६०
उपजले विटाळी २८०
उघडोनी वेदार्थाचा ३३७
उदार हा पंढरीराव ४९
उदंड शाहणे होवोत २६४
ऊंस डोंगा परी रस २४०
ओंगळ वासना १०८

ए ऐ

एकदां ऐसे नवल २८५
एकवेळां करी १५९
एक वेळा पंढरी ७०
एकाची फजिती २६६
एकांती बैसोनी १६४
ऐसा आवडी २९४
ऐसा पुत्र दे ८९

क

कर्मीतें वाळिलें ८१
करणेची नाहीं ३३४
करितसे धांवणें ३९
करीसूत्र शोभे १९
करोनिया दया १०२
कवणावरी आतां १२३
कवतुक गोकुळी ७५
कशासाठीं आतां २५४
कशासाठीं तुम्हां ११३
कळेल तैसे बोल १३४
काम क्रोध लोभ १७५
काम क्रोध वैरी १६७
काय जाणो १७७
काय दुकाळे २८७
काय पाहूं काय ३१३
काय मानूं आतां १५६
काय वानूं तुमचे ४५
काय हें दुःख १७१
काय हे मातेसी ११६
काया ही वाउगी १५८
कासया मानिसी १६५
कासया करूं तपाचे १६९
काळाचा विटाळ २८३
कांहीं तरी अभय १४३
कां हो केशीराजा १११
किति किति १५०
किती किती वाण ३३०
किती धांवा धांवी १२५
किती या हाटासी ३२९
केला अंगिकार १८५
केधवा सुटेन ऐसें ३०१
केलासे कुढावा ४०
कैचा हा हाट ३३२
कैसा मी वानूं १५५
कैसा या लोभे ३४१
कोण तो सोंवळा २८१
कोण माझा आतां १२८

कोण जाणे यांचे ३६
कोणी पंढरिसी जाती २१७
कोणाचा संग धरू ३३५
कोणासी सांकडें १९८
कोणासी हें वर्म न ७६
कोणे देखियलें जग २३८
कोठें एक कोठें ६७
कोपटी तळपती ३४४

ग

गणिका अजामिळें १८९
गातां नाम विठ्ठलाचें २०४
गोणी भरियेले रितीया ३२८
गोजिरें साजिरें श्रीमुख १७
गोधनें चारी गोपाळा ७७

घ

घरदार वोखटें अवघें २४३
घरहि झाडणें साळीहि २८६
घेतिलासे भेव। आतां १०४

च

चोखट चांग चोखट १४
चंदनाचे संगें २२९

ज

जगामध्यें दिसे बरें १३७
जनक तूं माझा ८४
जन्माची वेरझारी ९२
जन्माचें सांकडें २५५
जन्मला देह २२६
जन्मोजन्मीचे तुम्ही १७२
जया जे वासना तेचि २१
जया जे वासना तया २७३
जयाची वासना जयापरि ७२
जयाचिया साठीं ११९
जगालागीं करिती ३८
जयालागी तप ३७
जयासाठीं उगाचि ५४
जाणते असोनी नेणतें ६०
जिकडे पाहे तिकडे ११४
जिवीचा जिवलग १७६
जें कांहीं करितों १५३
जें नेणतें ना १५१
जें मन गांजलें ३११
जो वेदासी आकळ ४७
जो न कळे वेदां ५१
जोहार मायबाप जोहार ३४३
जोहार मायबाप जोहार। मी विठोबा ३४५
ज्या कारणें वेद श्रुति २६
ज्या सुखाकारणें योगी २४
ज्याचे वर्णिता पवाडे ४४

ट

टाळी वाजवावी गुढी ५७

ड

डोळियाचा देखणा २३३

त

तुटला आयुष्याचा २३२
तुमच्या चरणी जे ११०
तुमच्या कृपेचें १६६
तुम्ही आतां १०३
तुम्ही तो सांकडें २५०
तुम्ही वाढविलें १००
तुम्हासी शरण ९३
ते माझे सोयरे २२२
त्रैलोक्य वैभव १८०

**द**

| | |
|---|---|
| दुःखरूप देह | २३६ |
| देखिला देखिला योगियांचा | ३ |
| दुर्लभ होतें तें सुलभ | ३२ |
| देव म्हणे नारदासी | २४२ |
| देव हा उभा | ६८ |
| देवा कां हें सांकडें | ९९ |
| देवा तुम्ही उदार | १६८ |
| देवा नाहीं रूप | ७८ |
| देहबुद्धी वेगळें | २३५ |
| देहांत अवसान | ३०२ |
| देहीं देखिली पंढरी । विठू | २३० |
| देहीं देखिली पंढरी । आत्मा | २३७ |

**ध**

| | |
|---|---|
| धरोनिया आशा | १३२ |
| धरोनी विश्वास | १०५ |
| धन्य धन्य नामदेव | ३१५ |
| धन्य धन्य नामदेवा | ३०८ |
| धन्य धन्य महाराज | ३३९ |
| धन्य पुंडलिक सखा | ५३ |
| धन्य सभाग्य नर | २२३ |
| धांव घाली विठू | ८२ |
| धिक् तो आचार | २२८ |
| धीर माझे मना | ११८ |

**न**

| | |
|---|---|
| न करी आळस | ६१ |
| न करी सायासाचें | २५१ |
| न करी न करी आणिक | ३१७ |
| न करी न करी कांहीं | २११ |
| न म्हणे याति | २९२ |
| न लगे भुक्ति | १५४ |
| न सुचे कांहीं | १५७ |
| नको मज मान | ९७ |
| नवल पाही नवल | ७९ |
| नव्हे तें कैसें | ३१८ |
| नाम हें सोपें | १९० |
| नामाचें सामर्थ्य न | २०६ |
| नामाचें सामर्थ्य विष | १८७ |
| नामाचें चिंतन | २०८ |
| नामाचा महिमा | २०९ |
| नामदेवा हातीं | २८८ |
| नामदेवें आजि | ३३१ |
| नारायण नाम सुलभ | ४१३ |
| नाशिवंता साठीं | १८२ |
| नाहीं देहशुद्ध याति | १२७ |
| निगमाचे शाखे | ६ |
| निर्गुणा अंगीं | २४६ |
| निचाचे संगती | २७८ |
| नेणते तयासी | ७४ |
| नेणपणें मिठी | २५७ |
| नेणों काय आवडी | २६२ |
| नणों कोणें काय | २५३ |
| नेणो तुमचें मन | १४२ |
| नेत्रीं अश्रुधारा | ८६ |

**प**

| | |
|---|---|
| पाहतां पाहतां | १६ |
| पाहतां पाहाणें | ३१४ |
| पाहा नामयाचे | २९३ |
| पाहा लाघवी | १४९ |
| पाहा हो वैकुंठनिवासी | ४३ |
| पाहा क्षीरसागरीचा | ५५ |
| पांडुरंगी लागो मन | २३९ |
| पुंडलिकें सुख | ६४ |

पुढें आतां मज ३४७
पंचही भूतांचा २७९
पंधरा सतराचा हो ३४२
पंढरी पंढरी वाचे ७१
पंढरीचें सुख ५९

फ

फुलाचे अंगीं सुवास २३४

ब

बरें झालें येथें १४५
बरें हें वाईट १३०
बहु कनवाळु होसी १२९
बहु जन्म बहु फेरे १७८
बहु दुर्लभ होतें ३२०
बहु भुलवणा बहु ४६
बहु मत ग्रंथ ४१
बहु हिन याति देह ३२२
बहुत कनवाळु बहु हा २०
बहुत हिंडलों देश ६६
बहुतांचे धांवणें २२
बहुत प्रकार बहुत २९६
बावरलें मन करी ११७
बावरे मन रात्रंदिवस २५८
बोल जो बोलता ३१०
बैसोनि निवांत २५६
ब्रह्मादिका भाव ३०५

भ

भाक ( भाव ) समुद्री २४१
भक्तांच्या कैवारा २८४
भक्तांचिया लोभा २३
भक्ति भाव मज ३०४
भेदाभेद कर्म १७९
भवदुःख हरण नाम २१२
भवाचें भय न १९६
भवाचिया भेणें ८५
भाविकांच्या लोभा २७
भ्रमण करितां ९१

म

मजचि कां कारणें ११५
मज तो नवल २९
महादोष राशी पापाचे १९१
महाविष्णूचा अवतार ३३८
माकडाचे परी २६७
माझा तव अवघा ९०
माझा तो समय ३०३
माझा मी विचार १३६
माझा शिणभाग २२०
माझ्या तो मनें १९३
माझ्या मना तूं २२१
माझी तूं माऊली ३४६
माझें सुख मज ३०९
माझें मज हें १६०
मागें तुम्ही कोणा १७०
मागें बहुतांनी २६१
मागें बहुतानें हेचि २७४
माया मोह जाळे १२२
मी तो विकलों १३८
मुळांचा संचला १०
मोकाट हें मन ३०६
मोकाटाचे परी ३२५
मोहळा मक्षिका २०१

य

याचिया छंदा २५९
यातिहीन मज ८७

| | |
|---|---|
| योग याग जप | २०७ |
| योग याग तप व्रत | १८६ |
| येणे जाणे दोनी | २०५ |
| येथें तो दुःखाचे | २९८ |
| येथें तो संग आहे | २९५ |

**र**

| | |
|---|---|
| राम हीं अक्षरें | १९७ |
| रात्रंदिवस पडिलों | २९७ |
| राहिली वासना | ३४८ |
| रुदन स्फुंदन | ३०० |

**ल**

| | |
|---|---|
| लावण्याचा गाभा | ५२ |
| लिहीलें संचिती | २५२ |

**व**

| | |
|---|---|
| वाढलें शरीर | २२४ |
| वायां हांव भरी गुंतले | २४९ |
| वायां हांव भरी नका | २४८ |
| वारंवार किती करूं | १३५ |
| वारी पंढरीची तोची | ६९ |
| वासुदेव दिंडीगान | ३४९ |
| विठ्ठल विठ्ठल गजरी | ५८ |
| विठोबा पाहुणा आला | १३ |
| विपरीत हे कहाणी | ३१२ |
| विषयाचे लोलंगित | २६९ |
| वेदासी विटाळ | २८२ |
| वेध कैसा लागला | २१९ |
| वैकुंठ पंढरी | ६२ |
| वैकुंठ सोपें | २८९ |
| वोखटें गोमटें | २०० |
| व्यापक व्यापला | ४ |

**श**

| | |
|---|---|
| शरणांगता मोकलिता | १७३ |
| शीणले वेद चारी | २९० |
| शुद्ध चोखामेळा | ७३ |
| शुद्ध भाव शुद्ध मती | २७७ |

**श्र**

| | |
|---|---|
| श्रवणाचे श्रवण | ५ |
| श्रीमुख चांगलें | ११ |
| श्रीमुखाची शोभा | ३० |
| श्वान अथवा सूकर | १२० |

**स**

| | |
|---|---|
| सकळा आगराचे | ८ |
| सप्रेम निवृत्ति | २१६ |
| समर्थासी रंके | १४१ |
| सरळ वाकुडें | २०३ |
| सर्वेहि सुखाचें | २ |
| साच जें होतें | ११२ |
| सांज झाल्यावरी | ३३३ |
| साधन तें एक | २६८ |
| सुख पहावया | २७२ |
| सुख अनुपम | ३३६ |
| सुखाकारणें करी | १९५ |
| सुखाचा सुखराशी | ६३ |
| सुखाची सुखराशी आम्हासी | २७० |
| सुखाची मिराशी | ४२ |
| सुखाचें जें सुख | १२ |
| सुखाचिया लागी | १३१ |
| सुखें पंढरीराया | १५२ |
| सुंदर मुख कमल | ९ |
| सोस हा बहुत | १६२ |

संतांचा अनुभव २४४
संसाराचें नाहीं भय ९८

स्त्र

स्त्री पुत्र धन २६५

ष

षड्रस् पक्वान्न २७५

ह

हातिच्या कांकणा १८१
हीन याती माझी ८८

ज्ञ

ज्ञानेश्वर नामें ३४०

## कर्ममेळा

अखंड तें मन १
आजिवरी धरली आस ११
आणिक वासना २७
आतां येथवरी १७
आपण वाढवावें २२
आमुचा बाप तुझा ३
आमुच्या बापाचें २०
आमुच्या बापाच्या पुण्याचिया ९
आमुची केली हिन ५
आहेसी ठाउका मागा २१
उचित अनुचित ८
कशासाठी पोशियलें ४
चोख्यासाठीं देवें ७
जरी तुम्हा उबग २३
जें जे दिसे २५
झालों परदेशी १६
तुमचा तो कळला १२
तुमच्या संगतीचें ६
न कळे न कळे १४
नाहीं मी मागत २४
नेणता म्हणोनी १३
पाळिलों पोसिलों १०
बहु अपराध १८
भरंवसा मानिला १५
साधनाच्या कांहीं २
सुख दुःख १९
संतांची संगती २६

## बंका महार

आधींच निर्मळ वदन ५
आपुल्या भक्तांचा २६
आपुलिया क्रीदा ९
आम्ही तो जातीचे ३४
इतुक्यामाजी चोखा ३६
उपाधीच्या भेणें ११
एके एकादशी २१
कासया गा मज १०
कोण भाग्य तया २५
कौतुकें आनंदें ३७
गोकुळीं लाघव २७
चरण मिरवले १
चोखा चोखट १९
चोखियाचे घरा आले ३०
चोखियाचे घरीं चोखियाची २९
चोखियाचे घरीं नवल ३९
जें सुख ऐकतां ४
तुळसी वृंदावनी ३१
न कळे योग याग १४
न कळे वो माव ६
न पुसता गेला ३८
नाहीं प्रेमभाव १२
पहा हो नवल २४

...ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम.... ........... वि ..........
...... ......... ता. ठि.........

पांडुरंगा वाचोनी २२
प्रेमाचा पुतळा २
भक्तांची आवडी २३
भांवावोनी प्राणी १३
भोळ्या भाविकांसी १७
मग पंढरीराणा ३२
मनाचेनि मनें १५
येणें जाणें दोनी ७
येरी म्हणे मज ३५
वासना उडाली २८
सांवळे सगुण उभें ३
सुखाचा सागर २०
सोयराइनें मनीं ३३
संसार दुःखें ८
हीन याती पतीत १६
ज्ञानियाचा राजा १८

## निर्मळा

अनंता जन्मांचे ९
अनाथाचा नाथ १८
आजिवरी तुम्ही २१
आतां बहु २२
आनंदे वोविया २४
ऐकोनिया मात १३
ऐसें आनंदानें १५
कां बा पंढरिराया १९
कां हो पांडुरंगा ६
कृपेच्या सागरा ३
चहूंकडे देवा ४
चोखा म्हणे १६
जीवींचें सांकडें ७
तिही त्रिभुवनी १
तुमचा भरंवसा २३
न होई पांगिला ११
नाहीं मज आशा ८
परमार्थ साधावा १०
मज नामाची आवडी २
रात्रंदिवस मन २०
वडील तूं बंधु १४
सुख अणुमात्र ५
संसाराचे कोण १७
संसाराचे भय १२

## सोयराबाई

अवघा रंग एक ६
अवघे सुखाचे २१
अहो पंढरीच्या राया १
आजि माझा सर्व ५७
आणिक देवाचें ४०
आनंद सोहळा १९
आमची तो दशा २५
आमुचें सुख दुःख ३३
उदारा पंढरीराया ५६
उपजता कर्ममेळा १५
उपाधी भक्तांपाठीं ३
ऐशा आनंदांत ६०
ऐशा आनंद सोहळा ५९
कळिकाळ कांपे नाम ४८
कां बा उदास २९
किती किती बोलूं ३०
किती शिणताती ३१
किती हे मरती ५०
किती हें सुख ४९
कोण दुजा वारी ५४
कोण या पांगिला २४
गर्जती नाचती १८

| | |
|---|---|
| चोखानिर्मळा | ६१ |
| चोखा बैसतां समा | ५८ |
| जन ते आंधळे | १० |
| जयाचिये वाचे | ४७ |
| जें तुम्हा कळे | २६ |
| टाळ दिंडीचा गजर | १७ |
| देखोनी आंधळे | ५२ |
| देहासी विटाळ | ७ |
| दोघी बैसल्या | १४ |
| नवल पाहा नामाचें | ४५ |
| नामाचा भरंवसा | ३८ |
| नामाचें चिंतन करा | ३९ |
| नामाचें चिंतन अखंड | ४१ |
| नामेंचि तरले नर | ३७ |
| नामेंचि पावन | ४२ |
| नाहीं उरली वासना | ५ |
| निर्मळेसी करितां | १६ |
| पुसोनी सर्वांसी | ६२ |
| पंच महापातकी | २३ |
| पंचही भुतें अवघा | ५१ |
| पंढरीचें ब्राह्मणे | २० |
| बहुतां परी वानि | ५५ |
| बैसोनी एकांती | १२ |
| माझें मन तुमचे | २८ |
| माझें माझें म्हणूनी | २२ |
| माय तूं माउली | ८ |
| याचिये संगती | ५३ |
| येई येई गरूडध्वजा | २ |
| येई वो विठ्ठले | २७ |
| वाऊगें घरदार | ११ |
| शिणल्या भागल्याचा | ३४ |
| शीण वाटतसे मना | ९ |
| सदां सर्वकाळ | ४३ |
| सलगीनें बहु | ३२ |
| सुखाचें हें नाम | ४४ |
| सुलभ सोपें | ४६ |
| सोयरा म्हणे पती | १३ |
| संतांसी तो खूण | ३५ |
| हीन दीन म्हणोनी | ३६ |
| हीन मी काय | ४ |

REFBK-0017373